कंकुबाई पाठ्य पुस्तकमाला
महावीर ब्रह्मचर्याश्रम कारंजा
प्रकाशन १६ वे

॥ श्री ॥

श्रीमद् वादीभसिंहसुरिविरचित

# क्षत्रचूडामणिः

(नीतीचे अपूर्व सरस आणि सुरस काव्य)
(संस्कृत शब्दांचे अर्थ, टीप्पणि आणि कठीण श्लोकांच्या अन्वयासहित)

ग्रंथमाला संपादक
पं. धन्यकुमार गंगासा भोरे B.A.L.L.B.

अनुवादक
पं. नरेन्द्रनाथ जयवंतसा भिसीकर न्यायतीर्थ, कारंजा

महावीर निर्वाण संवत् २५२९
महावीर निर्वाण तिथि आश्विन व. ३० दि. ४/११/२००२

प्रकाशक – कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा

❀ पुस्तके मिळण्याची ठिकाणे :–

१. महावीर ग्रंथ भांडार
महावीर ब्रह्मचर्याश्रम
कारंजा, जि. वाशीम ४४४ १०५

२. भरतेश ग्रंथ भांडार
बाहुबली ब्रह्मचर्याश्रम
बाहुबली जि. कोल्हापूर ४१६ ११०

३. पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम
मु. पो. स्तवनिधी जि. बेळगाव (कर्नाटक)

४. पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल
मु. पो. वेरूळ जि. औरंगाबाद

५. जीवराज ग्रंथमाला
संतोषभवन, फलटणगल्ली, सोलापूर ४१३ ००२

६. श्री. नेमचंद पद्मासा अर्पल
कुंदकुंदनगर, सिडको बस स्टॉपजवळ, औरंगाबाद

❀ प्रकाशक
कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा

❀ द्वितीय आवृत्ती

❀ आश्विन वद्य ३०
महावीर निर्वाण संवत २५२९
ता. ४/११/२००२

❀ मुद्रक
नारायण ऑफसेट वर्क्स
२२४, टिकेकर रोड, धनतोली, नागपूर - १२
फोन : ५२२६४२

❀ मूल्य २० रुपये

☸ पुस्तके मिळण्याची ठिकाणे :–

१. महावीर ग्रंथ भांडार
महावीर ब्रह्मचर्याश्रम
कारंजा, जि. वाशीम ४४४ १०५

२. भरतेश ग्रंथ भांडार
बाहुबली ब्रह्मचर्याश्रम
बाहुबली जि. कोल्हापूर ४१६ ११०

३. पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम
मु. पो. स्तवनिधी जि. बेळगाव (कर्नाटक)

४. पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल
मु. पो. वेरूळ जि. औरंगाबाद

५. जीवराज ग्रंथमाला
संतोषभवन, फलटणगल्ली, सोलापूर ४१३ ००२

६. श्री. नेमचंद पद्मासा अर्पल
कुंदकुंदनगर, सिडको बस स्टॉपजवळ, औरंगाबाद

☸ द्वितीय आवृत्ती

☸ मूल्य २० रुपये

☸ आश्विन वद्य ३०
महावीर निर्वाण संवत २५२९
ता. ४/११/२००२

# संपादकीय मनोगत

श्री. जीवंधर कुमार हे या हुंडा अवसर्पिणी काळातील अंतिम कामदेव होते. शरीर सौंदर्यापेक्षाही आत्मिक सौंदर्य अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे होते. क्षत्रियांचे तेज मोक्षमार्गस्थ श्रमणांची शांति या दोहोंचाही गोड संगम होता. राज्यप्राप्तीचा ऐहिक पुरुषार्थ जसा सफल झाला तसाच मोक्षमार्गाचाही–रत्नत्रयाचाही पुरुषार्थ स्वाभाविकतःच पराकोटीचा होता. त्यामुळे ऐहिक सुखाची परमावधी आणि लोकोत्तर सुखाचे अत्युच्च शिखर मोक्ष दोन्ही सहजगत्या हस्तगत केले.

या महापुरुषांची जीवनकथा आ. श्री. वादीभ-सिंहसूरींनी दोन ग्रंथामध्ये निवेदन केली आहे. त्यातील एक गद्यचिंतामणी हा ग्रंथ साहित्य, प्रगल्भ भाषा, अलंकार व जीवनाचे सौंदर्य व शिव टिपणारी सरस कृती आहे. त्याची तुलना कवि बाणभट्टाच्या 'कादंबरी'शी होऊ शकते त्याचे साहित्यिक मूल्य फार श्रेष्ठ आहे. भाषा प्रौढ व अलंकारिक आहे. सामान्य लोकांच्या आकलनाच्या पलिकडे आहे.

याची त्यांना कल्पना असावी. म्हणून ती जीवितकहाणी सर्व सामान्याच्या आटोक्यात असावी आणि सर्वांना प्रेरक असावी म्हणून 'क्षत्रचूडामणि' या नावाने तीच जीवित कहाणी अत्यंत सरळ व सोप्या भाषेत रचली आहे; अकरा लंब व ७४७ अनुष्टुप छंदामध्ये ग्रथित केले आहे. त्यामध्ये अर्ध्यापेक्षाही कमी छंदामध्ये कथा ग्रंथित केलेली आहे. अर्ध्यापेक्षा थोड्या जास्त भागामध्ये धर्मतत्त्व, श्रावकाचार व नीतितत्त्वाची सर्वत्र पखरण केलेली आहे. त्यामुळे कथा जशी रोचक आहे तशीच ती प्रेरकही झालेली आहे. त्यांत एवढ्या संक्षेपाने कथा किती रोचक होऊं शकते याचा विद्वानांना प्रत्यय येईल आणि धर्मस्वरूप, व्यसनाचे व विषयसेवनाचे रौद्ररूप आणि भीषण परिणाम. व्यावहारिक नीति ठसविण्यातील चातुर्य पाहून सर्वांना प्रसन्नता वाटेल व सर्वांना जीवनाच्या उन्नयनाला प्रेरक होईल. अशा रीतीने हा ग्रंथ मुमुक्षूंना सहजच जीवनातील मांगल्याचा बोध करून देवून कल्याणमार्गाची प्रेरणा देईल.

त्याची प्रथम आवृत्ती कंकुबाई पाठ्यपुस्तकमालेतर्फे ७० वर्षापूर्वी १९३४ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. ती संपूनही आज ३५ वर्षे लोटलेली आहेत. तेव्हा असा सुंदर चरित काव्यग्रंथ बऱ्याच दिवसापासून मुमुक्षूंना उपलब्ध नव्हता. तो प्रकाशित व्हावा ही समाजाची मागणी होती. त्याची पूर्तता आज

इतक्या उशीरा होत आहे हे अत्यंत प्रसन्नतेचे कारण आहे.

मराठीभाषी मुमुक्षूंना जैनतत्त्वज्ञान व जैन कथेचा रसास्वाद घेता यावा, जैन साहित्य घरोघरी पोचावे या प्रयोजनाच्या प्रधानतेने अनेक उदारचेता श्रावकांना धर्मबुद्धीने मात्र पत्रद्वारा प्रेरणा केली. त्याला समाजाने असा उत्तम प्रतिसाद दिला की ती दानत पाहून थक्क व्हावे.

ज्या समाजाने दानत दाखविली आता त्याच निकडीने समाजाने जिनवाणीचा अभ्यास, मनन, चिंतन करावं, पुस्तकांची शोभा शोकेसमध्ये कपाटात नसून पुस्तके किती हाताळली जातात यामध्ये सामावलेली आहे. समाजाने नित्यनियमाने शाश्वत सुखाच्या प्रयोजनाने जिनवाणीचे मनसोक्त रसग्रहण स्वाध्यायाच्या द्वारा करावे. हे घडले तर त्यांत समिती आणि कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला यांना पुस्तक विक्रीपेक्षाही अधिक समाधान आहे. तर सर्व मुमुक्षुवर्गांनी अशी अभूतपूर्व जिनवाणीवरील निष्ठा दाखविली तर आमचे परिश्रम सफल होतील. तेव्हा मुमुक्षुवर्गाने असे हार्दिक स्वागत करावे एवढीच एकमात्र भावना आहे. त्यासाठी पुस्तकाचे मूल्य कोणासही परवडेल व झेपेल असेच ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे.

या वर्षात ४ पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. प्रत्येकांत त्यात दान देणाऱ्याची शुभ नामावली आहेच. त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद आहेत.

कागदाचे भाव या एकविसाव्या शतकात सर्वात जास्त वाढलेले आहेत. तसेच जुळणी, मुद्रण आणि बांधणीचे दर ही अत्यंत वाढलेले आहेत. तरीही समाजाने अभूतपूर्व दानरूपाने दिलेल्या प्रतिसादामुळे त्याची किंमत अत्यल्प नाममात्र ठेवलेली आहे. मुमुक्षु सज्जनांनी याा पूरेपूर लाभ घ्यावा एवढीच भावना आहे.

या पुस्तकाचे मुद्रण सुबक रूपामध्ये थोड्या अवधीत सुंदर झालेले आहे. यासाठी भूषण आणि मंदार यांनी आत्मीयतेने सुंदर केल्याबद्दल त्यांचे प्रकाशक ऋणी आहेत. आपण ते गोड करून घ्यावे. न्यून ते सुधारून घ्यावे. एवढीच प्रार्थना आहे.

आपला
ध. ग. भोरे

१५-१०-२००२

# अनुवादकीय

क्षत्रचूडामणि ग्रंथरत्नाचे प्रकाशन द्वितीयावृत्ती स्वरूपात या मालेतून आज होत आहे याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. ग्रंथरत्न महत्वपूर्ण काव्यग्रंथ असून त्याचे महत्व ओळखून हिंदी भाषेमध्ये अन्वयार्थ सहित भाषांतराच्या कितीतरी आवृत्त्या निघाल्या आहेत, मराठीभाषेमध्येही प्रस्तुत ग्रंथाचे भाषांतर व्हावयास पाहिजे अशी श्री० क्षु० पूज्या जिनमतिअम्मा (ब्र. कंकुबाईजी) यांनी इच्छा प्रदर्शित केली. श्री० पं० कल्लाप्पा भरमाप्पा निटवे यांनी पूर्वी एक केवळ अर्थाची आवृत्ति काढली होती परंतु केवळ अर्थाची तीही आवृत्ति आता दुर्मिळ झाली आहे. त्यामुळे अशा ग्रंथरत्नाचा मराठीमध्ये भावानुवाद करण्याचे ठरविले.

संस्कृत टिप्पणी किंवा भाषांतराचे काम किती कठीण आणि श्रमाचे असते याचा अनुभव नसतांना काम हाती घेतले, परंतु प्रत्यक्ष काम करीत असताना आचार्य श्री वादीभसिंहसूरींच्या उक्तीप्रमाणे सांगावयाचे झाल्यास "न हि वारणपर्याणं भर्तुं शक्तो वनायुजः" या वाक्याचा पदोपदी अनुभव येऊ लागला. दुसरा उपाय नसल्यामुळे शक्य तितका प्रयत्न करून अल्पबुद्धीला अनुसरून ही प्रत तयार केली. ग्रंथ तयार करताना पू. श्रद्धेय पं. देवकीनंदनजी सिद्धांतशास्त्री यांच्या विशेष अनुभवाचा जो फायदा मिळाला त्याबद्दल कृतज्ञता प्रकाशित करण्याकरिता माझे जवळ शब्द नाहीत. एकंदरीत विद्वत्कृती म्हणून या कृतीकडे न पाहता अभ्यासू माणसाचा हा प्रथम प्रयत्न आहे, असे समजून उदारबुद्धीने कोणीही ग्रंथातर्गत चुकांचे दिग्दर्शन केल्यास आम्ही त्यांचे अत्यंत आभारी होऊ आणि त्याप्रमाणे पुढील आवृत्तिमध्ये सुधारणाही करू.

श्री पूज्य क्षु. १०५ जिनमतिअम्मा (ब्र० कंकुबाईजी) यांचा या कामी विशेष उत्साह व आशीर्वाद कारणीभूत झाला असल्यामुळे त्यांचा मी विशेष ऋणी आहे. जैनसमाज त्यांच्या एकानैक धार्मिक संस्थाबद्दल चिरकालकरिता ऋणी राहील. प्रस्तुत माला त्यांच्याच उदार आश्रयाने अस्तित्वात येऊन चालू असलेल्या मालेमधून प्रकाशित होत आहे हे नमूद करताना आनंद होत आहे.

या ग्रंथाच्या स्वाध्यायाने या ग्रंथातील तत्त्वे आणि नीतिमूल्ये यांचा प्रकाश फाको हीच अंतरीची भावना. मुमुक्षुवर्ग ह्या जिनवाणीचे स्वागत करील आणि

आपला सन्मार्ग सोडणार नाहीत असा विश्वास वाटतो.

शेवटी ज्या परमात्म्याच्या प्रसादाने हे सर्व घडून येत आहे त्याच्या चरणी नम्र विनंती आहे की, या ग्रंथांतील तत्वरत्नांची सर्वत्र प्रभा फाको व अज्ञान अंधःकाराचा नाश होवो.

कारंजा विद्वज्जन - सेवक
मिती मार्गशीर्ष शु ।। १५ नरेंद्रनाथ जयवंतसा भिसीकर
वीर संवत् २४६४

# दातारांची यादी

| | |
|---|---|
| २५०१ | श्री. मा. पंकजभाई एन. शहा, भडोच |
| २००१ | श्री. सर्वमंगल प्रतिष्ठान तर्फे श्री. अशोक चवरे, कारंजा |
| १२५१ | श्री. सौ. प्रतिभा जिंतूरकर, नासिक |
| १००८ | श्री कल्पवृक्ष चॅरिटेबल ट्रस्ट, जयसिंगपूर |
| १००१ | श्री. सौ. रमाबाई शि. चवरे, कारंजा |
| १००१ | श्री. हुकुमचंद बन्धु शांतिकुमार गहाणकरी, नागपूर |
| १००१ | श्री. स्व. नरेन्द्रकुमार व मथुराबाई चवरे यांचे स्मरणार्थ श्री. शशीकान्त बंधु विवेक चवरे, कारंजा |
| ७५० | श्री. सुनंदा शरद मिश्रीकोटकर, औरंगाबाद |
| ७५० | विजयकुमार पद्माकर काळे, चांदूररेल्वे |
| ५११ | श्री. श्रीपाल गणेशलाल बिलाला चॅरिटेबल ट्रस्ट, अकोला |
| ५०१ | श्री. सौ. कान्ता अरुणसंगई, अंजनगाव |
| ५०१ | श्री. माणिकचंद रमेशचंद बज, वाशीम |
| ५०१ | श्री. संतोषकुमार पाटणी, वाशीम |
| ५०१ | श्री. कु. सावेरी मेघन नांदगावकर, कारंजा |
| ५०१ | श्री. अरविंद नवलसंगई कस्तुरीवाले गुरूजी, आश्रम, कारंजा |
| ५०१ | श्री. कवीश भरतकुमार गहाणकरी गुरूजी, आश्रम, कारंजा |
| ५०१ | श्री. सरोदे गुरूजी, आश्रम, कारंजा |
| ५०१ | श्री. आलोक शास्त्री गुरूजी, आश्रम, कारंजा |
| ५०१ | श्री. देवलाल अंबेकर, वेरूळ |
| ५०० | श्री. मनोहर अथणे, कोल्हापूर |
| ५०० | श्री. बापुसाहेब पाटील माणगावकर, ठाणे |
| ५०० | सौ. अंजली शशांक रूईवाले, ठाणे |
| ५०० | श्री. देवलालसाव अंबादास रूईवाले, कारंजा |
| ५०० | श्री. गौराबाई शिखरचंद मोदी, नागपूर |
| ५०० | श्री. शीलाबाई गुलाबचंद मोदी, नागपूर |
| ५०० | सौ. योगिता राजकुमार डोणगावकर, कारंजा |
| ५०० | श्री. सुहास प्रभाकर चवरे, कारंजा |
| ५०० | श्री. ब्र. देवचंद गुरूजी जोहरापूरकर, कारंजा |
| ५०० | श्री. राजकुमार धर्मचद चवरे, अकोला |
| ५०० | श्री. धन्यकुमार गुलाबसा रायबागकर, कारंजा |
| ३०० | श्री. राजेश कोठारी, कारंजा |
| २५१ | सौ. सुवर्णमालाबाई आगरकर, कारंजा |
| २५१ | श्री. किशोर चंद्रशेखर रूईवाले, कारंजा |
| २५१ | श्री. राजकुमार खोलापूरे, कारंजा |

| | |
|---|---|
| २५१ | श्री. माणिकचंद केशरीलाल गहाणकरी, कारंजा |
| २५१ | श्री. धन्यकुमार नेमासा खंडारे, कारंजा |
| २५१ | श्री. संतोष चंद्रशेखर मिश्रीकोटकर, कारंजा |
| २५१ | सौ. संगीता विनीत कळमकर, कटनी |
| २५१ | सौ. कुसुमताई मधुकर जोहरापूरकर, कारंजा |
| २५१ | श्री. गणपती सन्नाप्पा मिरजे, कोल्हापूर |
| २५० | श्री. मोतीलाल लालासा खंडारे, कारंजा |
| २५० | श्री. नरेन्द्र भानुसाव डोणगांवकर, देऊळगावराजा |
| २५० | श्री. नेमीचंद डोणगांवकर, देऊळगावराजा |
| २५० | श्री. दिनकर रामासाव जोहरापुरकर, नागपूर |
| २५० | सौ. मायादेवी काळे, कारंजा |
| २०१ | श्री. जवाहर देवडा, कारंजा |
| २०१ | सौ. सुमनताई नरेन्द्रकुमार कळमकर, जिंतूर |
| २०१ | सौ. स्नेहल चंद्रकान्त गहाणकरी, कारंजा |
| २०१ | श्री. गिरीश गजकुमार गहाणकरी, कारंजा |
| १५१ | श्री. यमुनाबाई माणिकलालजी भोंगाडे, कारंजा |
| १२५ | सौ. कमलताई कन्हैयालाल खंडारे, यवतमाळ |
| १०१ | श्री. कैलासचन्द्र जैन, नागपूर |
| १०१ | श्री. नीळकण्ठ शास्त्री बुराडे, नागपूर |
| १०१ | स्व. कु. शीतल सन्मती भोरे साठी सौ. स्वाती भोरे, कारंजा |
| १०१ | श्री. प्रभा चक्रेशकुमारजी, शिवनी |
| १०१ | श्री. प्रमिलाताई देऊळगावकर, नाशिक |
| १०१ | श्री. कांतिकुमार धर्मचंद्र रूईवाले, कारंजा |
| १०१ | श्री. किरण जैन, सिवनी |
| १०१ | श्री. श्रद्धा जैन, सिवनी |
| १०१ | श्रीमती इंदूमती दादासाहेब पाटील, कुंभोज |
| १०१ | ब्र. कुसुम जैन, कुंभोज |
| ५१ | श्री. दया जैन, सिवनी |
| ५१ | श्री. कुसुम जैन, सिवनी |
| ५१ | श्री. कस्तुरी जयकुमार पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. शकुन्तला बाबगौंडा पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. सूरदेवी बाबगौंडा पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. राजमती दादासाहेब पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. मंगला कलगौंडा पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. प्रभावती महावीर पाटील, कुंभोज |
| ५१ | सौ. ललिता शांतीनाथ मासुर्णे, कुंभोज |
| ५१ | सौ. इन्दुमती रामगौंडा पाटील, कुंभोज |
| ५१ | श्री. नागाप्पा देवगौंडा पाटील, कुंभोज |

# प्रस्तावना

प्राचीन संस्कृत वाङ्मयामध्ये आपल्या अमर ग्रंथरत्नांची भर घालून ज्या प्रतिभासंपन्न कवींनी संस्कृत भाषेला सजविले, आणि उन्नत बनविले अशा कविश्रेष्ठांपैकी श्रीमदाचार्यवर्य वादीभसिंहसूरींचे श्रेष्ठ स्थान फार वरचे आहे. त्यांच्या पूर्वी व त्यांच्या नंतर होऊन गेलेल्या कितीएक कवींनी कित्येक काव्यग्रंथ लिहिले. प्रत्येकाने आपापले वैशिष्ट्य आपल्या ग्रंथामधून ठेवले आहे. तथापि बहुतेकांची पद्धति प्रायः समान आहे. परंतु श्रीमत् वादीभसिंहांचे सर्वच निराळे आहे. गद्यचिंतामणि व क्षत्रचूडामणि हे त्यांचे दोनच ग्रंथ आज उपलब्ध आहेत. पहिला ग्रंथ चम्पू-स्वरूपाचा असून त्याची भाषा अत्यंत समास-बहुला व प्रौढ अशी आहे. पदोपदी पसरलेला शब्दालंकारांचा व अर्थालंकारांचा थाटमाट पाहिला म्हणजे कवि बाणभट्टांच्या कादंबरीच्या साहित्यातील गौडी पद्धतीची आठवण होते. सदरहू ग्रंथाचें वैशिष्ट्य लक्षामध्ये घेऊन मद्रास युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमामध्ये त्यास स्थानही मिळालेले आहे.

क्षत्रचूडामणीचा नूर गद्यचिंतामणिपेक्षा अगदीच निराळा आहे. दोन्ही ग्रंथांमधून वर्णिलेला वीरवर नरपुंगव एकच म्हणजे जीवंधरस्वामी हेच होत. जीवंधरांचे संपूर्ण चरित्र संभवनीय परंतु आश्चर्यकारक वीरोचित घटनांनी उज्वल झालेले असे असल्यामुळे आजपर्यंत संस्कृतमध्येच कित्येक कवींनी त्याला आपल्या लेखणीने नानाप्रकारे चित्रित केले आहे. अशा चित्ताकर्षक व बोधप्रद चरित्राबद्दल वसत असलेला आदर श्रीमत् वादीभसिंहांना त्यांचेबद्दल दोन ग्रंथ लिहून व्यक्त केला आहे व त्यांचे विभूतिमत्व प्रगटपणे मान्य केले आहे.

हा केवळ काव्य-ग्रंथ आहे. यामध्ये गद्यचिंतामणिप्रमाणे गद्य नाही. समासाचे बाहुल्यही नाही. भाषा साधी, सरळ, प्रसादिक, रसाळ व ओजस्विनी अशी आहे. इतके असूनही ती सालंकार आहे हे विशेष. वृत्यनुप्रास छेकानुप्रास किंवा लाटानुप्रास इत्यादि शब्दालंकाराबरोबरच अर्थालंकारही भरपूर आहेत. यमक व प्रासांची रचना कानाला जशी गोड लागणारी झाली आहे, त्याप्रमाणे अर्थाची यत्किंचितही हानी न होऊ देता अर्थाचा स्पष्ट बोध करून देण्याइतकी सुस्पष्ट आहे. इतर काव्य-ग्रंथ उत्तानशृंगार रसांनी ओथंबलेले असल्यामुळे बाल-विद्यार्थी-जनांच्या दृष्टीने त्यांचा उपयोग चांगला होत नाही असा अनुभवी अध्यापकांचा एकजात अभिप्राय आहे. अशा विद्यार्थ्यांकरिता या ग्रंथाचा चांगलाच उपयोग

होण्यासारखा आहे. साधेपणामध्ये सौंदर्य व देवत्वाचा वास असतो या तत्वाची त्यांना चांगलीच ओळख पटेल. पदलालित्य पाहून त्यांचे मन आनंदविभोर होईल. जीवंधराच्या चरित्राच्या उत्तमोत्तम घटनांचे वर्णन वाचताक्षणीच त्यामध्ये लपून बसलेल्या नीतितत्वाला आचार्यांनी वर आणून दाखविलेले पाहताना त्यांच्या हृत्पटलावर बेमालूम रीतीने नीतितत्वांचे ठसे उमटत जातील. ही अशी अपूर्व विशेषता या ग्रंथरत्नामध्ये आहे. हे सांगितल्यानंतर कुणासही त्याच्या कुशल कलादृष्टीबाबत अंतःकरणापासून आदर वाटल्याशिवाय राहणार नाही.

जीवंधरासारख्या थोर पुरुषरत्नाच्या गुणवर्णनामध्ये स्वतः रंगून दुसऱ्यासहि रंगविणाऱ्या प्रतिभासंपन्न कविवराचे समग्र जीवन-चरित्रही ओजस्वी असले पाहिजे असे कोणीही म्हणेल. जे जीवनचरित्र उपलब्ध झाले ते पुढे दिले आहे.

## ग्रंथकर्त्याचा परिचय –

आचार्यवर्य वादीभसिंह[१] हे दिगंबर जैन धर्मानुयायी होते. श्री. पुष्पसेन[२] मुनिवर्यांच्या शिष्यशाखेमधील आपण आहोत असे खुद्द श्री वादीभसिंहानीच गद्यचिंतामणीच्या प्रारंभालाच नमूद केले आहे. नावातील वैशिष्ट्यदर्शक अर्थवाहक शब्दावरून हे त्यांचे दीक्षान्त नाव आहे असेही स्पष्ट होते. दीक्षाविधानपूर्वीचे नाव 'ओडयदेव'[३] असल्याचाही उल्लेख गद्यचिंतामणि ग्रंथाच्या प्रारंभालाच केलेला आढळतो. उपलब्ध पुराव्यावरून कविवर्यांचा प्रदेश भारतामधील प्रस्तुतचा कर्नाटकच आहे. त्यामधील तिनिवेल्ली ह्या भागांमध्येच ते होऊन गेले असावेत असा अंदाज आहे. अद्यापही या भागामध्ये ओडयदेव, उडयदेव, ओडयत्तेव, ओडयल्वार अशा स्वरूपाची नावे जनतेमध्ये प्रचलित आहेत.

## काल –

आचार्यश्रींच्या समयाविषयी इतिहासविज्ञामध्ये दोन मते आहेत. एकपक्ष

(१) वादिन्-वादविवाद करणारे; इभ-हत्ती; सिंह-सिंह; सूरि-आचार्य वादीभसिंहसूरि-वादीरूपीं हत्तींना सिंहाप्रमाणे असणारे आचार्य.

(२) श्री पुष्पसेन-मुनिनाथ इति प्रतीतो ।
दिव्यो मुनिर्हृदि सदा मम सन्निदध्यात् ॥
यच्छक्तितः प्रकृतिमूढमतिर्जनोऽपि ।
वादीभसिंहमुनिपुंगवतामुपैति ॥ ६ ॥

(३) श्रीमद्वादीभसिंहेन गद्यचिंतामणिः कृतः ।
स्थेयादोडयदेवेन चिरायास्थानभूषणः ॥
स्थेयादोडयदेवेन वादीभहरिणा कृतः ।
गद्यचिंतामणिर्लोके चिंतामणिरिवापरः ॥ ७ ॥



विक्रम संवताच्या ८ व्या शतकाचा काल अनुमित करतो व दुसरा पक्ष विक्रम संवताच्या १० व ११ व्या शतकाच्या दरम्यानच्या कालामध्ये आचार्य होऊन गेले असावेत असे नमूद करतो. श्रीमत् गुणभद्राचार्यांच्या उत्तर[१]-पुराणांतर्गत कथेच्या आधाराने गद्यचिंतामणि व क्षत्रचूडामणि हे दोन ग्रंथ रचल्या गेले असल्याचा संभव अधिक वाटतो. याच ग्रंथद्वयांच्या व जीवंधरचम्पूच्या आधाराने तयार केलेल्या "जीवक चिंतामणि" नामक तामील भाषेच्या ग्रंथाचा अनुमानीत समय वि० सं० ११२५ च्या आसपासचा आहे. अर्थात् या दोन कालांच्या मध्यंतरी आचार्यश्रींनी या भारतभूमीस पावन केले असावे असे वाटते. यापेक्षा अधिक माहिती उपलब्ध नाही.

## कार्य –

आज जरी आचार्यांचे गद्यचिंतामणि व क्षत्रचूडामणि हे दोनच काव्यग्रंथ उपलब्ध आहेत; तथापि ह्या दोनच साहित्यकृती उपलब्ध आहेत.

## विद्वत्ता –

ग्रंथ चरित्रात्मक असला तरी विद्वत्ता आणि प्रतिभा यांचा सुवर्ण-संयोग दिसून येतो. त्याचे नाव तर न्यायशास्त्रांमधील प्रकांड विद्वत्तेला दाखवितेच, परंतु प्रसंगोपात्त सिद्धांत विषयक तत्त्वांचे प्रतिपादन करताना, सृष्टिरचनेसंबंधी ऊहापोहपूर्वक विचार करताना, आचार धर्माला आणि अहिंसा धर्माला युक्तिसंगत दाखविताना भगवंतांच्या स्तुतिमधील खराखुरा हेतु उघड करून दाखविताना तसेच जीवन विषयक महत्वपूर्ण प्रश्नांचा खल करून सांगताना किंवा राजनीति संबंधी मूलभूत-बीजभूत तत्वांचे स्पष्टीकरण करताना केलेली विधाने व दिलेले हेतू, या सर्वांबद्दल विचार करून पाहिला असताना असामान्य कवित्व शक्ति बरोबरच आचार्यश्रींचे ज्ञान सर्वांगीण व सखोल असून अनुभवाच्या मुशीत तयार झालेले होते असे म्हटले तर त्यामध्ये तिलप्राय अतिशयोक्ति होणार नाही.

ज्या ग्रंथ मालेतून प्रस्तुत प्रकाशन होत आहे त्याला आधारभूत असलेली चित्-शक्ति ब्र० कंकुबाईजी (पू० क्षु० १०५ जिनमतीबाईजी) यांचा खराखुरा उदार आश्रय ही होय. त्याबद्दल आमच्याप्रमाणे सारा समाज त्यांचा ऋणी राहील.

अशा या अपूर्व ग्रंथाचे संपादन श्री. नरेंद्रनाथ जयवंतसा भिसीकर,

१. उत्तर पुराणाचा काल प्रशस्तिवरूप वि० सं० ९५५ हा निश्चित आहे.

कारंजा यांनी केले आहे. व्यवहाराचे बहुविध व्याप गौण करून जैन-धर्म-वाङ्मयाविषयी बसत असलेल्या प्रेमाचे द्योतक म्हणून त्यांनी घेतलेली मेहनत व केलेले परिश्रम धन्यवादास पात्र आहेत. ग्रंथ तयार करताना व ग्रंथकर्त्याविषयी लिहिताना श्री. पं. नाथूरामजी प्रेमी यांची प्रस्तावना व श्री कन्नोमलजी व पं. निद्धामलजी यांच्या हिंदी प्रतींची बरीच मदत झाली. त्याबद्दल त्यांचेही आम्ही ऋणी आहोत.

ग्रंथ शुद्ध असावा याकरिता खटपट करूनही मुद्रण व्यवसायामधील अपूर्ण अनुभवामुळे काही चुका राहून गेल्या आहेत. त्यांपैकी महत्वाच्या चुकांचे शुद्धिकरण शुद्धिपत्रकामध्ये दिले आहे. त्याप्रमाणे ग्रंथ शुद्ध करून घ्यावा. अशी सहृदय पाठकांना नम्र विनंती आहे.

परमात्मकृपेने याच मालेमधून अशा बहुमोल ग्रंथरत्नांचे प्रकाशन होण्याचा योग प्राप्त होवो अशी प्रभुचरणी नम्र प्रार्थना आहे.

| | |
|---|---|
| वीरवाडी | आपला नम्र |
| मित्ती मार्गशीर्ष शुद्ध | मंत्री |
| पौर्णिमा, वीरसंवत् २४६४ | श्री कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला |

# ग्रंथ-संक्षेप

## प्रथम लंब

१ मंगलाचरण, २ राजपुरी-राजा सत्यंधर-राणी विजया-वर्णन, ३ राजाची अतिरिक्त कामासक्ति व राजकारभाराकडे दुर्लक्ष, ४ मंत्र्याच्या विनंतीचा अव्हेर, ५ राणीला पडलेली तीन स्वप्नें, ६ फलकथन-राणीची समजूत काढण्याचा प्रयत्न, ७ मयूरयन्त्रद्वारा आकाशविहाराचा अभ्यास, ८ काष्ठांगाराची राज्य बळकाविण्याची इच्छा व सभेमध्ये राजद्रोहाचे समर्थन-धर्मदत्ताने केलेला वीरोचित प्रतिकार, काष्ठांगाराची चढाई, ९ राणीचे आकाशमार्गाने जाऊन स्मशानभूमीमध्ये पडणे, पुत्र प्रसवणे, देवीचे दाईवेषाने प्रगट होणे, १० राजा समरांगणामध्ये उतरतो. भावनेची-उत्कटता-समाधि-स्वर्गवास, ११ लोकभावना, १२ गंधोत्कटाचा स्मशानामध्ये पुत्रशोध व प्राप्ती, १३ श्रेष्ठीने केलेला पुत्रजन्मोत्सव मूर्ख काष्ठांगार आपल्या राज्यप्राप्तीबद्दल कल्पून आनंद पावतो, १४ दण्डकारण्यांत राणीचे तपस्वीजीवन, १५ जीवधरांचे निष्कलंक व निरापद बालजीवन व आप्तांना आनंद.

## द्वितीय लंब

१ कुमाराचे विद्यार्थी जीवन, २ गुरुमुखाने गुरुवृत्तांत - श्रवण - विद्याधराधिपति लोकपालास मेघांचे नाशवंत रूप पाहून वैराग्य होणे, दीक्षाग्रहण-तपस्या-भस्मकरोग-बाधातिरेक, दीक्षात्याग-जीवंधराचे घरी आहारप्राप्ति व आरोग्यलाभ, साधूंची प्रत्युप्रकाराची प्रतिज्ञा, ३ विद्यामाहात्म्य, ४ कुमारास विद्यालाभ व त्याची विनयशीलता, ५ गुरुशिष्यलक्षण, ६ कुमारास स्वतःच्या जीवनाचा इतिहास कळतो व काष्ठांगारासह संघर्षाची भावना होते, ७ गुरूपदेश-क्रोधत्याग, यथाशास्त्र प्रवृत्ति, दुर्जनसंसर्ग-त्याग, सज्जनसंगठन, ८ आशीर्वाद, ९ गुरूंचा वनविहार व मुक्तिलाभ; गोप-गोधनाची चोरी १० काष्ठांगाराच्या सैन्याचा पराभव, ११ नंदगोप दवंडी देववितो १२ जीवंधराचा पहिला पराक्रम व विजय, १३ कबुलीप्रमाणें नंदगोप सात सुवर्णपुतळ्यासह आपली मुलगी अर्पण करतो; कुमार पद्मास्याला अर्पण करवितो, गोविंदेचा पद्मास्या बरोबर विवाह.

## तृतीय लंब

१ राजपुरीतील श्रीदत्तश्रेष्ठीचे धनसंचयार्थ परदेशगमन, २ धनप्रभाव, ३ श्रेष्ठीचें धनसंचय करून परत फिरणे, ४ नावेचे बुडणे, लोकांचे-भय व-श्रीदत्ताचा



उपदेश, ५ डोलकाठीच्या सहाय्याने काठाला येणे - आगंतुकाशी भाषण - दुर्दैवीघटनेचे कारण, ६ विद्याधराच्या राजदरबारामध्ये प्रवेश व गरुडवेगाची पूर्व-ओळख दृढ होणे, ७ कन्या गंधर्वदत्ता हिचा विवाह राजपुरीमध्ये होणार असे ज्योतिषांचे अभिमत सांगून कन्या धराचे स्वाधीन करतो, ८ गंधर्वदत्तेबरोबर गांवी येणे, ९ स्वयंवर घोषणा, वीणावादनामध्ये इतरांचा पराजय व जीवंधराचा विजय, १० काष्ठांगार चिडतो इतरांना भडकवितो, युद्धामध्ये कुमाराचाच विजय होतो, ११ गंधर्वदत्तेची प्राप्ती.

## चतुर्थ लम्ब

१ वसंतागमन, २ कुमाराचे जलक्रीडादर्शनार्थ गमन, ३ मरणासन्न कुत्र्याला मंत्रप्रदान, ४ कुत्रा यक्ष होऊन कुमाराचा दर्शनाकरिता येतो, ५ गुणमाला व सुरमंजरी यांची चूर्ण विषयक स्पर्धा, विद्वज्जनाकरवी परीक्षा, जीवंधरांचा सप्रमाण निकाल, ७ सुरमंजरीची प्रतिज्ञा व स्नान न करतां परतणे, ८ गंधसिंधुर हत्तीचा धुमाकूळ, ९ जीवंधराचे हत्तीला ताडन व संकटपरिहार, १० कुमार व गुणमाला यांची दृष्टादृष्ट व प्रेमभावाची उत्पत्ति, ११ गुणमालेचे क्रीडाशुकाबरोबर पत्र पाठविणे, १२ कुमाराचे उत्तर, १३ कुबेरमित्र व विनयमाला आपल्या गुणमालेला अर्पण करतात.

## पंचम लम्ब

१ काष्ठांगारांचा कुमारावर कोप व त्याची कारणे :- (१ हत्तीवरील प्रहार, २ प्राप्तयौवना व अत्यंत सुंदर अशा 'अनंगमाला' नामक एका विद्याधर स्त्रीचे तिच्यावर आसक्त असलेल्या विद्याधराचा तिरस्कार करून जीवंधरावर लुब्ध होणे व त्यांचा समागम (गद्य चिं.) ३ भिल्लावरील जय, ४ व वीणावादनांतील विजय) २ कुमारावर चढाई व पकडल्यानंतर मारण्याची दुष्ट आशा, यक्षेंद्राचे स्वामीला उचलणे, ३ कुमार मेले असे समजून लोकांमध्ये सुरू झालेला विचार प्रवाह, ४ यक्षेंद्राने केलेला आदर-सत्कार व तीन विद्यामंत्रांचे दान, ५ निर्भयपणे वनविहार - संकटापन्न हत्तींचे दयाभावपूर्वक परिरक्षण, ६ तीर्थवंदना - देवताद्वारा मानसन्मान ७ पल्लवदेशांतील चंद्राभा नगरींत आगमन व राजकन्येला झालेली सर्पविषबाधा दूर करणे, ८ लोकपाल राजाला झालेला आनंद व जीवंधर कुमारांना पद्मावतीची प्राप्ति.

## षष्ठ लम्ब

१ चंद्राभा सोडून तीर्थयात्रेकरितां प्रस्थान, २ अरण्यांत तापसी लोकांची

भेट व त्यांना खऱ्या तपाचा उपदेश ३ ईश्वर सृष्टिकर्ता नाही यास निर्दोष हेतु, ४ दक्षिण नामक देशामधील क्षेमपुरीमध्ये आगमन - बंद असलेल्या सहस्रकूट चैत्यालया समोर केलेली स्तुति ५ दरवाजे आपोआप उघडणे - रक्षकास झालेला आनंदाचे कारण तो स्वामीस सांगतो ६ सुभद्र श्रेष्ठीचे आगमन व परस्पर वार्तालाप ७ क्षेमश्रीची प्राप्ति.

## सप्तम लम्ब

१ पूर्वसूचनेशिवाय रात्री क्षेमपुरी सोडणे व सुभद्राचे चिंताक्रांत होणे २ प्राप्त अलंकार सुपात्राला देण्याची इच्छा ३ कृषीवलाची गाठ व त्यास धर्मोपदेश - खऱ्या स्वास्थ्याची व्याख्या, स्व-पर-स्वरूप वर्णन व कृषीवलाचे व्रतग्रहण, ४ कृषीवलाला झालेला आनंद, ५ अरण्यांत एकांतस्थली एका मायाचारी स्त्रीची गाठ, कुमारावर मोहिनी टाकण्याचा तिचा विफल प्रयत्न, ६ विद्याधराबरोबर संभाषण व त्यास विरक्तीचा उपदेश, ७ नगरोद्यानामध्ये स्वामीचे आगमन, धनुर्विद्येचा अभ्यास करणाऱ्या राजपुत्रांवर त्यांची पडलेली छाप, ८ राजपुत्र आपला वृत्तांत निवेदन करतात, ९ दृढमित्र राजाचा स्वामींना राहण्याकरिता आग्रह, १० स्वामींचे धनुर्विद्या-प्रदान, राजाचा आनंद, ११ कनकमालेची प्राप्ति.

## अष्टम लम्ब

१ हेमाभा नगरीमध्ये सासी सुखासीन असतांना एका स्त्रीचे साभिप्राय आगमन व आश्चर्यप्रदर्शन २ जीवंधराचा प्रश्न व तिचे उत्तर ३ नंदाढ्य आला असावा अशी भावना ४ उभयतांची आयुधशाळेत भेट व वार्तालाप ५ नंदाढ्य, स्वामींच्या अभावी त्याची व सर्वमित्रांची कशी अवस्था झाली व गंधर्वदत्तेच्या पत्रासह तो कसा आला हे सांगतो, ६ गोप-गोधनाची चोरी व राजाकडे फिर्याद. ७ स्वामी गोधन मुक्त करण्याकरिता स्वतः जातात, ८ गोधनाचे अपहरण करणारे स्वामीचे मित्र आहेत असे आढळून येते, उभयतांना आनंद ९ पद्मास्य प्रवासवृत्त सांगतो - दंडकारण्यातील मातेश्वरीची भेट व मित्रांना कुमाराचे यथार्थ स्वरूप समजणे. १० कुमार मातेच्या दर्शनाकरिता जातो, मातापुत्रांची भेट, कुमाराने राजा व्हावे ही इच्छा ती प्रगट करते, कुमाराचे आश्वासन, ११ कुमार मातेला मामाकडे पोहोचवितो १२ राजपुरीचे निरीक्षण १३ योगायोग-मोठ्या वाड्यांतून चेंडूचे पडणे, तेथील ओट्यावर स्वामीचे बसणे, सागरदत्ताचे सानंद आगमन व विनंती १४ विमलेची प्राप्ती.

## नवम लम्ब

१ वरचिन्ह युक्त होऊन मित्रसभेत आगमन-बुद्धिषेणाचा विनोद व उपहास



२ सुरमंजरीला वरण्याची प्रतिज्ञा ३ म्हाताऱ्याचे सोंग - सुरमंजरीच्या वाड्यांत प्रवेश-भोजन-निद्रा-कर्णमधुर गान ४ सुरमंजरीची जिज्ञासा व प्रश्न, म्हाताऱ्याचे उत्तर ऐकून आपला मनोदय प्रगट करणे ५ कामदेवाच्या मंदिराच्या निर्मितीची कल्पना ऐकून सुरमंजरीला आनंद होणे, तिची प्रार्थना, बुद्धिषेणाचे शब्द कामदेवाचे समजणे, कुमाराचे यथार्थ स्वरूपदर्शन, तिची लज्जाशौलता ६ कुबेरमित्र सुरमंजरीला अर्पण करितो.

## दशम लम्ब

१ गंधोत्कटाची भेट, सर्वांना आनंद २ गंधोत्कटाबद्दल गुप्त खलबत ३ आजोळी येऊन मामाशी विचारविनिमय करणे ४ काष्ठांगाराचे हृद्गत समजून घेणे व त्याच्या निमंत्रणावरून ससैन्य राजपुरीकडे प्रयाण ५ परस्पर नजराण्याची देवाण घेवाण ६ गोविंदराजा मुलीच्या लग्नाची घोषणा करतो ७ कुमाराने केलेला चंद्रकयंत्रस्थ वराहत्रयाचा भेद ८ जमलेल्यांना कुमार सत्यंधराचा मुलगा आहे अशी राजातर्फे ओळख ९ काष्ठांगाराच्या अंतःकरणांत धडकी व त्याचे विचार १० उभयपक्षांतील समरप्रसंग काष्ठांगाराचा वध ११ गोविंदराजाने केलेला आनंदोत्सव-भगवज्जन्माभिषेकादि मंगलकार्य १२ यक्षेंद्राचे आगमन १३ कुमाराचा राज्याभिषेक महोत्सव १४ लक्ष्मणा कन्येची प्राप्ती.

## एकादश लम्ब

१ राज्यामध्ये जीवंधराच्या राजपदप्राप्तीमुळे सर्वत्र आबादीआबाद २ राज्यपद्धति व व्यवस्था ३ विजयादेवीचे वैराग्य व तिचे विचार, सुनंदेलाहि वैराग्य होते, पद्मानामक आर्यिकेजवळ दीक्षा घेतात ४ स्वामींचा सहजशोक-आर्यिकेचा उपदेश मनःशांति ५ वनक्रीडा-वानर, वानरी व वनपाल या तिघांच्या भिन्नविभिन्न क्रिया पाहून स्वामी स्वतःच्या जीवनचारित्राचे सिंहावलोकन करू लागतात ६ राज्यत्यागाचे भाव - बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन (श्लोक २८ ते ८०) ७ उपदेशश्रवण ८ पूर्वभववृत्तांतश्रवण (घातकीखंडात भूमितिलक नगरी - पवनवेन राजाचा यशोधर कुमार, राजहंसाच्या पिल्लांना मातापित्यापासून अलग करणे, पित्याचा उपदेश, वैराग्याची प्राप्ती) ९ प्रखर वैराग्य १० आपल्या सत्यंधर पुत्राची राजपदी स्थापना ११ भगवान् महावीरांच्या समवशरणामध्ये प्रयाण भगवद्दर्शन-स्तुति-दीक्षायाचनाग्रहण-घोर तपश्चरण व मुक्तिलाभ. १२ ग्रंथकर्त्याची अंतिमभावना.

ॐ

श्रीमत् वादीभसिंहसूरिविरचितः

# क्षत्रचूडामणिः

## प्रथम लंब

श्रीपतिर्भगवान् पुष्पाद्भक्तानां वः समीहितम् ।
यद्भक्तिः शुल्कतामेति मुक्तिकन्याकरग्रहे ॥ १ ॥

अर्थ :– **ज्यांची भक्ती मुक्तीरूपी कन्येच्या पाणीग्रहणप्रसंगी (विवाहसमयी) जणू शुल्कच आहे असे चार अनंतचतुष्टयरूपी श्रीचे अधिपती भगवान् आम्हा सर्वांचे ईप्सित-मनोरथ पूर्ण करोत.**

संक्षेपेण प्रवक्ष्यामि चरितं जीवकोद्भवम् ।
पीयूषं न हि निःशेषं पिबन्नेव सुखायते ॥ २ ॥

अर्थ :– **मी जीवंधर कुमाराचे चरित्र संक्षेपाने सांगणार आहे. अमृताची अवीट गोडी ही चाखण्यासाठी अमृत संपूर्ण प्याल्यानेच सुखविते असे थोडेच आहे ? अर्थात् दोन चार थेंब थोडेसे प्याल्यानेही सुख प्राप्त होते.**

श्रेणिकप्रश्नमुद्दिश्य सुधर्मो गणनायकः ।
यथोवाच मयाप्येतदुच्यते मोक्षलिप्सया ॥ ३ ॥

अर्थ :– **राजा श्रेणिकाने भ. महावीराच्या समवशरणामध्ये विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर म्हणून श्री. सुधर्म नामक गणधरानी जसे सांगितले तेच मी सांगणार आहे.**

---

श्लोकांक (१) श्रीपतिः – श्रियः अतरंगबहिरंगलक्ष्म्याः पतिः । शुल्कतां मूल्यतां । (२) पीयूषं-अमृतं । (३) सुधर्मः – श्रीवर्धमानतीर्थंकरस्य एकादशसु गणधरेषु चतुर्थो गणधरः ।

इहास्ति भारते खंडे जम्बूद्वीपस्य मण्डने ।
मण्डलं हेमकोशाभं हेमाङ्गदसमाह्वयम् ॥ ४॥

अर्थ :– जंबुद्वीपास भूषणभूत अशा भरतक्षेत्रामध्ये हेमांगद नावाचा देश आहे. जणूकांही आपल्या नावाप्रमाणेच त्याची आभा सुवर्णाच्या राशीसारखी आहे.

तत्र राजपुरी नाम राजधानी विराजते ।
राजराजपुरीसृष्टौ स्रष्टुर्या मातृकायते ॥ ५॥

अर्थ :– त्या देशाची राजधानी राजपुरी नामक होती. राजाच्या राजधानीच्या निर्मितीमध्ये ती नगरी जणू प्रतिकृतिसारखी असल्यामुळे जननीच होती.

तस्यां सत्यंधरो नाम राजाऽभूत् सत्यवाङ्मयः ।
वृद्धसेवी विशेषज्ञो नित्योद्योगी निराग्रहः ॥ ६॥

अर्थ :– त्या राजपुरी नगरीचा सार्थ नामधारी असा सत्यंधर नावाचा राजा होता. तो नावाप्रमाणे सत्यभाषी व वृद्धाची सेवा करणारा होता. तसेच तो सदैव जागृत असून निराग्रही होता.

महिता महिषी तस्य विश्रुता विजयाख्यया ।
विजयाद्विश्वनारीणां पातिव्रत्यादिभिर्गुणैः ॥ ७॥

अर्थ :– त्या राजाची विजया नावाची विख्यात रानी होती. जणूं तूं पातिव्रत्यादि गुणामुळे जगातील सर्व नारीमध्ये श्रेष्ठ असल्यामुळे सार्थनाम होती.

सत्यप्यन्तःपुरस्त्रीणां समाजे राजवल्लभा ।
सैवासीन्नापरा काचित् सौभाग्यं हि सुदुर्लभम् ॥ ८॥

अर्थ :– सत्यंधराच्या अंतःपुरामध्ये अनेक स्त्रियाच्या समूहामध्ये तीच खरोखर राजपत्नी होती. अन्य कोणतीही नाही. सौभाग्य हे क्वचितच अत्यंत दुर्लभतेने प्राप्त होत असते.

---

श्लोकांक (४) मण्डने - भूषणभूते (भारते) । मण्डलं - देशः । हेमकोशाभं-सुवर्णनिधेः सदृशं । (५) मातृकायते - मातृवत् भवति । (७) महिषी - पट्टराज्ञी । विश्रुता प्रसिद्धा ।



निष्कंण्टकाधिराज्योऽयं राजा राज्ञीमनातरम् ।
रमयन्नान्यदज्ञासीत्प्राज्ञप्राग्रहरोऽपि सन् ॥ ९॥

अर्थ :– आपले राज्यशकट निष्कंटक चालवीत असतांना तो विद्वद्रत्न व प्राज्ञ समाजांत अग्रेसर असूनही आपल्याच राजपत्नीमध्ये अत्यंत आसक्त होऊन रममाण झाला.

विषयासक्तचित्तानां गुणः को वा न नश्यति ।
न वैदुष्यं न मानुष्यं नाभिजात्यं न सत्यवाक् ॥ १०॥

अर्थ :– भोगामध्ये जो आसक्त आहे त्याचे कोणते गुण नाश पावत नाहीत न विद्वत्ता, न माणुसकी, न कुलीनता न सत्यवादीत्व ! एवढेच नाही. तर सर्व सद्गुणाची माती होते ती भोगासक्तीमुळे.

परराधनजाद्दैन्यात्पैशून्यात्परिवादतः ।
पराभवात्किमन्येभ्यो न विभेति हि कामुकः ॥ ११॥

अर्थ :– अतिकामुक मनुष्य दुसऱ्याच्या मनधरणीमुळे येणाऱ्या दीनतेलाही, चुगलखोरपणासही, निंदानालस्तीलाही, पराभवालाही जुमानत नाही. तर त्या कामातुराला अन्य कशाचीही भीती नसते.

पाकं त्यागं विवेकं च वैभवं मानितामपि ।
कामार्ताः खलु मुञ्चन्ति किमन्यैः स्वं च जीवितम् ॥ १२॥

अर्थ :– कामातुर आपले भोजन, व्रतादिक, विवेक, वैभव, श्रेष्ठपणा सर्वच सद्गुणाचा नाश करतात. फार काय सांगावे ! कामांध पुरुष आपल्या जीविताचाही नाश करतात.

पुनरैच्छदयं दातुं काष्ठांगाराय काश्यपीम् ।
अविचारितरम्यं हि रागान्धानां विचेष्टितम् ॥१३॥

अर्थ :– त्यातच राजा सत्यंधराने काष्ठांगाराला राज्य देण्याचे योजले. रागाच्या आधीन व्यक्तीच्या सर्वच क्रिया अविचारीपणाने चांगल्या वाटतात ! हेच खरं !

---

श्लोकांक (९) अज्ञासीत् - अजानीत । प्राज्ञप्राग्रहरः – सूज्ञेषु श्रेष्ठः । (१०) वैदुष्यं – पाण्डित्यं, आभिजात्यं – कुलीनता । (११) कामुकः – विषयासक्तः । (१२) पाकं – आहारं । त्यागं-दानं । (१३) काश्यपीं – भूमीं, राज्यं ।

तावता तं समभ्येत्य मन्त्रिमुख्या अबूबुधन् ।
देव देवैरपि ज्ञातं विज्ञाप्यं श्रूयतामिदम् ॥ १४ ॥

अर्थ :– अशा विचारात सत्यंधर असताना तेवढ्यात राजाचे सर्वच प्रमुख मंत्री राजास सावध करण्यासाठी म्हणालेत ''हे महाराज ! देव, आपण तर सर्व जाणतच आहांत. तरीही आपणास एक विनंती आहे, ती ऐकावी.

हृदयं च न विश्वास्यं राजभिः किं परो नरः ।
किन्तु विश्वस्तवद्दश्यो नटायन्ते हि भूभुजः ॥ १५ ॥

अर्थ :– ''राजाने तर आपल्या हृदयाचाही विश्वास करू नये. तर मग अन्य माणसाचा विश्वास कसा ठेवावा ? परंतु फक्त विश्वास असल्यासारखे दाखवावे मात्र. राजेलोक नटाप्रमाणे असतात. नट ज्याप्रमाणे श्रोत्यांना वेगळेच भासवतात. तद्वत् राजाने वेगळेच दाखवावे. आपल्या मनाचा थांगपत्ता लागू देऊ नये.

परस्पराविरोधेन त्रिवर्गो यदि सेव्यते ।
अनर्गलमतः सौख्यमपवर्गोऽप्यनुक्रमात् ॥ १६ ॥

अर्थ :– ''धर्म, अर्थ, काम या तीन पुरुषार्थाची परस्पर अविरोधपणाने साधना केली तर निराबाध सुखच मिळते आणि अनुक्रमाने मुक्ती ही प्राप्त होते.''

ततस्त्याज्यौ न धर्मार्थौ राजभिः सुखकाम्यया ।
अदः काम्यति देवश्चेदमूलस्य कुतः सुखम् ॥ १७ ॥

अर्थ :– ''म्हणून राजांनी सुखाच्या लालसेने धर्म आणि अर्थ पुरुषार्थ कधीही न सोडावा ! देव जर सुखाभिलाषा मात्र करीत असेल तर सुखाचे मूळ अशा धर्माचे अभावी सुख तरी कसे मिळणार ? कारण धर्मच सर्व सुखाचे मूळ कारण आहे.''

नाशिनं भाविनं प्राप्यं प्राप्ते च फलसन्ततिम् ।
विचार्यैव विधातव्यमनुतापोऽन्यथा भवेत् ॥ १८ ॥

---

श्लोकांक (१४) समभ्येत्य - समीपं गत्वा । विज्ञाप्यं - प्रार्थनीयं, वक्तव्यं । (१६) त्रिवर्गः – धर्मार्थकामाः । अनर्गलं - अव्याबाधं । अपवर्गः - मोक्षः । (१८) अनुतापः - पश्चात्तापः ।



अर्थ :– विनाशकारी भवितव्य समोर दिसत असताना आणि त्याचे फल प्राप्त झाले असताना अत्यंत विचारपूर्वकच कृतीचा निर्णय घ्यावा हे महत्त्वाचे आहे. अन्यथा पश्चात्ताप तेवढा होईल.

इति प्रबोधितोऽप्येष धुरि राज्ञां न्यवेशयत् ।
काष्ठांङ्गारमहो मोहाद्बुद्धिः कर्मानुसारिणी ॥ १९ ॥

अर्थ :– याप्रमाणे सर्व प्रमुख मंत्र्यांनी सावध केले तरीही त्याने राज्यशकटाचे ओझे काष्ठांगारावर सोपविले. अहो ! बुद्धि कर्मानुसार जसे भवितव्य असेल तशीच सुचत असते हेच खरे!

विषयान्धविचारेण विरक्तानां नृपस्य तु ।
प्रकृष्यमाणरागेण कालो विलयमीयिवान् ॥ २० ॥

अर्थ :– विषयामध्ये अंध अशा राजाच्या भोगाकांक्षेने विरक्त पुरुषांचा त्याच प्रकारे विशेष रागामुळे राजाचे प्रवर्तन चालू राहल्याने दोघांचाही काळ जात होता.

सा तु निद्रावती स्वप्नमद्राक्षीत् क्षणदाक्षये ।
अस्वप्नपूर्वं हि जीवानां न हि जातु शुभाशुभम् ॥ २१ ॥

अर्थ :– एके दिवशीं विजयारानी निद्रा घेत असतांना उत्तर रात्रीच्या अंती तिने स्वप्ने पाहिलीत. बहु शुभ-अशुभ घटना या स्वप्नद्वारा सूचित होतात. स्वप्नाशिवाय घटना बहुधा घडत नाहीत.

वैभातिकविधेरन्ते विभोरन्तिकमीयुषी ।
अर्धासननिविष्टेयमभाषिष्ट च भूभुजः ॥ २२ ॥

अर्थ :– उठल्यानंतर सर्व प्रातर्विधी आटोपल्यानंतर ती आपल्या पतिदेवाच्याकडे जाण्याची तिची इच्छा होऊ लागली. राजाने विजयारानीला

---

श्लोकांक (२०) विषयान्धविचारेण - विषयेषु अंधता - अनभिज्ञतारूपपरिणामेण । प्रकृष्यमाणरागेण - वर्धमान - विषयानुरागपरिणामेण । विलयं ईयिवान् - विलयं गच्छति । (२१) अद्राक्षीत् – अपश्यत् । क्षणदाक्षये - निशाया - श्चरमे भागे । (२२) वैभातिक विधेःअन्ते – प्रातर्विधेरनन्तरं । अन्तिकं - समीपं । ईयुषी - गन्तुकामा ।

अर्धासनावर बसवून घेतले. नंतर तिने राजाला उत्तररात्रीं पडलेली स्वप्ने सांगितली.

श्रुत्वा स्वप्नत्रयं राजा ज्ञात्वा च फलमक्रमात् ।
प्रतिवक्तुमुपादत्त किञ्चिन्नञ्चन्मनाभवन् ॥ २३ ॥

अर्थ :– राजाने ती तिन्ही स्वप्ने ऐकून त्याच्या फलाचा निर्णय केला. आणि ज्या क्रमाने स्वप्ने पडली तदनुसार फल न सांगता त्याने अक्रमपूर्वक स्वप्नाचे फल सांगितले.

पुत्रमित्रकलत्रादौ सत्यामपि च संपदि ।
आत्मीयापायशङ्का हि शंकुः प्राणभृतां हृदि ॥ २४ ॥

अर्थ :– संपत्काली पुत्र, मित्र, पत्नी आदि परिवार असतांनाही आपल्या विनाशाचे भय हे जीवांच्या हृदयामध्ये शल्याप्रमाणे सारखे बोचत राहते.

देवि दृष्टस्त्वया स्वप्ने बालाशोकः समौलिकः ।
आचष्टे सोदयं सूनुमष्टमालास्तु तद्वधूः ॥ २५ ॥

अर्थ :– ''हे देवि ! तू स्वप्नामध्ये बाल अशोक वृक्ष पाहिलास. त्यावरून तुला मुकुटबद्ध असा राजपुत्र होईल आणि त्यास आठ पत्नी होतील हे आठ मालेवरून समज.''

आर्यपुत्र ततः पूर्वं दृष्टनष्टस्य किं फलम् ।
कङ्केलेरिति चेद्देवि कथयत्येष किंचन ॥ २६ ॥

अर्थ :– ''परंतु हे आर्यपुत्र ! त्या दोन स्वप्नापूर्वी अशोक वृक्ष पाहिला व तो पाहता पाहता नष्ट झाला. त्याचे फल काय ते सांगा.'' असे विचारता 'अं त्याचे काहीतरी फल असेल झालं' असे राजाने प्रत्युत्तर दिले.

इतीशवाक्यं शुश्रूषी महिषी भुवि पेतुषी ।
मूर्च्छिता तन्मुखग्लानेर्वक्त्रं वक्ति हि मानसम् ॥ २७ ॥

श्लोकांक (२३) न्यञ्चन्मनाः – खिन्नमनस्कः । (२४) शंकुः – कील इव मर्मभेदीत्यर्थः । (२५) समौलिकः - मुकुटमंडितः । आचष्टे – सूचयति । सोदयं – वैभवसंपन्नं । (२६) आर्यपुत्र - स्वामिन् । कङ्केलेः - अशोकवृक्षस्य । (२७) शुश्रूषी - श्रोतुकामा । पेतुषी - पपात । वक्त्रं - मुखं ।



अर्थ :– याप्रमाणे पतीचे वचन ऐकून व त्याचा खिन्न चेहरा पाहून विजयारानी धरणीवर कोसळली व मूर्च्छित झाली. चेहरा हा मनोभूमि दाखविणारा आरसा आहे. चेहरा हा अंतरंग सांगतो.

तन्मोहान्मोहितो राजा तामेवायमबूबुधत् ।
सत्यामप्यभिषङ्गार्तो जागर्त्येव हि पौरुषम् ॥ २८ ॥

अर्थ :– तेव्हा विजयाराणीच्या प्रेमाने मोही बनलेला राजा सत्यंधर तिची समजूत काढून धीर देऊ लागला. दुःख येऊन पडले म्हणजे पौरुष जागे होतेच.

स्वप्नदृष्टकृते सद्यो नष्टासुं किं तनोषि माम् ।
न हि रक्षितुमिच्छन्तो निर्दहन्ति फलद्रुमम् ॥ २९ ॥

अर्थ :– ''हे प्रिये ! स्वप्न पाहल्यामुळे मी आताच गतप्राण झालो असे समजतेस काय ? फळाने बहरलेल्या वृक्षाची रक्षा व्हावी असे इच्छिणारे त्यास जाळून टाकत नाहीत.''

विपदः परिहाराय शोकः किं कल्पते नृणाम् ।
पावके न हि पातः स्यादातपक्लेशशांतये ॥ ३० ॥

अर्थ :– ''विपत्ती दूर करण्यासाठी शोक करण्याने लाभ तो कोणता ? सूर्याच्या उन्हाने संतप्त मनुष्य आपले क्लेश दूर करण्यासाठी अग्नीमध्ये उडी घेऊन लाभ तो कोणता ?''

ततो व्यापत्प्रतीकारं धर्ममेव विनिश्चिनु ।
प्रदीपैर्दीपिते देशे न ह्यस्ति तमसो गतिः ॥ ३१ ॥

अर्थ :– ''म्हणून विपत्तीचा प्रतिकार धर्मानेच होऊ शकतो असे तूं ठामपणे समज. दीपांनी उजळलेल्या जागी अंधःकाराचा प्रवेश होऊ शकत नाही.''

इत्यादि स्वामिवाक्येन लब्धाश्वासा यथापुरम् ।

श्लोकांक (२९) स्वप्नदृष्टकृते - स्वप्नदर्शनादेव । सद्यः - तत्क्षणे । नष्टासुं - गतप्राणः । तनोषि - मन्यसे । (३०) किं कल्पते – किं समर्थः ? । (३२) लब्धाश्वासा - सचेतनावस्थां प्राप्ता ।

पत्या साकमसौ रेमे दुःखचिन्ता हि तत्क्षणे ॥ ३२ ॥

अर्थ :– **पतिदेवाच्या अशा भाषेने विजयारानीस धीर आला व ती पतिसह पूर्वीप्रमाणेच रममाण झाली. दुःखाची जाण तत्काल मात्र असते.**

अथ प्रबोधितं स्वप्नादप्रबुद्धममुं पुनः ।
बोधयन्तीव पत्नीयमन्तर्वत्नीधुरां दधौ ॥ ३३ ॥

अर्थ :– **स्वप्नामुळे तिला पतीच्या मरणाची आशंका आली असतांनाही ती जणू पतीला जाणवण्यासाठी ती गर्भभार धारण करू लागली.**

सदोहलामिमां वीक्ष्य दुःस्वप्नफलनिश्चयात् ।
अनुशेते स्म राजायमात्मरक्षापरायणः ॥ ३४ ॥

अर्थ :– **डोहाळे होत असलेले पाहून आपल्या दुःस्वप्नाचे फल निश्चित मानणारा सत्यंधर राजा आत्मरक्षेच्या चिंतेने आतुर होऊन पश्चात्तापाने कष्टी होत होता.**

मन्त्रिणां लंङ्घितं वाक्यमभाग्येन मया मुधा ।
विपाके हि सतां वाक्यं विश्वसन्त्यविवेकिनः ॥ ३५ ॥

अर्थ :– **मंत्र्याच्या प्रबोधनाचे उल्लंघन करणारा मी अभागीच खरा ! अविवेकी दुष्कर्माचे फळ मिळाल्यानंतर विश्वास करतात.**

न ह्यकालकृतावाञ्छा संपुष्णाति समीहितम् ।
किं पुष्पावचयः शक्यः फलकाले समागते ॥ ३६ ॥

अर्थ :– **अवेळी केलेल्या वांछेने इप्सित थोडेच मिळते ? फलाने वृक्ष भारावले असताना फुले गोळा करणे कसे शक्य आहे ?**

इत्यार्तो वंशरक्षार्थं केकियंत्रमचीकरत् ।
आस्था सतां यशःकाये न ह्यस्थायिशरीरके ॥ ३७ ॥

अर्थ :– **याप्रमाणे दुःखाने व्याकुळ राजाने (वंशरक्षा व्हावी म्हणून)**

श्लोकांक (३३) अन्तर्वत्नीधुरां - गर्भं । (३४) सदोहलां - दोहदवतीं । अनुशेतेस्म - पश्चात्तापं प्राप । (३५) मुधा - वृथा, निरर्थकं । विपाके - फलकाले । (३७) आस्था - श्रद्धा । यशःकाये - कीर्तये ।



**केकीयंत्र बनविले; कारण शूरवीर पुरुषाला अस्थायी शरीराची चिंता नसते. आपल्या यश या देहाचीच आस्था असते.**

आक्रीडे दौहदक्रीडामनुभोक्तुं विशांपतिः ।
व्यजीहरच्च यंत्रस्थां पत्नीं वर्त्मनि वार्मुचाम् ॥ ३८ ॥

अर्थ :– **सत्यंधराने आपल्या प्रिय पत्नीचे डोहाळे पुरविण्यासाठी तिला बगीच्यात नेले व त्या मयुराकृती यंत्रात बसवून आकाशात भ्रमण करविले.**

तावतैव कृतघ्नाख्यां राजघाख्यां च साधयन् ।
स्वविधेयां भुवं चेति काष्ठाङ्गारो व्यचीचरत् ॥ ३९ ॥

अर्थ :– **याच सुमारास कृतघ्न आणि राजास मारणारा हे बीरुद सिद्ध करणारा काष्ठांगार विचार करू लागला की हे तात्पुरते मिळालेले राज्य नेहमी आपले आधीन असावे.**

जीवितात्तु पराधीनाज्जीवानां मरणं वरम् ।
मृगेन्द्रस्य मृगेन्द्रत्वं वितीर्णं केन कानने ॥ ४० ॥

अर्थ :– **''जीवांच्या पराधीन जिण्यापेक्षा मरण बरे ! मृगराज सिंहाला मृगेन्द्रपणा हा जंगलामध्ये कोणी बहाल केला आहे कां ?''**

अचीकथच्च मंत्रिभ्यो राजद्रोहो विधीयताम् ।
इति राजद्रुहा नित्यं दैवतेनाभिधीयते ॥ ४१ ॥

अर्थ :– **याप्रमाणे विचार करून काष्ठांगार आपल्या प्रधानास म्हणाला, ''राजद्रोही देवता मला 'तूं राजद्रोह कर' असे नेहमी सांगत असते.''**

स्वन्तं किं नु दुरन्तं वा किमुदर्कं वितर्क्यताम् ।
अतर्कितमिदं वृत्तं तर्करूढं हि निश्चलम् ॥ ४२ ॥

अर्थ :– **''देवतेच्या आज्ञेचा शेवट चांगला होईल की दुःखद होईल ? 'त्याचा काय परिणाम होईल ?' याचा तर्क होत नाही. तेव्हा आपण याचा**

श्लोकांक (३८) वार्मुचां वर्त्मनि - आकाशे । (४२) स्वन्तं - शुभोदर्कम् । दुरन्तं - अशुभोदर्कम् ।

विचार करावा.''

जिव्हेमि वक्तुमप्येतदुक्तिर्दैवभयादिति ।
मनस्यन्यद्वचस्यन्यत्कर्मण्यन्यद्धि पापिनाम् ॥ ४३ ॥

अर्थ :– ''वास्तविक ही गोष्ट सांगण्याचीही मला लाज वाटते. ठीकच आहे. दुष्टाच्या मनांत वेगळेच असते, बोलण्यात वेगळेच असते आणि कृतीत दुसरेच काहीतरी असते.

तद्वाक्याद्वाच्यतो वंश्या यमिनः प्राणिहिंसनात् ।
क्षुद्रा दुर्भिक्षतश्चैव सभ्याः सर्वे हि तत्रसुः ॥ ४४ ॥

अर्थ :– काष्ठांगाराच्या या वचनाने जे कुलीन होते त्यांना हा विचार निंद्य वाटला. जे व्रती संयमी होते त्यांना प्राणी हिंसा होणार म्हणून दुःख झाले. आणि सामान्यजन दुष्काळाने भयभीत झाले. सर्वच सभ्य दुःखी व संत्रस्त झाले.

आत्मघ्नीं धर्मदत्ताख्यः सचिवो वाचमूचिवान् ।
गाढा हि स्वामिभक्तिः स्यादात्मप्राणानपेक्षिणी ॥ ४५ ॥

अर्थ :– सभेत जमलेल्या लोकांपैकी एक धर्मदत्त नावाचा मंत्री जेणे करून संकट ओढवेल असे वचन बोलला. निःसीम गाढ स्वामिभक्ती ही आपल्या प्राणांचीही पर्वा करत नाही.

राजानः प्राणिनां प्राणास्तेषु सत्स्वेव जीवनात् ।
तत्तत्र सदसत्कृत्यं लोक एव कृतं भवेत् ॥ ४६ ॥

अर्थ :– 'राजे लोक हे प्रजेचे प्राण असतात. कारण राजा असेल तर प्रजेचे रक्षण होते. तेव्हा राजासंबंधी जे जे बरेवाईट कृत्य घडेल ते ते प्रजेवर केल्यासारखे होईल.

एवं राजद्रुहां हन्त सर्वद्रोहित्वसंभवे ।
राजध्रुगेव किं न स्यात्पञ्चपातकभाजनम् ॥ ४७ ॥

अर्थ :– खेदाची गोष्ट आहे, राजद्रोहामध्ये सर्वच प्रकारचा द्रोह संभवतो. म्हणून जो राजद्रोह तो म्हणूनच करतो राजद्रोह पाच पापांचे निधान नाही कां ?

श्लोकांक (४५) आत्मघ्नीं - स्वघातिनीं ।



रक्षन्त्येवात्र राजानो देवान्देहभृतोऽपि च ।
देवास्तु नात्मनोऽप्येवं राजा हि परदेवता ॥ ४८ ॥

अर्थ :– इहलोकी राजा हाच सर्व देवतांचे व प्राणिमात्राचे रक्षण करणारा आहे. देव तर आपलेही रक्षण करू शकत नाही. म्हणून राजा ही परदेवता आहे.

किंचात्र दैवतं हन्ति दैवतद्रोहिणं जनम् ।
राजा राजद्रुहां वंशं वंश्यानन्यच्च तत्क्षणे ॥ ४९ ॥

अर्थ :– ''तसेच इहलोकी देवता आपला द्वेष करणाऱ्या मनुष्याचाच नाश करू शकेल. परंतु राजा राजद्रोह करणाऱ्याचा वंश व वंशाच्या लोकांचा नाश करेल.

अर्थिनां जीवनोपायमपायं चाभिभाविनाम् ।
कुर्वन्तः स्वलु राजानः सेव्या हव्यवहा यथा ॥ ५० ॥

अर्थ :– ज्याप्रमाणे अग्नी स्वयंपाकाचे कामी उपयोगात आणला तर तो जीवनाचा उपाय आहे. परंतु त्यावर पाय ठेवला तर तो जाळेलच, त्याप्रमाणे राजे सुद्धा आपल्या प्रजेचे पालनपोषण करतात तर त्यांच्यावर आणि त्यांचे राज्यावर आक्रमण करणाऱ्याचा नाश करतात. म्हणून यज्ञाच्या अग्नीप्रमाणं राजाची सेवा करावी.

इति धर्म्यवचोऽप्यासीन्मर्मभित्तीव्रकर्मणः ।
पित्तज्वरवतः क्षीरं तिक्तमेव हि भासते ॥ ५१ ॥

अर्थ :– याप्रमाणे धर्मदत्त मंत्र्याचे धर्म्य व न्याय्य वचनही तीव्र पापी काष्ठांगाराला मर्मभेदक वाटले. बरोबरच आहे की पित्तज्वराने पीडित रोग्याला दूधही कडूच लागते.

स कार्तघ्न्यादिदोषं च गुरुद्रोहं च किं परैः ।
परिवादं च नाद्राक्षीद्दोषं नार्थी हि पश्यति ॥ ५२ ॥

अर्थ :– ''आपणावर कृतघ्न, राजघातकी आणि गुरुद्रोहाचा दोषारोप येईल असा विचार काष्ठांगारास शिवलाही नाही. एवढेच नाही तर त्यास

श्लोकांक (५०) अभिभाविनाम् – आक्रामकानां । हव्यमहा - अग्नि (५१) तिक्तं - कटु । (५२) परिवादं - निन्दां, गर्हां । अर्थी - कार्यार्थी ।

लोकापवादाचेही भय वाटले नाही. स्वार्थी पापपुण्याचा-दोषांचा विचारच करत नाही.

मथनो नाम तत्स्यालस्तद्वाचं बह्वमन्यत ।
तद्धि पाणौ कृतं दात्रं परिपन्थिविधायिनः ॥ ५३ ॥

अर्थ :– काष्ठांगाराचा मथन नावाचा मेव्हणा होता. त्याने काष्ठांगाराचे बरेच समर्थन केले. काष्ठांगाराला आपल्या मेव्हण्याचे भाषण हे वध करणाऱ्याचे हाती शस्त्र मिळाल्यासारखे वाटले.

प्राहैषीच्च बलं हन्तुं राजानं हन्त पापधीः ।
पयो ह्यास्यगतं शक्यं पाननिष्ठीवनद्वये ॥ ५४ ॥

अर्थ :– त्या दुष्टबुद्धी काष्ठांगाराने राजास मारण्यासाठी आपले सैन्य पाठविले. तोंडी गेलेले दूध पिताही येते अथवा थुंकताही येते. सैन्याचा उपयोग रक्षणासाठीही व मारण्यासाठीही होऊ शकतो.

दौवारिकमुखादेतदुपलभ्य रुषा नृपः ।
उदतिष्ठत संग्रामे न हि तिष्ठति राजसम् ॥ ५५ ॥

अर्थ :– द्वारपालाचे मुखाने राजाने युद्धाची हकिकत ऐकून राजासही क्रोध उत्पन्न झाला. राजस वृत्तीचे पुरुष शत्रूचे आक्रमणाचा समाचार ऐकून कधीही स्वस्थ राहत नाहीत.

तावतार्धासनाद्भ्रष्टां नष्टासुं गर्भिणीं प्रियाम् ।
दृष्ट्वा पुनर्न्यवर्तिष्ट स्त्रीष्ववज्ञा हि दुःसहा ॥ ५६ ॥

अर्थ :– ही अकस्मात् युद्धवार्ता ऐकून राजाची गर्भवती राणी अर्धासनावरून खाली पडली व निश्चेष्ट झाली. हे पाहून राजा पुनः मागे परतला. स्त्रीची अवज्ञा दुःसह असते.

अबोधयच्च तां पत्नीं लब्धबोधो महीपतिः ।

श्लोकांक (५३) दात्रं - शस्त्रं । परिपंथिविवायिनः - विरोधिनः । (५४) आस्यगतं – मुखप्रविष्टं । निष्ठीवनं - (थुंकणे इति मराठीभाषायां) (५५) दौवारिक - द्वारपाल । (५७) लब्धबोधः - तत्वज्ञः ।



तत्वज्ञानं हि जागर्ति विदुषामार्तिसंभवे ॥ ५७ ॥

अर्थ :– ज्ञानसंपन्न राजाने राणीला संबोधित केले. ठीकच आहे. दुःखाचा संभव असतांना ज्ञानीचे तत्त्वज्ञान जागे होते.

शोकेनालमपुण्यानां पापं किं न फलप्रदम् ।
दीपनाशे तमोराशिः किमाव्हानमपेक्षते ॥ ५८ ॥

अर्थ :– ''प्रिये ! शोक पुरे झाला ! जे पुण्यशाली नाहीत त्यांचे पापकर्म फल कसे देणार नाही. अर्थात् देईलच. दीपक विझल्यानंतर घनदाट अंधारास बोलवावे लागते कां ?

यौवनं च शरीरं च संपच्च व्येति नाद्भुतम् ।
जलबुद्बुदनित्यत्वे चित्रीया न हि तत्क्षये ॥ ५९ ॥

अर्थ :– ''यौवन, शरीर आणि संपदा यांचा नाश होतो. यात काहीच आश्चर्य नाही. पाण्यावरील बुडबुडे विरून गेलेत यांत आश्चर्य नाही. ते टिकले तर आश्चर्य आहे !

संयुक्तानां वियोगश्च भविता हि नियोगतः ।
किमन्यैरङ्गतोऽप्यङ्गी निःसङ्गो हि निवर्तते ॥ ६० ॥

अर्थ :– ''ज्यांचा संयोग होतो त्यांचा वियोग हा निश्चितच दिसून येतो. फार काय शरीरी जीवास शरीरही सोडावेच लागते.

अनादौ सति संसारे केन कस्य न बन्धुता ।
सर्वथा शत्रुभावश्च सर्वमेतद्धि कल्पना ॥ ६१ ॥

अर्थ :– ''हा संसार अनादि आहे. कोणाची कोणासह बंधुता आहे ? कोणाशीच नाही. आणि सर्वस्वी शत्रुत्व तरी कोठे राहते ? या सर्व जीवाच्या कल्पनामात्र आहेत.''

इति धर्म्यं वचस्तस्या लेभे नैव पदं हृदि ।
दग्धभूम्युप्तबीजस्य न ह्यङ्कुरसमर्थता ॥ ६२ ॥

श्लोकांक (६०) नियोगतः - निश्चयेन । अङ्गी - आत्मा । निःसङ्ग - सम्बन्धरहितः ।

अर्थ :– असा हा राजाचा धर्मोपदेश राणीच्या हृदयास भिडू शकला नाही. जळालेल्या भूमिमध्ये टाकलेले बीज उगवण्यास समर्थ नसते.

अयं त्वापन्नसत्त्वां तामारोप्य शिखियन्त्रकम् ।
स्वयं तद्भ्रामयामास हन्त क्रूरतमो विधिः ॥ ६३ ॥

अर्थ :– त्या राजाने थोडा धीर प्राप्त झालेल्या विजया राणीस केकीयंत्रावर चढविले आणि त्याने स्वतः त्यास गती देऊन उडविले. अरेरे ! दैव किती निष्ठुर असते !

वियतास्मिन्गते योध्दुं स मोहादुपचक्रमे ।
न ह्यङ्गुलिरसाहाय्या स्वयं शब्दायतेतराम् ॥ ६४ ॥

अर्थ :– आणि ते केकीयंत्र आकाशातून जात असतांना तो मोहाने युद्धाने प्रतिकार करूं लागला. परंतु असहाय एक अंगुली काय शब्द करणार ? अर्थात् करणार नाही. तद्वत् एकटा लढून काय प्रतिकार होणार ? अर्थात् नाही.

अथ युद्ध्वा चिरं योद्धा मुधा प्राणिवधेन किम् ।
इत्यूहेन विरक्तोऽभूद्गत्यधीनं हि मानसम् ॥ ६५ ॥

अर्थ :– याप्रमाणे लढून व्यर्थ जीवघाताने लाभ तो कोणता ? अशा विचाराने विरक्त होऊन चूप राहिला. जशी गती असेल तशीच मती होते हेच तर शेवटी खरे आहे !

विषयासङ्गदोषोऽयं त्वयैव विषयीकृतः ।
सांप्रतं वा विषप्रख्ये मुञ्चात्मन्विषये स्पृहाम् ॥ ६६ ॥

अर्थ :– राजा स्वतःलाच संबोधून विचार करूं लागला - ''हे आत्मन् ! तूं आतापावेतो विषसमान विषयासक्तीचा स्वतःच अनुभव घेतलेला आहेस. आतां तरी विषासमान विषयांची इच्छा सोड कसा !

भुक्तपूर्वमिदं सर्वं त्वयात्मनभुज्यते ततः ।
उच्छिष्टं त्यज्यतां राज्यमनन्ता ह्यसुभृद्भवाः ॥ ६७ ॥

श्लोकांक (६३) आपन्नसत्वां - गर्भिणीं । (६४) उपचक्रमे - प्रारेभे । वियता - आकाशमार्गेण। असहाय्या - एकाकिनी । (६६) विषप्रख्ये - विषतुल्ये ।



अर्थ :– ''हे आत्मन् !! पूर्वी अनेकवार वारंवार भव धारण करून भोगलेल्या भोगांचीच पुनः इच्छा करतो आहेस म्हणून भुक्त उच्छिष्ट भोगांना व राज्यास सोड. जीवांनी तर अनंत भव घेतलेले आहेत.

अवश्यं यदि नश्यन्ति स्थित्वापि विषयाश्चिरम् ।
स्वयं त्याज्यास्तथा हि स्यान्मुक्तिः संसृतिरन्यथा ॥ ६८ ॥

अर्थ :– ''हे संसारातील विषयभोग दीर्घकाळ राहूनही अवश्यमेव नाश पावतात. जर त्यांना आपणहून स्वतः सोडले तर मुक्ती आहे. नाहीतर संसारात भटकणे आहेच.

त्यज्यते रज्यमानेन राज्येनान्येन वा जनः ।
भज्यते त्यज्यमानेन तत्त्यागोऽस्तु विवेकिनाम् ॥ ६९ ॥

अर्थ :– ''राज्य असो की अन्य कोणताही भोग असो जेवढे त्याचे मागे आसक्तीपूर्वक लागावे तेवढे ते सोडून जातात. आणि त्याग करावा तर ते प्राप्त होतात; म्हणून विवेकी जीवांना विषयांचा त्यागच श्रेयस्कर आहे.''

इति भावनया राजा वैराग्यं परमीयिवान् ।
त्यक्त्वा सङ्गं निजाङ्गं च दिव्यां संपदमासदत् ॥ ७० ॥

अर्थ :– अशा वारंवार चिंतवनाने राजास परम वैराग्य प्राप्त झाले. सर्व परिग्रह आणि आपले शरीर देखील सोडून स्वर्गीय संपत्ती व भोग प्राप्त करता झाला.

पौरा जानपदाः सर्वे निर्वेदं प्रतिपेदिरे ।
पीडा ह्यभिनवा नृणां प्रायो वैराग्यकारणम् ॥ ७१ ॥

अर्थ :– सर्व राज्यातील नगरवासीयांनाही वैराग्य उत्पन्न झाले. ठीकच आहे, प्रायः नवीन पीडा वा संकटे वैराग्यास कारण होतात.

अधिस्त्रिरागक्रूरोऽयं राज्यं प्राज्यमसूनपि ।
तद्वञ्चिता हि मुञ्चन्ति किं न मुञ्चन्ति रागिणः ॥ ७२ ॥

श्लोकांक (७१) निर्वेदं - वैराग्यं । प्रतिपेदिरे - प्राप । (७२) अधिस्त्रिरागः - स्त्रियां आसक्तिः । प्राज्यं - विस्तीर्णं । श्रेष्ठं ।

अर्थ :– स्त्रियांच्या संबंधी रागभाव हा असा भयंकर आहे की, त्याकारणाने ठगविल्या गेलेले प्राणी विशाल राज्य आणि आपले प्राणही सोडतात. रागीला काय काय सोडावे लागत नाही !

नारीजघनरन्ध्रस्थविण्मूत्रमयचर्मणा ।
वराह इव विड्भक्षी हन्त मूढः सुखायते ॥ ७३ ॥

अर्थ :– ''खेदाची गोष्ट आहे की, स्त्रियांचा जघन भाग हा मलमूत्राने भरलेला असूनही विष्टा भक्षण करणाऱ्या डुकराप्रमाणे मूढ जीव सुख मानतात.

किं कीदृशं कियत्क्वेति विचारे सति दुःसहम् ।
अविचारितरम्यं हि रामासंपर्कजं सुखम् ॥ ७४ ॥

अर्थ :– जसा जसा स्त्रीसंगाचा विचार करावा की स्त्रीसुख कसे आहे, काय आहे, किती काळ टिकेल. असा विचार करावा तेवढा दुस्सह आहे. स्त्रीसहवासाचे सुख हे विचार न करावा तोपावेतोच रम्य आहे.

निवारिताप्यकृत्ये स्यान्निष्फला दुष्फला च धीः ।
कृत्ये तु नापि यत्नेन कोऽत्र हेतुर्निरूप्यताम् ॥ ७५ ॥

अर्थ :– दुष्कृत्यापासून हटवूनही बुद्धी निष्फल वा दुःखफल देते. आणि कर्तव्यामध्ये बुद्धिपूर्वक लावूनही लागत नाही. याचे कारण काय असावे ?

निश्चित्याप्यघहेतुत्वं दुश्चित्तानां निवारणे ।
येनात्मन्निपुणो नासि तद्धि दुष्कर्मवैभवम् ॥ ७६ ॥

अर्थ :– ही सर्व दुर्बुद्धी पापास कारण आहे असा निश्चय करूनही, हे आत्मन् ! तू तिला मात्र सोडू शकत नाहीस हेच पापकर्माचे वैभव आहे !

हेये स्वयं सती बुद्धिर्यत्नेनाप्यसती शुभे ।
तद्धेतुकर्म तद्वन्तमात्मानमपि साधयेत् ॥ ७७ ॥

अर्थ :– हेयामध्ये स्वतःहून प्रवर्तणारी बुद्धी शुभकार्यामध्ये लावूनही लागत नाही. असे कां ? त्या दुष्कर्मास कारणभूत कर्मच त्याप्रमाणे जीवास प्रवर्तन करविते. असेच मानावे लागते.

---

श्लोकांक (७७) सती - अभिमुखी । असती - विमुखी ।



कोऽहं कीदृग्गुणः क्वत्यः किं प्राप्यः किं निमित्तकः ।
इत्यूहः प्रत्यहं नो चेदस्थाने हि मतिर्भवेत् ॥ ७८ ॥

अर्थ :– मी कोण आहे ? माझे गुण कोणते ? कोठून आलो ? काय मिळवावयाचे आहे ? त्याचे कारण काय ? याप्रमाणे मानवाने सारासार विवेक न केला तर बुद्धि उन्मार्गामध्ये लागेल.

मुह्यन्ति देहिनो मोहान्मोहनीयेन कर्मणा ।
निर्मितान्निर्मिताशेषकर्मणा धर्मवैरिणा ॥ ७९ ॥

अर्थ :– ज्याने अवशिष्ट कर्म घडविले आहेत अशा मोहनीय कर्माच्या निमित्ताने होणाऱ्या मोहामुळे सर्वच जीव (संसारी) मोहित होतात.

किं न कर्तुं त्वयारब्धं किं नु वा क्रियतेऽधुना ।
आत्मन्नारब्धमुत्सृज्य हन्त बाह्येन मुह्यसि ॥ ८० ॥

अर्थ :– हे आत्मन् ! तूं काय करण्यास प्रारंभ केला होता आणि आता काय करतो आहेस ? प्रारंभलेले कार्य सोडून तूं बाह्य परिग्रहामध्ये का मोहित होतोस ?

इदमिष्टमनिष्टं वेत्यात्मन्संकल्पयन्मुधा ।
किं नु मोमुह्यसे बाह्ये स्वस्वान्तं स्ववशीकुरु ॥ ८१ ॥

अर्थ :– हे इष्ट आहे की अनिष्ट आहे असे संकल्प मात्र करून हे आत्मन् ! तूं बाह्य पदार्थामध्ये कां मोहित होतोस ? म्हणून तूं, आपले मन आपल्या आधीन ठेव.

लोकद्वयाहितोत्पादि हन्त स्वान्तमशान्तिमत् ।
न द्वेक्षि द्वेक्षि ते मौढ्यादन्यं संकल्प्य विद्विषम् ॥ ८२ ॥

अर्थ :– दोन्ही लोकांत (इहपरलोकीं) अहित करणाऱ्या अशा अशांत आपल्याच मनाचा तूं द्वेष न करता मूढतेमुळे दुसऱ्यास शत्रु मानून त्याचा द्वेष करतोस.

---

श्लोकांक (८०) बाह्येन - परपदार्थेन (८१) स्वस्वान्तं - स्वकीयं अंतःकरणं । (८२) विद्विषं - शत्रुं । द्वेक्षि - द्वेषं करोषि ।

अन्यदीयमिवात्मीयमपि दोषं प्रपश्यता ।
कः समः खलु मुक्तोऽयं युक्तः कायेन चेदपि ॥ ८३ ॥

अर्थ :– जो दुसऱ्याचे दोषाप्रमाणे आपलेही दोष पाहतो त्यासारखा कोण आहे ? खरोखर तो शरीरसहित असूनही जणूं मुक्तच आहे !

इत्यादयूहपरे लोके केकी तु वियता गता ।
पातयामास राज्ञीं तां तत्पुरप्रेतवेश्मनि ॥ ८४ ॥

अर्थ :– याप्रमाणे लोक विचार करत असतांना आकाशमार्गाने जाणाऱ्या केकीयंत्राने त्या राणीला त्या नगरीच्या स्मशानामध्ये टाकले.

जीवानां पापवैचित्रीं श्रुतवन्तः श्रुतौ पुरा ।
पश्येयुरधुनेतीव श्रीकल्पाभूदकिञ्चना ॥ ८५ ॥

अर्थ :– जीवांच्या पापाच्या वैचित्र्याचे पूर्वी शास्त्रांत श्रवण करणाऱ्यानी आता हे पाहावे की, जणूं साक्षात् लक्ष्मी अकिंचन, दरिद्री झाली आहे !

क्षणनश्वरमैश्वर्यमित्यर्थं सर्वथा जनः ।
निरणैषीदिमां दृष्ट्वा दृष्टान्ते हि स्फुटा मतिः ॥ ८६ ॥

अर्थ :– ऐश्वर्य हे क्षणात सर्वस्वी नाश पावणारे आहे असा विजयाराणीस पाहून निर्णय करावा. कारण उदाहरणाने बुद्धि स्पष्ट होते.

पूर्वाह्णे पूजिता राज्ञी राज्ञा सैवापराह्णके ।
परेतभूशरण्याऽभूत्पापाद्बिभ्यतु पंडिताः ॥ ८७ ॥

अर्थ :– सकाळी राजाकरवी पूजनीय (माननीय) असणारी. तीच सायंकाळी अपरात्री स्मशानभूमीला शरण गेली. पंडितांनी पापाचे भय बाळगावे !

सा तु मूर्च्छापराधीना सूतिपीडामजानती ।
मासि वैजनने सूनुं सुषुवे हन्त तद्दिने ॥ ८८ ॥

अर्थ :– ती विजया मूर्छेच्या आधीन होऊन बाळंतपणाच्या वेदनाही तिला

श्लोकांक (८४) ऊहपरे - विचारमग्ने । प्रेतवेश्मनि - स्मशानभूमौ । (८५) श्रुतौ - शास्त्रे। श्रीकल्पा - लक्ष्मीतुल्या । अकिञ्चना - निर्धना । (८७) परेतभूः - स्मशानभूमिः । (८८) वैजनने मासि - प्रसूतिमासे ।



जाणवल्या नाहीत. त्याच दिवशी प्रसवमासीं तिने मुलास जन्म दिला.

तावता देवता काचिद्धात्रीवेषेण संन्यधात् ।
तत्रैव पुत्रपुण्येन पुण्ये किं वा दुरासदम् ॥ ८९ ॥

अर्थ :– तेवढ्यातच पुत्राच्या पुण्योदयाने कोणी एक देवता दाईचा वेष घेवून तेथे आली. पुण्य असेल तर काय प्राप्त होणे कठीण असते ?

तां पश्यन्त्या अभूत्तस्या उद्वेलः शोकसागरः ।
संनिधौ हि स्वबन्धूनां दुःखमुन्मस्तकं भवेत ॥ ९० ॥

अर्थ :– त्या दाईस पाहून विजयाराणीचा शोकसागर बेफाम झाला. आपल्या मित्र बांधवाच्या सान्निध्यात शोकाला भरती येते.

देवता तु समाश्वास्य जातमाहात्म्यवर्णनैः ।
ऊर्णादिदर्शनोद्भूतैर्देवी तामित्यवोचत् ॥ ९१ ॥

अर्थ :– त्या बालकाच्या दोन भुवयामध्ये भोवरा आदि शुभचिन्हे पाहून जन्मलेल्या पुत्राच्या भाग्याचे वर्णन करून राणीला धीर देऊं लागली व तिने राणीला संबोधित केले.

पुत्राभिवर्धनोपाये देवि ! चिन्तां निवर्त्यताम् ।
क्षत्रपुत्रोचितं कश्चिदेनं संवर्धयिष्यति ॥ ९२ ॥

अर्थ :– ''पुत्राच्या रक्षणादिकांची चिंता सोडून द्यावी. 'कोणी एक क्षत्रिय राजपुत्राप्रमाणे त्याचे संवर्धन करील.

इत्युक्ते कोऽपि दृष्टोऽभूद् विसृष्टप्रेतसूनुकः ।
सूनुं सुनृतयोगीन्द्रवाक्यात्तत्र गवेषयन् ॥ ९३ ॥

अर्थ :– एवढे ती म्हणाली असतांना ज्याने पुत्राचे प्रेत सोडले आहे असा कोणी एक नजरेस पडला. तो सत्यभाषी मुनीश्वरांनी पूर्वीच भविष्य कथन केले होते की, तुला एक बालक स्मशानात मिळेल. त्याप्रमाणे तो शोधत शोधत आला

श्लोकांक (८९) दुरासदम् - दुष्प्राप्यं । (९१) ऊर्णादिदर्शनोद्भूतैः - सामुद्रिक-शास्त्रोक्त-चिन्ह - विशेषदर्शनोत्पन्नैः । (९३) विसृष्टप्रेतसूनुकः - सूनोः विसृष्टं-त्यक्तं येन सः । गवेषयन् - शोधयन् ।

व रात्री देवीने त्यास पाहिले.

तद्दर्शनेन तद्वाक्यं प्रमाणं निर्णिनाय सा ।
निश्चलादविसंवादात् वस्तुनो हि विनिश्चयः ॥ ९४॥

अर्थ :– त्याच्या दर्शनाने राणीला देवीचे वचन खरे वाटले. कोणतीही गोष्ट आपण जशी ऐकली तशीच जर दिसून आली, त्यात कोणताही विसंवाद आढळला नाही तर त्या गोष्टीचा निर्णय होतो.

ततो गत्यन्तराऽभावात् देवताप्रेरणाच्च सा ।
पित्रीयमुद्रयोपेतमाशास्यान्तर्धात्सुतम् ॥ ९५॥

अर्थ :– त्यावेळी दुसरा कोणताच उपाय नसल्यामुळे आणि देवतेच्या आग्रहामुळे पित्याची आंगठी त्याचे बोटात घालून व त्यास आशीर्वाद देऊन राणी अंतर्धान पावली.

गन्धोत्कटोऽपि तं पश्यन्नातृपद्वैश्यनायकः ।
एधोन्वेषिजनैर्दृष्टः किं वा न प्रीतये मणिः ॥ ९६॥

अर्थ :– वैश्यश्रेष्ठी गंधोत्कटही त्या बालकाला पाहताच आनंदित झाला. इंधन शोधणाऱ्यास नररत्न सापडले. त्यास आनंद होणार नाही कां ? अर्थात् होईलच.

हर्षकण्टकिताङ्गोऽयमादधानस्तमङ्गजम् ।
जीवेत्याशिषमाकर्ण्य तन्नाम समकल्पयत् ॥ ९७॥

अर्थ :– आनंदाने पुलकित झालेल्या गंधोत्कट श्रेष्ठीने त्या बालकास उचलून घेत असतांना ''जीव ! जीव !'' (सुखाने जग) असे शब्द ऐकल्याने त्याचे 'जीवंधर' नाव ठेवण्याचा संकल्प करता झाला.

अमृतं सूनुमज्ञानात् संस्थितं कथमभ्यधाः ।
इति क्रुध्यन्स्वभार्यायै सानन्दोऽयमदात्सुतम् ॥ ९८॥

अर्थ :– न मेलेल्या मुलास अज्ञानवश मृत जाणून 'मेला' असे कसे

श्लोकांक (९७) हर्ष - कण्टकिताङ्गः - हर्षभरेण रोमाञ्चितदेहः, पुलकितांगः । (९८) संस्थितं - मृतं ।



म्हणालीस ? याप्रमाणे आपल्या पत्नीस रागावून आनंदविभोर होऊन आणलेल्या बालकास पत्नीच्या स्वाधीन केले.

अभ्यनन्दीत्सुनन्दापि नन्दनस्यावलोकनात् ।
प्राणवत्प्रीतये पुत्रा मृतोत्पन्नस्तु किं पुनः ॥ ९९॥

अर्थ :– बालकास पाहून सुनंदाही हर्षित झाली. साहजिकच आहे आधीच पुत्र प्राणाप्रमाणे सर्वांनाच प्रीतीस कारण असतात. त्यात तो मृतवत दिसून जिवंत दिसला तर त्यास पाहून प्रीति होणार नाही कां ?

देवता जननीमस्य बन्धुवेश्मपराङ्मुखीम् ।
दण्डकारण्यमध्यस्थमनैषीत्तापसाश्रमम् ॥ १००॥

अर्थ :– त्या देवतेने बंधुच्या घरी जाण्यास नाखुष त्या मातेला दंडकारण्यामध्ये अवस्थित तापसाश्रमामध्ये पोचविले.

कृत्वा च तां तपस्यन्तीं सतोषा सा मिषादगात् ।
समीहितार्थसंसिद्धौ मनः कस्य न तुष्यति ॥ १०१॥

अर्थ :– यानंतर विजयाराणीला तपमार्गात स्थित करून ती संतोष पावली. या मिषाने ती देवता निघून गेली. आपले इप्सिताची सिद्धी झाल्यानंतर कोणाचे मन प्रसन्न होणार नाही ?

अवासीद्राजपत्नी च वत्सं निजमनोगृहे ।
जिनपादाम्बुजं चैव ध्यायन्ती हन्त तापसी ॥ १०२॥

अर्थ :– तसेच राणी विजया जिनेंद्राच्या चरण कमलाचें ध्यान करीत आपल्या पुत्रास आपल्या मनोगृहांत जागा देती झाली.

अनल्पतूलतल्पस्थसवृन्तप्रसवादपि ।
निर्भरं हन्त सीदन्त्यै दर्भशय्याप्यरोचत ॥ १०३॥

अर्थ :– भरपूर रुईने बनलेल्या आणि फुलाच्या शय्येवर झोपणाऱ्या ज्या विजयाराणीला फुलांचे देठही बोचत होते त्या राणीला चटई पण प्रिय वाटू

श्लोकांक (१०१) मिषात् - छलेन । (१०३) सवृन्तप्रसवात् - बंधनसहितकुसुमात् । निर्भरं - भूरि । सीदन्त्यै - पीडितायै ।

लागली.

स्वहस्तलूननीवारोऽप्याहारोऽस्याः परेण किम् ।
अवश्यं ह्यनुभोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम् ॥ १०४ ॥

अर्थ :– आपल्या हाताने तयार केलेले निवार (तांदुळ) हाच तिचा आहार होता. जे शुभ-अशुभ कृत्ये केलीत त्याचे फल भोगण्यापासून सुटका नाही.

अथ गन्धोत्कटायार्थमर्मकार्थं महोत्सवम् ।
आत्मार्थं गणयन्मूढः काष्ठाङ्गारोऽप्यदान्मुदा ॥ १०५ ॥

अर्थ :– गंधोत्कटाचे घरी बालकाच्या आगमनामुळे जो उत्सव होता तो आपल्याचसाठी आहे असे मानणाऱ्या मूढ काष्ठांगाराने गन्धोत्काला खूप धन दिले.

तत्क्षणे तत्पुरे जाताञ्जातानपि तदाज्ञया ।
लब्ध्वा वैश्यपतिः पुत्रं मित्रैः सार्धमवर्धयत् ॥ १०६ ॥

अर्थ :– वैश्यश्रेष्ठी गंधोत्कट, जीवंधर कुमारासोबत त्या नगरीत जन्मलेल्या समवयस्क बालकांना बोलावून त्यासह जीवंधर कुमाराचे पालनपोषण करू लागला.

अथ जातः सुनन्दाया नन्दाढ्यो नाम नन्दनः ।
तेन जीवंधरो रेजे सोभ्रात्रं हि दुरासदम् ॥ १०७ ॥

अर्थ :– तसेच तदनंतर सुनंदेला नंदाढ्य नावाचा पुत्र झाला. त्या भावाच्या संसर्गामुळे जीवंधरकुमार अधिकच शोभायमान होत होता. चांगला भाऊ लाभणे हेहि दुर्लभच आहे.

एवं सद्बन्धुमित्रोऽयमेधमानो दिनेदिने ।
अतिशेते स्म शीतांशुभकलङ्काङ्गभावतः ॥ १०८ ॥

अर्थ :– याप्रमाणे भाऊ आणि मित्राच्या संगतीत दिन-प्रतिदिन आपल्या

श्लोकांक (१०६) जातान् - उत्पन्नान् । जातान् – पुत्रान् । वैश्यपतिः - गंधोत्कटः । (१०७) सौभ्रात्रं - सद्बंधुता । दुरासदं - दुष्प्राप्यं । (१०८) एधमानः - वर्धमानः शीतांशुं - चन्द्रमसं ।



सुंदर शरीराच्या कांतीने चंद्रालाही मागे टाकत होता.

ततः शैशवसंभूष्णुसर्वव्यसनदूरगः ।
पंचमं च वयो भेजे भाग्ये जाग्रति का व्यथा ॥ १०९ ॥

अर्थ :– याप्रमाणे शैशवामध्ये संभवनीय सर्व व्यसनापासून दूर राहणारा जीवंधर कुमार पाच वर्षाचा झाला. भाग्यच जर जागृत असेल तर कोणती व्यथा असू शकेल ?

अथानर्थकमव्यक्तमतिहृद्यं च वाङ्मयम् ।
मुक्त्वाऽतिव्यक्तगीरासीत्स्वयं वृण्वन्ति हि स्त्रियः ॥ ११० ॥

अर्थ :– तद्नंतर अर्थविरहित, अस्पष्ट शब्दमय आणि मनोहर अशी तोतले वचन सोडून कुमार अत्यंत स्पष्टभाषी झाला. योग्यच आहे की, वाणी सारख्या स्त्रिया जीवंधरकुमाराचा आश्रय घेत असत.

आचार्यैकवपुः कश्चिदार्यनन्दीति कीर्तितः ।
आसीदस्य गुरुः पुण्याद् गुरुरेव हि देवता ॥ १११ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराच्या पुण्याने कोणी आर्यनंदी नावाच्या विख्यात गुरूचा लाभ झाला. गुरू म्हणजेच प्राणीमात्रांना देवतारूप आहेत.

निष्प्रत्यूहेष्टसिद्ध्यर्थं सिद्धपूजादिपूर्वकम् ।
सिद्धमातृकया सिद्धामथ लेभे सरस्वतीम् ॥ ११२ ॥

अर्थ :– तदनंतर जीवंधर कुमाराने इष्टसिद्धि निराबाध व्हावी म्हणून सिद्धपूजापूर्वक अनादि स्वर व्यंजन मात्राद्वारा जणू प्रसिद्धच अशा सरस्वतीला प्राप्त केले.

इति श्रीमत् वादीभसिंहसूरि–विरचिते
क्षत्रचूडामणौ सरस्वतीलम्भोनाम
प्रथमो लम्बः ।

श्लोकांक (१०९) भेजे - प्राप । (११०) अतिहृद्यं - अतिमनोहरं । अतिव्यक्तगीः - सुस्पष्टभाषी । (१११) आचार्यैकवपुः - आचायकं आचार्यत्वं, तदेव वपुः यस्य सः । (११२) सिद्धमातृकया - 'अ इ उ क्र क ख' इत्यादि वर्णमाला, तया । सिद्धां - प्रसिद्धां ।

# द्वितीय लंब

अथ विद्यागृहं किंचिदासाद्य सखिमण्डितः ।
पण्डिताद्विश्वविद्यायामध्यगीष्टातिपण्डितः ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे आपल्या मित्रासह स्वयंपंडित कुमार जीवंधर कोणत्याही विद्यालयामध्ये सर्वच विद्यामध्ये निपुण अशा पंडितापासून विद्या प्राप्त करून अतिशय विद्वान् झाला.

तस्य प्रश्रयशुश्रूषाचातुर्याद्गुरुगोचरात् ।
स्मृता इवाभन्विद्या गुरुस्नेहो हि कामसूः ॥ २ ॥

अर्थ :– त्याची (गुरुची) सेवा, शुश्रुषा आणि चातुर्यामुळे त्यास विद्या आठवल्यागत प्राप्त झाली. (म्हणजे अत्यल्प परिश्रमाने प्राप्त झाली) ठीकच आहे, गुरुभक्ती सर्व इच्छित पूर्ण करणारी असते.

अनुजीवकमेवात्र जीवलोके विपश्चितः ।
इति निश्चयतः सूरिः सुतरां प्रीतिमव्रजत् ॥ ३ ॥

अर्थ :– या संसारामध्ये सर्वच विद्वान् जीवंधराच्या मागेच आहेत. असे दिसून आल्या कारणाने गुरू आर्यनंदी अत्यंत संतुष्ट झालेत.

आत्मकृत्यमकृत्यं च सफलं प्रीतये नृणाम् ।
किं पुनः श्लाध्यभूतं तत्किं विद्यास्थापनात्परम् ॥ ४ ॥

अर्थ :– आपले कृत्य-अकृत्य जर सफल झाले तर मनुष्यांना आनंददायी होते. त्यांतही विद्यादानापेक्षा परम स्तुत्य काय असूं शकते ? असे सत्कार्य पूर्ण सफल झाले त्यापेक्षा आनंद कोणता ?

अथ प्रसन्नधीः सूरिरन्तेवासिनमेकदा ।
एकान्ते हि निजप्रांतमावसन्तमचीकथत् ॥ ५ ॥

श्लोकांक (१) अध्यगीष्ट - अधीतवान् । (२) प्रश्रयः - विनयः । कामसूः - कामान् मनोरथान् सूते प्रसौति इति कामसूः कामधुक् इत्यर्थः । (३) विपश्चितः - पण्डिताः अनुजीवकं - जीवकस्य अनुपूर्व्येण इति (अव्ययीभाव) (५) अन्तेवासिनं - शिष्यं ।



अर्थ :– अशाप्रकारे प्रसन्न आर्यनंदी गुरू एकदा एकांतामध्ये आपणाजवळ बसलेल्या आपले शिष्यास म्हणाले -

श्रुतशालिन्महाभाग श्रूयतामिह कस्यचित् ।
चरितं चरितार्थेन यदत्यर्थं दयावहम् ॥ ६ ॥

अर्थ :– ''हे विद्यालंकृत ! महाभाग ! तूं कुणा एकाची चरितकहाणी ऐक. ती जीवितकथा अत्यंत अनुकंपा उत्पन्न करणारी आहे.

विद्याधरास्पदे लोके लोकपालाव्हयान्वितः ।
लोकं वै पालयन्भूपः कोऽपि कालमजीगमत् ॥ ७ ॥

अर्थ :– ''विद्याधरांच्या निवासस्थानी कोणी एक लोकपाल नावाचा राजा आपल्या नावाप्रमाणे प्रजेचे पालन उत्तम रीतीने करत करत सुखाने काळ घालवित होता.

क्षणक्षीणत्वमैश्वर्ये क्षीबाणामिव बोधयत् ।
क्षेपीयः पश्यतां नश्यदभ्रमैक्षिष्ट सोऽधिराट् ॥ ८ ॥

अर्थ :– ''एके दिवशी त्या राजाने जणू काही ऐश्वर्याच्या क्षणिकपणाचे अस्थायीपणास बोधक अशा क्षणात क्षीण होणाऱ्या मेघसमूहास पाहिले.

तद्वीक्षणेन वैराग्यं विजजृम्भे महीभुजः ।
पम्फुलीति हि निर्वेगो भव्यानां कालपाकतः ॥ ९ ॥

अर्थ :– ''नाश पावणारा मेघ पाहून राजाचे वैराग्य अधिकच वृद्धिंगत झाले. भव्य जीवांचे वैराग्य काललब्धीला अनुसरून विशेषरूपात प्रगट होते.

ततोऽयं पुत्रनिक्षिप्तराज्यभारः क्षितीश्वरः ।
जैनीं दीक्षामुपादत्त यस्यां कायेऽपि हेयता ॥ १० ॥

अर्थ :– ''नंतर त्या राजाने आपल्या मुलावर राज्यभार सोपवून जिनदीक्षेचा

श्लोकांक (६) श्रुतशालिन् - श्रुतपारग । (८) क्षीबाणां - मत्तानां । क्षेपीयः - त्वरितम् । अधिराट् - अधिकः राट्र (प्रादि) - नृपतिः (लोकपालः) । (९) विजजृम्भे - अवर्धत । पम्फुलीति - भृशं फलति । निर्वेगः - वैराग्यं (१०) पुत्रनिक्षिप्तराज्यभारः - पुत्रे निक्षिप्तः राज्यभारः येन सः (बहुव्रीहि)

स्वीकार केला. जिनदीक्षेमध्ये तर शरीरामध्येही हेयपणाची भावना असते.

तपांसि तप्यमानस्य तस्य चासीदहो पुनः ।
भस्मकाख्यो महारोगो भुक्तं यो भस्मयेत्क्षणात् ॥ ११ ॥

अर्थ :– ''तपसाधना करत असतांना त्याला भस्मक नावाचा दुर्धर रोग झाला. तो रोग जे खावे ते क्षणात भस्मसात् करत असे.

न हि वारयितुं शक्यं दुष्कर्माल्पतपस्यया ।
विस्फुलिङ्गेन किं शक्यं दग्धुमार्द्रमपीन्धनम् ॥ १२ ॥

अर्थ :– ''अल्पकालीन दीक्षेने दुष्कर्माचे फळ निवारण करणे शक्य नसते - अग्नीच्या ठिणग्यांनी ओले इंधन जाळणे शक्य होते कां?

अशक्तयैव तपः सोऽयं राजा राज्यमिवात्यजत् ।
श्रेयांसि बहुविघ्नानीत्येतन्नह्यधुनाभवत् ॥ १३ ॥

अर्थ :– ''लोकपाल राजा सामर्थ्य नसल्याकारणाने राज्याप्रमाणे दीक्षेलाही सोडता झाला. श्रेयकार्यामध्ये बहु विघ्ने असतात ही किंवदन्ती आजची नसून पूर्वीपासून चालत आली आहे.

तपसाच्छादितस्तिष्ठन्स्वैराचारी हि पातकी ।
गुल्मेनान्तर्हितो गुल्मन्विष्किरानिव नाफलः ॥ १४ ॥
अवर्तिष्ट यथेष्टं स पाषाण्डितपसा पुनः ।
चित्रं जैनी तपस्या हि स्वैराचारविरोधिनी ॥ १५ ॥

अर्थ :– ''ज्याप्रमाणे एखादा शिकारी झाडझुडप्यात लपून पाखरे पकडतो तद्वत् तो पापी संन्यासी खोटा साधूवेष घेवून स्वैराचारी बनला व स्वैरपणाने यथेष्ट वागू लागला. खोटी तपस्या करू लागला. खरोखरच जैनी दीक्षा ही स्वैराचाराच्या विरोधी आहे.

---

श्लोकांक (११) भस्मकाख्यः - भस्मकः आख्या यस्यसः (बहु०) (१२) विस्फुलिङ्गेन - अग्निकणेन । (१४) गुल्मेन - पर्णगुच्छेन । अन्तर्हितः - आच्छदितः । विष्किरान् - पक्षिणः । नाफलः - व्याधः ।



अथ भिक्षुर्बुभुक्षुः सन् गन्धोत्कटगृहं गतः ।
उपतापरुजोऽप्येष धार्मिकाणां भिषक्तमः ॥ १६ ॥

अर्थ :– ''असा हा पाखंडी व भूकेला साधू गंधोत्कट श्रेष्ठीच्या घरी गेला. तो तापसी रोगाने ग्रस्त असूनही धर्मात्मा जीवासाठी उत्तम वैद्य होता.

धार्मिकाणां शरण्यं हि धार्मिका एव नापरे ।
अहेर्नकुलवत्तेषां प्रकृत्यान्ये हि विद्विषः ॥ १७ ॥

अर्थ :– ''धर्मात्म्यास शरण-आश्रय धर्मात्माच असतो. अन्य अधार्मिक परिग्रही प्राणी हे तर स्वभावतःच साप व मुंगुसाप्रमाणे विरोधी शत्रूप्रमाणेच असतात.

तत्र मध्येगृहं भिक्षुरद्राक्षीत्पुत्रपुंगवम् ।
अङ्ग त्वां च तं वीक्ष्य तद्बुभुक्षामलक्षयः ॥ १८ ॥

अर्थ :– तेथे ह्या भिक्षुने श्रेष्ठीच्या घरात पुत्रपुंगव जीवंधर कुमारास पाहिले. त्यास तू पाहून आणि त्याने तुला पाहून ''हा भूकेला आहे'' असे त्याने जाणले.

भोक्तुमारभमाणस्त्वं पौरोगवमचीकथः ।
भोज्यतामयमित्येष पुनरेनमबूभुजत् ॥ १९ ॥

अर्थ :– ''तूं भोजनाच्या तयारीत असता तू आचाऱ्यास सांगितले की, ''महाराज या भिक्षूला भोजन द्या' आणि आचाऱ्याने त्यास जेवू घातले.

अन्नैस्तद्गृहसंपन्नैर्नाभूत्तत्कुक्षिपूरणम् ।
अहो पापस्य घोरत्वमाशाब्धिः केन पूर्यते ॥ २० ॥

अर्थ :– ''त्या घरांत शिजविलेल्या अन्नाने त्या भिक्षुकाची भूक शांत झाली नाही. अहो पाप असेच भयंकर असते ! आशेचा सागर कोण शांत करू शकतो ?

---

श्लोकांक (१६) उपतापरुजः - रोगपीडितस्य । भिषक्तमः - वैद्यवरः । (१७) विद्विषः - शत्रवः । पुंगवः - श्रेष्ठः । अङ्ग - हे वत्स । अलक्षयः - अपश्यः । (१९) पौरागवम् - पुरः प्रथमं याच्यवस्तुषु गौ नेत्रं यस्य तं, पाकशाला - व्यवस्थापकः तम् । (२०) कुक्षिः - उदरं ।

अभुञ्जानस्त्वमाश्चर्यादासीनोऽस्मै वितीर्णवान् ।
कारुण्यादस्य पुण्याद्वा करस्थं कवलं मुदा ॥ २१ ॥

अर्थ :– "तूं भोजन न करता पाटावर बसून आश्चर्याने पाहत राहिलास. तेव्हा करुणेने म्हणा की त्या भिक्षुकाच्या पुण्याने म्हणा आपल्या हातातील घास त्या भिक्षुकास आनंदाने दिला.

वर्णिनो जठरं पूर्णं तदास्वादनतः क्षणात् ।
आशाब्धिरिव नैराश्यादहो पुण्यस्य वैभवम् ॥ २२ ॥

अर्थ :– आणि आश्चर्य ! आशेचा सागर नैराश्याने - वैराग्याने पूर्ण भरावा त्याप्रमाणे त्याने दिलेल्या घासाचा आस्वाद घेता क्षणीच त्या भिक्षुकाचे पोट यथेच्छ भरले ! अहो हा पुण्याचा प्रभाव आहे !

परिव्राडपि संप्राप्य सौहित्यं तत्क्षणे चिरात् ।
महोपकारिणोऽस्याहं किं करोमीत्यचिन्तयत् ॥ २३ ॥

अर्थ :– कुमार जीवंधराने दिलेला घास गिळताक्षणीच संन्याशाच्याही रोग शांत झाला. माझ्यावर महान उपकार करणाऱ्याची काय परतफेड करावी असा तो महात्मा उपकाराचा विचार करू लागला.

अपश्चिमफलां विद्यां निश्चित्यात्र प्रतिक्रियाम् ।
आयुष्मन्तमसौ पश्चाद्विपश्चितमकल्पयत् ॥ २४ ॥

अर्थ :– कुमाराने केलेल्या उपकाराची परतफेड त्यास सर्वोत्कृष्ट फल देणाऱ्या विद्येचे दान हीच होऊ शकते असा त्याने निर्णय केला. त्याने या आयुष्मानास विद्येत पारंगत करण्याचा निर्णय केला.

विद्या हि विद्यमानेयं वितीर्णापि प्रकृष्यते ।
नाकृष्यते च चौराद्यैः पुष्यत्येव मनीषितम् ॥ २५ ॥

---

श्लोकांक (२१) आसीनः - स्थितः । वित्तीर्णवान् - दत्तवान् । कवलं - ग्रासं । (२२) वर्णिनः - ब्रह्मचारिणः (भिक्षोः) (२३) परिव्राट् - साधुः । सौहित्यं - स्वास्थ्यं, रोगनिवृत्तिं । महोपकारिणः - महान् उपकारी महोपकारी तस्य । (कर्म०) (२४) अपश्चिमफलां - नास्ति पश्चिमः अन्तः यस्याः तां अनन्तफलदां इत्यर्थं । प्रतिक्रिया - प्रत्युपकारं । आयुष्मन्तं - दीर्घायुषं । विपश्चितं - पण्डितं । अकल्पयत् - चकार (२५) आकृष्यते - चौर्यते



अर्थ :– आपली विद्या दुसऱ्यास दिली असता कमी न होता वाटत राहते; तिला चौरादिकही हरण करू शकत नाहीत. विद्येमुळे मनुष्य हा ईप्सित कार्य पूर्ण करू शकतो.

वैदुष्येन हि वंश्यत्वं वैभवं सदुपास्यता ।
सदस्यतालमुक्तेन विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥ २६ ॥

अर्थ :– विद्वत्तेमुळे कुलीनपणा, ऐश्वर्य, मानसन्मान व विद्वत्सभेत बसण्याची योग्यता प्राप्त होते. फार काय सांगावे ? विद्वान् हा सर्वत्र पूजिला जातो.

वैपश्चित्यं हि जीवानामाजीवितमनिन्दितम् ।
अपवर्गेऽपि मार्गोयमदः क्षीरमिवौषधम् ॥ २७ ॥

अर्थ :– विद्वत्ता ही मानवाला जन्मभर सन्माननीय बनविते. विद्वत्ता (सम्यग्ज्ञान) हे भवरोगाचे नाश करणारे दुधासारखे मधुर औषध आहे.

इत्युदन्तं गुरोः श्रुत्वा शिष्यो नोत्तरमूचिवान् ।
स्ववाचा किंतु वक्त्रेण शैष्योपाध्यायिका हि सा ॥ २८ ॥

अर्थ :– याप्रमाणे ही गुरूची चरितकहाणी ऐकून शिष्याने काहीही बोलून उत्तर दिले नाही. परंतु चेहरा मात्र जणूं उत्तर देत होता. हेच तर गुरुशिष्य-नाते आहे !

विज्ञातगुरुशुद्धिः स विशेषात्पिप्रियेतराम् ।
माणिक्यस्य हि लब्धस्य शुद्धेर्मोदो विशेषतः ॥ २९ ॥

अर्थ :– गुरुची ही पुनः पदप्राप्तीची कथा ऐकून शिष्याला अत्यानंद झाला. प्राप्त माणिक रत्न हे उत्तम आहे हे कळाले म्हणजे अत्यानंद होणे स्वाभाविक आहे.

रत्नत्रयविशुद्धः सन्पात्रस्नेही परार्थकृत् ।
परिपालितधर्मो हि भवाब्धेस्तारको गुरुः ॥ ३० ॥

---

श्लोकांक (२६) वैदुष्येण - पाण्डित्येन । वंश्यत्वं - कुलीनत्वं । सदुपास्यता - सद्भिः पूज्यता । सदस्यता - सभ्यता । उदन्तं - वृत्तान्तं । शैष्योपाध्यायिका - गुरुशिष्य विषयको व्यपहारः । (२९) तराम् - विशेषेण । (३०) परार्थकृत् - परोपकारकः । रत्नत्रयविशुद्ध - रत्नानां त्रयः तेन विशुद्धः (तृ. त.)

अर्थ :– तोच खरा गुरू आहे की जो रत्नत्रयाने पावन आहे, पात्र शिष्यावर स्नेहाचा वर्षाव करतो; निस्वार्थपणाने पराचे हित करतो, धर्माची पूर्ण पालना करतो आणि जो संसारसागरातून तारून नेणारा आहे.

गुरुभक्तो भवाद्भीतो विनीतो धार्मिकः सुधीः ।
शान्तस्वान्तो ह्यतन्द्रालुः शिष्टः शिष्योऽयमिष्यते ॥ ३१ ॥

अर्थ :– आणि शिष्यही तोच खरा, जो गुरूवर निःस्सीम प्रेम करतो, संसारापासून भयभीत आहे, विनयसंपन्न आहे, धर्माचा खरा साधक आहे, सुबुद्धिसंपन्न आहे, ज्याचे मन निराकुल आहे, ज्यास आळस नाही, सदाचारी आहे, तोच वास्तविक खरा शिष्य आहे.

गुरुभक्तिः सती मुक्त्यै क्षुद्रं किं वा न साधयेत् ।
त्रिलोकीमूल्यरत्नेन दुर्लभः किं तुषोत्करः ॥ ३२ ॥

अर्थ :– जी गुरुभक्ती मुक्तीचे निमित्त आहे ती अन्य छोट्या गोष्टी सिद्ध करणार नाही कां ? त्रिलोकाच्या मोलाच्या रत्नाने भुसाचा ढीग मिळणे दुर्लभ आहे कां ?

गुरुद्रुहां गुणः को वा कृतघ्नानां न नश्यति ।
विद्यापि विद्युदाभा स्यादमूलस्य कुतः स्थितिः ॥ ३३ ॥

अर्थ :– गुरूचा द्रोह करणाऱ्या कृतघ्नाचा कोणता गुण नष्ट होत नाही ? त्याची विद्याही वीज लखलखावी अशी क्षणिकमात्र होते. ज्यास मूळ नाही त्याची स्थिती कशी असू शकेल ?

गुरुद्रुहो न हि क्वापि विश्वास्यो विश्वघातिनः ।
अबिभ्यतां गुरुद्रोहादन्यद्रोहात्कुतो भयम् ॥ ३४ ॥

अर्थ :– विश्वाचे अनहित करणारा गुरुद्रोही केव्हाही व कोठेही विश्वसनीय

---

श्लोकांक (३१) शांतस्वान्तः - शांतं स्वान्तं - अंतकरणं यस्य सः (३२) तुषोत्करः - तुषराशिः । त्रिलोकीमूल्यरत्नेन - त्रयाणां लोकांनां समाहारः त्रिलोकी (द्विगु) त्रिलोकी मूल्यं यस्य तत् त्रिलोकी मूल्यं (बहु) त्रिलोकी मूल्यं च तद्रत्नं च तेन (कर्म०) (३३) विद्युदाभा - विद्युदिव आभा यस्याः सा (बइहु०) विद्युदाभा - चंचला चपला वा ।



असत नाही. जो गुरुद्रोहास भीत नाही त्यास अन्य द्रोहाचे भय कसे असू शकेल ?

अथ कृत्यविदाचार्यः कृतकृत्यं यथाविधि ।
छात्रं प्रबोधयामास सद्धर्मंगृहमेधिनाम् ॥ ३५ ॥

अर्थ :– यानंतर कर्तव्य जाणणारे आचार्य कृतकृत्य छात्राला समीचीन गृहस्थधर्माचा उपदेश देऊ लागले.

पुनश्च राजपुत्रत्वमपि बोधयितुं गुरुः ।
अनुगृह्याभ्यधात्तस्य तदुदन्तमिदंतया ॥ ३६ ॥

अर्थ :– तदनंतर उपकारी कुमारास ''आपण राजपुत्र आहो'' याची जाणीव व्हावी म्हणून कृपेने त्याचा पूर्व इतिहास वृत्तांत त्यास सांगितला.

काष्ठांगारमसौ ज्ञात्वा राजघ्नं गुरुवाक्यतः ।
सत्यंधरात्मजः क्रोधात्संनाहं तद्वधे व्यधात् ॥ ३७ ॥

अर्थ :– गुरूच्या निवेदनावरून काष्ठांगार हाच राजाचा वध करणारा आहे असे जाणून सत्यंधरपुत्र कुमार जीवंधर त्यास मारण्यासाठी युद्ध करण्यास जय्यत तयार झाला.

मुहुर्निवार्यमाणोऽपि सूरिणा न शशाम सः ।
हन्तात्मानमपि घ्नन्तः क्रुद्धाः किं किं न कुर्वते ॥ ३८ ॥

अर्थ :– गुरुकरवी वारंवार रोकल्या गेल्यानंतरही तो शांत झाला नाही. क्रोधाच्या आवेशात आत्मघात करणारे काय काय करणार नाहीत ?

वत्सरं क्षम्यतामेकं वत्सेयं गुरुदक्षिणा ।
गुरुणेति निषिद्धोऽभूत्कोऽनन्धो लङ्घयेद् गुरुम् ॥ ३९ ॥

अर्थ :– 'हे वत्स ! एक वर्षपावेतो क्षमा करावीस' हीच तेवढी गुरुदक्षिणा दे. गुरूच्या या उपदेशाने तो उतावळपणापासून परावृत्त झाला. कोण विवेकी गुरुवचनाचे उल्लंघन करील ?

---

श्लोकांक (३५) कृत्यविद् - कार्यवेत्ता । कृतकृत्यं – कृतं कृत्यं येन तं । (३६) अभ्यघात् – अकथयत् । इदंतया - इदं इत्यस्य भावः इदंता तया । (३७) संनाहं - युद्धसंभारं । व्यधात् - चकार । (३९) अनन्धः - न अन्धः (नञ् तत्पुरुष) अनन्धः - ज्ञानी ।

पश्यन्कोपक्षणे तस्य पारवश्यमसौ गुरुः ।
अशिक्षयत्पुनश्चैनमपथघ्नी हि वाग्गुरोः ॥ ४० ॥

अर्थ :– कुमाराच्या कोपाविष्ट पराधीन भूमिकेला पाहून त्यास गुरूंनी पुनः उपदेश देवून सावध केले. गुरुचे वचन हे अमार्गाचा - कुमार्गाचा नाश करणारे असते.

अवशः किमहो मोहादकुपः पुत्रपुङ्गव ।
सति हेतौ विकारस्य तदभावो हि धीरता ॥ ४१ ॥

अर्थ :– हे पुत्रश्रेष्ठ ! तूं मोहाधीन होऊन क्रोधवश का झालास ? विकाराच्या उत्पत्तीची कारणे मिळाली असतांनाही विकार न होऊ देणे हीच तर धीरता आहे.

अपकुर्वति कोपश्चेत्किं न कोपाय कुप्यसि ।
त्रिवर्गस्यापवर्गस्य जीवितस्य च नाशिने ॥ ४२ ॥

अर्थ :– अपकार करणाऱ्यावरच क्रोध करावयाचा तर तूं कोपावर कां कोप करत नाहीस, कारण कोप हा तीन पुरुषार्थाचा, मोक्षाचा आणि जीविताचाही नाश करणारा आहे.

दहेत्स्वमेव रोषाग्निर्नापरं विषयं ततः ।
कृध्यन्निक्षिपति स्वाङ्गे वह्निमन्यदिधिक्षया ॥ ४३ ॥

अर्थ :– हा क्रोधाग्नि तर प्रथमतः आपलाच घात करतो. नंतर अन्य विषयाचा ! क्रोधी दुसऱ्यास जाळण्याच्या अभिप्रायाने प्रथमतः स्वतःलाच जाळून घेतो.

हेयोपादेयविज्ञानं नो चेद् व्यर्थः श्रमः श्रुतौ ।
किं ब्रीहिखण्डनायासैस्तंडुलानामसंभवे ॥ ४४ ॥

अर्थ :– जर हेयोपादेयाचे भेदज्ञान नसेल तर आगमाभ्यासातील श्रम

श्लोकांक (४०) पारवश्यं - पराधीनतां । अपथघ्नी - न पन्था अपथः (नञ. त.) तं हन्तीति (उ० त०) - कुपथात् निवारयन्ती । (४४) हेयोपादेयविज्ञानं - हेयश्च उपादेयश्च हेयोपादेयौ तयाः विज्ञानं (ष० त०) श्रुतौ-शास्त्रागमे ।



व्यर्थच आहेत. तांदूळ जर मिळत नसतील तर भुसा कांडण्याचे श्रम घेवून कोणता फायदा आहे ?

तत्वज्ञानं च मोघं स्यात्तद्विरुद्धप्रवर्तिनाम् ।
पाणौ कृतेन दीपेन किं कूपे पततां फलम् ॥ ४५ ॥

अर्थ :– सज्जनाचे हृदय विकारांच्या (निमित्त) सन्निध असतांनाही विकारी होत नाही. हातामध्ये दिवा असूनही विहीरीत पडणाऱ्यास त्या दिव्याचा उपयोग काय ?

तत्वज्ञानानुकूलं तदनुष्ठातुं त्वमर्हसि ।
मुषितं धीधनं न स्याद्यथा मोहादिदस्युभिः ॥ ४६ ॥

अर्थ :– अतएव तत्त्वज्ञानास अनुकूल वागणे हेच तुला उचित आहे. यामुळे असे वागशील तर मोहादिक (रागद्वेष) हे चोर तुझे बुद्धिवैभव हरण करू शकणार नाहीत.

स्त्रीमुखेन कृतद्वारान्स्वपथोत्सुकमानसान् ।
दुर्जनाहीञ्जहीहि त्वं ते हि सर्वंकषाः खलाः ॥ ४७ ॥

अर्थ :– स्त्रीमुखाने दरवाजा करून ज्यांनी अंतःकरणात प्रवेश केलेला आहे आणि जे स्वार्थ सिद्ध करण्यात जागृत आहेत अशा दुर्जनरूपी सापांचा संग तूं सोडून दे. कारण ते दुर्जन आपल्या सर्वस्वाचा नाश करतात.

स्पृष्टानामहिभिर्नश्येद्गात्रं खलजनेन तु ।
वंशवैभववैदुष्यक्षान्तिकीर्त्यादिकं क्षणात् ॥ ४८ ॥

अर्थ :– सापाने चावले तर फक्त शरीर इंद्रिये नाश पावतील. परंतु दुर्जन पुरूषांशी जर संबंध असेल तर तो वंश, वैभव, विद्या, शांति, कीर्ति आदि सर्वांचा तात्काळ नाश करतो.

श्लोकांक (४५) मोघं – निष्फलं । (४६) मुषितं-अपहृतं । दस्युभिः - चौरैः । (चौरैकागरिकस्तेनदस्युतस्करमोषकः इत्यमरः) (४७) सर्वंकषाः - सर्वं कषन्ति नाशयन्ति इति, । सर्वस्वनाशकाः । स्वपथोत्सुकामनसान् - स्वस्य पन्थाः स्वपथः तस्मिन् उत्सुकं मानसं येषां ते (त०) । दुर्जनाहीन् - दुर्जनाः एव अहयः दुर्जनाहयः तान् (कर्म०) स्त्रीमुखेन - नारीमुखेन पक्षे वम्री मुखेन । स्पृष्टानां - दष्टानां ।

खलः कुर्यात्खलं लोकमन्यमन्यो न कंचन ।
न हि शक्यं पदार्थानां भावनं च विनाशवत् ॥ ४९ ॥

अर्थ :– दुर्जन हा सहवासातील जनास दुर्जन करेल परंतु सज्जन मात्र लोकास सज्जन करू शकणार नाहीत. पदार्थाची मोडतोड जशी शक्य आहे तसे त्यांची जडणघडण सुलभ नाही.

सज्जनास्तु सतां पूर्वं समावर्ज्याः प्रयत्नतः ।
किं लोके लोष्ठवत्प्राप्यं श्लाघ्यं रत्नमयत्नतः ॥ ५० ॥

अर्थ :– सज्जनांनी प्रयत्नपूर्वक सज्जनाचा सहवास मिळवावा. या जगामध्ये मातीच्या ढेकळाप्रमाणे बहुमोल रत्न प्रयत्नाशिवाय मिळू शकत नाही.

जाग्रत्त्वं सौमनस्यं च कुर्यात्सद्वागलं परैः ।
अजलाशयसंभूतममृतं हि सतां वचः ॥ ५१ ॥

अर्थ :– फार काय ? सत्पुरुषाचे वचन हे अमृत आहे. कारण ते जागृत करते, मन पवित्र करते. हे असे अमृत आहे की, ते सागरापासून उत्पन्न होत नाही. परंतु अमृत मात्र सागरमंथनातून प्राप्त होते.

यौवनं सत्वमैश्वर्यमेकैकं च विकारकृत् ।
समवायो न किं कुर्यादविकारोऽस्तु तैरपि ॥ ५२ ॥

अर्थ :– यौवन, बल, ऐश्वर्य हे एक एकही विकार जागविणारे आहेत. तर हे तिन्ही असतील तर मनुष्यास विकारी कसे बनविणार नाहीत ? म्हणून विकारापासून सज्जनांनी दूरच राहावे.

न हि विक्रियते चेतः सतां तद्धेतुसंनिधौ ।
किं गोष्पदजलक्षोभी क्षोभयेज्जलधेर्जलम् ॥ ५३ ॥

अर्थ :– विकारास कारण सन्निध असतांनाही सज्जनाचे मनात विकृती उत्पन्न होत नाही. गाईच्या पावलांनी निर्मित लहानशा गढ्यातील पाणी गढूळ

---

श्लोकांक (४९) भावनं - अभावात् भावनं - उत्पत्तिः - निर्मापणं । (५०) पूर्वं - प्रथमतः । समावर्ज्याः – संग्राह्याः । अयत्नतः विनाप्रयासेन । (५१) सौमनस्यं - मनः पावित्र्यं । सद्वाक् - सतां वाणी । (५२) सत्वं - बलम् । समवायः - यौवनसत्वैश्वर्याणां समूहः । अविकारः - अविकृतिः । (५३) गोष्पदजलक्षोभी - व्युत्पत्तिः - गोःपदं गोष्पदं गोष्पदेजलं गोष्पदजलं तं क्षोभयति इत्येवं शीलः (उ० त० पु०)



करणारा सागराचे पाणी क्षुब्ध करू शकेल काय ?

देशकालखलाः किं तैश्चला धीरेव बाधिका ।
अवहितोऽत्र धर्मे स्यादवधानं हि मुक्तये ॥ ५४ ॥

अर्थ :– केवळ देश, काल व दुर्जन हे घातक असत नाहीत. तर त्यांनी भ्रष्ट झालेली बुद्धी हीच घातक आहे. धर्मामध्ये सावधान असावे. धर्मामध्ये लीनता हे मुक्तीला कारण आहे.

शिक्षावचःसहस्रैर्वा क्षीणपुण्ये न धर्मधीः ।
पात्रे तु स्फायते तस्मादात्मैव गुरुरात्मनः ॥ ५५ ॥

अर्थ :– हजारो उपदेश वचनांनी पुण्यहीन पुरुषामध्ये धर्मबुद्धी जागृत होत नाही. आणि पात्र व्यक्तीला दिलेला उपदेश हा धर्मभावना जागृत करतो. म्हणून प्रत्येक प्राणीमात्र आपणच आपला गुरू आहे.

न श्रृण्वन्ति न बुध्यन्ति न प्रयान्ति च सत्पथम् ।
प्रयान्तोऽपि न कार्यान्तं धनान्धा इति चिन्त्यताम् ॥ ५६ ॥

अर्थ :– धनाने अंध पुरूष एकतर धर्मच ऐकत नाहीत, ऐकतील तर समजून घेत नाहीत, समजून घेतील तरी सन्मार्गाला लागत नाहीत, लागलेत तरीही कार्यसिद्धी पावेतो टिकून राहणार नाहीत. असे निश्चित समजावे.''

इत्याशास्य तमाश्वास्य कृच्छ्रं स तपसे गतः ।
प्राणप्रयाणवेलायां न हि लोके प्रतिक्रिया ॥ ५७ ॥

अर्थ :– याप्रमाणे आर्यनंदी गुरू जीवंधरास उपदेश आणि आशीर्वाद देऊन आणि आश्वासन देऊन तपाच्या साधनेसाठी निघून गेले. प्राण जाण्याच्या वेळेला त्याचा कोणताही प्रतिकार असत नाही.

प्रव्रज्याथ तपःशक्तया नित्यमानन्दमव्रजत् ।

---

श्लोकांक (५४) चला - बाधिका - दूषिका । अवहितः - तत्परः । अवधानं - धर्मध्यानं (५५) स्फायते - वृद्धिर्भवति । धर्मधीः - धर्मे धीः यस्यः सः (बहु०) शिक्षावचःसहस्त्रैः - शिक्षायाः वचांसि, तेषां सहस्त्रं, तैः (ष० त०) (५७) प्रतिक्रिया - प्रतीकारः । प्राणप्रयाणवेला - मरणकालः । कृछ्रं - कष्टेन । इति भावः (५८) प्रवज्य - दीक्षां । गृहीत्वा निष्प्रत्यूहा - निराबाधा ।

निष्प्रत्यूहा हि सामग्री- नियतं कार्यकारिणी ॥ ५८ ॥

अर्थ :– तद्नंतर परत दीक्षा घेवून, तपस्या करून आर्यनंदी गुरूने नित्य आनंदस्वरूप मोक्ष मिळविला. निश्चयाने निराबाध सामग्री ही कार्य सिद्ध करणारी असते.

तपोवनं गुरौ प्राप्ते शुचं प्रापत्स कौरवः ।
गर्भाधानक्रियामात्रन्यूनौ हि पितरौ गुरुः ॥ ५९ ॥

अर्थ :– गुरू तपोवनास गेल्यानंतर जीवंधर कुमारांना शोक झाला. साहजिकच आहे. कारण गुरू हे मात्र गर्भाधान क्रियेविना मातापिताच आहेत.

तत्वज्ञानजलेनाथ शोकाग्निं निरवापयत् ।
शैत्ये जाग्रति किं नु स्यादातपार्तिः कदाचन ॥ ६० ॥

अर्थ :– कुमाराने तत्त्वज्ञानद्वारा शोकरूपी अग्नी शांत केला. थंडी कडाडत असतांना उन्हाळ्याच्या बाधा-वेदना कधी असूं शकतात कां ?

अथास्मिन्विद्यया कान्त्या विदुषां योषितां हृदि ।
रथे च योग्यया भाति तत्र प्रस्तुतमुच्यते ॥ ६१ ॥

अर्थ :– याप्रमाणे गुरूचे प्रयाणानंतर जीवंधर कुमाराने विद्येने विद्वानांच्या हृदयांत आणि कांतीने - तारुण्य सुलभ सौंदर्याने रमणींच्या हृदयात आणि शस्त्रविद्येच्या निपुणतेमुळे रथामध्ये स्थान प्राप्त करून जीवंधरकुमार शोभायमान झाले असतांना जे घडले ते सांगितले जाते.

अथैकदा समभ्येत्य राजाङ्गणभुवि स्थिताः ।
गावोऽवस्कन्दिता व्याधैरिति गोपा हि चुक्रुशुः ॥ ६२ ॥

अर्थ :– यानंतर एके दिवशी ''आमच्या गायी व्याधांनी हरण केल्यात'' असे ओरडत सर्वच गवळी मोठ्याने आक्रोश करू लागले.

श्लोकांक (५९) शुचं - शोकं। कौरवः - कुरुवंशी जीवंधरस्वामी । गर्भाधानक्रियामात्रन्यूनौ - गर्भस्याधानं गर्भाधानं तस्य क्रिया तया एव न्यूनः तौ (तृ० त०) (६०) आतपार्तिः – ग्रीष्मबाधा । (६१) योग्यया – रथसंचालनयोग्यतया । 'अभ्यासः खुरली योग्या' इति त्रिकाण्डे । भाति इति सप्तम्येकवचनं । भाति - प्रकाशमाने (६२) समभ्येत्य - आगत्य । अवस्कन्दिताः – अपहृताः ।



काष्ठांगारोऽपि रुष्टोऽभूत्तदाक्रोशवचःश्रुतेः ।
असमानकृतावज्ञा पूज्यानां हि सुदुःसहा ॥ ६३ ॥

अर्थ :– त्यांचा आक्रोश व ओरडणे ऐकून काष्ठांगारही रुष्ट झाला. लहान पुरुषांनी केलेली अवज्ञा श्रेष्ठ व्यक्तींना दुःसह होते.

पराजेष्ठ पुनस्तेन गवार्थं प्रहितं बलम् ।
स्वदेशे हि शशप्रायो बलिष्ठः कुंजरादपि ॥ ६४ ॥

अर्थ :– त्या काष्ठांगाराने गायी सोडविण्यासाठी पाठविलेले सैन्य पराजित होऊन परत आले. आपल्या देशात सशासारखे क्षुद्र जीवही हत्तीपेक्षा बलवान असतात. परंतु बाहेर त्यांचा काहीच प्रभाव नसतो.

व्यजेष्ट व्याधसेनेति श्रुत्वा घोषोऽपि चुक्षुमे ।
न बिभेति कुतो लोक आजीवनपरिक्षये ॥ ६५ ॥

अर्थ :– 'व्याधांची सेना जिंकली' असे ऐकून गवळी लोकही खवळले. ते स्वयं प्रतिकारास सज्ज झाले. बरोबरच आहे उपजीविकेचे साधन नाहीसे झाल्यानंतर प्राणीमात्र कशाचीही पर्वा करत नाहीत.

नन्दगोपाव्हयः कोऽपि तज्जयार्थं व्यचीचरत् ।
किं स्यात्किंकृत इत्येवं चिन्तयन्ति हि पीडिताः ॥ ६६ ॥

अर्थ :– त्या गवळ्यापैकी नंदगोप नावाच्या गवळ्याने त्या भिल्लांना जिंकण्याचा प्रयत्न केला. पीडित व्यक्ती काय केल्याने काय होईल याचा विचार करू शकत नाही.

धनार्जनादपि क्षेमे क्षेमादपि च तत्क्षये ।
उत्तरोत्तरवृद्धा हि पीडा नृणामनन्तशः ॥ ६७ ॥

अर्थ :– धनार्जनापेक्षाही धनाच्या सुरक्षिततेमध्ये पीडा अधिक असते. सुरक्षिततेपेक्षाही धनाच्या नाशामध्ये पीडा अधिक असते. याप्रमाणे पीडा सारखी

श्लोकांक (६३) असमान - कृतावज्ञा - असमानैः - हीनैः कृता अवज्ञा । सदुःसहा - असह्या । तदाक्रोशवचः - श्रुतेः - आक्रोषश्च वचांसिश्च आक्रोषवचांसि, तेषां (गोपानां) आक्रोषवचांसि, तेषां श्रुतिः, तस्याः (ष० त०) (६४) पराजेष्ट - विजयं प्राप्ता (६५) घोषः - गोपानां समूहः । आजीवनपरिक्षये - आजीविकायाः नाशे । (६७) क्षेमे - संरक्षणे ।

वाढती असते.

यथाशक्ति प्रतिकारः करणीयस्तथापि चेत् ।
व्यर्थः किमत्र शोकेन यदशोकः प्रतिक्रिया ॥ ६८ ॥

अर्थ :– यथाशक्ती प्रतिकार कर्तव्य आहेच. तथापि तोही व्यर्थ होतो तर तेथे शोक करून काय मिळणार ? याचा अर्थ शोक न करणे एवढाच प्रतिकार राहतो.

इत्यूहेन स वीराय विजये हि वनौकसाम् ।
सप्तकल्याणपुत्रीभिर्देया पुत्रीत्यघोषयत् ॥ ६९ ॥

अर्थ :– अशा विचाराने त्या नंदगोप गवळ्याने ''जंगली भिल्लावर विजय मिळविणाऱ्या शूरवीरास मी सात सोन्याच्या पुतळ्यासह कन्यका अर्पण करील'' अशी घोषणा केली.

सात्यंधरिस्तु तच्छ्रुत्वा तद्घोषणमवारयत् ।
उदात्तानां हि लोकोऽयमखिलो हि कुटुम्बकम् ॥ ७० ॥

अर्थ :– यानंतर सत्यंधरपुत्र जीवंधर कुमाराने ती घोषणा ऐकून ती घोषणा थांबविली. कारण थोर उदात्त पुरुषांना तर हे संपूर्ण विश्वच एक कुटुंब वाटते. त्यामुळे त्यासाठी ते कोणतेही साहस करण्यास अगदी जय्यत तयार असतात.

जित्वाथ जीवकस्वामी किरातानाहरत्पशून् ।
तमो ह्यभेद्यं खद्योतैर्भानुना तु विभिद्यते ॥ ७१ ॥

अर्थ :– जीवंधर स्वामीने भिल्लांना जिंकून गाई जनावरे सोडवून आणलीत. ठीकच आहे, जो अंधःकार खद्योताकडून भेदल्या जात नाही तो सूर्याकरवी भेदल्या जातोच !

ननन्द नन्दगोपोऽपि गोधनस्योपलम्भतः ।

---

श्लोकांक (६९) ऊहः - तर्कः । सप्तकल्याणपुत्रीभिः - सप्तसुवर्णपुत्तलीभिः सहिता । वनौकसाम् - वनं ओकः येषां ते वनौकसः तेषां (ब०) वनेचराणां । (७०) सात्यंधरिः - सत्यंधरस्य अपत्यं पुमान् सात्यंधरिः । (७२) उपलम्भतः - प्राप्तेः । असुमतां - प्राणभृतां । असुभ्यः - प्राणेभ्यः । गरीयः – श्रेयः ।



असुमतामसुभ्योऽपि गरीयो हि भृशं धनम् ॥ ७२ ॥

अर्थ :– या घटनेने नंदगोप गवळी गोधन परत मिळाल्यामुळे आनंदित झाला. बरोबरच आहे. जीवांना प्राणापेक्षाही धन अधिक प्रिय असते.

अथानीय सुतां दातुं स्वामिने वार्यपातयत् ।
कृत्याकृत्यविमूढा हि गाढस्नेहान्धजन्तवः ॥ ७३ ॥

अर्थ :– त्याने आपल्या गोविंदा नामक मुलीस आणवून जीवंधर कुमारांना देण्यासाठी जलधारा टाकली. गाढ स्नेहाने - रागाने अंध प्राणी कृत्य-अकृत्याच्या विचारामध्ये मूढ असतात.

जीवंधरस्तु जग्राह वार्धारां तेन पातिताम् ।
पद्मास्यो योग्य इत्युक्त्वा न ह्ययोग्ये स्पृहा सताम् ॥ ७४ ॥

अर्थ :– 'पद्मास्य हिच्यासाठी योग्य आहे' असे म्हणून त्या नंदगोप गवळ्याने सोडलेली जलधारा कुमाराने ग्रहण केली. मोठ्या माणसाची अयोग्य गोष्टीमध्ये स्पृहा नसते.

माम मामेव पद्मास्यं पश्येति पुनरब्रवीत् ।
गात्रमात्रेण भिन्नं हि मित्रत्वं मित्रता भवेत् ॥ ७५ ॥

अर्थ :– 'हे मामा पद्मास्याला जीवंधर कुमारच समजा.' असे जलधारा स्वीकारल्यानंतर जीवंधर कुमार नंदगोपास म्हणाला. आम्ही दोघेही जीवश्चकंठश्च मित्र आहोत. दोन शरीरे पण मित्रतेच्या अपेक्षेने हृदये मात्र अभिन्नच असतात.

गोदावरीसुतां दत्तां नन्दगोपेन तुष्यता ।
परिणिन्येऽथ गोविन्दां पद्मास्यो वह्निसाक्षिकम् ॥ ७६ ॥

अर्थ :– संतुष्ट नंदगोपाने दिलेल्या गोदावरीची कन्यका गोविंदा नामक कन्येचा पद्मास्याने अग्नीसाक्षीने स्वीकार केला.

**याप्रमाणे श्रीमत् वादीभसिंहसूरि-विरचित**
**क्षत्रचूडामणीमध्ये गोविन्दाविवाह नामक**
**दुसरा लंब समाप्त झाला.**

---

श्लोकांक (७३) कृत्याकृत्यविमूढाः - सदसद्विचाररहिताः । (स० त० पु०) गाढस्नेहान्धः जंतवः - अनुरक्तमनसः । गाढस्नेहेन अन्धाः जन्तवः (कर्म०) (७४) अयोग्ये - अनुचिते वस्तुनि । (७५) माम - श्वशुरमुद्दिश्य संबोधनम् । (७६) परिणिन्ये - व्यूढवान् विवाहं चकार ।

## तृतीय लंब

अथोपयम्य गोविंदां पद्मास्ये रमयत्यलम् ।
वीरश्रियं कुमारे च तत्र प्रस्तुतमुच्यते ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे गोविंदेशी विवाह करून पद्मास्य संसारात रंगला असतांना आणि कुमार जीवंधर वीरश्रीच्या सह रममाण होत असतांना काही घटना घडत होत्या. त्या सांगतात -

आसीत्तत्पुरवास्तव्यो वैश्यः श्रीदत्तनामकः ।
वित्तायास्पृहयत्सोऽयं धनाशा कस्य नो भवेत् ॥ २ ॥

अर्थ :– एक त्याच नगरीत राहणारा श्रीदत्त नावाचा श्रेष्ठी होता. त्यास धन कमविण्याची स्पृहा झाली. धनाची वासना कोणास बरे असत नाही ?

अर्थार्जननिदानं च तत्फलं चायमौहत ।
निरङ्कुशं हि जीवानामैहिकोपायचिन्तनम् ॥ ३ ॥

अर्थ :– अर्थप्राप्तीचे साधन, त्याचे फल याचा तो विचार करू लागला. संसारी जीवांना ऐहिक प्राप्तीच्या उपायाची चिंता अनिवार असते.

अस्तु पैतृकमस्तोकं वस्तु किं तेन वस्तुना ।
रोचते न हि शौण्डाय परपिण्डादिदीनता ॥ ४ ॥

अर्थ :– वडिलोपार्जित धन भरपूर असो तरीही त्या धनाने त्यात समाधान नसते. कर्तबगार व व्यवहारकुशल व्यक्तीला परधनाची दीनता रुचत नाही.

स्वापतेयमनायं चेत्सव्ययं व्येति भूर्यपि ।
सर्वदा भुज्यमानो हि पर्वतोऽपि परिक्षयी ॥ ५ ॥

अर्थ :– आपल्या मालकीचे अमाप असले तरीही जर खर्च होतच राहील

श्लोकांक (३) औहत - व्यतर्कयत् । (४) पैतृकं - पितुरागतं । अस्तोकं - अनल्पं विपुलं। शौण्डाय - सुग्योयोय इतिभाव३ । परपिण्डादिदीनता - परपिण्डादनशीलस्य या दीनता सा (५) स्वापतेयं - (स्व पतौ साधु) स्वस्वामिकं धनं । अनायं - आयेन रहितं व्येति - नश्यति ।



तर भरपूर इस्टेटही संपतेच. नेहमी पोखरल्या जाणारा डोंगर सुद्धा हा नष्ट होणारच.

दारिद्र्यादपरं नास्ति जन्तूनामप्यरुन्तुदम् ।
अत्यक्तं मरणं प्राणः प्राणिनां हि दरिद्रता ॥ ६ ॥

अर्थ :– संसारी जीवांना दारिद्र्यासारखे मर्मावर आघात करणारे काहीही असत नाही. जीवमात्रास दारिद्र्य हे प्राण न जाता जणू मरणच असते.

रिक्तस्य हि न जागर्ति कीर्तनीयोऽखिलो गुणः ।
हन्त किं तेन विद्यापि विद्यमाना न शोभते ॥ ७ ॥

अर्थ :– दरिद्री जीवाचे स्तुतिपात्र अनेक गुण असतांनाही तेही दुर्लक्षितच राहतात. फार काय विद्या भरपूर असूनही तीही शोभास्पद असत नाही.

स्यादकिंचित्करः सोऽयमाकिंचन्येन वञ्चितः ।
अलमन्यैः स साकूतं धन्यवक्त्रं च पश्यति ॥ ८ ॥

अर्थ :– अकिंचनतेमुळे ठगविलेला हा काहीही करू शकत नाही. फार काय सांगावे, तो अन्य श्रीमंताचे मुखाकडे आशाळभूतपणाने पाहत असतो.

संपल्लाभफलं पुंसां सज्जनानां हि पोषणम् ।
काकार्थफलनिम्बोऽपि श्लाघ्यते न हि चूतवत् ॥ ९ ॥

अर्थ :– मनुष्यास संपत्तीच्या प्राप्तीचे फल मात्र सज्जनांचे पोषण हेच आहे. निंबवृक्षाला निंबोळ्या भरपूर असतील तरी त्या कावळ्याला आंब्याची चव थोडीच येते.

लोकद्वयहितं चापि सुकरं वस्तु नासताम् ।
लवणाब्धिगतं हि स्यान्नादेयं विफलं जलम् ॥ १० ॥

अर्थ :– दुर्जनास इहपरलोकी हिताची प्राप्तीही सहज सुलभ नसते.

श्लोकांक (६) अरुन्तुदम् - अरूंषि तुदतीति, मर्मभेदि । अत्यक्तं - न त्यक्तं । (८) अकिंचित्करः - किञ्चित् करोतीति किञ्चित्करः, न किञ्चितः अकिञ्चित्करः (नञ् तत्पु०) साकूतं - साभिप्रायं । (९) काकार्थफलनिम्बः - काकाय इति काकार्थः, काकार्थं फलं यस्य सः । (१०) सुकरं - शुभकृत् । नादेयं - नद्या इदं

सागरास मिळालेला जलप्रवाहही ग्राह्य असत नाही. निष्फलच असतो.

इत्यूहान्नावमारुह्य प्रतस्थे स वणिक्पतिः ।
वार्धिमेव धनार्थी किं गाहते पार्थिवानपि ॥ ११ ॥

अर्थ :– अशा प्रकारे विचार करून तो श्रेष्ठ व्यापारी नावेत बसून परदेशास जावयास निघाला. धनार्थी समुद्रातच काय, तो तर खोल खाणीत देखील प्रवेश करण्यास तयारच असतो.

द्वीपान्तरान्यवार्तिष्ट पुष्टः सयांत्रिको धनैः ।
अतर्क्यं खलु जीवानामर्थसंचयकारणम् ॥ १२ ॥

अर्थ :– तो वैश्यश्रेष्ठ भरपूर धन कमवून नावेचा मालक श्रीदत्त शेठ द्वीपांतराहून परत मायदेशी निघाला. जीवास संपत्तीच्या संचयाची साधन हा अतर्क्य असते हेच खरे !

अवारान्तमथ प्रापत्पारावारस्य नाविकः ।
चुक्षुभे नौरिहासारान्न हि वेद्यो विपत्क्षणः ॥ १३ ॥

अर्थ :– तो नाविक तीराच्या जवळपास पोचला. परत समुद्र क्षुब्ध झाल्यामुळे नावही हेलकावे खावू लागली. डगमगूं लागली. या असार संसारात आपत्काळी कोणीही वाचवीत नाही.

पूर्वमेव तु नौनाशाच्छोकाब्धिं पोतगा गताः ।
काष्ठागतस्य दुःखस्य दृष्टान्तं तद्धि नौक्षये ॥ १४ ॥

अर्थ :– परंतु नौकायंत्र बुडण्यापूर्वीच नावेतील प्रवासी शोकाने हलकल्लोळ करू लागले. या संसारातील दुःखाची चरमसीमा पाहावयाची असेल तर नाव बुडतांना होणारा हलकल्लोळ हे त्याचे चित्र आहे.

सायांत्रिकस्तु तत्वज्ञो विकारं नैव जग्निवान् ।
अज्ञात्प्राज्ञस्य को भेदो हेतोश्चेद्विकृतिर्द्वयोः ॥ १५ ॥

अर्थ :– या नौकायंत्राचा मालक मात्र घाबरला नाही. एकाच कारणाने

श्लोकांक (१२) सांयात्रिकः - पोतवणिक् (१३) अवारान्तं - तीरस्य समीपं । (१४) पोतगाः - नौवासिनः । (१५) जग्मिवान् - प्राप ।



दोघांनाही विकार होत असतील तर अज्ञ आणि प्राज्ञ यातील फरक स्पष्ट दिसून येईल. अज्ञ दुःखाने गर्भगळित होईल तर प्राज्ञ घाबरणार नाही.

भाविन्या विपदो यूयं विपन्नाः किं बुधाः शुचा ।
सर्पशंकाबिभीताः किं सर्पास्ये करदायिनः ॥ १६ ॥

अर्थ :– ''अजून तर नाव बुडाली नाही. भावी संकटाचा भयाने एवढे का घाबरत आहांत ? शोक करता आहांत ? सापाच्या भयाची आशंका असेल तर तेव्हा सापाच्या तोंडात हात घालून त्याचा प्रतिकार होईल कां ?''

विपदस्तु प्रतीकारो निर्भयत्वं न शोकिता ।
तच्च तत्वविदामेव तत्त्वज्ञाः स्यात तद्बुधाः ॥ १७ ॥

अर्थ :– ''विपत्तीचा प्रतिकार शोक करणे घाबरणे हा नसून निर्भयता हाच त्याचा प्रतिकार आहे. आणि ती निर्भयता तर तत्त्ववेदींनाच होते. म्हणून हे सज्जनांनो ! तत्त्वाचा आश्रय घ्या.''

इत्यप्यबोधयत्सोयं वणिक्पोताश्रितान्सुधीः ।
तत्वज्ञानं हि जीवानां लोकद्वयसुखावहम् ॥ १८ ॥

अर्थ :– याप्रमाणे तो नौयंत्राचा मालक नावेतील लोकांना संबोधू लागला. खरोखर तत्त्वज्ञान हेच जीवांना इहपरलोकी सुखदायक आहे.

तावता नावि नष्टायां दृष्टोऽभूत्कूपखण्डकः ।
सत्यायुषि हि जायेत प्राणिनां प्राणरक्षणम् ॥ १९ ॥

अर्थ :– त्यानंतर नाव बुडण्याच्या बेतात असतांना एक लाकडाचा ओंडका दिसला. जर आयुष्य असेल तर प्राण्यांचे प्राणरक्षण होतेच.

श्रीदत्तस्तु तमारुह्य प्रासदद्द्वीपसंश्रितः ।
राज्यभ्रष्टोऽपि तुष्टः स्याल्लब्धप्राणो हि जन्तुकः ॥ २० ॥

श्लोकांक (१६) भाविन्याः - आगामिन्याः अनागताया । सर्पशंकाविभीताः - सर्पशंकाया विभिताः (०तत्पु०) करदायिनः - हस्तदातारः । (१८) लोकद्वयसुखावहम् - लोकयोः द्वयं लोकद्वयं, लोकद्वयस्य सुखं आवहतीति (उप० त० पु०) (१९) कूपखण्डकः - नौमध्यरज्जुबंधनकाष्ठस्य खण्डः । (मस्तूल; हिंदी भाषायां( (२०) द्वीपसंश्रितः - दीपं संश्रितः (द्वि० त०)

अर्थ :– श्रीदत्त त्या ओंडक्यावर बसून द्वीपाच्या किनाऱ्यास पोचला. राज्य गमावलेल्या जीवास प्राण वाचलेत तर तेही सुखावह भासते.

नष्टशेवधिरप्येष मृष्टमेवमतर्कयत् ।
दुःखार्थोऽपि सुखार्थो हि तत्वज्ञानधने सति ॥ २१ ॥

अर्थ :– सर्व धन नष्ट झाले तरीही श्रीदत्त घाबरला नाही. तत्त्वज्ञानधन असेल तर दुःखाचे कारणही सुखास कारण होते.

तृष्णाग्निदह्यमानस्त्वं मूढात्मन्किं नु मुह्यसि ।
लोकद्वयहितध्वंसोर्न हि तृष्णारुषोर्भिदा ॥ २२ ॥

अर्थ :– तृष्णारूपी अग्नीने तूं दग्ध होत आहेस. तरी हे मूढ जीवा ! तूं कां बरं मोहित होत आहेस ? इहलोक व परलोक दोहोचाही नाश करणारे तृष्णा आणि क्रोध यांत काहीच अंतर नाही.

लोकद्वयहितायात्मन्नैराश्यनिरतो भव ।
धर्मसौख्यच्छिदाशा ते तरुच्छेदः फलार्थिनाम् ॥ २३ ॥

अर्थ :– इहलोकीं आणि परलोकी हितासाठी, हे आत्मन् ! तूं आशा सोड. वैराग्याने संपन्न हो. धर्म आणि सुखाचा नाश करणारी आशा ही फलासाठी वृक्षाचा मूलतः घात करण्यासारखे आहे.

संसारासारभावोऽयमहो साक्षात्कृतोऽधुना ।
यस्मादन्यदुपक्रान्तमन्यदापतितं पुनः ॥ २४ ॥

अर्थ :– संसाराच्या असारतेचे स्वरूप आता साक्षात् प्रत्यक्ष आहे. पहा ! कोणती गोष्ट प्रारंभ केली होती ? परंतु ते साध्य न होता घडले काय ? हे संसाराच्या असारतेचे चित्र आहे.

अत एव हि योगींद्रा अपीन्द्रत्वार्हसंपदम् ।

---

श्लोकांक (२१) नष्टशेवधिः - नष्टः शेवधिः यस्यसः (बहु०) शेवधिः - वित्तसंचयः निधिः ,। दुखार्थः - दुःखाय इति (च० त०) । मृष्टं - शुद्धं, अव्याकुलम् (२२) भिदा-भेदः तृष्णाग्निदहयमानः - तृष्णा एव अग्निः तृष्णाग्निः (कर्म०) तेन दहव्यमानः (तृ० त०) (२४) उपक्रान्तं - प्रारब्धम् ।



त्यक्त्वा तपांसि तप्यन्ते मुक्त्यै तेभ्यो नमोनमः ॥ २५ ॥

अर्थ :– आणि म्हणूनच इन्द्रास शोभनीय संपदा देखील योगीन्द्र सोडतात. मोक्षासाठी तपश्चरण करतात. त्यांना नमस्कार असो.''

इत्यूहोऽपि स दृष्टस्य कस्यचित्स्वार्तिमूचिवान् ।
मध्ये मध्ये हि चापल्यमामोहादपि योगिनाम् ॥ २६ ॥

अर्थ :– याप्रमाणे तत्त्वविचार असूनही त्याने कोणास पाहून आपल्या वेदना सांगितल्या. योगीन्द्रानाही मध्ये मध्ये मोहवश चंचलता होतच असते.

यादृच्छिक इवायातस्तत्कृच्छ्रं सोऽपि शुश्रुवान् ।
संसृतौ व्यवहारस्तु न हि मायाविवर्जितः ॥ २७ ॥

अर्थ :– सहजच आलेल्या त्या पुरुषाने सांगितले ते सर्व ऐकून घेतले. संसारामध्ये व्यवहार बहुधा मायावर्जित असत नाही. कपटयुक्तच असतो.

श्रुत्वा मिषेण केनापि नीत्वा राजतभूधरम् ।
स्वागतेः कारणं सर्वमभाणीत्स वणिक्पतेः ॥ २८ ॥

अर्थ :– अर्थात् तो कोणत्या तरी प्रयोजनानेच आला होता. ते सर्व भाषण ऐकून त्याने कोणत्या तरी मिषाने राजत पर्वतास नेऊन त्याने त्या श्रेष्ठीवर्यास आपल्या येण्याचे कारण सर्व काही सांगितले.

विजयार्धगिरावस्ति दक्षिणश्रेणिमण्डने ।
गान्धारविषये ख्याता नित्यालोकाव्हया पुरी ॥ २९ ॥

अर्थ :– ''या विजयार्धपर्वतावर दक्षिणश्रेणीला सुशोभित करणारा गांधार नावाचा देश असून त्या देशात नित्यालोक नावाची नगरी आहे.''

गरुडवेगनामास्यां राजा राज्ञी तु धारिणी ।
पुत्री गन्धर्वदत्ताऽभूदभूत्सापि यवीयसी ॥ ३० ॥

अर्थ :– ''त्या नगरीत गरुडवेग नामक राजा आहे, त्याची धारणी

---

श्लोकांक (२६) स्वार्तिम् - निजपीडां । (२७) यादृच्छिकः - प्रयोजनं विना स्वेच्छया आगतः । कृच्छ्रं - दुःखं । (२८) राजतभूधरं - विजयार्धगिरिं । (३०) यवीयसी - अतिशयेन युवतिः ।

नावाची राणी आहे. गंधर्वदत्ता नावाची मुलगी आहे आणि ती तारुण्यांत आलेली आहे.''

वीणाविजयिनो भार्या राजपुर्यामियं भवेत् ।
भूमाविति मुहूर्तज्ञा जन्मलग्ने व्यजीगणन् ॥ ३१ ॥

अर्थ :- ''राजपुरी नगरीमध्ये वीणावादनात जो जिंकेल त्याची ती भार्या होणार आहे, असे मुहूर्त जाणणाऱ्याने तिच्या जन्मप्रसंगी सांगितले.''

तदर्थं पार्थिवः सार्धमेकान्ते कान्तया तया ।
मन्त्रयित्वा तदन्ते मामम्न्दप्रीतिरादिशत् ॥ ३२ ॥

अर्थ :- ''तदनंतर राजा आपल्या धारिणी राणीसह एकांतात बोलणे करून शेवटी मला त्याने अत्यंत प्रीतीने आदेश दिला.''

कुलक्रमागता मैत्री श्रीदत्तेनास्ति नस्ततः ।
गत्वा सत्वरमत्रैव सोऽयमानीयतामिति ॥ ३३ ॥

अर्थ :- ''आमची श्रीदत्तासह कुलक्रमाने मैत्री आहे. तेव्हा आपण तातडीने जाऊन त्यास येथे सत्वर आणावे.''

भवन्तं परतन्त्रोऽहं नौभ्रंशभ्रांतिमावहन् ।
नाम्ना धरः कृतेर्भूम्ना पुनरानतवानिति ॥ ३४ ॥

अर्थ :- ''माझे नाव धर आहे. राजाज्ञावश मीच ती नाव माझ्या विद्येने बुडविली. आणि कार्यविशेषाने येथे घेऊन आलो आहे.''

श्रीदत्तोऽपि तदाकर्ण्य तुतोष सुतरामसौ ।
दुःखस्यानन्तरं सौख्यमतिमात्रं हि देहिनाम् ॥ ३५ ॥

अर्थ :- श्रीदत्तही हे सर्व ऐकून अत्यंत संतुष्ट झाला. दुःखानंतर सुख मिळाले तर त्यामुळे अत्यानंद होणे स्वाभाविकच आहे.

असुखायत वैश्योऽपि खेचरेन्द्रावलोकनात् ।

श्लोकांक (३१) व्यजीगणन् - विज्ञापयामास । (३२) मंत्रयित्वा - विचार्य । अमन्दप्रीतिः - सुप्रीतः, अमन्दा प्रीतिः यस्य सः (बहु०) (३४) परतंत्रः - पराधीनः । भूम्ना - बाहुल्येन ।



मित्रं धात्रीपतिं लोके कोऽपरः पश्यतः सुखी ॥ ३६ ॥

अर्थ :- ते वणिक् श्रेष्ठीही विद्याधर राजास पाहून अत्यंत सुखावला ज्याचा मित्र राजा आहे त्यासारखा आणखी कोण सुखी असेल?

नभश्चराधिपः पश्चात्तदायत्तां सुतां व्यधात् ।
प्राणेष्वपि प्रमाणं यत्तद्धि मित्रमितीष्यते ॥ ३७ ॥

अर्थ :- विद्याधर राजाने नंतर मुलीस श्रीदत्ताच्या स्वाधीन केले. प्राणापेक्षाही प्रिय अशी मैत्री असेल तर तोच खरा मित्र म्हटल्या जातो.

श्रीदत्तं सत्वरं तस्मात्खेचरेशो न्यवर्तयत् ।
अङ्गजायां हि सूत्यायामयोग्यं कालयापनम् ॥ ३८ ॥

अर्थ :- म्हणून विद्याधर राजाने श्रीदत्ताला ताबडतोब परत पाठविले. मुलगी यौवनात आली असतांना काल घालविणे अयोग्य आहे.

गृहस्थानां हि तद्दौःस्थ्यमतिमात्रमरुन्तुदम् ।
कन्यानामप्रदानेन रक्षणादिसमुद्भवम् ॥ ३९ ॥

अर्थ :- युवती कन्या प्रदान न केली तर तेच गृहस्थांना मर्मभेदी दुःख असते. कारण तिच्या शील रक्षणाची काळजी बोचत असते.

तयामा स्वपुरं प्राप्य श्रीदत्तोऽप्यथ तत्कथाम् ।
पत्न्याः प्रकटयामास स्त्रीणामेव हि दुर्मतिः ॥ ४० ॥

अर्थ :- गंधर्वदत्तेसह आपल्या नगरीला आलेल्या श्रीदत्त श्रेष्ठीने आपल्या पत्नीला हा सर्व वृत्तांत सांगितला, कारण स्त्रीची अशी दुर्बुद्धि स्वाभाविकच असते. (बायांना पतिसंसर्गात अन्यस्त्री पाहून ईर्षा सहज उत्पन्न होते)

वीणाविजयिनो योग्या भोग्या पुत्री ममेति सः ।
कटके घोषयामास राजानुमतिपूर्वकम् ॥ ४१ ॥

श्लोकांक (३७) तदायत्तां - श्रीदत्ताधीनां । (३८) सूत्यायां - युवत्यां । कालयामपनं - कालापहारः । (३९) दौस्थ्यम् - दुःखं, आकुलता । (४०) तयामा - तया सह । (४१) कटके - राजधान्यां

अर्थ :– त्या श्रीदत्त श्रेष्ठीने ''जो वीणावादनात पुत्रीला जिंकेल तोच या कन्येचा पती होईल'' अशी राजाच्या अनुमतीने दवंडी देवविली.

अकुतोभीतिता भूमेर्भूपानामाज्ञयान्यथा ।
आस्तामन्यत्सुवृत्तानां वृत्तं च न हि सुस्थितम् ॥ ४२ ॥

अर्थ :– राजाची संमती घेण्याचे कारण असे की, राजाज्ञेने कोणतेही काम केले तर त्यांत कसलीही कोठूनही भीति नसते. अन्यथा व्रतींना व्रते पाळणेही दुरापास्त होते.

वीणामण्डपमासेदुस्तावता धरणीभुजः ।
स्त्रीरागेणात्र के नाम जगत्यां न प्रतारिताः ॥ ४३ ॥

अर्थ :– त्या दवंडीला अनुसरून अनेक राजे स्त्रीलोभाने वीणा मंडपात पोचलेत. स्त्रीवासनेने या जगात कोण ठगविले गेले नाहीत ?

कन्यायाः परिवादिन्यां पराजेषत पार्थिवाः ।
अपुष्कला हि विद्या स्यादवज्ञैकफला क्वचित् ॥ ४४ ॥

अर्थ :– त्या परिवादिनी नामक विद्यावादनांत सर्व राजे पराजित झालेत. जर विद्या अपूर्ण अर्धवट असेल तर ती कधी अपमान करणारीही असू शकते.

जीवंधरकुमारस्तु घोषवत्यां जिगाय ताम् ।
अनवद्या हि विद्या-स्याल्लोकद्वयफलावहा ॥ ४५ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराने मात्र घोषवती वीणेमध्ये तिला जिंकले. ठीकच आहे, निर्दोष विद्या इहलोकीं परलोकीं फलदायी असते.

पराजयं जयाश्लाघ्यं मत्वा सापि तमासदत् ।
अन्तिकं कृतपुण्यानां श्रीरन्विष्य हि गच्छति ॥ ४६ ॥

---

श्लोकांक (४२) अकुतोभीतिता - न कुतश्चित् भयत्वं, सर्वथा निर्भयत्वं । सुवृत्तानां - सदाचारिणां । वृत्तं - वर्तनं । सुस्थितं - बाधारहितं; निर्वाधं । (४३) आसेदुः - आगताः । प्रतारिताः वञ्चितांः । (४४) परिवादिन्यां - परिवादिनीसंज्ञिकाय । अपुष्कला - असंपूर्णा अवज्ञैकफला - अवज्ञाप्रदा । (४५) घोषवत्यां - घोषवती संज्ञिकायां वीणायां अनवद्या - प्रशस्ता । लोकद्वयफलावहा - उभयलोकहितप्रदा (४६) श्लाघ्यं - प्रशस्यं । अन्तिकं - समीपं । अन्विष्य - गार्गयित्वा



अर्थ :– हा पराजयही विजयासारखा स्तुत्य मानून ती गंधर्वदत्ता कुमार जीवंधराजवळ गेली व तिने वरमाला टाकली. पुण्यशाली जीवाकडे श्री-लक्ष्मी शोधून जाते.

आमुमोचाथ मोचोरुः स्रजं जीवकवक्षसि ।
कुर्वन्तु तप इत्येवं सर्वेभ्योब्रुवतीव सा ॥ ४७ ॥

अर्थ :– त्या गंधर्वदत्तेने फुलमाला जीवंधर कुमाराचे गळ्यात टाकली. जणूं कांही ती असेच बोलत होती ''सर्वांनी असेच तप करावे.''

काष्ठांगारस्तु तद्वीक्ष्य क्षितिपान्समधुक्षयत् ।
अन्याभ्युदयखिन्नत्वं तद्धि दौर्जन्यलक्षणम् ॥ ४८ ॥

अर्थ :– हे सर्व पाहून काष्ठांगाराने सर्व राजांना मात्र चिथावणी दिली. दुसऱ्याचा उत्कर्षात दुःख मानणे हेच दुर्जनतेचे लक्षण आहे.

क्रयविक्रययोर्योग्यः कुप्यानां वैश्यसूनुकः ।
कथं लभेत स्त्रीरत्नं शस्तं वस्तु हि भूभुजाम् ॥ ४९ ॥

अर्थ :– ''भांड्यांचा क्रय-विक्रय करावा या योग्यतेच्या वैश्यपुत्राला हे स्त्रीरत्न कसे मिळेल ? कारण उत्कृष्ट वस्तू राजालाच शोभून दिसते.''

इति संधुक्षिताश्चक्रुः स्वामिना तेऽपि संयुगम् ।
प्रकृत्या स्यादकृत्ये धीर्दुःशिक्षायां तु किं पुनः ॥ ५० ॥

अर्थ :– याप्रमाणे काष्ठांगाराने त्यांना उत्तेजित केले. त्यामुळे तेही कुमारासह युद्ध करण्यास सज्ज झाले. दुर्बुद्धी स्वभावतःच वाईट गोष्टीमध्ये प्रवृत्त होते. त्यांत अशी उत्तेजना जर मिळाली तर मग काय पाहावयाचे !

पराजेषत भूपास्ते धन्विनां चक्रवर्तिनः ।
अलं काकसहस्रेभ्य एकैव हि दृषद्भवेत् ॥ ५१ ॥

---

श्लोकांक (४७) मोचोरुः - रम्भोरुः (गंधर्वदत्ता) (४८) समधुक्षयत् - संधुक्षितान् व्यधात्। अन्याभ्युदयखिन्नत्वं - अन्येषां अभ्युदयः तेन खिन्नत्वं । (तृ० त०) (४९) कुप्यम् - सुवर्णरजाताभ्यां अन्यत् । शस्तं - उत्तमं । वैश्यसूनुकः - साधारणः वणिक्पुत्रः । (५०) संधुक्षिताः - शोभिताः । संयुगं - युद्धं । प्रकृत्या - स्वभावेन - अकृत्ये - अकार्ये ।

अर्थ :– ते सर्व राजेलोक धनुर्धारीमध्ये चक्रवर्ती जीवंधर कुमारांचे समोर पराजित झालेत. हजारो कावळ्यांना उडविण्यास एकच दगड पुरेसा असतो.

स्थाने कन्यामनः सत्यमित्यूचुः सज्जना मुदा ।
सुधासूतेः सुधोत्पत्तिरपि लोके किमद्‌भुतम् ॥ ५२ ॥

अर्थ :– सज्जन लोक आनंदाने उद्गारलेत, ''कन्येचे मन योग्य स्थानी जडले.'' 'जगांत चंद्रकिरणांपासूनच अमृत उत्पन्न होते.' यांत आश्चर्य ते कोणते ?

अथ गन्धर्वदत्तां तां श्रीदत्तेनाग्निसाक्षिकम् ।
दत्तां स जीवकस्वामी पर्यणैष्ट यथाविधी ॥ ५३ ॥

अर्थ :– याप्रमाणे श्रीदत्त श्रेष्ठीने अग्नीसाक्षीने दिलेल्या गंधर्वदत्ता कन्येशी विधीप्रमाणे विवाह केला.

इति श्रीमत् वादीभसिंहसूरि-विरचिते
क्षत्रचूडामणौ गंधर्वदत्तालम्भो नाम
तृतीयो लम्बः ।
याप्रमाणे वादीभसिंहसूरीविरचित क्षत्रचूडामणि मध्ये गंधर्वदत्तेची प्राप्ती नामक तिसरा लंब समाप्त झाला.

---

श्लोकांक (५२) स्थाने - योग्यस्थाने । सुधासूतेः - चन्द्रमसः । सुधोत्पत्तिः - अमृतोत्पत्तिः ।

## चतुर्थ लंब

अथ जीवंधरस्वामी रेमे रामासमन्वितः ।
संसारेऽपि यथायोग्याद्भोग्यान्ननु सुखी जनः ॥ १ ॥

अर्थ :– गंधर्वदत्तेशी विवाह झाल्यानंतर कुमार संसार भोगात रममाण झाला. संसारामध्ये सुद्धा परस्परानुकूल भोग सुखावह वाटतात.

माधवोऽथ जलक्रीडां पौराणामुदपादयत् ।
रागान्धानां वसन्तो हि बन्धुरग्नेरिवानिलः ॥ २ ॥

अर्थ :– वसंत ऋतु आला. त्याने जलक्रीडेचा व्यामोह लोकामध्ये उत्पन्न केला. ज्याप्रमाणे अग्नीचा सखा वायु असतो तद्वत् संसारात वसंत रागांध जीवांचा असाच मित्र असतो.

जीवंधरकुमारोऽपि मित्रैर्द्रष्टुमयादमुम् ।
नवापगाजलक्रीडां लोको ह्यभिनवप्रियः ॥ ३ ॥

अर्थ :– जीवंधरकुमार देखील आपल्या मित्रासह जलक्रीडा पाहण्यासाठी गेला. लोक हे अभिनव वस्तूमध्ये प्रीति करतात.

अवधिषुर्द्विजास्तत्र हविर्दूषितभाषणम् ।
क्रूराः किं किं न कुर्वन्ति कर्मधर्मपराङ्मुखाः ॥ ४ ॥

अर्थ :– तो त्याने पाहिले की, होमद्रव्यास शिवल्यामुळे ब्राह्मणांनी त्या कुत्र्यास खूप मारले. कर्म-धर्मापासून पराङ्मुख अज्ञानी क्रूर माणसे काय काय करीत नाहीत ?

निर्निमित्तमपि घ्नन्ति हन्त जन्तूनधार्मिकाः ।

---

श्लोकांक (२) माधवः - वसन्तः । जलक्रीडां - जलक्रीडेच्छां इत्यर्थः । उदपादयत् - उत्पन्नां अकरोत् । (४) हविर्दूषितभाषणं - हविः दूषितं येन तं भाषणं - श्वानं । अवधिषुः - अघ्नन् । (५) कारणाभासे - ईषद् भासः आभासः कारणस्य आभासः तस्मिन् अकारण स्यापि कारणवद् भासमानत्वे सति इत्यर्थः ।

किं पुनः कारणाभासे नो चेदत्र निवारकः ॥ ५ ॥

अर्थ :– अरेरे ! अधर्मिक जीव कांही कारणाविना सुद्धा जीवांचा वध करतात. त्यांत काहीतरी कारण दिसून आले तर व कोणी अडविणारा नसेल तर काय पहावे ?

तद्व्यथां वीक्षमाणोऽयं कुमारो विषसाद सः ।
तद्धि कारुण्यमन्येषां स्वस्येव व्यसने व्यथा ॥ ६ ॥

अर्थ :– अतिमाराने विव्हळणाऱ्या त्या कुत्र्याच्या वेदना पाहून कुमारास दुःख झाले. दुसऱ्याच्या आपत्तिकाळी आपल्या आपत्तिप्रमाणे कळवळा वाटणे हेच कारुण्य आहे !

प्रत्युज्जीवयितुं श्वानं यत्नेनाप्यथ नाशकत् ।
न ह्यकालकृतो यत्नो भूयानपि फलप्रदः ॥ ७ ॥

अर्थ :– त्या कुत्र्यास पुनरुज्जीवित करण्यास कुमार यत्न करूनही समर्थ झाला नाही. अवेळी केलेला यत्न खूप असूनही फलद्रूप होत नाही.

परलोकार्थमस्यायं पञ्चमन्त्रमुपादिशत् ।
निर्वाणपथपान्थानां पाथेयं तद्धि किं परैः ॥ ८ ॥

अर्थ :– त्याचा परलोक सुधारावा म्हणून कुमाराने त्याचे कानात णमोकार मंत्र दिला. निर्वाणमार्गाच्या वाटसरूंना तीच एक शिदोरी आहे! अन्य वस्तुमुळे काय लाभ ?

यक्षेन्द्रोऽजनि यक्षोऽयमहो मन्त्रस्य शक्तितः ।
कालायसं हि कल्याणं कल्पते रसयोगतः ॥ ९ ॥

अर्थ :– अहो ! त्या मंत्राच्या प्रभावाने कुत्रा देखील यक्षेन्द्र झाला ! रसाच्या संसर्गाने लोखंड देखील सोने होते.

---

श्लोकांक (६) विषसाद् - विषादं प्राप । व्यसने - दुःखे । (८) पञ्चमन्त्रं - णमोकारमन्त्रं। पाथेयं - पथि साधु हितकरं (९) यक्षः - श्वा । कालायसं कालं च तदयश्च कालायसं लोहः । कल्याणं - सुवर्णं । कल्पते - निष्पद्यते रसयोगतः - रसायनसंसर्गेण ।



मरणक्षणलब्धेन येन श्वा देवताऽजनि ।
पञ्चमन्त्रपदं जप्यमिदं केन न धीमता ॥ १० ॥

अर्थ :– मरणक्षणी मिळालेल्या ज्या मंत्राने कुत्रा यक्षदेव झाला तो पंच नमस्कार पद असलेल्या मंत्राचा जप कोण बुद्धिमान करणार नाही ?

स कृतज्ञचरो देवः कृतज्ञत्वात्तदागमत् ।
अन्तर्मुहूर्ततः पूर्तिर्दिव्यायां हि तनोर्भवेत् ॥ ११ ॥

अर्थ :– तो देव कृतोपकार जाणून कृतज्ञतेमुळे तेथे आला. अहो ! देवांच्या दिव्य शरीराची पूर्णता अंतर्मुहूर्तातच होते.

कुमारममरो दृष्ट्वा हृष्टस्तुष्टाव मृष्टवाक् ।
उपकारस्मृतिः कस्य न स्यान्नो चेदचेतनः ॥ १२ ॥

अर्थ :– देवाने कुमारास पाहून आनंदी व संतुष्ट होऊन तो म्हणाला - कोण्या व्यक्तीला जर तो अचेतन नसेल तर उपकारांचे स्मरण होणार नाही ?

व्यस्मेष्ट तेन न स्वामी मनुमाहात्म्यनिर्णयात् ।
मुक्तिप्रदेन मन्त्रेण देवत्वं न हि दुर्लभम् ॥ १३ ॥

अर्थ :– हे सर्व पाहून कुमारास कांहीच आश्चर्य वाटले नाही. तो मंत्र सामर्थ्याचा प्रभाव जाणून होता. जो मंत्र मोक्षपद देवू शकतो त्याने देवत्व दुर्लभ आहे कां ?

स्मर्तव्योऽस्मि महाभागेत्युक्त्वा देवस्तिरोऽभवत् ।
प्रतिकर्तु कथं नेच्छेदुपकर्तुः सचेतनः ॥ १४ ॥

अर्थ :– ''हे महाभाग ! जरूर तेव्हा स्मरण करावे.'' असे म्हणून देव निघून गेला. प्राणी सचेतन असेल तर उपकार करणाऱ्याची परतफेड कशी करणार नाही ?

---

श्लोकांक (१०) मरणक्षणलब्धेन - मरणस्य क्षणः तस्मिन् लब्धः तन (स० त०) । (११) कृतज्ञः - श्वा । भूतपूर्वः कृतज्ञः कृतज्ञचरः (भूतपूर्वे चरट् शुनो जीवः । दिव्या - देवसंबंधिनी, स्वर्गीया । (१२) मृष्टवाक् मृष्टा - शुद्धा वाक् यस्य सः । (१३) व्यस्मेष्ट - विस्मयं प्राप । मनुमाहात्म्यनिर्णयात् - मंत्रमाहात्म्यविनिश्चयेन (१४) तिरस - अन्तर्हितः, प्रच्छन्नः । प्रतिकर्तुं - प्रत्युपकारं कर्तुं ।

सारमेयचरे देवे तमाश्लिष्य मुहुर्मुहुः ।
आपृच्छ्य च गते तस्मिन्नत्र प्रस्तुतमुच्यते ॥ १५ ॥

अर्थ :– **सारमेय - कुत्र्याचा जीव जो यक्षेन्द्र त्याने कुमारास वारंवार आदराने आलिंगन देऊन; त्याची आज्ञा घेवून निघून गेला. इकडे असा वृत्तांत घडला.**

चूर्णार्थं सुरमञ्जर्याः स्पर्धाभूद्गुणमालया ।
एकार्थस्पृहया स्पर्धा न वर्धेतात्र कस्य वा ॥ १६ ॥

अर्थ :– **चूर्णासाठी गुणमालेची सूरमंजरीसह स्पर्धा झाली. एकाच वस्तूचा लाभ इच्छिणाऱ्यामध्ये स्पर्धा होणे स्वाभाविकच आहे.**

माभूत्पराजिता स्नाता नादेये वारिणीति वै ।
संगिराते स्म ते सख्यौ मात्सर्यात्किं न नश्यति ॥ १७ ॥

अर्थ :– **''जी हरेल तिने नदीचे पाण्यामध्ये स्नान करू नये'' अशी त्या दोघा मैत्रिणींनी आपसांत प्रतिज्ञा केली. मात्सर्याने सर्वस्वनाश होतो. तर मग परस्पर प्रेमात माती कालविली जाते यात काय आश्चर्य !**

कन्ये प्राहिणुतां पश्चाच्चेट्यौ स्वे निकटे सताम् ।
कुत्सितं कर्म किं किं वा मत्सरिभ्यो न रोचते ॥ १८ ॥

अर्थ :– **तदनंतर त्या दोघाही मैत्रिणींनी आपआपल्या दासींना परिचित सज्जनांकडे पाठविले. मत्सरपीडित लोकांना कोणते निंद्य कार्य आवडत नाही ?**

अस्थिषातामथागत्य चेट्यौ जीवककोविदे ।
अनवद्या सती विद्या लोके किं न प्रकाशते ॥ १९ ॥

अर्थ :– **त्या दोन्ही दासी फिरत फिरत अखेर कुमार जीवंधराकडे आल्या. जर निर्दोष ज्ञान असेल तर ते उजेडात येतेच.**

श्लोकांक (१५) सारमेयचरे - सरमा शुनी, तस्याः अपत्यं सारमेयः श्वा; भूतपूर्वे सारमेये। (१६) चूर्णार्थं - चूर्णाय । एकार्थस्पृहया - एकं अर्थं प्रति समेच्छया । (१७) वै - अवधारणे, दृढमित्यर्थः । संगिराते स्म - प्रतिज्ञां चक्रतुः । (१८) चेट्यौ - दास्यौ । (१९) अस्थिषाताम् - अतिष्ठताम् । जीवककोविदे - पंडितं जीवंधरं प्रति । सती - प्रशस्ता



गुणवद्गुणमालायाश्चूर्णं निर्वर्ण्य सोऽभ्यधात् ।
पाण्डित्यं हि पदार्थानां गुणदोषविनिश्चयः ॥ २० ॥

अर्थ :– **त्या दोहोपैकी गुणमालेचे चूर्ण हे चांगले व गुणयुक्त आहे असे पूर्ण परीक्षा करून जीवंधर स्वामींनी निर्वाळा दिला. गुणदोषांची योग्य पारख हेच तर पांडित्य आहे !**

चेटी तु सुरमञ्जर्यास्तच्छ्रुत्वा रोषणाऽब्रवीत् ।
अन्यैरप्युक्तमुक्तं तैः किमध्यैष्ट भवानिति ॥ २१ ॥

अर्थ :– **जीवंधराने दिलेला निर्णय ऐकून सुरमंजरीची दासी रागाने फणफणत म्हणाली - ''आपणही तर दुसऱ्यासारखेच सांगितले. जणू दोघांनीही एकत्र अध्ययन केले.''**

चूर्णयोरलिभिः स्वामी गुणदोषावसाधयत् ।
निर्विवादविधिर्नो चेन्नैपुण्यं नाम किं भवेत् ॥ २२ ॥

अर्थ :– **गुणमालेच्या चूर्णावर भ्रमर गुंजारव करत आहेत असे दाखवून कुमाराने दोघींच्याही चूर्णातील गुणदोष स्पष्ट करून सांगितले. जर आपली गोष्ट सिद्ध करून दाखविली नाही तर ते नैपुण्य कसे असेल ?**

आकालिकतया दुष्टं चूर्णमन्यदवर्णयत् ।
न ह्यकालकृतं कर्म कार्यनिष्पादनक्षमम् ॥ २३ ॥

अर्थ :– **कुमाराने सांगितले की, 'सूरमंजिरीचे चूर्ण अकाली तयार केल्यामुळे अधिक चांगले झाले नाही. अवेळी जर काम केले तर इष्टसिद्धी होत नाही.'**

कुमारादथ कुट्टन्यौ नुत्वा नत्वा च निर्गते ।
निर्विवादं वितन्वाना न स्तुत्याः केन भूतले ॥ २४ ॥

अर्थ :– **दोन्ही दासी याप्रमाणे जीवंधरांना नमस्कार करून, त्यांची स्तुती**

श्लोकांक (२०) निर्वर्ण्य - परीक्ष्य । गुणवत् - श्रेष्ठं । (२१) रोषणा - रुष्टा । अन्यैरपि - अत्र अपिर्गर्हायाम् पृथग्जनैरित्यर्थः । तैर्यदुक्तं तदेव त्वयाप्युक्तं निदर्शनं विनैव । भवान् तैरेवसह अध्यैष्ट किं ? अविशेषदर्शित्वा दितिभावः । (२२) असाधयत् - सिद्धमकरोत् । निर्विवादविधिः - विवादरहिता प्रक्रिया (२३) आकालिकतया - अकाले भवा आकालिका तस्याः भावः तया ।

करून निघून गेल्यात. निर्विवाद निर्णय देणारा सर्वांनाच मान्य असतो.

तद्यासीत्सुरमञ्जर्या विरागस्यैव कारणम् ।
न ह्यत्र रोचते न्यायमीर्षादूषितचेतसे ॥ २५ ॥

अर्थ :– तीच गोष्ट सुरमंजरीच्या रोषाला कारण झाली. 'ईर्षेने दूषित मनाला न्याय्य गोष्टही रुचत नाही हेच खरे !

प्रार्थिताप्यकृतस्नाना सत्वरं सुरमञ्जरी ।
न्यवर्तिष्ट महारोषादीर्षा हि स्त्रीसमुद्भवा ॥ २६ ॥

अर्थ :– गुणमालेने वारंवार विनवणी केली असतांनाही सुरमंजिरी स्नान न करता क्रोधाने फणफणत निघून गेली. ईर्षा ही स्त्रियांमध्ये विशेषत्वाने आढळून येते.

जीवकादपरान्नेक्षे पुरुषानिति संविदा ।
कन्या गृहमथ प्रापन्न ह्यभेद्यं मनः स्त्रियाः ॥ २७ ॥

अर्थ :– ''जीवक सोडून अन्य पुरुषाचे तोंडही पाहणार नाही' असा पक्का निर्धार करून सुरमंजिरी घरी परत आली. स्त्रियांचे मन हे बदलविणे शक्य नसते.

सख्यां तथैव यातायां गुणमाला शुशोच ताम् ।
न ह्यनिष्टेष्टसंयोगवियोगाभमरुन्तुदम् ॥ २८ ॥

अर्थ :– दासी परत आलेल्या पाहून गुणमालेला दुःख झाले. बरोबरच आहे अनिष्टाचा संयोग आणि इष्टाचा वियोग यासारखे मर्मांतिक दुःख नाही.

गन्धसिंधुरतो भीतिरासीदथ पुरौकसाम् ।
विपदोऽपि हि तद्भीतिर्मूढानां हन्त बाधिका ॥ २९ ॥

अर्थ :– इकडे गंधसिंधु नामक हत्ती स्वैर पळत आहे असे पाहून नगरवासी जन भयग्रस्त झालेत. मूर्खांना प्रत्यक्ष आपत्तिपेक्षाही त्याची भीतीच अधिक

---

श्लोकांक (२६) न्यवर्तिष्ट - प्रत्यागच्छत् । भेद्यं न - दुर्बोध्यं इत्यर्थः (२८) यातायां - गतायां । (२९) गंधसिंधुरतः - गंधसिंधुरनामकहस्तिनः ।



बाधक असते.

परिजनस्तु तं पश्यन्गुणमालामथात्यजत् ।
न हि सन्तीह जन्तूनामपाये सति बान्धवाः ॥ ३० ॥

अर्थ :– ह्या उन्मत्त हत्तीला पाहून गुणमालेचे नोकर व मैत्रिणी सोडून पळाल्यात. जर संकट आले तर कोणीच नातलग जवळ राहत नाहीत.

कृत्वा तां पृष्ठतो धात्री काचिदस्थाद्दयावहम् ।
हतायां मय्यतः पूर्वं कन्येयं हन्यतामिति ॥ ३१ ॥

अर्थ :– कोणी एक दयाळू दासी तिला पाठीशी घालून समोर उभी राहिली. ''मी मारल्या गेली असतांनाच नंतर ही कन्या मारल्या जावी हा तिचा भाव होता.''

समदुःखसुखा एव बन्धवो ह्यत्र बांधवाः ।
दूता एव कृतान्तस्य द्वन्द्वकाले पराङ्मुखाः ॥ ३२ ॥

अर्थ :– सुख व दुःख दोहोमध्ये जे बरोबर समभागी होऊन राहतात तेच नातलग व मित्र खरे ! आपत्प्रसंगी पाठ फिरविणारे जणूं यमाचे दूतच होत.

स्वामी परिणतं वीक्ष्य करिणं तं न्यवारयत् ।
स्वापदं न हि पश्यन्ति सन्तः पारार्थ्यतत्पराः ॥ ३३ ॥

अर्थ :– हत्ती उन्मत्त, बेफाम झालेला पाहून जीवंधर पुढे येवून हत्तीस परत फिरविले. दुसऱ्याच्या हिताची चिंता वाहणारे आपल्यावरील आपत्तीला जुमानत नाहीत.

यत्र क्वापि हि सन्त्येव सन्तः सार्वगुणोदयः ।
क्वचित्किमपि सौजन्यं नो चेल्लोकः कुतो भवेत् ॥ ३४ ॥

अर्थ :– परहितदक्ष असे महात्मे क्वचित् दिसून येतात. जर या लोकीं असे

---

श्लोकांक (३०) परिजनः - सेवकगणः । (३२) द्वन्द्वकाले - विपत्तिकाले । कृतान्तस्य - यमस्य । समदुःखसुखाः समानं - दुःखं च सुखं च येषां ते (बहु०) (३३) परिणतं - तिर्यग्दंतप्रहारस्तु गजः परिणता मतः । पारार्थ्यतत्पराः - परार्थस्य परहितस्य भावः पारार्थ्यं तस्मिन् तत्परः । (३४) सार्वगुणोदयाः - सर्वगुणसंपन्नाः । सौजन्यं - सुजनता ।

संतमहात्मे नसतील तर ही जगरहाटी कशी चालू राहील ?

परिवारोऽप्यथायासीदहंपूर्विकया स्वयम् ।
स्वास्थ्ये ह्यदृष्टपूर्वाश्च कल्पयन्त्येव बन्धुताम् ॥ ३५ ॥

अर्थ :– हत्ती परत फिरल्यानंतर गुणमालेचा परिवार ''मी पुढे, मी पुढे'' अशा अहमहमिकेने गोळा होऊन गुणमालेजवळ आला. चांगल्या काळी ज्यांची पूर्वी कधीही दृष्टभेटही झालेली नाही असेही लोक बंधुत्वाचे नाते जोडतात.

अन्योऽन्यदर्शनादासीत्कामः कन्याकुमारयोः ।
दुःखस्यानन्तरं सौख्यं ततो दुःखं हि देहिनाम् ॥ ३६ ॥

अर्थ :– कन्या आणि कुमार या उभयतांनी परस्पराकडे पाहताच प्रेमभाव दोहोंनाही उत्पन्न झाला. दुःखानंतर सुख व सुखानंतर दुःख संसारात पाठपुरावा करतेच.

अशान्तस्वान्तसंतापा निशान्तं प्राप सा पुनः ।
नो चेद्विवेकनीरौघो रागाग्निः केन शाम्यति ॥ ३७ ॥

अर्थ :– गुणमालेच्या अंतःकरणातील प्रेमभावनेने तिचे हृदय शांत झाले नाही व ती अस्वस्थ चित्ताने घरी परत गेली. विवेकाचे जल नसेल तर रागाचा (प्रीतीचा) अग्नी कशाने शांत होणार ?

क्रीडाशुकं च प्राहैषीत्सविधे स्वामिनः पुनः ।
योग्यायोग्यविचारोऽयं रागान्धानां कुतो भवेत् ॥ ३८ ॥

अर्थ :– तिने पोपटास शिकवून व त्यासोबत एक पत्र देऊन जीवकाकडे पाठविले. प्रेमाने विव्हळणाऱ्यांना उचित-अनुचित विचार कसा असेल ?

चाटुं प्रायुङ्क्त कीरोऽपि तं पश्यन्स्वेष्टासिद्धये ।
एतादृशेन लिङ्गेन परलोको हि साध्यते ॥ ३९ ॥

अर्थ :– आपले इष्टकार्य सिद्ध व्हावे म्हणून तो पोपटही स्वामीस पाहून

श्लोकांक (३७) निशान्तं स्वमंदिरं अशान्तस्वान्तसंतापा - अशान्तः मनःसंतापः यस्याः सा (बहु०) । विवेकनीरौघः - विवेकजलप्रवाहः । नीरस्य अेघः नीरौघः विवेकः एव नीरौघः (कर्म०) (३८) क्रीडाशुकं - क्रीडायै शुकः तं । सविधे - समीपं । (३९) चाटुं - मधुरवचनम् ।



गोड गोड बोलू लागला. अशा गोड व मिष्ट भाषेनेच दुसरे लोक वश होतात.

विषयेषु समस्तेषु कामं सफलयन्सदा ।
गुणमालां जगन्मान्यां जीवयञ्जीवताच्चिरम् ॥ ४० ॥

अर्थ :– तो पोपट म्हणाला 'सर्वच संपूर्ण विषयामध्ये आपले मनोरथ पूर्णपणे सफल करीत जगतास मान्य अशा गुणमालेस कायम राखून तू चिरंजीव व्हावंस. म्हणजेच सर्वच पदार्थविषयक तुझे मनोरथ पूर्ण होवोत ! गुणांची मालिका अशीच सदैव कायम उज्वल राहो व तूं दीर्घायु व्हावंस अशा अर्थाचे पत्र पोपटाने कुमारास दिले. त्यांत श्लेषरूपाने गुणमालेचा आंतरिक अभिप्रायही सूचित झाला आहे.

इत्याशिषा कुमारोऽपि तत्संदेशाच्च पिप्रिये ।
इष्टस्थाने सती वृष्टिस्तुष्टये हि विशेषतः ॥ ४१ ॥

अर्थ :– अशा आशीर्वादाने आणि त्या संदेशाने जीवंधर कुमारही अत्यंत आनंदी झाला. इष्टस्थानी झालेली वर्षा विशेष आनंदास कारण होते.

प्रतिसन्देशमप्येष कीराय प्रत्यपादयत् ।
प्रेक्षावन्तो वितन्वन्ति न ह्युपेक्षामपेक्षिते ॥ ४२ ॥

अर्थ :– त्याचे उत्तर म्हणून आपला प्रतिसंदेशही रवाना केला. बुद्धीमान् पुरुष अपेक्षा करणाऱ्याची उपेक्षा कधीही करत नाहीत.

मुमुदे गुणमालापि दृष्ट्वा पत्रेण पत्रिणम् ।
स्वस्येव सफलो यत्नः प्रीतये हि विशेषतः ॥ ४३ ॥

अर्थ :– गुणमाला देखील पोपट पत्र घेवून परत येतो आहे हे पाहून प्रमुदित झाली. जर आपलाच प्रयास-प्रयोजन सफल झाले तर तो विशेष प्रीतीस कारण होतोच.

पितरावेतदाकर्ण्य मुमुदाते भृशं पुनः ।

श्लोकांक (४२) अपेक्षिते - इच्छिते वस्तुनि । प्रेक्षावन्तः - बुद्धिमंतः । (४३) पत्रिणं - शुकं । आमुष्यायणौ - सद्वंशोद्भवौ कुलीनौ ।

दुर्लभो हि वरो लोके योग्यो भाग्यसमन्वितः ॥ ४४ ॥

अर्थ :– आईबापही हे सर्व ऐकून अत्यंत आनंदित झालेत. कन्येला उत्कृष्ट भाग्यवान् वर मिळणे हे दुर्लभच असते. येथे तर वर घरी चालत आला आहे.

अथामुष्यायणौ कौचिन्नीतौ गन्धोत्कटाऽन्तिकम् ।
न हि नीचमनोवृत्तिरेकरूपा स्थिता भवेत् ॥ ४५ ॥

अर्थ :– कोणी दोघेही जीवंधराबाबत द्वेष बाळगणारे गंधोत्कट श्रेष्ठीकडे जाऊन चुगली केली. हलकटांची मनोवृत्ती कधीही स्थिर नसते. येनकेन प्रकारे वाईट केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही.

अनुमेने तयोर्वाक्यं श्रुत्वा गन्धोत्कटोऽपि सः ।
अदोषोपहतोऽप्यर्थः परोक्त्या नैव दूष्यते ॥ ४६ ॥

अर्थ :– कुत्सित बुद्धीने केलेले त्यांचे भाषण ऐकून गंधोत्कटाने तिकडे दुर्लक्ष केले. त्याने उभयताच्या विवाहास संमतीच दिली. जर अभिप्राय स्वभावतःच निर्मल असेल तर दुसऱ्याच्या सांगण्याने मलीन होत नाही.

सुतां विनयमालाया गुणमालां यथाविधि ।
दत्तां कुबेरमित्रेण परिणिन्येऽथ जीवकः ॥ ४७ ॥

अर्थ :– याप्रमाणे जीवंधर कुमाराने विनयमालाची मुलगी आणि कुबेरदत्तमित्राने दिलेल्या गुणमालेसह यथाविधी विवाह केला.

इति श्रीमद् वादीभसिंहसूरि-विरचिते क्षत्रचूडामणौ
गुणमालालम्भो नाम चतुर्थो लम्बः ।
याप्रमाणे वादीभसिंहसूरीविरचित क्षत्रचूडामणिमध्ये गुणमालेसह विवाहाचे वर्णन करणारा चौथा लंब समाप्त झाला.

---

श्लोकांक (४६) अदोषोपहतो - दाषः अबाधितः । अदोषेन उपहतः (तृ० त०)

## पंचम लंब

अथ व्यूढामिमां मेने स कुमारोऽतिदुर्लभाम् ।
प्रयत्नेन हि लब्धं स्यात्प्रायः स्नेहस्य कारणम् ॥ १ ॥

अर्थ :– याप्रकारे गुणमालेशी विवाह झाल्यानंतर कुमार जीवंधरास अत्यंत दुर्लभ वस्तूची प्राप्ती झाल्यासारखे वाटले. प्रयत्नाने मिळालेली वस्तू विशेष स्नेहाचे कारण असते.

नादत्त कवलं दन्ती स्वामिकुण्डलताडितः ।
न हि सोढव्यतां याति तिरश्चां वा तिरस्कृतिः ॥ २ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराने आपल्या कंकणाने ज्या हत्तीस परतविले होते त्याने गवत खाणे सोडले. तिर्यंचांनाही अपमानाचे शल्य सहन होत नाही.

काष्ठांङ्गारस्तदाकर्ण्य चुकोप स्वामिने भृशम् ।
सर्पिष्पातेन सप्तार्चिरुदर्चिः सुतरां भवेत् ॥ ३ ॥

अर्थ :– हे ऐकून काष्ठांगार स्वामीवर खूपच कोपला. अग्नीमध्ये तूप टाकल्याने अग्नी हा वाढतच असतो.

सङ्गादनङ्गमालाया विजयाच्च वनौकसाम् ।
वीणाविजयतश्चास्य कोपाग्निः स्थापितो हृदि ॥ ४ ॥

अर्थ :– अनंगमालेची प्राप्ती, भिल्लावर मिळविलेला विजय, वीणावादनांतील विजयामुळे आधीच अंतर्यामी क्रोध होताच.

गुणाधिक्यं च जीवानामाधेरेव हि कारणम् ।
नीचत्वं नाम किं नु स्यादस्ति चेद्गुणरागिता ॥ ५ ॥

अर्थ :– गुणांची अधिकता हेही मत्सरी जीवांना मानसिक व्यथेचे कारण असते. जर गुणानुराग असेल तर तेथे नीचपणा खरोखर असू शकेल कां ? अर्थात नाही.

---

श्लोकांक (३) सर्पिष्पोन - घृतसिंचनेन । सप्तार्चिः - अग्निः । उदर्चिः - प्रज्वलितः ।

उपकारोऽपि नीचानामपकाराय कल्पते ।
पन्नगेन पयः पीतं विषस्यैव हि वर्धनम् ॥ ६ ॥

अर्थ :– नीच पुरुषावर केलेला उपकारही त्यास अपकारच वाटतो. साप दूध प्याला तरी त्यामुळे विषच वाढणार !

हस्तग्राहं ग्रहीतुं स कुमारं प्राहिणोद्बलम् ।
मूढानां हन्त कोपाग्निरस्थानेऽपि हि वर्धते ॥ ७ ॥

अर्थ :– त्याने कुमारास पकडून आणण्यासाठी सैन्य पाठविले. मूर्खाचा क्रोधाग्नी अस्थानीच वाढत असतो. जेथे क्रोध करणे इष्ट नसते तेथेही प्रकोपच होतो.

कुमारावसथं पश्चात्तत्सैन्यं पर्यवारयत् ।
मृगाः किं नाम कुर्वन्ति मृगेन्द्रं परितः स्थिताः ॥ ८ ॥

अर्थ :– त्या सैन्याने जीवंधर कुमाराच्या घराभोवती चारही बाजूस वेढा दिला. सिंहाच्या भोवती असलेला हरणाचा वेढा काय करू शकतो ?

प्रारेभे स कुमारोऽपि प्रहर्तुं रोषतश्चमुम् ।
तत्वज्ञानजलं नो चेत् क्रोधाग्निः केन शाम्यति ॥ ९ ॥

अर्थ :– कुमार कोपाविष्ट होऊन त्याने सैन्य पिटाळण्यास प्रारंभ केला. जर तत्त्वज्ञानरूपी जल नसेल तर कोपरूपी अग्नी कशाने शांत होणार ?

न्यरौत्सीत्तस्य संनाहमथ गंधोत्कटः शनैः ।
अलंघ्यं हि पितुर्वाक्यमपत्यैः पथ्यकाङ्क्षिभिः ॥ १० ॥

१०. गंधोत्कटाने जीवंधर कुमारास हळूवार समजावून सांगून 'युद्धापासून परावृत्त केले. कुमाराने त्याची आज्ञा मान्य केली. हित अपेक्षिणाऱ्या मुलाकडून पिताच्या आज्ञेचे उल्लंघन कधीही होत नाही.

---

श्लोकांक (६) पन्नगः - सर्पः (७) हस्तग्राहं ग्रहीतुं - करबद्धं कृत्वा धृत्वानयनार्थं । बलं - सैन्यं । (८) कुमारावसथं - स्वामिनः वसतिगृहम् । पर्यवारयत् - वेष्ठितवान् । (१०) न्यरौत्सीत् - न्यवारयत् ।



पश्चाद्बद्धममुं पश्चादसौ गंधोत्कटो व्यधात् ।
न हि वारयितुं शक्यं पौरुषेण पुराकृतम् ॥ ११ ॥

अर्थ :– तदनंतर गंधोत्कटाने कुमारास मुसक्या बांधून काष्ठांगाराचे स्वाधीन केले. पूर्वोपार्जित पाप कर्माचे फळ पुरुषार्थाने निवारण करता येत नाही.

दृष्ट्वापि तं तथाभूतं हन्तुमाह स दुर्मतिः ।
सतां हि प्रह्वता शांत्यै खलानां दर्पकारणम् ॥ १२ ॥

अर्थ :– कुमारास अशा अवस्थेत मारावे अशी आज्ञा काष्ठांगाराने दिली. शांतिसाठी सज्जनाची नम्रता पाहून दुर्जनास अधिकच गर्व चढतो.

काष्ठाङ्गारं कुमारोऽयं गुरुवाक्येन नावधीत् ।
न हि प्राणवियोगेऽपि प्राज्ञैलंघ्यं गुरोर्वचः ॥ १३ ॥

अर्थ :– कुमाराने मारण्याचे सामर्थ्य असूनही गुरू-आज्ञेचे स्मरण करून मारले नाही. प्राणांचा वियोग संभवत असतांनाही विवेकी गुरूच्या आज्ञेचे उल्लंघन करत नाही.

यक्षेण तत्क्षणे स्वामी स्मृतेनादायि कृत्यवित् ।
सचेतनः कथं नु स्यादकुर्वन्प्रत्युपक्रियाम् ॥ १४ ॥

अर्थ :– समयसूचक जीवंधर कुमाराने याचवेळी यक्षाचे स्मरण केल्यामुळे तेव्हा यक्षाने येवून स्वामीस उचलून नेले. ज्यास उपकाराबाबत कृतज्ञता आहे असा सचेतन प्राणी प्रत्युपकार केल्याशिवाय कसा राहील ?

अतिमात्रशुचा लोकः पुनरेवमचिंतयत् ।
गुणज्ञो लोक इत्येषा किंवदन्ती हि सूनृतम् ॥ १५ ॥

अर्थ :– हे ऐकून लोकही शोकाकुल झालेत व पुढीलप्रमाणे विचार करू लागले. सामान्यजन गुणाची कदर करतात ही किंवदन्ति नितांत खरी आहे.

---

श्लोकांक (११) पश्चात् - पृष्ठतः । पश्चात् - अनंतरम् । (१२) प्रव्हता - नम्रता, विनयशीलता । (१५) किंवदन्ती जनश्रुतिः, लोकवादः ।

अतिलोकमिदं शाठ्यं काष्ठाङ्गारस्य दुर्मतेः ।
एतावदेव किं शाठ्यं स्वामिद्रोहादबिभ्यतः ॥ १६ ॥

अर्थ :– ''दुर्बुद्धि काष्ठांगाराचे हे कृत्य अत्यंत विश्वासघातकीपणाचे आहे. परंतु ज्याने आश्रय दिला अशा सत्यंधराचा द्रोह करण्यासही ज्याने मागेपुढे पाहिले नाही, त्यास हे कृत्य नीचपणाचे आहे हे कसे पटणार ?

समवर्त्यपि दुर्वृत्तिरासीदणकभूपवत् ।
न ह्यसारतया हन्त सोऽपि गृण्हाति दुर्जनान् ॥ १७ ॥

अर्थ :– ''अरेरे ! अत्यंत निष्पक्ष म्हणणारा यम सुद्धा एखाद्या जबाबदार उद्दंड राजाप्रमाणे दुराचारी झाला ! मोठ्या खेदाने म्हणावे लागते की समदर्शी यमही निःसारभूत जाणून दुर्जनाचा बळी घेत नाही. तो काष्ठांगारास सोडून जीवंधर कुमारास उचलतो.

वारि हंस इव क्षीरं सारं गृण्हाति सज्जनः ।
यथाश्रुतं यथारुच्यं शोच्यानां हि कृतिर्मता ॥ १८ ॥

अर्थ :– ''ज्याप्रमाणे हंस पाण्यातही दुधास सारभूत समजून दूध तेवढे वेगळे करतो त्याप्रमाणे सज्जन योग्य पदार्थाचा स्वीकार करतात. नीच पुरुष मात्र आवड व ऐकिवावर भरोसा ठेवून तदनुकूल व्यवहार करतात.

हेत्वन्तरकृतोपेक्षे गुणदोषप्रवर्तिते ।
स्यातामादानहाने चेत्तद्धि सौजन्यलक्षणम् ॥ १९ ॥

अर्थ :– ''अन्य कारणांची अपेक्षा न राखता गुणाकडील ओढ आणि तदनुसार प्रवृत्ती तसेच दोषास हेय जाणून त्याचा त्याग करण्याची वृत्ती हे सज्जनाचे लक्षण आहे. गुणग्रहण व दोष सोडणे हेच तर सौजन्याचे लक्षण आहे.

युक्तायुक्तवितर्केऽपि तर्करूढविधावपि ।
पराङ्मुखात्फलं किं वा वैदुष्याद्वैभवादपि ॥ २० ॥

अर्थ :– ''योग्य आणि अयोग्य याचा पूर्ण निर्णय करून तर्काने निश्चित

---

श्लोकांक (१६) अतिलोकं - लोकमात्रं अतिक्रम्य । (१७) समवर्तिः - यमः, कृतान्तः । अणकभूपवत् - स्वच्छन्दवृत्तिभूपतिवत्, उद्दण्डनृपतिवद्व ।



अशा गोष्टीपासूनही जर विद्वान् व ऐश्वर्यसंपन्न परावृत्त होतील तर ती विद्वत्ता आणि ऐश्वर्य काय कामाचे ?''

इत्यूहादाधिमापन्ने लोके तेऽपि युयुत्सवः ।
सखायः सानुजाः सर्वे पश्चात्तापमुपागमन् ॥ २१ ॥

अर्थ :– याप्रमाणे सर्व लोक मानसिक चिंतेने विचार करत असता युद्धोत्सुक बंधुसह मित्रही या सर्वांनाच अत्यंत पश्चात्ताप झाला.

स्मरन्तौ मुनिवाक्यस्य सप्राणौ पितरौ स्थितौ ।
वितथे मुनिवाक्येऽपि प्रामाण्यं वचने कुतः ॥ २२ ॥

अर्थ :– परंतु गंधोत्कट व त्याची पत्नी यांनी मुनीवाक्यावर विश्वास ठेवून जीव मुठीत धरून ते शांत राहिले. मुनीचे वचन जर वितथा (खोटे) होईल तर कोणत्या वचनामध्ये प्रमाणता कोठून येईल ?

स्वामिनो न विषादो वा प्रसादो वा तदाऽभवत् ।
किन्तु पूर्वकृतं कर्म भोक्तव्यमिति मानसम् ॥ २३ ॥

अर्थ :– स्वामींना मात्र न विषाद होता न प्रसाद होता. परंतु पूर्व कर्माचे फल भोगलेच पाहिजे एवढा मात्र विश्वास होता.

अथ चंद्रोदयाव्हानपर्वतस्थं स्वमंदिरम् ।
यक्षेन्द्रः स्वामिनं नीत्वा कृतवानभिषेचनम् ॥ २४ ॥

अर्थ :– इकडे त्या यक्षेन्द्राने जीवकास चंद्रोदयनामक पर्वतावरील आपल्या निवासस्थानी नेले व तेथे त्याचा अभिषेकपूर्वक सन्मान केला.

विपद्य संपदे पुण्यात्किमन्यत्तत्र गण्यते ।
भानुर्लोकं तपन्कुर्याद्विकासश्रियमम्बुजे ॥ २५ ॥

अर्थ :– फार काय ? अहो विपत्ती देखील संपत्तीप्रमाणे होते. हा पुण्याचा प्रभाव आहे. तर दुसरे काय मोजावे ? किरणांनी लोकास संतप्त करणारा सूर्य कमलांना तर फुलवितो.

---

श्लोकांक (२१) युयुत्सवः - योद्धुं इच्छुकाः (२२) वितथे - अलीके सती, अतथ्ये सति ।

पयोवार्धिपयःपूरैःरभिषिच्यायमब्रवीत् ।
पवित्रोऽसि पवित्रं मां श्वानं यत्कृतवानिति ॥ २६ ॥

अर्थ :– सागरजलाने त्याचा अभिषेक करून यक्षेन्द्र म्हणाला - ''तूं मला कुत्र्याच्या योनीतून देव बनविलेस, पवित्र बनविलेस ! तूं पावन आहेस !''

कामरूपविधौ गाने विषहाने च शक्तिमत् ।
यक्षेन्द्रः स्वामिने पश्चान्मन्त्रत्रयमुपादिशत् ॥ २७ ॥

अर्थ :– यक्षेन्द्राने इच्छेनुसार रूप घेता यावे, छान गाता यावे व विषबाधा दूर करता यावी म्हणून तीन सामर्थ्यसंपन्न मंत्र स्वामीस सांगितले.

एकहायन मात्रेण धुरि राज्ञां प्रवेक्ष्यसि ।
मोक्षस्यैव पवित्र त्वं पश्चादिति च सोऽब्रवीत् ॥ २८ ॥

अर्थ :– ''हे पवित्र आत्मन् ! फक्त एकच वर्षाने तू राजेलोकात प्रमुख पद धारण करशील. तसेच कांही काळानंतर मोक्ष प्राप्त करशील, असे तो कुमारास म्हणाला.

तथा संभाव्यमानस्य स्वामिनस्तेन सन्ततम् ।
देशान्तरदिदृक्षाभूद्भाव्यधीनं हि मानसम् ॥ २९ ॥

अर्थ :– याप्रमाणे यक्षेन्द्राकडून वारंवार संमानीत होत असताना कुमारास अन्य देश पाहण्याची इच्छा झाली. पुढील भवितव्यानुसार घटना घडत जातात हेच खरे.

मनीषितं हितान्वेषी ज्ञात्वा तस्य मनीषिणः ।
अनुमेने स देवोऽपि त्रिकालज्ञा हि निर्जराः ॥ ३० ॥

अर्थ :– याप्रमाणे मनीषी जीवंधराची इच्छा जाणून हित इच्छिणाऱ्या यक्षेन्द्राने त्यास जाण्यास अनुमती दिली. देवांना अवधिज्ञानामुळे तिन्ही काळाचे ज्ञान असते.

इदंतया पथोदन्तमुपादिश्याथ संमतः ।

---

श्लोकांक (२७) कामरूपविधौ - इच्छितरूपनिर्माणे । (२८) हायनः - अद्बः, संवत्सरं । (२९) दिदृक्षा - द्रष्टुं इच्छा । (३०) मनीषितं - समीहितं । निर्जराः - अमराः । (३१) पथोदन्तं - मार्गवृत्तान्तम् ।



सुदर्शनेन सोऽयासीद्धितकृत्त्वं हि मित्रता ॥ ३१ ॥

अर्थ :– मार्गाबाबत माहिती त्यास मिळाल्यानंतर कुमाराने सुदर्शन यक्षेन्द्राची अनुमती मिळविली व पुढे प्रस्थान केले. हितास जपणारी मित्रताच खरी मित्रता आहे.

एकाकी व्यहरत्स्वामी निर्भयोऽयमितस्ततः ।
न हि स्ववीर्यगुप्तानां भीतिः केसरिणामिव ॥ ३२ ॥

अर्थ :– जीवंधर स्वामीनी एकाकी निर्भयपणाने इतस्ततः विहार केला. स्वतःच्या सामर्थ्यावर ज्याची भिस्त आहे त्यास सिंहाप्रमाणे कोणतीच भीती शिवत नाही.

एकाकिनोऽपि नोद्वेगो वशिनस्तस्य जातुचित् ।
विक्रिया हि विमूढानां संपदापल्लवादपि ॥ ३३ ॥

अर्थ :– स्वामी एकाकी विहार करत असतांना त्यांना यत्किंचितही उदासीनता जाणवली नाही. मूर्ख लोकांनाच अल्प वैभव अथवा छोटी संकटे आली असताना विकार उत्पन्न होतात; निग्रही पुरुषांना अजिबात होत नाहीत.

अरण्ये क्वचिदालोक्य वनदावेन वारितान् ।
दह्यमानानसौ मह्यस्त्रातुमैच्छदनेकपान् ॥ ३४ ॥

अर्थ :– एकदा फिरत असताना एके ठिकाणी अरण्यामध्ये असणाऱ्या हत्तीच्या कळपाभोवती सर्व बाजूला वणवा पेटलेला पाहून हत्तींचे रक्षण करावे असा स्वामींना भाव झाला.

धर्मो नाम कृपामूलः सा तु जीवानुकंपनम् ।
अशरण्यशरण्यत्वमतो धार्मिकलक्षणम् ॥ ३५ ॥

अर्थ :– धर्माचे मूल दया आहे व दया म्हणजे प्राणीमात्राबाबत अनुकंपा. बरोबरच आहे अशरणांना शरण्यत्व हे धार्मिकाचे खास लक्षण आहे.

---

श्लोकांक (३३) उद्वेगः - मनस्तापः, चित्तव्यथा । (३४) वारितान् - परिवोष्ठितान् । मह्यः - पूज्यः । अनेकपान् - गजान्, नागान्

वव्रृषुर्वारिदास्तत्र तावतैव सगर्जिताः ।
सुकृतीनामहो वाञ्छा सफलैव हि जायते ॥ ३६ ॥

अर्थ :– कुमाराच्या मनात असे विचार येताक्षणीच मेघगर्जना होऊन पर्जन्यवृष्टी पण झाली. अहो पुण्यात्म्याची भावना सफल होतेच !

अनेकपानसौ वीक्ष्य रक्षितानतृपत्तराम् ।
स्वयं त्वासीत्समः स्वामी स्वस्य बन्धविमोक्षयोः ॥ ३७ ॥

अर्थ :– हत्तीवरील संकट दूर झालेले पाहून कुमारास खूप आनंद झाला. बंधनात असो वा बंधनमुक्त असो त्यांचा मनाचा तोल कधीही ढळला नाही. अर्थात् त्यांना हर्षविषाद झाला नाही.

संपदापद्द्वये स्वेषां समभावा हि सज्जनाः ।
परेषां तु प्रसन्नाश्च विपन्नाश्च निसर्गतः ॥ ३८ ॥

अर्थ :– धैर्यवान् धार्मिक पुरुष आपल्या संपत्ती व आपत्तीचे प्रसंगी सदैव मनाची समता ढळूं देत नाहीत. परंतु दुसऱ्याचे दुःखाने मात्र ते स्वभावतःच दुःखी होतात व त्यांचे सुखाने मात्र सुखी होतात. याप्रमाणे सज्जनता व दुर्जनता पूज्य-अपूज्य व्यक्तीच्या संसर्गाने दिसून येते.

ततस्तस्माद्विनिर्गत्य तीर्थस्थानान्यपूजयत् ।
सदसत्वं हि वस्तूनां संसर्गादेव दृश्यते ॥ ३९ ॥

अर्थ :– तदनंतर तेथून निघून कुमार तीर्थस्थानांची वंदना करत गेला. वस्तूमध्ये चांगलेपणा, वाईटपणा हा संसर्गाने दिसून येतो.

अथ संभावयामास यक्षी सा धर्मरक्षिणी ।
धर्ममूर्तिममुं तत्र सम्यक्कशिपुदानतः ॥ ४० ॥

अर्थ :– त्याठिकाणी असणाऱ्या धर्मप्रेमी यक्षिणीने साक्षात् धर्ममूर्ती कुमारास उत्तम वस्त्रे व आहार देऊन सत्कार केला.

दैवतेनापि पूज्यन्ते धार्मिकाः किं पुनः परैः ।

श्लोकांक (४०) संभावयामास - संमानयामास । सत्कारं अकरोत् । कशिपु - अन्नवस्त्रं ।



अतो धर्मरताः सन्तु शर्मणे स्पृहयालयः ॥ ४१ ॥

अर्थ :– धार्मिक व्यक्ती दैवताकडून पूजिले जातात. इतरांकडून ते पूजनीय का असणार नाहीत ? म्हणून सुखप्राप्तीस्तव दक्षचित्त श्रावकांनी धर्मात सावधान असावे.

ततः पल्लवदेशस्थां चंद्राभाख्यां क्रमात्पुरीम् ।
भेजे शुभनिमित्तेन सनिमित्ता हि भाविनः ॥ ४२ ॥

अर्थ :– याप्रमाणे जीवंधरकुमार फिरत फिरत शुभ निमित्ताने पल्लव देशातील चंद्राभा नामक नगरीत आले. कोणत्याही घटना भविष्य कालाच्या अनुसारच होत असतात.

राज्ञो धनपतेः पुत्रीमहिदष्टामजीवयत् ।
निर्हेतुकान्यरक्षा हि सतां नैसर्गिको गुणः ॥ ४३ ॥

अर्थ :– त्या नगरीचा राजा धनपती नावाचा असून त्याच्या मुलीत सर्पदंश झाला असताना तिचे प्राण जीवकाने वाचविले. परतफेडीची आशा न राखतां दुसऱ्याच्या अडचणी दूर करून त्यांची रक्षा करणे ही थोरांची नैसर्गिक वृत्ती असते.

लोकपालस्तदालोक्य तज्ज्येष्ठस्तमपूजयत् ।
प्राणप्रदायिनामन्या न ह्यस्ति प्रत्युपक्रिया ॥ ४४ ।

अर्थ :– बहिणीचे प्राण वाचविलेले पाहून मोठा भाऊ धनपालाने जीवंधरांचा खूप खूप सत्कार केला. प्राण वाचविण्याच्या उपकाराचा मोबदला सत्कारच असू शकतो. दुसरा नाही.

पूज्या अपि स्वयं सन्तः सज्जनानां हि पूजकाः ।
पूज्यत्वं नाम किं नु स्यात्पूज्यपूजाव्यतिक्रमे ॥ ४५ ॥

अर्थ :– श्रेष्ठ पुरूष स्वतः आदरणीय असले तरीही दुसऱ्या श्रेष्ठ पुरुषांचा सन्मान करण्यात कधीही चुकत नाहीत, जर पूज्याच्या पूजेचा व्यतिक्रम होईल तर पूज्यत्व ते कसले ?

श्लोकांक (४२) भेजे - जगाम (४३) निर्हेतुका - अकारणा; निर्निमित्ता; निष्कारणा । (४५) व्यतिक्रमे - उल्लंघने । उल्लंघमाणे सति । उल्लंघयति सति ।

प्राज्ञेषु प्रह्वतावश्यमात्मवश्योचिता मता ।
प्रव्हतापि धनुष्काणां कार्मुकस्येव कामदा ॥ ४६ ॥

अर्थ :– **सूज्ञांनी सदैव विनय गुणाची पालना अवश्य करावी. धनुष्याच्या कार्मुकाची नम्रता देखील आपले सर्व मनोरथ पूर्ण करते.**

वपुर्वीक्षणमात्रेण निरणाय्यस्य वैभवम् ।
वपुर्वक्ति हि माहात्म्यं दौरात्म्यमपि तद्विदाम् ॥ ४७ ॥

अर्थ :– **कुमाराची देहयष्टी पाहताक्षणीच हा कुमार वैभवशाली आहे असे जाणले. एखाद्याचा चेहरा पाहता क्षणीच हा सज्जन की दुर्जन हे चेहराच निपुणांना सांगतो.**

अर्धराज्यं च कन्यां च पार्थिवः स्वामिने ददौ ।
पात्रतां नीतमात्मानं स्वयं यान्ति हि संपदः ॥ ४८ ॥

अर्थ :– **यानंतर धनपती राजाने आपली कन्या पद्मावती आणि अर्धे राज्य जीवंधरास दिले. स्वयं पात्रता प्राप्त करणाऱ्याचे मागे लक्ष्मी स्वतःहून धावत असते.**

तिलोत्तमासुतां पश्चाल्लोकपालसमर्पिताम् ।
पर्यणैषीत्पवित्रोऽयं पद्माख्यां तां यवीयसीम् ॥ ४९ ॥

अर्थ :– **त्यानंतर पवित्र जीवंधर स्वामीने, लोकपाल राजाकडून दिल्या गेलेली व तिलोत्तमाची पुत्री पद्मावती नामक कन्येशी विवाह केला.**

**इति श्रीमद् वादीभसिंहसुरि-विरचिते क्षत्रचूडामणौ**
**पद्मालम्भो नाम पञ्चमो लम्बः ।**
**याप्रमाणे वादीभसिंहसूरीविरचित क्षत्रचूडामणि मध्ये पद्मावतीशी विवाहाचे वर्णन करणारा पाचवा लंब समाप्त झाला.**

श्लोकांक (४६) धनुष्काणां - धनुर्धारिणां । कार्मुकं - धनुः । शरासनं । कोदंडं । (४७) दौरात्म्यं - दुष्टता; दौर्जन्यं । (४९) पर्यणैषीत् - पाणिग्रहणं कृतवान् ।

## षष्ठं लंब

अथोपयम्य पद्मां तां रमयन्नप्ययात्ततः ।
असक्तो हि सुखं भुङ्क्ते कृतार्थोऽपि जनः कृती ॥ १ ॥

अर्थ :– **स्वामी पद्माशी विवाह करून तेथे रममाण झाले. तथापि एकेदिवशी ते तेथूनही निघाले. कृतार्थ पुण्यशाली पुरुष अनासक्तपणे संसारातील सुखे भोगतो.**

पद्मा तु तद्वियोगेन दुःखसागरसादभूत् ।
तत्वज्ञानविहीनानां दुःखमेव हि शाश्वतम् ॥ २ ॥

अर्थ :– **पद्मा मात्र त्यांच्या वियोगाने अत्यंत दुःखी होऊन दुःखसागरात डुंबून गेली. ज्यांना तत्त्वज्ञानाची प्राप्ती नाही त्यांना शाश्वत दुःखच असते.**

लोकपालजनैर्नायं रोद्धुं शेके गवेषिभिः ।
प्रतिहन्तुं न हि प्राज्ञैः प्रारब्धं पार्यते परैः ॥ ३ ॥

अर्थ :– **शोध घेणाऱ्या लोकपाल राजाच्या चाकराकरवी सुद्धा तो रोकल्या जाऊ शकला नाही. अन्य प्राज्ञ लोक प्रारब्ध बदलण्याचा रोकण्याचा यत्न करत नाहीत. त्यांना रोकणे कोणासही शक्य नाही.**

सत्वरं गत्वरः स्वामी तीर्थस्थानान्यपूजयत् ।
पावनानि हि जायन्ते स्थानान्यपि सदाश्रयात् ॥ ४ ॥

अर्थ :– **लगबग लगबग जाणारा कुमार तीर्थस्थानांची पूजा व दर्शन करत गेला. धर्मात्म्याच्या संपर्काने स्थाने ही पावन होतात.**

सद्भिरध्युषिता धात्री संपूज्येति किमद्भुतम् ।
कालायसं हि कल्याणं कल्पते रसयोगतः ॥ ५ ॥

श्लोकांक (१) उपयम्य - विवाहं कृत्वा । असक्तः - अनासक्तः । कृति - कृतकृत्यः, पुण्यवान् । (२) दुःखसागरसात् - दुःखसागराधीना । (३) गवेषिभिः - अन्वेषिभिः । (४) गत्वरः - गमनशीलः । सदाश्रयात् - सत्पुरुषाश्रितत्वत् । (५) अध्युषिता - कृताधिवासा । धात्री - पृथ्वी । कालायसं - लोहः । कल्याणं - सुवर्णं । रसयोगतः - रसायन संसर्गात्

अर्थ :– सज्जनांनी स्पर्शित भूमी त्यांच्या निवासाने पावन-पूज्य होते यात काय आश्चर्य ! रसायनाच्या संपर्काने लोखंडाचेही सोने होते.

सदसत्संगमादेव सदसत्वे नृणामपि ।
तस्मात्सत्संगताः सन्तु सन्तो दुर्जनदूरगाः ॥ ६ ॥

अर्थ :– सज्जन-दुर्जनाच्या संगतीने मानव प्राणी सज्जन दुर्जन होतात. म्हणून सर्वांनी सज्जनाची संगति करून दुर्जनापासून दूर राहावे.

याजंयाजमटन्नेव तीर्थस्थानानि जीवकः ।
क्रमेणारण्यमध्यस्थं तापसाश्रममाश्रयत् ॥ ७ ॥

अर्थ :– वाटेत येणारे तीर्थ व जिनप्रतिमेचे पूजन करत करत क्रमशः कुमार एका तापसाश्रमास पोचले.

असत्तपो विलोक्यासीदनुकम्पी तपस्विनाम् ।
निर्व्याजं सानुकम्पा हि सार्वाः सर्वेषु जन्तुषु ॥ ८ ॥

अर्थ :– ते तप मिथ्यातप होते. त्यात लीन तपस्वींना पाहून जीवकास करुणा उत्पन्न झाली. सर्वहितेच्छु जीवांची सर्वच प्राणिमात्रामध्ये निर्व्याज अनुकंपा असते.

अतत्वज्ञेऽपि तत्वज्ञैर्भवितव्यं दयालुभिः ।
कूपे पिपतिषुर्बालो न हि केनाप्युपेक्ष्यते ॥ ९ ॥

अर्थ :– तत्त्वज्ञाने सुद्धा अतत्त्वज्ञ जीवामध्ये करुणाच ठेवावी. कोणी बाल विहीरीत पडत असेल तर कोणीही त्याची उपेक्षा करून दुर्लक्ष करू नये.

तानप्यबूबुधत्तत्वं तत्वज्ञः सोऽयमादरात् ।
भव्यो वा स्यान्न श्रोता पारार्थ्यं हि सतां मनः ॥ १० ॥

अर्थ :– तत्त्वज्ञ जीवकाने त्या खोट्या तापसांना तत्त्वज्ञानाचा उपदेश दिला. श्रोता भव्य असो वा नसो सज्जनाचे मन सर्व प्राण्यांचे हितच इच्छिते.

---

श्लोकांक (८) निर्व्याजं - निरपेक्षं । निष्कपटं । सार्वाः - सर्वस्मै हिताः । (९) पिपतिषुः - पतितुं इच्छुकः । (१०) पारार्थ्यं - परार्थे-परहिताय प्रवृत्तं ।



न हिंस्यात्सर्वभूतानीत्यस्मिन्प्रवचने सति ।
तप्यध्वं किं बुधा यूयं हिंसामात्रफलं तपः ॥ ११ ॥

अर्थ :– ''कोणत्याही जीवमात्राची हिंसा करू नये'' असे जिनप्रवचनात सांगितले असतांना सुद्धा ज्यामध्ये हिंसा मात्र फल दिसून येते असे तप आपण कां आचरता ?

जलावगाहने लग्नाञ्जटायां काष्ठगानपि ।
नश्यतः पश्यतां जन्तून्पश्यताग्नौ पुनश्च्युतान् ॥ १२ ॥

अर्थ :– पाण्यामध्ये अवगाहन करताना जटेला बिलगलेले तसेच त्या लाकडामध्ये असलले जीव हे नाश पावत आहेत. हे प्रत्यक्ष दिसूनही आपण असे तप कां आचरता ?

पञ्चाग्निमध्यमस्थानं ततो नैवोचितं तपः ।
जन्तुमारणहेतुत्वादाजवञ्जवकारणम् ॥ १३ ॥

अर्थ :– पंचाग्निसाधन तप हे योग्य तप नव्हे. कारण ते जंतुंना मारण्याचे कारण आहे. म्हणूनच ते संसारात भटकण्याचे कारण आहे.

तत्तपो यत्र जन्तूनां संतापो नैव जातुचित् ।
तच्चारम्भा निवृत्तौ स्यान्नह्यारंभो विहिंसनः ॥ १४ ॥

अर्थ :– जेथे जीवांची हिंसा मुळीच नाही तेच तप आहे. त्यासाठी आरंभापासून निवृत्त झाले असतांना (निर्ग्रंथ साधूंनाच) ते होऊ शकते. कारण आरंभ हिंसेने रहित असत नाही.

आरम्भविनिवृत्तिश्च निर्ग्रन्थेष्वेव जायते ।
न हि कार्यपराचीनैर्मृग्यते भुवि कारणम् ॥ १५ ॥

अर्थ :– आरंभापासून निवृत्ति निर्गंथ साधूमध्येच असते. ज्यांना कार्याची (संसाराची) आसक्ति नाही ते संसारकारणाच्या मागे कसे लागतील ?

---

श्लोकांक (१३) आजवञ्जवकारणं - संसारकारणं । (१४) विहिंसनः - हिंसारहितः (१५) पराचीनैः - पराङ्मुखैः ।

नैर्ग्रन्थ्यं हि तपोऽन्यत्तु संसारस्यैव साधनम् ।
मुमुक्षूणां हि कायोऽपि हेयः किं परं पुनः ॥ १६ ॥

अर्थ :–परिग्रहाचा त्याग असेल तरच खरे तप संभवनीय आहे. अन्य तप तर संताराचेच कारण आहे. मुमुक्षूंना तर देह ही हेय असतो. तर परिग्रहाचे प्रयोजनच काय ?

ग्रंथानुबन्धी संसारस्तेनैव न परिक्षयी ।
रक्तेन दूषितं वस्त्रं न हि रक्तेन शुध्यति ॥ १७ ॥

अर्थ :–संसाराचा परिग्रहाशी नियमाने अनुबंध (संबंध) असतो. त्या परिग्रहाने संसाराचा नाश कसा होणार ? रक्ताने दूषित वस्त्र रक्ताने शुद्ध होत नाही.

तत्वज्ञानविहीनानां नैर्ग्रंथ्यमपि निष्फलम् ।
न हि स्थाल्यादिभिः साध्यमन्नमन्यैरतण्डुलैः ॥ १८ ॥

अर्थ :–जर दिगंबरत्व असून तत्त्वज्ञान नसेल तर त्यांचे आकिंचन्य, (नैर्गन्थ्य) निष्परिग्रहत्वही निष्फल आहे. तांदुळाशिवाय अन्य तपेले गंज आदि सामग्रीने अन्न, स्वयंपाक कसा होणार ?

तत्वज्ञानं च जीवादितत्त्वयाथात्म्यनिश्चयः ।
अन्यथाधीस्तु लोकेऽस्मिन्मिथ्याज्ञानं हि कथ्यते ॥ १९ ॥

अर्थ :–जीवादि तत्त्वार्थांचा यथार्थ निर्णय हेच तर तत्त्वज्ञान आहे. अन्य सर्व हे विपरीत बुद्धि म्हणजे सात तत्त्वांचा निर्णय न होणे हे मिथ्याज्ञान आहे.

आप्तागमपदार्थाख्यतत्ववेदनतद्रुची ।
वृत्तं च तद्द्वयस्यात्मन्यस्खलद्वृत्तिधारणम् ॥ २० ॥
इति त्रयी तु मार्गः स्यादपवर्गस्य कारणम् ।
बाह्यमन्यत्तपः सर्वं तत्रयस्यैव साधनम् ॥ २१ ॥

अर्थ :–खरा देव, खरे शास्त्र व नवपदार्थ यांच्या स्वरूपाचा यथार्थ निर्णय

---

श्लोकांक (१७) तेनैव - ग्रंथेनैव । ग्रंथानुबंधी - रागादिदोषानुवर्ती ग्रंथं अनुबध्नातीति (उ० त०) (१९) अन्यथाधीः - जीवादितत्वविपरीतनिश्चयः । मिथ्याबुद्धिः । (२०) आप्तागम-पदार्थाख्यतत्ववेदनतद्रुची - आप्तश्च आगमश्च पदार्थाश्च त एव तत्वानि तेषां वेदनं सम्यग्ज्ञानं, तद्रुचिः - तच्छ्रद्धानं । अस्खलद्वृत्तिधारणं - नियतवृत्ति धारणं - वृत्तं - चारित्रं । (२१) अपवर्गस्य - मोक्षस्य



(सम्यग्ज्ञान) त्यांचे यथार्थ श्रद्धान (सम्यग्दर्शन) व त्यामध्ये लीनता, (च्युत न होणे) हेच चारित्र आहे. अशी या तिहींची एकाग्रता हाच मोक्षमार्ग असून अन्य सर्व बाह्य तप वगैरे हे रत्नत्रयाचे साधन आहे.

न च बाह्यतपोहीनमभ्यन्तरतपो भवेत् ।
तण्डुलस्यैव विक्लित्तिर्न हि वह्न्यादिकं विना ॥ २२ ॥

अर्थ :–बाह्य तपाने रहित अंतरंग तप साध्य होत नाही. जसे भातासाठी अन्य अग्नी वगैरे सहकारी असतात. त्याशिवाय तांदूळ स्वच्छ व खाद्य होत नाहीत.

तत्त्रयं च न मोक्षार्थमाप्ताभासादिगोचरम् ।
ध्यातो गरुडबोधेन न हि हन्ति विषं बकः ॥ २३ ॥

अर्थ :–खोटा देव, खोटा आगम एतत्संबंधी श्रद्धा-ज्ञान-चारित्र हे मोक्षाचे साधन नाही. गरूड समजून बगळ्याचे ध्यान केले तर सर्पदंशाची विषबाधा कशी दूर होणार ?

सर्वदोषविनिर्मुक्तं सर्वज्ञोपज्ञमञ्जसा ।
तप्यध्वं तत्तपो यूयं किं मुधा तुषखण्डनैः ॥ २४ ॥

अर्थ :–जे समस्त १८ दोषांनी रहित आहेत व सर्व पदार्थांना त्यांच्या पर्यायासह युगपत् जाणतात अशा सर्वज्ञाने सांगितले आहे, असे तप आपण करा. निष्कारण भूसा कांडत बसण्यांत लाभ तो कोणता ?

रागादिदोषसंयुक्तः प्राणिनां नैव तारकः ।
पतन्तः स्वयमन्येषां न हि हस्तावलम्बनम् ॥ २५ ॥

अर्थ :–रागादि दोषांनी संपन्न देव हा प्राण्यांना संसारातून तारक असू शकत नाही. जो स्वयं खड्ड्यांत पडतो तो दुसऱ्यास हाताने पकडून कसा आधार देणार ?

न च क्रीडा विभोस्तस्य बालिशेष्वेवदर्शनात् ।

---

श्लोकांक (२२) विक्लित्तिः - पाकः । (२३) आप्ताभासादिगोचरं आप्तवत् अवभासन्ते ते आप्ताभासाः । मिथ्यादेवाः आदिशब्दात् आगमपदार्थाः । गोचरं विषयः यस्य तत् । (२४) उपज्ञं - आज्ञातम् - सर्वज्ञोपज्ञं - अर्हत्परमेश्वरेण निरूपितम् ।

अतृप्तश्च भवेत्तृप्तिं क्रीडया कर्तुमुद्यतः ॥ २६ ॥

अर्थ :–अशा ईश्वरास क्रीडा असतच नाही. क्रीडा बालिश पुरुषांत दिसून येते. जो अतृप्त आहे तोच क्रीडेने तृप्ती करण्यास उद्युक्त होईल.

स्वैराचारस्वभावोऽपि नैश्वरस्यैश्यहानितः ।
अप्यस्मदादिभिर्द्वेष्यं सर्वोत्कर्षवतः कुतः ॥ २७ ॥

अर्थ :– ईश्वरास स्वैराचार स्वभावही असत नाही. कारण त्यामुळे ईशत्वाचा नाश होतो. संपूर्ण उत्कर्षवान् अशा ईश्वरास आम्हासारखा द्वेषही कसा असेल ?

अदोषश्चेदकृत्यं च कृतिनः किमु कृत्यतः ।
स्वैराचारविधिर्दृष्टो मत्त एव न चोत्तमे ॥ २८ ॥

अर्थ :–ईश्वर जर सर्व दोषांनी रहित असेल तर कृतकृत्य ईश्वरास काहीही करण्याची इच्छा असू नये. जर तो कृतकृत्य असेल तर त्यास जग निर्माण करण्यापासून लाभ कोणता ? स्वैराचार हा उन्मत्त पुरुषामध्ये आढळतो. उत्तम पुरुषामध्ये नाही.

इति प्रबोधिताः केचिद्बभूवुस्तेषु धार्मिकाः ।
मृत्स्ना ह्यार्द्रत्वमायाति नोत्पलं जलसेचनात् ॥ २९ ॥

अर्थ :–याप्रमाणे उपदेश ऐकून त्यापैकी कित्येक धार्मिक बनलेत, जैनधर्मी झाले. पाण्याच्या सिंचनामुळे माती ओलसर झालेली दिसून येते. दगडामध्ये फरक पडत नाही.

धर्माश्रितान्समालोक्य तापसान्मुमुदे कृती ।
प्रीतये हि सतां लोके स्वोदयाच्च परोदयः ॥ ३० ॥

अर्थ :–त्या तापसांनी खरा धर्म स्वीकारलेला पाहून जीवकास अत्यानंद झाला. या लोकात सत्पुरुषांना आपल्या उत्कर्षापेक्षा पराच्या उत्कर्षात आनंद होतो.

---

श्लोकांक (२७) ऐश्यहानितः - ईश्वरत्वहानिप्रसंगात् । (२८) अकृत्यं - अकर्तव्यं । कृतिनः - योग्यस्य । कृत्यतः - विधेयकर्तव्यात् । मत्ते - उन्मत्तपुरुषे । (२९) मृत्स्ना - मृत्तिका। (३०) कृती - पुण्यवान् ।



बोधिलाभात्परा पुंसां भूतिः का वा जगत्त्रये ।
किंपाकफलसंकाशैः किं परैरुदयच्छलैः ॥ ३१ ॥

अर्थ :–या तीन लोकामध्ये रत्नत्रयधर्माच्या प्राप्तीपेक्षा कोणती विभूति श्रेष्ठ आहे ? उदयकाळी त्रासदायक परिग्रह सामग्रीपासून फायदा तो कोणता ? किंपाक वृक्षाची फळे गोळा करून कोणता लाभ होणार आहे ?

ततस्तस्माद्विनिर्गत्य देशे दक्षिणनामके ।
सहस्रकूटमाश्रित्य श्रीविमानं नुनाव सः ॥ ३२ ॥

अर्थ :–त्यानंतर तेथून निघून दक्षिण नामक देशामध्ये सहस्रकुट नामक जिनमंदिरास जीवंधर पोचले व त्यांनी ते पाहून भक्तीने स्तुती केली.

भगवन्दुर्णयध्वान्तैराकीर्णे पथि मे सति ।
सज्ज्ञानदीपिका भूयात्संसारावधिवर्धिनी ॥ ३३ ॥

अर्थ :–''हे भगवन् ! अनेक मिथ्या नयाने व्याप्त हा जीवनमार्ग अंधारला असतांना संसाराचा शेवट करणारा (मोक्षप्रदर्शक) समग्ज्ञानरूपी दीपक मला प्राप्त होवो.

जन्मजीर्णाटवीमध्ये जनुषान्धस्य मे सती ।
सन्मार्गे भगवन्भक्तिर्भवतान्मुक्तिदायिनी ॥ ३४ ॥

अर्थ :–''या संसाराच्या गहन जीर्ण शीर्ण अरण्यांत मी हा असा जन्माने आंधळा भटकत असताना आपली भक्ती हाच दीपक सन्मार्गामध्ये प्रवृत्त करून मुक्ती देणारा होवो !

स्वान्तशान्तिं ममैकान्तामनैकान्तैकनायकः ।

---

श्लोकांक (३१) परा - अन्या, उत्कृष्टा । भूतिः - ऐश्वर्यं । परैः - बोधिलाभव्यतिरिक्तैः । (३२) श्रीविमानं - जिनमंदिरं । (३३) दुर्णयध्वान्तैः - मिथ्यामतांधकारैः; । दुर्णयः एव ध्वान्तः तैः (कर्म॰); संसरावधिवधिनी मोक्षप्रापिनी; संसारस्य अवधिःअन्तः समाप्तिरित्यर्थः; तस्य वर्धिनी पोषिका । (ष॰ त॰) (३४) जनुषा - जन्मना । सती - समीचीना । जन्मजीर्णाटवीमध्ये - जीर्णा-चैषा अटवी जीर्णाटवी (कर्म॰) जन्म एव जीर्णाटवी (कर्म॰) तस्यां मध्ये (स॰ त॰) (३५) एकान्तां - स्थिरां । स्वान्तं - मनः । अनैकांतैकनायकः - न एकांतः अनैकान्तः (नञ्) तस्य एक एव नायकः एकनायकः (कर्म॰)

शान्तिनाथो जिनः कुर्यात्संसृतिक्लेशशान्तये ॥ ३५ ॥

अर्थ :–"स्याद्वादमताचे अधिनायक शांतिनाथ भगवान् संसारातील क्लेश दुःखाचा नाश व्हावा म्हणून माझे अंतःकरण सर्वस्वी शांत करून पवित्र करोत.

इति स्तोत्रेण तद्यासीदुद्घाटितकवाटकम् ।
मुक्तिद्वारकवाटस्य भेदिना किं न भिद्यते ॥ ३६ ॥

अर्थ :– असे स्तोत्र म्हणत असताना त्या जिनालयाचे दार उघडले. मोक्षाचा दरवाजा उघडण्याचे सामर्थ्य असणाऱ्याला कशाचाही भेद करून उघडणे काय अशक्य आहे ?

अन्याशक्यमिदं मान्यो वितन्वन्न विसिष्मिये ।
लोकमालोकसात्कुर्वन्न हि विस्मयते रविः ॥ ३७ ॥

अर्थ :– जे अन्यास करणे अशक्य होते असा हा दरवाजा उघडल्याचे पाहून सर्वमान्य जीवकाला त्यात कांहीच आश्चर्य वाटले नाही. सर्व जग उजळणाऱ्या सूर्याला आश्चर्य ते काय असणार ?

तावता तं समासाद्य प्रणतः कोऽपि पिप्रिये ।
स्वमनीषितनिष्पत्तौ किं न तुष्यन्ति जन्तवः ॥ ३८ ॥

अर्थ :– तेवढ्यात जीवंधराचे जवळ येवून त्यास नमस्कार करून कोणी एक अत्यंत आनंदाने विभोर झाला. आपले मनीषित पूर्ण झालेले पाहून कोणास आनंद होणार नाही बरे !

स्वामी तु तं समालोक्य कस्त्वमार्येति पृष्टवान् ।
प्रभूणां प्राभवं नाम प्रणतेष्वेकरूपता ॥ ३९ ॥

अर्थ :– जीवंधर त्यास पाहून विचारूं लागले "हे आर्य ! आपण कोण?" मोठ्या पुरुषाचा मोठेपणा तोच की, जे प्रणताशी एकरूप होणे हाच तर आहे.

श्लोकांक (३६) उद्घाटितकवाटकं - उद्घाटितौ कवाटौ यस्य तत् । (बहु० इत्यत्र मंदिरं । (३७) विसिष्मिये - विस्मयं प्राप । आश्चर्यचकितं बभूव । आलोकसात् कुर्वन् - प्रेक्षयन् । (३८) समासाद्य - समीपं प्राप्य । स्वमनीषितनिष्पतौ - निजमनोरथसिद्धौ । (३९) प्राभवं - प्रभुत्वं। प्रणतेषु - विनीतेषु । एकरूपता - समता । (४०) कृतत्वरः - कृता त्वरा येन सः (बहु०)



पृष्टः सोऽप्युत्तरं वक्तुमुपादत्त कृतत्वरः ।
समीहितेऽपि साहाय्ये प्रयत्नो हि प्रकृष्यते ॥ ४० ॥

अर्थ :– असे विचारल्यानंतर तो पुरुष ताबडतोब उत्तर देवू लागला. "दैवाची अनुकूलता सहज प्राप्त होत असताना इच्छित प्राप्त करण्याचा पुरुषार्थ हा विशेषतः घडतच असतो.

इह क्षेमपुरी नाम राजधानी विराजते ।
नरपतिस्तु देवान्तो राजा तत्पुरनायकः ॥ ४१ ॥

अर्थ :– "येथे क्षेमपुरी नावाची राजधानी शोभिवंत आहे व त्या नगरीचा नरपतीदेव नामक राजा आहे.

तस्य श्रेष्ठिपदप्राप्तः सुभद्रस्तस्य गेहिनी ।
नाम्ना तु निर्वृतिः पुत्री क्षेमश्रीरित्यभूत्तयोः ॥ ४२ ॥

अर्थ :– "त्या राजाचा श्रेष्ठपद विभूषित सुभद्र नावाचा व्यापारी श्रेष्ठी आहे. त्याची निवृति नामक भार्या आहे. त्यांची क्षेमश्री नावाची कन्यका आहे.

जन्मलग्ने च दैवज्ञास्तत्पतिं तमजीगणन् ।
स्वयंविघटितद्वारो येनायं स्याज्जिनालयः ॥ ४३ ॥

अर्थ :– "तिच्या जन्मतांनाच ज्योतिषांनी सांगितले आहे की, "जो आला असतांना ह्या पुरातन जिनमंदिराचे बंद द्वार उघडले जाईल तोच हिचा पती होईल."

तत्परीक्षाकृतेऽत्रैव गुणभद्रसमाह्वयः ।
प्रेष्योऽहं प्रेरितस्तिष्ठन्भवन्तं दृष्टवानिति ॥ ४४ ॥

अर्थ :– "मी गुणधर नावाचा त्या श्रेष्ठीचा नौकर असून त्या ज्योतिष्याने वर्तविलेल्या ज्योतिषाची परीक्षा पाहण्यासाठी मला येथेच निगरानी करण्याची शेठजीनी आज्ञा केली आहे. तोच आपण नजरेला आलात."

श्लोकांक (४३) दैवज्ञाः - जोतिर्विदः । स्वयंविघटितद्वारः - स्वयं (विनाप्रयत्नेन) विघटितं द्वारं यस्य सः । (बहु०)

इत्युक्त्वा स पुनर्नत्वा गत्वा सत्वरमात्मनः ।
स्वामिने स्वामिवृत्तान्तममन्दप्रीतिरब्रवीत् ॥ ४५ ॥

अर्थ :– असे बोलून कुमारास नमन करून लगबगीने घरी जाऊन आपल्या स्वामीस सर्व वृत्तांत निवेदन करू लागला. तेव्हा तो आनंदाने भारावलेला होता.

भद्रवार्तां ततः शृण्वन् सुभद्रोऽपि समागतः ।
तत्क्षणे च तमद्राक्षीज्जिनपूजाकृतक्षणम् ॥ ४६ ॥

अर्थ :– अशी ही शुभ वार्ता ऐकून सुभद्र श्रेष्ठीही तेथे पोहोचला. तेव्हा त्याने जिनपूजा व भक्तीमध्ये मग्न जीवकास पाहिले.

न गात्रमात्रमद्राक्षीद्विभवं चास्य वैश्यराट् ।
सौगन्धिकस्य सौगन्ध्यं शपथात्किं प्रतीयते ॥ ४७ ॥

अर्थ :– सुभद्र श्रेष्ठीवराने त्याचे शरीरसौंदर्यच न्याहाळले असे नाही. तर त्याचे वैभव, बुद्धिवैभवही पाहिले. कस्तुरीच्या सुगंधाची काय परीक्षा करावी लागते ? कस्तुरीचा सुगंध सहजच आपणहून दरवळतो. तसेच त्याचे सौंदर्य व वैभव दोन्ही सुभद्र शेठजीने पाहले.

इज्यान्तेऽभूद्यथायोग्यमुपचारः परस्परम् ।
सतां हि प्रव्हता शास्ति शालीनामिव पक्वताम् ॥ ४८ ॥

अर्थ :– पूजा समाप्त झाल्यानंतर त्या दोहोमध्ये यथायोग्य नमस्कार उपचारादि व्यवहार झाला. सालीप्रमाणे सत्पुरुषाची नम्रता ही त्यांच्या परिपक्वतेची व सौजन्याची गमक असते.

तद्वेश्म तस्य निर्बन्धादथ बन्धुप्रियो गतः ।
सख्यं साप्तपदीनं हि लोके संभाव्यते सताम् ॥ ४९ ॥

अर्थ :– नंतर सुभद्र श्रेष्ठीने आग्रह केल्यामुळे बंधुप्रिय जीवंधरकुमार श्रेष्ठीच्या घरी गेला. दोन सज्जनाचे सख्य खरंच सात पावले चालण्यानेच प्रगट होते.

---

श्लोकांक (४७) सौगन्धिकस्य - सुगन्धिनः (४८) इज्या - पूजा । (४९) निर्बन्धात् - आग्रहात् - साप्तपदीनं - सप्तानां समाहारः सप्तपदी (स० द्वंद्व) तस्य इदम् ।



कन्यायाः करपीडां च तद्दैन्यादन्वमन्यत ।
आश्रयन्तीं श्रियं को वा पादेन भुवि ताडयेत् ॥ ५० ॥

अर्थ :– तदनंतर सुभद्र श्रेष्ठीच्या विनंतीवरून जीवंधराने मुलीशी विवाह करण्याचे मान्य केले. लक्ष्मी घरा चालत आली असता तिला पायाने कोण बरे लाथाडेल ?

अथ भद्रतरे लग्ने सुभद्रेण समर्पिताम् ।
क्षेमश्रियं पवित्रोऽयमुपयेमे यथाविधि ॥ ५१ ॥

अर्थ :– याप्रमाणे शुभ ग्रहयोग मुहूर्त असताना सुभद्राने दिलेल्या क्षेमश्रीचा पवित्र कुमाराने यथाविधी स्वीकार केला.

इति श्रीमद्वादीभसिंहसूरिविरचिते क्षत्रचूडामणौ
क्षेमश्रीलम्भो नाम षष्ठो लम्बः ।

याप्रमाणे वादीभसिंहसूरीविरचित क्षत्रचूडामणिमध्ये क्षेमश्री विवाह नामक सहावा लंब समाप्त झाला.

## सप्तम लंब

अथ वध्वा तया साकमनुबोभूय भूयसीम् ।
सुखतातिं ततो यातुं वितताम मतिं कृती ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे आपल्या क्षेमश्री पत्नीसह खूप सुखोपभोगाचा अनुभव घेऊन तदनंतर तेथून निघण्याची त्याची बुद्धी झाली.

अकथयन्नथ स्वामी गणरात्रात्यये गतः ।
न हि मुग्धाः सतां वाक्यं विश्वसन्ति कदाचन ॥ २ ॥

अर्थ :– नंतर कुमार जीवंधर रात्रीच्या शेवटच्या प्रहरीं निघून गेला. मूढ लोक सज्जनाच्या वचनावर विश्वास ठेवत नाहीत.

तद्वियोगादभूत्पत्नी दग्धरज्जुसमद्युतिः ।
प्राणाः पाणिगृहीतीनां प्राणनाथो हि नापरम् ॥ ३ ॥

अर्थ :– पतीच्या विरहाने पत्नी क्षेमश्री जळल्या दोरीप्रमाणे निस्तेज झाली. रमणीचे प्राण प्राणनाथ पतीच असतात. दुसरे नाहीत.

सुभद्रोऽपि पवित्रं तमन्विष्याधिमयोऽभवत् ।
बहुयत्नोपलब्धस्य प्रच्यवो हि दुरुत्सहः ॥ ४ ॥

अर्थ :– सुभद्र श्रेष्ठीने खूप प्रयास करूनही जीवंधर न मिळाल्यामुळे चिंताग्रस्त झाले. बऱ्याच प्रयत्नाने लाभलेल्या इष्ट वस्तूचा विरह हा दुस्सहच असतो.

स्वामी स्वाभरणत्यागमैच्छद्रच्छदतुच्छधीः ।
विवेकभूषितानां हि भूषा दोषाय कल्पते ॥ ५ ॥

---

श्लोकांक (१) अनुबोभूय - वारंवारं अनुभूय । वितताम - चकार । (२) गण - रात्रात्यये - गणानां बहूवीनां रात्रीणां समाहारः गणरात्रं (द्विगु) तस्य अत्ययः अतिक्रम तस्मिन् । (३) दग्धरज्जुसमद्युतिः - दग्धरज्जुवत् शक्तिहीना; संतापबहुला; दग्धारज्जुः दग्धरज्जुः (कर्म०) दग्धरज्जुसमा दुयुतिः यस्याः सा (बहु०) (४) आधिमयः - संतप्तमनस्कः । प्रच्यवः - वियोगः । (५) भूषा - भूषणं ।



अर्थ :– उदार कुमाराने आपल्या भारी वस्त्रप्रावरणांचा जाता जाता त्याग करण्याचे ठरविले. विवेकाने संपन्न पुरुषांना वेषभूषा दोषास्पद म्हटली जाते.

धार्मिकाय तदाकल्पं दातुं च समकल्पयत् ।
स्थाने हि बीजवद्दत्तमेकं चापि सहस्रधा ॥ ६ ॥

अर्थ :– तेव्हा धार्मिक पुरुषाला वस्त्रादि द्यावेत असा त्याने विचार केला. योग्य पात्री दिलेले दान बीजाप्रमाणे सहस्रपटीने फलते.

तावता संन्यधात्कोऽपि सन्निधेस्तस्य संनिधौ ।
भागधेयविधेया हि प्राणिनां हि प्रवृत्तयः ॥ ७ ॥

अर्थ :– तेवढ्यातच कोणी पुरूष जीवकस्वामीच्या सन्निध आला. प्राण्यांची सर्व प्रवृत्ती ह्या भाग्याधीन असतात.

आगच्छन्तमपृच्छच्च पामरं पार्श्वमात्मनः ।
कुतः कुत्र प्रयासि त्वं स्वास्थ्यं चास्ति न वेति च ॥ ८ ॥

अर्थ :– आपल्या जवळ आलेल्या त्या पामरास कुमाराने विचारले ''तूं कोठून आलास व कोठे जावयाचे आहे ? स्वास्थ्य तर ठीक आहेना की नाही ?

प्रीतः प्रत्यब्रवीत्सोऽपि प्रश्रयेण समाश्रितः ।
मुखदानं हि मुख्यानां लघूनामभिषेचनम् ॥ ९ ॥

अर्थ :– त्या प्रसन्न नवागताने अत्यंत विनयाने उत्तर दिले. प्रधान पुरुषाशी भाषण हे छोट्यांना अभिषेकासारखे भासते.

इतस्ततो मया मह्य गम्यते कार्यकाम्यया ।
स्वास्थ्यं स्वास्थ्यतम भूयात्कार्येऽप्यार्यदृशो मम ॥ १० ॥

अर्थ :– ''हे पूज्य ! मी माझ्या कार्यवश इकडून आलो व इकडे जात आहे. ''मी सुखी असून आपणासारख्या महान् पुरुषांच्या दर्शनाने माझे कार्य

---

श्लोकांक (६) आकल्पं - आभूषणं । (७) सन्निधेः - सतां निधेः, सतां आश्रयभूतस्य । भागधेयविधेया - दैवलिखिता (८) स्वास्थ्यं - कुशलं । (९) प्रश्रयेण - विनयेन । मुखदानं - अभिमुखीभूय संभाषणं । (१०) आर्यदृशः - श्रेष्ठदर्शनात् ।

अधिक सुखकर होणार आहे.''

इत्युक्तेन कुमारेण प्रत्युक्तो वृषलः पुनः ।
स्वास्थ्यं नाम न कृष्यादिजायमानं कृषीवलः ॥ ११ ॥
षट्कर्मोपस्थितं स्वाथ्यं तृष्णाबीजं विनश्वरम् ।
पापहेतुः परापेक्षि दुरन्तं दुःखमिश्रितम् ॥ १२ ॥

अर्थ :– याप्रमाणे शेतकऱ्याचे उत्तर ऐकून कुमार ज्या शेतकऱ्यास पुनः म्हणाला ''कृषीवलमित्र ! असि, मसि, सेवा, कृषि, वाणिज्य व शिल्प या षट्कर्मांने प्राप्त स्वास्थ्य तृष्णा उत्पन्न करणारे व वाढविणारे आहे. नाशवंत आहे, पापाचे कारण आहे, परसापेक्ष आहे, शेवटी दुःखच देणारे व दुःखमिश्रितच आहे.

आत्मोत्थमात्मना साध्यमव्याबाधमनुत्तरम् ।
अनन्तं स्वास्थ्यमानन्दमतृष्णमपवर्गजम् ॥ १३ ॥

अर्थ :– ''आत्म्यापासून उत्पन्न, आत्मद्वाराच साध्य, निराबाध, अनुत्तर, अविनाशी, तृष्णेने रहित, मोक्षपर्यायाश्रित स्वास्थ्य हेच खरे सुख (आनंद) आहे.

तदपि स्वपरज्ञाने याथात्म्यरुचिमात्रके ।
परित्यागे च पूर्णे स्यात्परमं पदमात्मनः ॥ १४ ॥

अर्थ :– ''असे हे स्वास्थ्य या जीवास स्वपरभेदविज्ञान झाले असतांना, यथार्थ प्रतीती स्वरूपाचे असे सम्यग्दर्शन, व पूर्ण चारित्र असते. ते परमात्मपद् प्राप्त होते.

स्वमपि ज्ञानदृक्सौख्यसामर्थ्यादिगुणात्मकम् ।
परं पुत्रकलत्रादि विद्धि गात्रमलं परैः ॥ १५ ॥

अर्थ :– तूं आत्म्याला ज्ञान, दर्शन, सौख्य, वीर्यादि गुणात्मक आणि पर पुत्रकलत्रादिकास, फार काय या शरीरास सुद्धा तू पर समज.

श्लोकांक (११) वृषलः - शूद्रः । (१२) दुरन्तं - अन्ते दुःखदं । (१३) आत्मोत्थं - आत्मसंभवं । अव्याबाधं - अप्रतिबंधं । अनुत्तरं - सर्वोत्कृष्टं । (१४) तदपि - तत् स्वास्थ्यमपि । याथात्म्यरुचिमात्रके - यथार्थ श्रद्धानरूपे । सम्यग्दर्शने । परित्यागे - सर्वसंगपरित्यागरूपे सम्यक्‌चारित्रे। (१५) स्वं अपि - स्वपदार्थं आत्मानमपि । विद्धि - जानीहि ।



एवं भिन्नस्वभायोऽयं देही स्वत्वेन देहकम् ।
बुध्यते - पुनरज्ञानादतो देहेन बध्यते ॥ १६ ॥

अर्थ :– याप्रमाणे या संसारातील परिग्रह आणि रागादिकापासून भिन्न स्वरूपी हा आत्मा देहास आत्मरूपाने मानतो, ते केवळ अज्ञानाने! म्हणून पुनश्च देह व भव प्राप्त करतो.

अज्ञानात्कायहेतुः स्यात्कर्माज्ञानमिहात्मनाम् ।
प्रतीके स्यात्प्रबन्धोऽयमनादिः सैव संसृतिः ॥ १७ ॥

अर्थ :– संसारात शरीर प्राप्तीस कारणभूत कर्म या जीवास अज्ञानामुळे प्राप्त होते आणि शरीर व इंद्रियद्वारा पुनः कर्म व शरीर प्राप्त होते. असा हा बंध अनादि काळापासून चालू आहे व तोच संसार आहे.

स्वं स्वत्वेन ततः पश्यन्परत्वेन च तत्परम् ।
परत्यागे मतिं कुर्याः कार्येरन्यैः किमस्थिरैः ॥ १८ ॥

अर्थ :– म्हणून आत्मरूपाने आत्म्याचे आणि पररूपाने पराचे श्रद्धान करून पराच्या त्यागामध्ये प्रवृत्त हो. अन्य अस्थिर कार्यात दंग राहून काय लाभ ?

परत्यागकृतो ज्ञेयाः सानगारा अगारिणः ।
गात्रमात्रधनाः पूर्वे सर्वसावद्यवर्जिताः ॥ १९ ॥

अर्थ :– पराचा त्याग करणारे धर्मात्मा अनगार आणि सागार असे दोन प्रकारचे आहेत. मात्र शरीरच ज्यांचे धन ते अनगार होत आणि ते संपूर्ण पापांचा त्याग करतात.

मूलोत्तरादिकान्वोढुं त्वं न शक्तो हि तद्‌गुणान् ।
न हि वारणपर्याणं भर्तुं शक्तो वनायुजः ॥ २० ॥

अर्थ :– त्या साधूंचे मूलगुण आणि उत्तरगुण असतात. तूं त्या गुणास

श्लोकांक (१६) देही - जीवः । स्वत्वेन - आत्मत्वेन । (१७) प्रबंधः - कर्मबंधः (परिपाटी) । प्रतीके - विपरीते; प्रत्युत (१९) परत्यागकृतः - परवस्तुत्यागकृतः । (२०) वारणपर्याणं - गजपलायनं । वनायुजः - वनायुर्देशजातः, अश्वः ।

धारण करण्यास समर्थ नाहीस. हत्तीच्या पाठीवरील अंबारीचे भक्कम ओझे घोडा कसा घेऊ शकेल ?

अतस्त्वमधुना धर्मं गृहाण गृहमेधिनाम् ।
न ह्यारोढुमधिश्रेणिं यौगपद्येन पार्यते ॥ २१ ॥

अर्थ :– म्हणून आता सागारांचा धर्म धारण कर. कारण एकदम शिडीच्या वरील पायरीवर चढणे कठीणच असते. म्हणून क्रमाक्रमाने चढणे श्रेयस्कर असते.

त्रिचतुःपञ्चभिर्युक्ता गुणशिक्षाणुभिर्व्रतैः ।
तत्वधीरुचिसंपन्नाः सावद्या गृहमेधिनः ॥ २२ ॥

अर्थ :– गृहनिरत श्रावक तीन गुणव्रते चार शिक्षाव्रते, पाच अणुव्रते, तद्वत सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञानाने संपन्न असतात. परंतु आरंभादिकामुळे त्यात अतीचार लागतात. पापाचा परिपूर्ण त्याग करू शकत नाहीत. म्हणून त्यांना देशव्रती म्हणतात.

अहिंसा सत्यमस्तेयं स्वस्त्रीमितवसुग्रहौ ।
मद्यमांसमधुत्यागैस्तेषां मूलगुणाष्टक्रम् ॥ २३ ॥

अर्थ :– श्रावकाचे आठ मूलगुण आहेत. १ अहिंसा २ सत्य (खरे बोलणे ३ अचौर्य, चोरी न करणे ४ ब्रह्मचर्य (स्वस्त्रीमध्ये मात्र संतोष) व ५ परिग्रह - परिमाण (परिग्रहाचा परिमित स्वीकार) ६-७-८ मद्य, मांस व मधू यांचा त्याग.

भोगोपभोगसंहारोऽनर्थदण्डव्रतान्वितः ।
गुणानुबृंहणाद्ज्ञेयो दिग्व्रतेन गुणव्रतम् ॥ २४ ॥

अर्थ :– दिग्व्रत, भोगोपभोगपरिमाणव्रत व अनर्थदंडव्रत ही तीन गुणव्रते आहेत. पूर्व श्लोकांत सांगितलेल्या पाच गुणांना अणुव्रतांना वाढविण्यात, रक्षा करण्यास कारण असल्यामुळे त्यांना गुणव्रते म्हणतात.

---

श्लोकांक (२१) अधिश्रेणिं - अधिरोहिणिं । सोपानं । (२३) मितवसुग्रहः - परिग्रहपरिमाणः । (२४) अनर्थदंडव्रतं - निष्फलदुष्कृतेस्त्यागः । गुणानुबृंहणात् - गुणवृद्धेः ।



स प्रोषधोपवासेन व्रतं सामायिकेन च ।
देशावकाशिकेन स्याद्वैय्यावृत्त्यं तु शिक्षकम् ॥ २५ ॥

अर्थ :– शिक्षाव्रते चार आहेत. १ देशावकाशिक २ सामायिक ३ प्रोषधोपवास ४ वैयावृत्य.

परिच्छिन्नदिशि प्राप्तिं त्यागं निष्फलदुष्कृतेः ।
मितान्नस्त्र्यादिकत्वं च कृत्यं विद्धि गुणव्रते ॥ २६ ॥

अर्थ :– दिशांची मर्यादा ठरवून त्याचे आंत व्यवहार करणे व बाहेर आजन्म सर्व क्रियांचा त्याग करणे (दिग्व्रत) निष्प्रयोजन अशा ५ पापक्रियेंचा त्याग करणे (अनर्थदंडव्रत) व अन्नादिकभोग व वस्त्रादिक उपभोगांच्या मर्यादा ठरवून नियम करणे, भोगोपभोगपरिणाम व्रत हे गुणव्रतांचे लक्षण आहे.

संचारस्यावधिर्नित्यं सचिन्हा चात्मभावना ।
दानाद्यैरुपवासश्च पर्वादिष्वन्यतः कृती ॥ २७ ॥

अर्थ :– देशकालादिकास अनुसरून काही कालासाठी दहाही दिशांची मर्यादा ठरविणे व त्या बाहेर कालमर्यादा बांधून त्याग करणे, (देशावकाशिकव्रत), ठराविक काळपावेतो कांहीतरी चिन्ह ठरवून पाच पापांचा त्यागपूर्वक आपल्या शुद्ध आत्म्याचे चिंतवन करणे (सामायिक), पर्वदिनी उपवास एकाशनादि करणे (प्रोषधोपवास व्रत) व चतुर्विध संघास आहारदानादि देणे (वैय्यावृत्य) अशी चार शिक्षाव्रते आहेत.

अणुव्रती व्रतैरेतैः क्वचिद्देशे क्वचित्क्षणे ।
महाव्रती भवेत्तस्माद्ग्राह्यं धर्ममगारिणाम् ॥ २८ ॥

अर्थ :– पाच अणुव्रतास धारण करणारा श्रावक ३ गुणव्रत व ४ शिक्षाव्रतांना धारण केल्यामुळे विशिष्ट दृष्टीने महाव्रती म्हटल्या जातो. तेही मात्र उपचाराने. अतएव तूं या गृहस्थ धर्माचा अंगीकार कर.

इत्युक्तः प्रत्यगृह्णाच्च स धर्मं गृहमेधिनाम् ।

---

श्लोकांक (२६) परिच्छिन्नदिशि-प्राप्तिं - दिग्व्रतमिति भावः । (२७) कृती - कृत्यं । अन्यतः - शिक्षाव्रते (प्रकरणानुसारेण) ।

कः कदा कीदृशो न स्याद्भाग्ये सति पचेलिमे ॥ २९ ॥

अर्थ :– कुमाराचा हा उपदेश श्रवण करून त्याने गृहस्थधर्माचा स्वीकार केला. भाग्योदय प्रबल असेल तर कोणास कोणते पद मिळेल हे सांगता येत नाही.

अत्यादरान्निजाहार्यममुष्मै दानविद्ददौ ।
नादाने किंतु दाने हि सतां तुष्यति मानसम् ॥ ३० ॥

अर्थ :– दानविधीचे मर्म जाणणाऱ्या कुमाराने त्या शेतकऱ्याला आदरपूर्वक आपली वस्त्रप्रावरणे दागदागिने अर्पण केलीत. सज्जनांना दुसऱ्याचे दान घेतांना आनंद वाटत नाही. मात्र दुसऱ्यास दान देण्यातच आनंद वाटतो.

अनर्घ्याकल्पलाभाच्च धर्मलाभाच्च पिप्रिये ।
तादात्विकसुखप्रीतिः संसृतौ हि विशेषतः ॥ ३१ ॥

अर्थ :– मूल्यवान् आणि अकल्पित अलंकाराची प्राप्ती व धर्माचा लाभ झाल्याने त्यास अतिशय आनंद झाला. तात्कालिक सुखदायी वस्तूचा लाभ सर्व सामान्यजीवांना सुखकर वाटतो.

तं विसृज्य ततः स्वामी तस्य स्मृत्वैव निर्ययौ ।
प्रत्यक्षे च परोक्षे च सन्तो हि समवृत्तिकाः ॥ ३२ ॥

अर्थ :– कृपीवलास सोडून कुमार पुढे निघाला. तथापि त्याची आठवण ठेवून. सज्जनांचा व्यवहार व्यक्तीसमोर अथवा पाठीमागे एकसारखाच असतो.

अथारण्ये क्वचिच्छ्रान्तो निषण्णो निरुपद्रवः ।
शरण्यं सर्व जीवानां पुण्यमेव हि नापरम् ॥ ३३ ॥

अर्थ :– चालत असताना जीवंधर कुमार एका जागी थांबले. तेथे त्यांना कोणतीच बाधा नव्हती. जीवमात्रास आपले पुण्य तेवढेच शरण आहे. अन्य काहीही नाही.

---

श्लोकांक (२९) पचेलिमे - फलोन्मुखे (३०) निजाहार्यं - स्वाभरणं । आदाने - प्रतिग्रहे । (३१) अनर्घ्याकल्पलाभात् - अमूल्याभरणलाभात् । तादात्विक - तात्कालिक । (३२) तस्य स्मृत्वैव - तं स्मरन्नेव । समवृत्तिकाः - समाना वृत्तिः (प्रत्यक्षे परोक्षे च) येषां ते । (३३) निषण्णः - उपविष्टः; आसितः ।



तत्र चैकाकिनीं रामां पश्यन्नासीत्पराङ्मुखः ।
अपदोषानुषङ्गा हि करुणा कृतिसंभवा ॥ ३४ ॥

अर्थ :– तेथे एकाकी स्त्रीला पाहून जीवंधर परत फिरला. सज्जनाच्या हृदयात असणारी दया निर्दोष असते. त्यामुळे लोकापवादाच्या भयाने तिला एकाकी पाहून दया उत्पन्न झाली नाही.

सा तु जाता वृषस्यन्ती वृषस्कन्धस्य वीक्षणात् ।
अप्राप्ते हि रुचिः स्त्रीणां न तु प्राप्ते कदाचन ॥ ३५ ॥

अर्थ :– ती, वृषभस्कंधाप्रमाणे ज्यांचा खांदा धष्टपुष्ट आहे अशा कुमारास पाहून कामातुर झाली. स्त्रीचा ओढा अप्राप्ताकडे प्राप्तापेक्षा जास्त असतो.

अश्वस्यन्तीं विभाव्यैनामाकूतज्ञो व्यरज्यत ।
अनुरागकृदज्ञानां वशिनां हि विरक्तये ॥ ३६ ॥

अर्थ :– मनातील भाव जाणणाऱ्या कुमाराने ती कामवश जाणून ते विरक्त झाले. अज्ञांना अनुराग उत्पन्न करणारी गोष्ट संयमीला वैराग्यास कारण होते.

पृथक्चेदङ्गनिर्माणं चर्ममांसमलादिकम् ।
सजुगुप्सेऽत्र तत्पुञ्जे मूढात्मा हन्त मुह्यति ॥ ३७ ॥

अर्थ :– ''जर शरीराचे घटक वेगवेगळे केले तर चर्म मांस आणि मालिन्य याशिवाय दुसरे काहीच मिळणार नाही. असे असूनही अज्ञानी घृणास्पद शरीरावरही प्रेम करतो हे खेदजनक आश्चर्य आहे.

दुर्गन्धमलमांसादिव्यतिरिक्तं विवेचने ।
नेक्षते जातु देहेऽस्मिन्मोहे को हेतुरात्मनाम् ॥ ३८ ॥

अर्थ :– ''शरीरावरचे कातडे जर अलग केले तर या शरीरांत दुर्गंधी मलादिक मांस याशिवाय काहीही दिसून येणार नाही. असे असून प्राणी तेथेच

---

श्लोकांक (३४) अपशेषानुषङ्गा - निर्दोषा । कृतिसंभवा - सज्जनात् उत्पन्ना । (३५) वृषस्यन्ती - मैथुनकांक्षी । वृषस्कन्धस्य - वृषस्य स्कंधौ इव स्कंधौ यस्य सः जीवंधरः; तस्य । (३६) अश्वस्यन्ती - मैथुनकांक्षी । विभाव्य - ज्ञात्वा । आकूतज्ञः - आकूतं, भिप्रायं जानाति - इति आकूतज्ञः (उप० त०) वशिनां - जितेन्द्रियानां । (३७) सजुगुप्से - जुगुप्सया सहितं सजुगुप्सं घृणायुक्तं तस्मिन् (स० त०) । (३८) विवेचने - विचार्यमाणे सति ।

का बरे मोहित होतात ?

अज्ञानमशुचेर्बीजं ज्ञात्वा व्यूहं च देहकम् ।
आत्मात्रसस्पृहो वक्ति कर्माधीनत्वमात्मनः ॥ ३९ ॥

अर्थ :– ''या शरीरास अचेतन-जड, अपावित्र्याचे मूल, विचारशून्य जाणूनहि तेथे आसक्त असा जीव हा कर्माधीन आहे हे हा देह प्रगट करतो.

मदीयं मांसलं मांसममीमांसेयमङ्गना ।
पश्यन्ती पारवश्यान्धा ततो याम्यात्मनेऽथवा ॥ ४० ॥

अर्थ :– ''ही उन्मत्त विवेकशून्य स्त्री तारुण्याने मुसमुसलेल्या मला पाहून (कामवश पराधीन होऊन) मोहित झाली आहे. अतएव आपले हितासाठी आपण येथून जावे हेच बरे !

अङ्गारसदृशी नारी नवनीतसमा नराः ।
तत्तत्सान्निध्यमात्रेण द्रवेत्पुंसां हि मानसम् ॥ ४१ ॥

अर्थ :– नारी ही अंगारसदृश असून पुरुष हा लोण्याप्रमाणे आहे. तिच्या संसर्गमात्राने पुरुषाचे मन विकार पावते.

संलापवासहासादि तद्वर्ज्यं पापभीरुणा ।
बालया वृद्धया मात्रा दुहित्रा वा व्रतस्थया ॥ ४२ ॥

अर्थ :– स्त्रीसह संभाषण, सहवास, हसणे वगैरे पापास भिणाऱ्याने टाळावे. मग ती बाल असो, वृद्ध असो, आई असो, मुलगी असो की व्रतस्थ असो.''

इति वैराग्यतर्केण ततो यातुं प्रचक्रमे ।
भेतव्यं खलु भेतव्यं प्राज्ञैरज्ञोचितात्परम् ॥ ४३ ॥

अर्थ :– याप्रमाणे कुमार वैराग्य विचाराने तेथून परत फिरण्यास प्रवृत्त झाले. खरोखर प्राज्ञ पुरुषांनी अज्ञोचित संगाला भ्यावे.

विरक्तमेव रक्ता सा निश्चिकाय विपश्चितम् ।

श्लोकांक (३९) व्यूहं - विचारशून्यं । (४०) अमीमांसा - विवेकरहिता



निसर्गादिङ्गितज्ञानमङ्गनासु हि जायते ॥ ४४ ॥

अर्थ :– त्या मोहित स्त्रीने हा विरक्त विद्वान् आहे असे ताडून घेतले. शरीराच्या क्रियेवरून मनातील भाव ओळखण्यात स्त्रिया स्वभावतःच चतुर असतात.

तस्य स्वान्तं वशीकर्तुं स्वोदन्तमियमूचिषी ।
प्रतारणविधौ स्त्रीणां बहुद्वारा हि दुर्मतिः ॥ ४५ ॥

अर्थ :– असे असूनही ती कुमारास वश करण्यासाठी आपला वृत्तांत सांगू लागली. दुसऱ्यांना फसविण्याचे अनेक मार्ग कुटिल स्त्रियांना माहीत असतात.

विद्धि दीनां महाभाग मां विद्याधरकन्यकाम् ।
स्यालेनात्र बलान्नीतां त्यक्तामात्मप्रियाभयात् ॥ ४६ ॥

अर्थ :– ती म्हणाली, ''हे पुण्य पुरुषा ! मी निराश्रित अशी एक विद्याधरकन्या असून माझ्या बहिणीचा नवरा मला बलात्काराने नेत असता. बायको रागावेल या शंकेने मला सोडून गेला.

अनङ्गतिलकां नाम्ना पुंसां तिलक रक्ष माम् ।
अशरण्यशरण्यत्वं वरेण्ये वर्ततामिति ॥ ४७ ॥

अर्थ :– ''माझे नाव अनंगतिलका आहे. हे पुरुषश्रेष्ठ ! माझे रक्षण कर!'' अशरण जीवांचे शरण्य होण्याची बुद्धी आपणास उत्पन्न होवो !''

तावदार्तस्वरः कोऽपि शुश्रुवे श्रुतशालिना ।
क्व प्रयाता प्रिये प्राणा मम यान्तीति दुःसहः ॥ ४८ ॥

अर्थ :– एवढ्यात कोठून तरी अत्यंत करुणाजनक व दुस्सह विव्हळणे त्या शास्त्रज्ञ स्वामीचे कानी पडले. ''हा प्रिये ! तूं कोठे गेलीस ? तुझ्या विरहाने माझे प्राण जात आहेत !''

योषाप्येषा मिषेणास्मान्निमेषादिव निर्ययौ ।

श्लोकांक (४५) ऊचिषी - अकथयत् । (४६) विद्धि - जानीहि । (४७) वरेण्ये - पुरुषश्रेष्ठे (त्वयि) (४९) योषा - स्त्री । निमेषात् - क्षणमात्रात् । मिषेण - व्याजेन ।

मायामयी हि नारीणां मनोवृत्तिर्निसर्गतः ॥ ४९ ॥

अर्थ :– हे शब्द ऐकताच ती तरुणी देखील काही कारण दाखवून कोणत्या तरी मिषाने क्षणार्धातच स्वामीपासून निघून गेली. स्त्रियांची मनोवृत्ती स्वभावतःच मायावी-कपटी असते.

आर्तस्वरकरोऽप्याह दैन्यं मान्यस्य वीक्षणात् ।
शोच्याः कथं न रागान्धा ये तु वाच्यान्न बिभ्यति ॥ ५० ॥

अर्थ :– मान्यवर कुमारास पाहून विव्हळणारा तो दैन्य प्रगट करू लागला. जे कामाने पीडित लोक आहेत ते निंदा वा लोकापवादाचा विचार न करता शोकाकुल होत असतात.

उदन्योपद्रुतामत्र मान्य भार्यां पतिव्रताम् ।
पानीयार्थमवस्थाप्य नाद्राक्षं प्रस्थितागतः ॥ ५१ ॥

अर्थ :– "हे मान्यवर ! तहानेने व्याकुळ माझ्या पतिव्रता स्त्रीला येथे ठेवून मी पाणी आणण्याकरता गेलो. परंतु परत येवून पाहतो तो ती या ठिकाणी मला दिसली नाही.

विद्याप्यविद्यामानैव मम विद्याधरोचिता ।
मर्त्योत्तम भवानत्र कर्तव्यं कथयेदिति ॥ ५२ ॥

अर्थ :– "हे पुरुषश्रेष्ठा ! मी विद्याधर आहे. विद्याधरास संभवणारी विद्या माझेजवळ असूनही त्या नसल्यागत माझी परिस्थिती झाली आहे. तरी मी आता काय करावे हे सांगा."

पुरंध्रीष्वतिसंधानादभैषीदभयंकरः ।
वचनीयाद्धि भीरुत्वं महतां महनीयता ॥ ५३ ॥

अर्थ :– निर्भय जीवंधरकुमार परस्त्रीसह अतिसंधान - सहवासास खूप भ्याले. चार लोक वाईट म्हणतील अशा निंदावचनाला घाबरणे हाच मोठ्यांचा थोरपणा आहे.

श्लोकांक (५०) दैन्यं - दीनतापूर्वकं । (५१) उदन्योपद्रुतां - तृषार्तां । (५३) पुरन्ध्रीषु - स्त्रीषु । अतिसंधानात् - प्रेमातिशयात् । वचनीयात् - वाच्यात्, अपवादात् ।



नभश्चरं पुनश्चैनं स विपश्चिदबोधयत् ।
अपश्चिमफलं वक्तुं निश्चितं हि हितार्थिनः ॥ ५४ ॥

अर्थ :– पुनश्च ज्ञानी जीवंधर कुमार त्या विद्याधरास म्हणाला - जीवमात्राचे हित चिंतणाऱ्यानी हिताच्या चार गोष्टी सांगाव्यात ही जगरहाटीच आहे.

भवदत्त मुधार्तोसि विद्यावित्तो भवन्नपि ।
न विद्यते हि विद्यायामगम्यं रम्यवस्तुषु ॥ ५५ ॥

अर्थ :– "हे भवदत्त ! तूं एवढा हुशार असूनही निष्कारणच शोक करतो आहेस. विद्या असतांनाही कोणतीही मनोहर वस्तू शोधून सापडण्याचा उपाय मिळतोच.

नभश्चर न कश्चित्स्याद्विपश्चिदविपश्चितोः ।
विनिश्चलशुचोर्भेदो यतश्चन कुतश्चन ॥ ५६ ॥

अर्थ :– "हे विद्याधर ! चहूकडून संकटानी घेरले असतांनाही विद्वान् व चतुर लोक घाबरून न जाता स्थिरचित्त राहतात आणि मूढ मात्र घाबरून जाऊन शोकाकुल होतात. दोहोमध्ये हा फरक असतो. एरवी चतुर आणि मुर्खामध्ये फरक तो कोणता ?

परं सहस्त्रधीभाजि स्त्रीवर्गे का पतिव्रता ।
पातिव्रत्यं हि नारीणां गत्यभावे तु कुत्रचित् ॥ ५७ ॥

अर्थ :– हजारो मार्गांनी कपटकारस्थान करणाऱ्या स्त्रीवर्गामध्ये पातिव्रत्य बहुधा तर नसते. क्वचितच आढळते. जोपावेतो घरात आहे तोपावेतो सर्वच पतिव्रता असतात. तेही कधीकाळी तरी.

मदमात्सर्यमायेर्ष्यारागरोषादिभूषिताः ।
असत्याशुद्धिकौटिल्यशाठ्यमौढ्यधनाः स्त्रियः ॥ ५८ ॥

अर्थ :– "स्त्रिया सामान्यतः मद, (उन्माद) मात्सर्य, माया, ईर्ष्या, राग,

श्लोकांक (५४) नभश्चरं - विद्याधरं । अपश्चिमफलं - उत्तमफलदायकं (वचनं) । (५५) अगम्यं - दुष्प्राप्यं । (५७) सहस्त्रधीभाजि - धियं भजतीति धीभाक् (उप० त०); सहस्त्रेषु धीभाक् सहस्त्रधीभाक्; तस्मिन् (स० त०)

रोष इत्यादि विकारांनी भूषित असतात. तसेच असत्य, अपवित्र, कुटिलता, दुष्टता आणि मूर्खता हे स्त्रियांचे जणू धनच असते.

निर्घृणे निर्दवे क्रूरे निर्व्यवस्थे निरङ्कुशे ।
पापे पापनिमित्ते च कलत्रे ते कुतः स्पृहा ॥ ५९ ॥

अर्थ :– अरे मित्रा ! स्त्रीचे ठायी जेथे प्रसंगविशेषी निर्दयता असते, शुद्ध प्रेमाचा अभाव असतो, क्रूरता, चंचलता आणि स्वच्छंदवृत्ती यांचे वश असतात, जी स्वयं पापी आहे आणि पापास प्रेरणा देणारी आहे अशा कलत्रामध्ये (स्त्रीमध्ये) तुझी वासना एवढी प्रबल कां असावी ?''

इत्युपादिष्टमेतस्य हृदये नासजत्तराम् ।
जठरे सारमेयस्य सर्पिषो न हि सञ्जनम् ॥ ६० ॥

अर्थ :– याप्रमाणे कुमाराने दिलेला हितोपदेशही त्याचे हृदयास रुचला नाही. कुत्र्याचे पोटांत तूप टिकून राहत नाही. ते वमनद्वारा बाहेर पडतेच. तद्वत् हा कुमाराचा उपदेश विद्याधरास रुचला नाही.

स्वामी तु तस्य मौढ्येन सुतरामन्वकम्पत ।
उत्पथस्थे प्रबुद्धानामनुकम्पा हि युज्यते ॥ ६१ ॥

अर्थ :– जीवंधर कुमार मात्र त्याची मूढता पाहून त्यांना खूप अनुकंपा उत्पन्न झाली. प्रबुद्ध ज्ञानीला उन्मार्गगामी प्राण्यामध्ये अनुकंपा ही उचित व स्वाभाविकपणे असते.

ततस्तस्माद्विनिर्गत्य कमप्याराममाश्रयत् ।
अदृष्टपूर्वदृष्टौ हि प्रायेणोत्कण्ठते मनः ॥ ६२ ॥

अर्थ :– तदनंतर जीवंधर तेथून निघून कोण्या एका बगीचास पोहोचले. तेथे बसले. पूर्वी कधीही न पाहलेली वस्तु नजरेस पडली तर बहुधा मन उत्कंठित होते.

श्लोकांक (५९) निरङ्कुशे - स्वतंत्रे । निर्द्रवे - निष्ठुरे । निर्व्यवस्थे - अव्यवस्थितचित्ते । (६०) अनसजत्तराम् - स्थानं नैव अलभत । जठरे - उदरे । सञ्जनं - अवस्थानं । (६१) उत्पथस्थे - दुर्मार्गस्थिते (पुरुषे) । (६२) आरामं - उपवनं ।



तत्राम्रफलमाक्रष्टुं धनुषा कोऽपि नाशकत् ।
अशक्तेः कर्तुमारब्धं सुकरं किं न दुष्करम् ॥ ६३ ॥

अर्थ :– तेथे कोणीएक झाडावरून आम्रफल पाडण्याचा यत्न करूनही तो फल पाडू शकला नाही. त्या समुहातील कोणासही ते शक्य झाले नाही. असमर्थ माणसाने हाती घेतलेले काम सोपे असले तरी त्यास ते कठीणच वाटते.

स्वामी तु तत्फलं विद्धमादत्त सशिलीमुखम् ।
तत्तन्मात्रकृतोत्साहैः साध्यते हि समीहितम् ॥ ६४ ॥

अर्थ :– कुमाराने बाण सोडला आणि तो बाण फलासह खाली आला. योग्य व समर्थ अशा पुरुषाकडून इष्टफल सहज प्राप्त होते.

अपराद्धपृषत्कोऽपि दृष्ट्वा व्यस्मेष्ट तत्कृतिम् ।
अपदानमशक्तानामद्भुताय हि जायते ॥ ६५ ॥

अर्थ :– स्वामीचे हे धनुविद्येतील कौशल्य त्या चुकलेल्या पैकी एकाचे ध्यानात आले. त्यास मात्र विशेष आश्चर्य वाटले. आपण स्वयं जे काम करूं शकत नाही ते दुसऱ्याने केले असता असमर्थ व्यक्ती आश्चर्यचकित मात्र होते.

स्वामिनोऽयं स्ववृत्तान्तं सकातर्यं समभ्यधात् ।
सन्निधाने समर्थानां वराको हि परो जनः ॥ ६६ ॥

अर्थ :– स्वामीला हा स्ववृत्तांत त्याने भीत भीत सांगितला. समर्थासमोर असमर्थ हा दुबळाच ठरतो हे मात्र खरं !

कर्तव्यं वा न वा प्रोक्तं मया कार्मुककोविद ।
कर्णकट्वपि मद्वाक्यमाकर्णयितुमर्हसि ॥ ६७ ॥

अर्थ :– हे धनुर्विद्येत निपुण महाभाग ! माझ्या सांगण्याप्रमाणे आपण

श्लोकांक (६३) आक्रष्टुं - भूमौ पातयितुं । (६४) विद्धं (व्यध्)- वेधसहितं, छिद्रितं । सशिलीमुखं - शिलीमुखेन शरेण सहितं । तत्तन्मात्रकृतोत्साहैः - यथायोग्यउद्योगतत्परैः मनुजैः । (६५) अपराद्धपृषत्कः - लक्ष्यच्युतः बाणः यस्य सः । पृषत्कः - बाणः । अपदानं - प्रशस्तं कर्म । (६६) कातर्यं - भीरुता । समभ्यधात् - अकथयत् । वराकः - दीनः । (६७) कार्मुककोविद - धनुर्विद्यानिपुण ।

करा अथवा करू नका. माझे बोलणे ऐकताना कटू वाटले तरी आपण ऐकावे मात्र जरूर.

एतन्मध्यमदेशस्था हेमाभा स्यादियं पुरी ।
क्षत्रियो दृढमित्रः स्यात्तत्प्रिया ललिताव्हया ॥ ६८ ॥

अर्थ :– या मगध नामक देशाच्या मध्यभागी हेमाभा नावाची नगरी आहे. तेथे दृढमित्र नावाचा क्षत्रिय असून ललिता नावाची त्याची पत्नी आहे.

सुमित्राद्यास्तयोः पुत्रास्तेष्वप्यन्यतमोऽस्म्यहम् ।
वयसैव वयं पक्वा विश्वेऽपि न तु विद्यया ॥ ६९ ॥

अर्थ :– सुमित्रादिक त्याचे पुत्र आहेत. त्यापैकी मी एक आहे. आम्ही सर्व या लोकीं वयाने मात्र वाढलो. परंतु विद्येने मात्र वाढलो नाही.

तातपादोऽयमस्माकं चापविद्याविशारदम् ।
विचिनोति न चेद्दोष एषोऽप्यालोक्यतामिति ॥ ७० ॥

अर्थ :– आमचे पिता धनुर्विद्येत निष्णात अशा गुरूच्या शोधात आहेत. जर त्यात काही वैषम्य वाटत नसेल तर आपण त्यांना भेटून घ्यावे.

तद्व्याहारे विसंवादो विदुषोऽप्यस्य नाजनि ।
विधिर्घटयतीष्टार्थैः स्वयमेव हि देहिनः ॥ ७१ ॥

अर्थ :– त्याच्या बोलण्यामध्ये व व्यवहारामध्ये विद्वान् जीवंधर कुमारास कांहीही विकल्प अथवा संशय उत्पन्न झाला नाही. म्हणून ते त्यांच्या बरोबर गेले. दैव जर अनुकूल असेल तर ते स्वतःहून इष्ट पदार्थाप्रत घेऊन जाते.

पार्थिवं च ततः पश्यंस्तद्वश्योऽभूच्च संमतः ।
अनुसारप्रियो न स्यात्को वा लोके सचेतनः ॥ ७२ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराने राजास पाहिले. तेव्हा राजानेही त्यांचा प्रेमपूर्ण आदरसत्कार केला. त्यामुळे त्यांचा राजावर विश्वास बसला. असा कोण चतुर

---

श्लोकांक (६९) अन्यतमः - एकः । विश्वेऽपि - सर्वेऽपि । (७१) व्याहारे - वचने, भाषणे । विधिः - कर्म । घटयति - संयोजयति ।



पुरुष असेल बरे की, जो आपणास अनुकूल माणसावर प्रेम करणार नाही ? तो प्रयोजनाची पूर्ति करतो म्हणून तेथे प्रेम असणे स्वाभाविकच आहे.

महीक्षिता क्षणात्तस्य माहात्म्यमपि वीक्षितम् ।
वर्पुवक्ति हि सुव्यक्तमनुभावमनक्षरम् ॥ ७३ ॥

अर्थ :– तत्क्षणीच राजाने कुमाराचे वैभव व मोठेपणा ओळखला. न बोलताही त्याचा प्रभाव अथवा ज्ञानाची समग्रता चेहऱ्यावरून स्पष्ट दृग्गोचर होते.

सुतविद्यार्थमत्यर्थं पार्थिवस्तमयाचत ।
आराधनैकसंपाद्या विद्या न ह्यन्यसाधना ॥ ७४ ॥

अर्थ :– राजाची मुले धनुर्विद्येत निष्णात व्हावीत या प्रयोजनाने राजाने त्यास खूप विनंती केली. आराधनेनेच विद्या मिळणे शक्य आहे. अन्य कोणत्याही उपायाने नाही.

अभ्यर्थनबलात्तस्य कुमारोऽप्यप्युभ्युपागमत् ।
स्वयं देयासति विद्या प्रार्थनायां तु किं पुनः ॥ ७५ ॥

अर्थ :– राजाच्या अत्यंत आग्रहामुळे कुमाराने मुलांना धनुर्विद्या शिकविण्याचे मान्य केले. विद्या तर स्वतःहून देण्याची वस्तू आहे. तर प्रार्थल्यानंतर तर देणे योग्यच आहे.

पवित्रोऽपि सुतान्विद्यां स प्रापदवञ्चितम् ।
कृतार्थानां हि पारार्थ्यमैहिकार्थपराङ्मुखम् ॥ ७६ ॥

अर्थ :– पवित्र कुमारानेही मोकळेपणाने सर्व पुत्रांना विद्या दिली. कृतार्थ महात्म्यांना परार्थाची-परोपकाराची प्रवृत्ती ही कोणत्याही ऐहिक प्रयोजनाची अपेक्षा न ठेवता असते.

प्रश्रयेण बभूवुस्ते प्रत्यक्षाचार्यरूपकाः ।

---

श्लोकांक (७३) महीक्षिता - राज्ञा । अनुभावं - प्रभावं । अत्यर्थं - अतीव । (७५) अभ्यर्थनबलात् - प्रार्थनासामर्थ्यात् । अभ्युपागमत् - स्वीकृतवान् । (७७) धात्रिपः - नृपः । समभावयत् - संमानं-आदरं कृतवान् ।

विनयः खलु विद्यानां दोग्ध्री सुरभिरञ्जसा ॥ ७७ ॥

अर्थ :– ती सर्व मुलेही विनयामुळे प्रत्यक्ष विद्यादात्या गुरूप्रमाणे निष्णात झालीत. खरोखरच विनय हीच सर्व विद्यांची - विद्या देणारी कामधेनूच आहे.

वीक्ष्य तानतृपद्भूपो विद्यानां पारदृश्वनः ।
पुत्रमात्रं मुदे पित्रोर्विद्यापात्रं तु किं पुनः ॥ ७८ ॥

अर्थ :– आपली मुले धनुर्विद्येत पारंगत झालेली पाहून राजास परम संतोष झाला. आईबापास पुत्र म्हणजेच सुखाचे निधान असतात. त्यांतही जर ते विद्याविभूषित असतील तर प्रश्नच नाही. विकल्पच नाही.

अतिमात्रं पवित्रं च धात्रिपः समभावयत् ।
असंभावयितुर्दोषो विदुषां चेदसंमतिः ॥ ७९ ॥

अर्थ :– त्या क्षत्रिय राजाने पुण्यात्मा कुमार, जीवंधराचा खूप आदरातिथ्यपूर्वक सन्मान केला. ज्ञानदात्या गुरूविषयी आदर उत्पन्न होत नाही हा विद्वत्तेचा व विद्वानांचा दोष नसून तो आदर न करणाऱ्याचा दोष आहे.

महोपकारिणः किं वा कुर्यामित्यप्यतर्कयत् ।
विद्याप्रदायिनां लोके का वा स्यात्प्रत्युपक्रिया ॥ ८० ॥

अर्थ :– अशा महान उपकारकर्त्यांचा प्रत्युपकार कसा करावा याचाही त्या राजाने खूप विचार केला. विद्यादात्या गुरूचा कोणताही प्रत्युपकार असूच शकत नाही.

कन्याविश्राणनं तस्मै करणीयमजीगणत् ।
शक्यमेव हि दातव्यं सादरैरपि दातृभिः ॥ ८१ ॥

अर्थ :– विचार करून विद्यादात्या जीवंधर कुमारास आपली मुलगी द्यावी असा राजाने विचार केला. दात्याने दानात द्यावयाची वस्तू देणे शक्य तर असणे जरूर आहे. परंतु ती सन्मानपूर्वकच द्यावयास हवी.

अभ्युपाजीगमत् पुत्रीं परिणेतुममुं पुनः ।

श्लोकांक (८१) विश्राणनं - प्रदानं, विरणं । अजीगणत् - निश्चयं अकरोत् ।



उदाराः खलु मन्यन्ते तृणायेदं जगत्त्रयम् ॥ ८२ ॥

अर्थ :– याप्रमाणे विचारांती राजाने जीवंधर कुमारास विचारले तेव्हा कुमाराने मुलीशी विवाह करण्याची अनुमती दिली. उदारचरित महापुरुष तीन लोकही तृणवत मानतात. देतांना ते न्यूनता दाखवितच नाहीत.

ततः कनकमालाख्यां कन्यां राज्ञा समर्पिताम् ।
पर्यणैषीत्पवित्रोऽयं पवित्रामग्निसाक्षिकम् ॥ ८३ ॥

अर्थ :– याप्रमाणे पावन जीवंधन कुमाराने अग्नीसाक्षीने अर्पण केलेल्या कनकमाला नामक मुलीशी विवाह केला.

इति श्रीमद्वादीभसिंहसूरिविरचिते क्षत्रचूडामणौ
कनकमालालम्भो नाम सप्तमो लम्बः ।
याप्रमाणे वादीभसिंहसूरिविरचित क्षत्रचूडामणि चरितकहाणीमध्ये कनकमाला प्राप्ती वर्णन करणारा सातवा लंब समाप्त झाला.

## अष्टम लंब

अथ तत्करपीडान्तेऽसक्तस्वान्तोऽभवत्सुधीः ॥
तीरस्थाः खलु जीवन्ति न हि रागाब्धिगाहिनः ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे कनकमालेशी विवाह झाल्यानंतर भोग घेवून कुमार तेथेच आसक्त झाले नाहीत. रागसागरामध्ये तीरावर असणारे तर जगतात. परंतु तेथे पोहणारे मात्र सुखी होत नाहीत.

स्यालानां तत्र वात्सल्यादवात्सीत्सुचिरं सुधीः ।
वत्सलेषु च मोहः स्याद्वात्सल्यं हि मनोहरम् ॥ २ ॥

अर्थ :– शालकांच्या प्रेमामुळे बुद्धिमान कुमार तेथे बराच काळ राहिलेत. वत्सल व्यक्तीमध्ये मोह असेल जर वात्सल्य हे मनोहर असते.

यापितोऽपि महाकालस्तस्य नोद्वेगमातनोत् ।
वत्सलैः सह संवासे वत्सरो हि क्षणायते ॥ ३ ॥

अर्थ :– तेथे बराच काळ घालविला तरीही त्यास उद्वेग भासला नाही. स्नेही मंडळीसोबत राहिले तर वर्षही क्षणासारखे वाटते.

कदाचित्कापि तत्प्रान्तं समन्दस्मितमासदत् ।
नैसर्गिकं हि नारीणां चेतः संमोहिचेष्टितम् ॥ ४ ॥

अर्थ :– एके दिवशी कोणी एक स्त्री मधुर स्मित करीत त्याचे जवळ आली. स्त्रियांचे मन स्वभावतःच मनास मोहित करत असते.

अप्राक्षीत्तां च साकूतां किमायातेति सादरः ।
विवक्षालिङ्गितं हि स्यात्प्रष्टुः प्रश्नकुतूहलम् ॥ ५ ॥

अर्थ :– विशिष्ट हेतू मनांत ठेवून आलेल्या तरुणीस पाहून कुमाराने

---

श्लोकांक (१) असक्तस्वान्तः - अत्यासक्तिं अकुर्वाणः । (२) वत्सलेषु - स्नेहविशिष्टेषु । (३) उद्वेगं - दुःखम् । यापितः - विलयं गतः । (४) चेतःसंमोहि - मनोहारि । (५) विवक्षालिङ्गितं - वक्तुं इच्छया सहितं ।



अत्यंत आदराने विचारले ''कसे काय येणे झाले ?'' विचारणाऱ्याचा त्याकाळातील प्रश्न कांहीतरी विवक्षेपूर्वक म्हणजे तिच्याकडून काही जाणून घेण्याच्या इच्छेने कुमारास प्रश्न होता.

अत्र चायुधशालायां चैकदैवाविशेषतः ।
स्वामिन्स्वामिनमद्राक्षमित्यसौ प्रत्यभाषत ॥ ६ ॥

अर्थ :– ''महाराज ! येथे आणि शस्त्रागारामध्ये एकाच वेळी मी आपणास सारख्याच स्वरूपात पाहिले.'' असे तिने प्रत्युत्तर दिले.

अतिमात्रं पवित्रोऽयमचित्रीयत तच्छ्रुतेः ।
अयुक्तं खलु दृष्टं वा श्रुतं वा विस्मयावहम् ॥ ७ ॥

अर्थ :– ते ऐकून पवित्र कुमार अत्यंत आश्चर्यचकित झाला. अयुक्त असे पाहिले किंवा ऐकले तर ते आश्चर्य उत्पन्न करणारे होते.

नन्दाढ्यः किमिहायात इत्ययं पुनरौहत ।
संसारविषये सद्यः स्वतो हि मनसो गतिः ॥ ८ ॥

अर्थ :– तो मनात विचार करू लागला ''काय नंदाढ्य तर आला नाही ?'' संसारातील गोष्टीकडे तात्काळ आणि स्वयं मन जात असते.

प्रागेव तन्मनोवृत्तेः प्रययौ तत्र तद्वपुः ।
आस्थायां हि विना यत्नमस्ति वाक्कायचेष्टितम् ॥ ९ ॥

अर्थ :– असा विचार मनात येतो न येतो त्यापूर्वीच नंदाढ्य कुमारासमोर उपस्थित झाला. जर आस्था असेल तर प्रयत्न न करताही वचन शरीराची प्रवृत्ती होत असलेली दिसून येते.

गत्वा तत्र च नन्दाढ्यं पश्यन्संमदसादभूत् ।
भ्रातुर्विलोकनं प्रीत्यै विप्रयुक्तस्य किं पुनः ॥ १० ॥

---

श्लोकांक (६) एकदैव - एकस्मिन्नेव समये । अविशेषतः - अभेदेन । (७) अचित्रीयत - विस्मयं चकार । (८) औहत - अतर्कयत् । सद्यः - आशु, अचिरेणैव । (१०) संमदसात् - आनंदभरितः । विप्रयुक्तस्य - बहुकालतः वियोगं प्राप्तस्य ।

अर्थ :– तेथे जाऊन नंदाढ्यास पाहून कुमार जीवंधर अत्यंत आनंदाने प्रसन्न चित्त झाले. भावास पाहणेच आनंदकारक असते. त्यांत चिर विरहानंतर जर तो पाहण्यात आला तर मग किती प्रसन्नता होईल ?

अनुजोऽपि तमालोक्य मुमुचे दुःखसागरात् ।
विस्मृतं हि चिरं भुक्तं दुःखं स्यात्सुखलाभतः ॥ ११ ॥

अर्थ :– लहान भावानेही कुमारास पाहून तो विरहाच्या दुःख सागराच्या यातनेतून मुक्त झाला. दीर्घ काळाने जरी सुख लाभले तरी दीर्घकाळ भोगलेले दुःखही तात्काळ विसरल्यासारखे होते.

कथमाया इति ज्यायानन्वयुङ्क्त मिथोऽनुजम् ।
वञ्चनं चावमानं च न हि प्राज्ञैः प्रकाश्यते ॥ १२ ॥

अर्थ :– कुमार जीवंधराने तेथे आलेल्या आपल्या भावास पाहून विचारले 'तूं येथे कसा आलास ?'' असे एकांतात विचारले. बुद्धिमान पुरुष आपला अपमान वा फसगत चार चौघात प्रगट करत नसतात.

सखेदं ध्यातदुःखोऽयमाचख्यौ वृत्तिमात्मनः ।
ध्यातेऽपि हि पुरा दुःखे भृशं दुःखायते जनः ॥ १३ ॥

अर्थ :– खेदपूर्वक दुःखाच्या चिंतेने पीडित असा नंदाढ्य आपला सर्व वृत्तांत सांगू लागला. पूर्वी अनुभवलेल्या दुःखाची आठवण झाली की, मनुष्याचे दुःख अधिक भासल्यामुळे लोक अति कष्टी होतात.

पूज्यपाद तदास्माकं पापाद्भवति निर्गते ।
मृतकल्पोऽप्यहं मर्तुं सर्वथा समकल्पयम् ॥ १४ ॥

अर्थ :– ''आमच्या पापोदयाने आपण निघून गेल्यानंतर मी तर मृतवत् झालो होतो. तरी जर आपली भेट झालीच नाही तर प्राणत्याग करण्याचे योजिले होते.

---

श्लोकांक (१२) आयाः - समागतोऽसि । मिथः - एकान्ते । (१३) ध्यातेऽपि - स्मृते सत्यपि । (१४) मृतकल्पः - मृतप्रायः ।



विद्याविदितवृत्तान्ता कथं वृत्ता प्रजावती ।
इत्यालोच्यैव संस्थाने बोधो मे समजायत ॥ १५ ॥

अर्थ :– ''जी विद्येच्या सामर्थ्यामुळे सर्व वृत्तांत मिळवून जाणण्यास माझी भावजय गंधर्वदत्ता समर्थ होती. तिची परिस्थिति काय असेल असा विचार करून मला योग्य काळी सन्मती सुचली. तसेच तिला अवलोकिनी विद्या असल्यामुळे तिच्याकडून आपला समाचार मिळेल या आशेने भाभीकडे जाण्याचे योजिले.

एवं भाविभवद्दृष्टिशंभरत्वादहं पुनः ।
प्रजावतीगृहं प्राप्य सविषादमवास्थिषम् ॥ १६ ॥

अर्थ :– ''भविष्यांत (नजिकच्या) आपल्या दर्शनाचे सुख प्राप्त होईल या आशेने गंधर्वदत्तेच्या घरी जाऊन दुःखाने खाली बसलो.

स्वामिनि स्वामिहीनानां कुतः स्त्रीणां सुखासिका ।
इति वक्तुमुपक्रान्ते हृदयज्ञा तु साभ्यधात् ॥ १७ ॥

अर्थ :– आणि ''हे स्वामिनी ! पतिविरहाने पोळलेल्या स्त्रियांना सुखवास कोठून असणार ?'' असे बोलण्यास मी प्रारंभ करताच मनोवृत्ती जाणणारी गंधर्वदत्ता भावजय म्हणाली.

अङ्ग किं खिद्यसे ज्यायाननुपद्रव एव ते ।
वयमेव महापापा मध्ये दुःखाब्धिपातिताः ॥ १८ ॥

अर्थ :– ''हे बाळ ! आतां तूं कष्टी का होतोस. तुझे वडील बंधू चतुर आहेत; अत्यंत सुखामध्ये आहेत. आम्ही मात्र महापापी दुःखसागरात पडलो आहोत.''

---

श्लोकांक (१५) विद्याविदितवृत्तान्ता - अवलोकिन्याख्या विद्यया विदितं वृत्तांतं यया । प्रजावती - भ्रातृजाया । गंधर्वदत्ता संस्थाने - योग्यस्थाने । (१६) भाविभवद्दृष्टिशंभरत्वात् भवतां दृष्टिः भवत्दृष्टिः भाविनी च भवत् दृष्टिः भाविभवत्दृष्टिः । सैव च शं, तस्य भरः, तत्वात् । अवास्थिषम् - अहं स्थितः । (१७) सुखासिका - सुखस्थितिः; सुखावस्था । उपक्रान्ते - प्रारब्धे सति । हृदयज्ञा - हृदयं जानाति इति (उप० त०) (१८) अनुपद्रवः - सुखेन अवतिष्ठते इत्यर्थः । ज्यायान् - पूर्वजः, ज्येष्ठभ्राता ।

प्रतिदेशं प्रतिग्रामं प्रतिगृह्यैव मह्यते ।
विपद्य संपदे हि स्याद्भाग्यं यदि पचेलिमम् ॥ १९ ॥

अर्थ :– ती पुढे बोलू लागली, 'त्यांचा तर देशोदेशी प्रत्येक गावात आदरपूर्वक सत्कार होत आहे. भाग्य सफल असेल तर आपत्ती देखील वैभवाला कारण होते.'

द्रष्टुमिच्छसि चेद्वत्स तं जनं तव पूर्वजम् ।
किं नु ताम्यसि गम्येत क्व नु पापा हि भामिनी ॥ २० ॥

अर्थ :– 'हे बाळ ! त्यांना पाहण्याची तुझी इच्छा असेल तर असा दुःखी कां होतोस ? मी दुर्दैवी स्त्रीजात असल्यामुळे मला कसे जाता येईल ? पण तूं जा.'

इत्युक्त्वा शाययित्वा च शय्यायां साभिमन्त्रितम् ।
मामत्रभवती चात्र सपत्रं प्राहिणोदिति ॥ २१ ॥

अर्थ :– ''असे बोलून तिने मला शय्येवर झोपविले. मंत्र उच्चारून पत्रासहित येथे पाठविलेले आहे.''

अखिद्यत ततः स्वामी सदयैरनुजोदितैः ।
स्नेहपाशो हि जीवानामासंसारं न मुञ्चति ॥ २२ ॥

अर्थ :– असे हे करूणा वाटावे असे बोलणे ऐकून स्वामींना खेद झाला. संसार आहे तोवर प्राणी प्रेमबंधनातून मुक्त होऊ शकत नाही.

गुणमालाव्यथाशंसि पत्रं चायमवाचयत् ।
चतुराणां स्वकार्योक्तिः स्वमुखान्न हि वर्तते ॥ २३ ॥

अर्थ :– गंधर्वदत्तेने पाठविलेले पत्र कुमाराने वाचले. त्या पत्रात गुणमालेच्या विरहव्यथेचे वर्णन केले होते. चतुर पुरुष आपले दुःख आपले मुखाने सांगत नाही. दुसऱ्याचे नाव पुढे करून त्याद्वारा आपला अभिप्राय सूचित करतात.

---

श्लोकांक (१९) प्रतिगृह्यैव - स्वागतं कृत्वैव । मह्यते - पूज्यते । पचेलिमं - फलोन्मुं । (२०) ताम्यसि खेदं प्राप्नोषि, दुःखीभवसि । गम्येत - त्वया इति संबंधः । क्व - कुत्र गच्छेत् इत्यर्थः । (२३) गुणमालाव्यथाशंसि - गुणमालया अनुभूयमानस्य विरहवेदना - प्रकारस्य प्रख्यापकं ।



अन्योपदेशसंदेशात्खेचर्यां खेदवानभूत् ।
विद्वेषः पक्षपातश्च प्रतिपात्रं च भिद्यते ॥ २४ ॥

अर्थ :– गुणमालेच्या नावाने लिहून गंधर्वदत्तेने आपले दुःख सूचित केल्यामुळे कुमारांना गंधर्वदत्तेसाठी विषाद वाटला. मानवास असलेला द्वेष किंवा पक्षपात व्यक्तिपरत्वे वेगळा वेगळा असतो.

प्रियाशोकश्रुतेर्जातः शोकोऽप्येतस्य नास्फुरत् ।
न हि प्रसादखेदाभ्यां विक्रियन्ते विवेकिनः ॥ २५ ॥

अर्थ :– प्रिय पत्नीच्या शोक संदेशाने स्वामींना दुःख झाले. पण ते त्यांनी प्रगट केले नाही. विवेकी मनुष्य प्रसाद, आनंद किंवा खेद होतो तेव्हा सुखी दुःखी होत नाही.

वैवाहिकगृहस्थाश्च ह्यातस्थुरनुजं भृशम् ।
बन्धोर्बन्धौ च बन्धो हि बन्धुता चेदवञ्चिता ॥ २६ ॥

अर्थ :– जीवंधराच्या श्वसुरगृहातील सर्वांनी नंदाढ्याचे ही खूप स्वागत व आदर-सत्कार केला. बंधूचे प्रेम निर्व्याज असेल, सहज असेल तर बंधूच्या बंधुवरही बंधुवतच प्रेम होते.

अवस्कन्दाद्गवां गोपा अथाक्रोशन्नृपाङ्गणे ।
पीडायां तु भृशं जीवा अपेक्षन्ते हि रक्षकान् ॥ २७ ॥

अर्थ :– ''आपण इकडे आदरसत्कार घेत घेत सुखाने कालक्रमणा करत असताना राजपुरीमध्ये मात्र काही गवळी त्यांच्या गायी चोरून नेल्यामुळे राजवाड्यासमोर आक्रोश करत होते. खूप त्रास होतो तेव्हा प्राणीमात्र रक्षकांची अपेक्षा करतातच.''

---

श्लोकांक (२४) अन्यापदेशसंदेशात् - अन्यापदेशरूपवाचिकात् । अपदेशेन - मिषेण; व्याजेन । प्रतिपात्रं - वस्तुनि वस्तुनि । (२५) प्रियाशोकश्रुते - गंधर्वदत्तादुःखश्रवणात् (२६) वैवाहिकगृहस्था - वैवाहिकस्य श्वशुरस्य दृढमित्रस्य राज्ञः गृहे स्थिताः । आतस्थुः - परिवव्रुः, समन्वात् स्थिताः, परितःस्थिताः । अनुजं - नन्दाढ्यं । बन्धः - प्रेमबन्धः । वञ्चिता - आकृत्रिमा । (२७) अवस्कन्दात् - बलात् चोरितत्वात्, अभिभवात्, अभिद्रवात् ।

सानुक्रोशं तदाक्रोशं क्षमाधीशो न चक्षमे ।
पातापायान्न चेत्पायात्कुतो लोकव्यवस्थितिः ॥ २८ ॥

अर्थ :– असे हे करुणेने ओथंबलेले नंदगोपाचे रडणे व बोलणे राजा दृढमित्रास सहन झाले नाही. संकटे येवून पडली असताना जर बचाव झाला नाही तर जगांत सुव्यवस्था कशी राहील ?

स्वामी श्वशुररुद्धोऽपि गोमोचनकृते ययौ ।
पराभवो न सोढव्योऽशक्तैः शक्तैस्तु किं पुनः ॥ २९ ॥

अर्थ :– जीवंधर कुमार श्वसुर दृढमित्राने रोकले तरीही गायीची सुटका करावयासाठी निघाले. अशक्तानेही पराभव सहन करू नये. जर तो सशक्त असेल तर तो कसा सहन करील ?

दस्यवोऽपि गवां तत्र मित्राण्येवाभवन्विभोः ।
एधोगवेषिभिर्भाग्ये रत्नं चापि हि लभ्यते ॥ ३० ॥

अर्थ :– कुमारास पाहून गायी चोरणारेही त्याचे मित्रच झाले. दैवाची अनुकूलता असेल लाकूड शोधणाऱ्यासही रत्नाची प्राप्ती होईल.

समोऽभूत्स्वामिमित्रेषु स्नेह श्चान्योन्यवीक्षणात् ।
एककोटिगतस्नेहो जडानां खलु चेष्टितम् ॥ ३१ ॥

अर्थ :– स्वामी आणि मित्रगणाने एकमेकास पाहून त्यांना अतिशय आत्मीयता वाटली. एकतर्फी प्रेम हे मूर्ख वा कपटी लोकांचे कार्य आहे.

जामातरि चमत्कारो राज्ञोऽभून्मित्रवीक्षणात् ।
कृतिनोऽपि न गण्या हि वीतस्फीतपरिच्छदाः ॥ ३२ ॥

अर्थ :– शत्रूही मित्र झालेले पाहून श्वसुरांना खूप आनंद झाला. पुण्यवान् एकाकी असले तरीही ते बलहीन समजू नये. पुण्याचे बलही अपरिमित असते.

---

श्लोकांक (२८) पाता - रक्षणकर्ता । व्यवस्थितिः - सुव्यवस्था । (२९) गोमोचनकृते - गवां मोचनार्थं । (३०) दस्यवः - तस्कराः एधोगवेषिभिः - काष्ठान्वेषिभिः । भाग्ये इत्यत्र सतीति शेषः । (३१) एककोटिगतः - एकपक्षगतः । (३२) चमत्कारः - लोकातीतवस्तुदृष्ट्या चित्तस्य आनन्दहेतुः वीतस्फीतपरिच्छदाः - वीतः विनाकृतः समृद्धः परिच्छदः परिवारः येषां ते ।



समित्रावरजो हृष्यदतिमात्रमसौ कृती ।
एकेच्छानामतुच्छानां न ह्यन्यत्संगमात्सुखम् ॥ ३३ ॥

अर्थ :– स्वामी मित्रमंडळीसहित लहान भावास पाहून अत्यंत आनंदित झाले. एकाच आत्मीयतेने भारावलेली उदार माणसे - जर एकत्र आलीत तर तो सहवास अतिशय सुखकर असतो. अन्य संगमापासून सुख नसते.

अयथापुरसंमानात्समशेत सखीनसौ ।
विशेते हि विशेषज्ञो विशेषाकारवीक्षणात् ॥ ३४ ॥

अर्थ :– मित्रमंडळीकडून अधिक विशेष आदरसत्कार होत असलेला पाहून कुमारास संशय उत्पन्न झाला. विशेष ज्ञानीच्या विशेष क्रिया पाहून संशय वाटणे स्वाभाविकच आहे.

रहस्येव वयस्येषु तन्निदानमचोदयत् ।
एककण्ठेषु जाता हि बन्धुता ह्यवतिष्ठते ॥ ३५ ॥

अर्थ :– संशयनिवारण व्हावे म्हणून कुमाराने त्या मित्रांना या सर्व सोपस्काराचे कारण विचारले. जर एकात्मता असेल तर बंधूता टिकून राहते.

मुख्यं सख्यं गतस्तेषामाचख्यौ पङ्कजाननः ।
सज्जनानां हि शैलीयं सक्रमारम्भशालिता ॥ ३६ ॥

अर्थ :– त्यापैकी पद्मास्य नावाच्या एक विशेष मित्राने आपला वृत्तांत सांगण्यास प्रारंभ केला. सज्ञनाची अशीच पद्धत असते की कोणत्याही बाबीचा प्रारंभ क्रमाक्रमाने करतात.

स्वामिन्स्वामिवियोगेऽ पि युक्ता दग्धासुभिर्वयम् ।
अस्तोकभाविभाग्येन हस्तग्राहं ग्रहादिव ॥ ३७ ॥

---

श्लोकांक (३३) समित्रावरजः - मित्रैः अवरजैः अनुजैः बंधुभिश्च सहितः । अतिमात्रं - अतिशयेन । एकेच्छानां - सहमतानां, समानशीलानां । अतुच्छानां - अहीनानां, तुल्यानां । (३४) अयथापुरसंमानात् - यथापूर्वं नाभवत् तथा संमानात् समशेत - संशयितवान् बभूव । विशेते - संशेते । (३५) अचोदयत् - पप्रच्छ (३६) पंकजाननः - पद्मास्यः । सक्रमारंभशालिता - क्रमपूर्वककार्यारंभशीलत्वं (३७) अस्तोकं - महत् । हस्तग्राहं ग्रहात् - हस्तावलंबनयोगात् ।

अर्थ :– ''महाराज ! आपला वियोग झाल्याने आमचे प्राणही जळाल्यागत झाल्यासारखे वाटले. पुढे केव्हातरी महद्भाग्याने आपले दर्शन होईल या आशेने कसेबसे जिवंत आहोत.

साश्वासाश्च ततो देव्या दत्तहस्तावलम्बनाः ।
प्रास्थिष्महि धुरं प्राप्ता वयमश्वीयपाणिनाम् ॥ ३८ ॥

अर्थ :– धीर सुटल्यामुळे आम्हा खेदखिन्न मित्रमंडळीस गंधर्वदत्तेच्या बोलण्याने धीर आला. आधार लाभला. घोडे विकण्याच्या धंद्याचे पुढारी म्हणून तेथून निघालो.

अतिलङ्घ्य ततोऽध्वानमध्वश्रमविहानये ।
दण्डकारण्यविख्यातं तापसाश्रममाश्रिताः ॥ ३९ ॥

अर्थ :– बरीच पायपीट झाल्यानंतर परिश्रमाने आलेला थकवा घालविण्यासाठी म्हणून दंडकारण्यातील एका प्रशस्त आणि प्रसिद्ध आश्रमामध्ये आम्ही थांबलो. तेथे ठाण मांडले.

दर्शंदर्शं ततो दृश्यं विहरन्तोऽत्र विश्वतः ।
अपश्याम क्वचित्कांचित्पुण्यतः पुण्यमातरम् ॥ ४० ॥

अर्थ :– इकडे तिकडे भटकत असतांना, निरनिराळी सृष्टी शोभा पाहता पाहता आम्ही महत्पुण्याने महान् पुण्यशाली मातेला पाहिले.

तन्मात्रा दृष्टमात्रेण कुत्रत्या इति चोदिताः ।
वयमप्युत्तरं वक्तुमुपक्रम्य यथाक्रमम् ॥ ४१ ॥

अर्थ :– त्या मातेनेही पाहून आम्हास विचारले की ''आपण कोठून आलात ?'' आम्ही सुद्धा उत्तर देण्यास प्रारंभ केला.

---

श्लोकांक (३८) साश्वासा३ - आश्वासनसहिताः । प्रास्थिष्महि - प्रस्थानं अकुर्म । अश्वीयपाणिनां - अश्वानां समूहः अश्वीयं पणितुं विक्रेतुं शीलं येषां ते । (३९) अध्वानं - बहुदूर - तरमार्गं । अध्वश्रमविहानये - मार्गाक्रमणश्रमपरिहाराय; विश्रांतिसुखानुभवाय । (४०) विश्वस्तः - सर्वप्रदेशेषु। दृश्यं - मनोहरं, दर्शनीयं । दर्शं दर्शं - दृष्ट्वा दृष्ट्वा (४१) चोदिताः - पृष्टाः । दृष्टमात्रेण - दर्शनोत्तरकाल एव ।



अस्ति राजपुरे कश्चिद्विबुधानामपश्चिमः ।
विशां च जीवकाख्योऽयमेतं जीवातुका वयम् ॥ ४२ ॥

अर्थ :– ''या राजपुरी नगरीत कोणीतरी सर्वश्रेष्ठ विद्वान् आणि वैश्यांचा विख्यात श्रेष्ठी, त्याचे नाव जीवक असे आहे, त्याचे आम्ही सर्व दास आहोत.

काष्ठांङ्गाराह्वयः कोऽपि कोपादेनमनेनसम् ।
हन्तुं किलेत्यवोचाम मूच्छिता सा च पेतुषी ॥ ४३ ॥

अर्थ :–''काष्ठांगार नामक कोणी एक दुष्ट निष्पाप कुमारास मारण्यात....'' एवढे बोलणार तोच ती मूर्च्छित पडली.

हन्त हन्त हतो नायमम्बेत्यभिहिता मया ।
पिहितासुप्रयाणा सा प्रालपल्लब्धचेतना ॥ ४४ ॥

अर्थ :–''अरेरे ! अरेरे !! तो मारल्या गेला नाही !'' असे मी म्हणालो तेव्हा ती शुद्धीवर आली. तिचा प्राण गेलेला नव्हता. ती मोठ्याने गळा काढून रडू लागली. शोक करू लागली.

अम्भोदालीव दम्भोलीममृतं च मुमोच सा ।
देवी समं प्रलापेन देवोदन्तमदिन्तया ॥ ४५ ॥

अर्थ :–''ज्याप्रमाणे मेघमालेपासून वज्रपात आणि जलवर्षा एकदमच होते त्याप्रमाणे त्या मातेने रडत रडत आपला वृत्तांत सांगितला. (तिचा प्रलाप वज्रपाताप्रमाणे व वृत्तांत जलवृष्टीप्रमाणे वाटला.)

तन्मुखात्खादिवोत्पन्नां रत्नवृष्टिं तवोन्नतिम् ।
उपलभ्य वयं लब्धाममन्यामहि तन्महीम् ॥ ४६ ॥

अर्थ :–''आकाशातून रत्नवृष्टी व्हावी त्याप्रमाणे मातेच्या मुखातून आपली उन्नति व सत्काराचा समाचार ऐकून आम्हास ते राज्य मिळाल्या सारखेच वाटले.

---

श्लोकांक (४२) अपश्चिमः - अग्रणीः । जीवातुकाः - जीवंधरस्य अनुजीविनः । (४३) अनेनसम् - निरपराधिनं । मूच्छितां - नष्टसंज्ञा । (४४) पिहितासुप्रयाणा - निरुद्धप्राणप्रयाणा । लब्धचेतना - लब्धसंज्ञा । (४५) अमीदालीव - मेघमालेव । दम्भोलिं - अशनिं, वज्रधनूः । अमृतं - जलं । देवोदन्तं - देवस्य जीवकस्य वृत्तान्तं । (४६) खात् - आकाशात् ।

देव वैभवसंकीर्त्या ततो देवीं पुनः पुनः ।
आश्वास्यापृच्छ्य तद्देशादिमं देशं गता इति ॥ ४७ ॥

अर्थ :–''आम्ही आपल्या ऐश्वर्याचे गुणांचे संकीर्तन करून तिच्या अंतःकरणात धैर्य उत्पन्न केले. आणि तेथून या देशात आलो आहोत.

मातुर्जीवन्मृतिज्ञानात्तत्त्वज्ञः सोऽप्यखिद्यत ।
जीवानां जननीस्नेहो न ह्यन्यैः प्रतिहन्यते ॥ ४८ ॥

अर्थ :–''आपली माता जिवंत असूनही तिची अवस्था मृतवत् असे ऐकून तत्त्वज्ञ जीवंधर कुमारासही दुःख झाले. मानवाची मातृभक्ती कोणत्याही कारणाने नष्ट होऊ शकत नाही.

अत्वरिष्ट च तां द्रष्टुं कौरवो गुरुगौरवः ।
अम्बामदृष्टपूर्वां च द्रष्टुं को नाम नेच्छति ॥ ४९ ॥

अर्थ :–''मातापितादि वडीलधाऱ्या मंडळीचा सन्मान राखतांना आदर ठेवणारे जीवंधर तिचे दर्शन घेण्यास अत्यंत आतुर झाले. पूर्वी न पाहिलेल्या मातेस पाहण्याची उत्कंठा कोणास लागणार नाही ?

व्यस्मारि मातरि स्नेहान्मान्येनान्यदशेषतः ।
रागद्वेषादि तेनेव बलिष्ठेन हि बाध्यते ॥ ५० ॥

अर्थ :–मान्यवर जीवंधर कुमार मातृप्रेमाने अन्य सर्व विसरून गेले सर्वसाधारण रागादि विकार त्यापेक्षा बलवान् मातृस्नेहाने पार मावळून जातात.

अन्वजिज्ञपदात्मीयां गतिं भार्यां परानपि ।
आवश्यकेऽपि बन्धूनां प्रातिकूल्यं हि शल्यकृत् ॥ ५१ ॥

अर्थ :– स्वामींना आपला तिथे जाण्याचा विचार आपल्या सर्व नातलगांना सांगितला. साहजिकच आहे, ''अत्यंत आवश्यक कार्यामध्ये कुटुंबीजनांची प्रतिकूलता शल्याप्रमाणे टोचत असते.

---

श्लोकांक (४७) तद्देशात् - माताया आदेशात् । (४८) जीवन्मृतिज्ञानात् - देशांतरवर्तित्वात् जीवितापि मृतवत्परिकल्पनया । (४९) अत्वरिष्ट - शिघ्रतां कृतवान् । (५०) तेनैव इत्येत्र मातृस्नेहेन । (५१) गतिं - गमनं । आवश्यके - आवश्यककार्ये ।



अनुनीयानुगान्बन्धून्प्रसभं प्रययौ ततः ।
अनुनयो हि माहात्म्यं महतामुपबृंहयेत् ॥ ५२ ॥

अर्थ :– निरोप देण्यास आलेल्या आपल्या श्यालकांची व मित्रमंडळींना आश्वासन देवून स्वामींनी त्यांना आपला मनोदय स्पष्ट करून सांगितला व ते तात्काळ पुढे निघाले.

प्रसवित्रीं ततः प्रेक्ष्य प्रेमान्धोऽभूदवन्ध्यधीः ।
तत्वज्ञानतिरोभावे रागादि हि निरङ्कुशम् ॥ ५३ ॥

अर्थ :– तेथून निघून कुमार आपल्या मातेजवळ पोचले. तिला पाहतांच ते प्रेमाने अत्यंत खेदखिन्न झाले. तत्त्वज्ञान बाजूला सारले तर सुखदुःखादि विकारावर आपला ताबा राहात नाही.

जातजातक्षणत्यागाज्जातं दुर्जातमक्षिणोत् ।
सुतवीक्षणतो माता सुतप्राणा हि मातरः ॥ ५४ ॥

अर्थ :– पुत्रास जन्मतःच सोडावे लागल्यामुळे मातेस जे दारुण दुःख झाले होते ते सर्व दुःख पुत्रास पाहताच जणू नष्ट झाले ! खरंच पुत्र हाच तर मातेचा प्राण असतो !

सूनोर्वीक्षणतस्तृप्ता क्षोणीशं तमियेष सा ।
लाभं लाभमभीच्छा स्यान्न हि तृप्तिः कदाचन ॥ ५५ ॥

अर्थ :– पुत्रास पाहिल्या कारणाने तत्क्षणीच आपल्या बाळाने राजा व्हावे असे तिला तात्काळ वाटले. एका लाभानंतर अन्य लाभ झाला तर इच्छा वाढतच राहते. तृप्ती कधीही होत नाही.

कच्चित्पितुः पदं ते स्यादङ्ग पुत्रेत्यचोदयत् ।

---

श्लोकांक (५२) अनुगान् - अनुयायिनः स्याला दीन् बंधून् । प्रसभं - हठात् । अनुनयः - विनयः । उपबृंहयेत् - वृद्धिं नयति वर्धयेत् । (५३) प्रसवित्रीं - जननीं । अवन्ध्यधीः - अवन्ध्या सफला कार्यनिष्पादनदक्षा धीः यस्य । तिरोभावे - विलोपे । (५४) जातजातक्षणत्यागात् - जातस्य पुत्रस्य जातक्षणे एव जननान्तरकाले एव त्यजनात् (प्रसवनात्) । दुर्जातं - दुःखं । (५५) क्षोणीशं तं इयेष - तस्य राज्यप्राप्तिं आचकाङ्क्ष । लाभंलाभं - एकतरलाभात् अन्यतरलाभाय । (५६) कच्चित् - कदा । विकलं - रहितं ।

सामग्रीविकलं कार्यं न हि लोके विलोकितम् ॥ ५६ ॥

अर्थ :– ''हे पुत्र ! बाळा ! तुला तुझ्या पित्याचे पद कधीतरी लाभेल कां?'' असे ती त्यास म्हणाली. कारण साधनसामग्रीचा योग असल्याशिवाय कार्याची सिद्धी झालेली दिसत नाही.

अम्ब ! किं वत खेदेन बाढं स्यादिति सोऽभ्यधात् ।
मुग्धेष्वतिविदग्धानां युक्त हि बलकीर्तनम् ॥ ५७ ॥

अर्थ :– कुमार म्हणाला 'आई ! अशी दुःखी कां होतेस ? पुरे झाले तुझे खेद करणे ! राज्यपद जरूरच प्राप्त होईल. त्यात मुळीही शंका नको'' चतुर माणसाने मुग्ध मातेसमोर आपले सामर्थ्य प्रगट करणे हे योग्यच आहे.

पुत्रवाक्येन हस्तस्थां मेने माता च मेदिनीम् ।
मुग्धाः श्रुतविनिश्चेया न हि युक्तिवितर्किणः ॥ ५८ ॥

अर्थ :– मुलाच्या या आश्वासनामुळे मातेला असे वाटू लागले की जणू राज्यच आपल्या हाती आले आहे ! मुग्धांना तर कोणतीही गोष्ट ऐकूनच आपल्या मनाचा निश्चय होतो.

अपायस्थानमस्तोकं दूरक्षं व्याहरद्विभोः ।
अमित्रो हि कलत्रं च क्षत्रियाणां किमन्यतः ॥ ५९ ॥

अर्थ :– विजया राणीने आपल्या पुत्रास राज्यपद प्राप्त करण्यातील अडचणी व राज्य राखण्यातील अडचणी याची जीवंधर कुमाराशी चर्चा करून जाणीव दिली. क्षत्रियाच्या स्त्रिया सुद्धा शत्रू असू शकतात. तर मग इतरांची कथा काय ?

कर्तव्यं च ततो मात्रा मन्त्रितं तेन मन्त्रिणा ।
विचार्यैवेतरैः कार्यं कार्यं स्यात्कार्यवेदिभिः ॥ ६० ॥

अर्थ :– यानंतर त्या विचारशील कुमाराने आपल्या मातेसह कर्तव्याचा

श्लोकांक (५७) बाढं स्यात् - तथास्तु । विदग्धानां - पंडितानां । (५८) मेदिनीं - पृथ्वीं श्रुतविनिश्चेया - परप्रत्ययनेयबुद्धयः । (५९) दुरक्षं - कृच्छ्रेण रक्ष्यम् । अस्तोकं महत् । अमित्रः - शत्रुः । अमति गच्छति; 'अमेर्द्विषति चित्' इति इन्नन् । (६०) तेन मंत्रिणा - अवश्यं मंत्रयते इति मंत्रिन्, तेन जीवधरेण ।



विचार केला - कर्तव्य जाणणाऱ्या इतरांसह विचार करूनच कार्य करावे हेच चांगले.

प्राहिणोत्प्रसवित्रीं तां मातुलोपान्तिके कृती ।
न हि मातुः सजीवेन सोढव्या स्याद् दुरासिका ॥ ६१ ॥

अर्थ :– विवेकी कुमाराने मातुश्रीला मामाकडे पाठवून दिले. मातेची होणारी दुरवस्था कोणताही जीव सहन करू शकत नाही.

ततः सपरितोषोऽयं परिव्राजकपार्श्वतः ।
निकषा स्वपुरं प्राप्य तदारामे निषण्णवान् ॥ ६२ ॥

अर्थ :– तदनंतर आश्रमातील तपस्वी जनांचा निरोप घेवून अत्यंत हर्षित होऊन कुमार व मित्र आपल्या गावाजवळ पोचले व तेथे गावाबाहेर बगिच्यात राहिले.

तत्र मित्राण्यवस्थाप्य व्यहरत्परितः पुरीम् ।
विशृङ्खला न हि क्वापि तिष्ठन्तीन्द्रियदन्तिनः ॥ ६३ ॥

अर्थ :– तेथेच मित्रांना ठेवून कुमार नगरीच्या भोवती फिरू लागले व निरीक्षण करू लागले. अनियंत्रित इंद्रियरूपी हत्ती कोठेही एके जागी निश्चल राहत नाही.

ततो राजपुरीं वीक्ष्य सुतरामतृपत्सुधीः ।
ममत्वधीकृतो मोहः सविशेषो हि देहिनाम् ॥ ६४ ॥

अर्थ :– आपली पितृनगरी राजपुरीला पाहून कुमारास अति हर्ष झाला. 'ही वस्तु आपली आहे' हे कळल्यानंतर त्या वस्तुवर मनुष्याचा विशेष लोभ असणे स्वाभाविकच आहे.

क्रीडन्ती कापि हर्म्याग्रात्पातयामास कन्दुकम् ।
संपदामापदां चाप्तिर्व्याजेनैव हि केनचित् ॥ ६५ ॥

अर्थ :– एवढ्यात कोणी एक युवती वाड्याच्या शिखरावरून चेंडू खाली

श्लोकांक (६१) उपान्तिके - समीपे । दुरासिका - दुरवस्था । (६२) परिव्राजकपार्श्वतः - दंडकारण्यवर्तितापसजनसमीपतः । निकषा - समीपं । (६३) विश,ङ्खलाः - अप्रतिबन्धाः ।

फेकती झाली. संपत्ती अथवा विपत्तीचा लाभ हा कोणत्यातरी व्याजानेच होत असतो.

उद्वक्त्रस्तद्वतीं सूत्यां दृष्ट्वामुह्यदबाह्यधीः ।
वशिनां हि मनोवृत्तिः स्थान एव हि जायते ॥ ६६ ॥

अर्थ :– वर मान करून पाहतो तो ती कन्या पाहून बाह्यपदार्थामध्ये ज्यांची बुद्धी नाही असे कुमार तिच्यावर मोहित झाले. संयमी पुरुषांची वृत्ती अस्थानी कधीही प्रवृत्त होत नाही.

तन्मोहादयमध्यास्त तत्सौधाग्रवितर्दिकाम् ।
अञ्जसा कृतपुण्यानां न हि वाञ्छापि वञ्चिता ॥ ६७ ॥

अर्थ :– कुमार जीवंधर त्या कन्येवरील प्रेमामुळे त्या वाड्याच्या समोरील ओट्यावर बसले. पुण्यवंताचे मनोरथ कधीही निष्फळ होत नाहीत. ते पूर्णच होतात.

वैश्येशः कोऽपि तं पश्यन्व्याजहे विकसन्मुखः ।
चिरकाङ्क्षितसंप्राप्त्या प्रसीदन्ति हि देहिनः ॥ ६८ ॥

अर्थ :– स्वामींना पाहताच आनंदाने प्रफुल्लित वैश्यश्रेष्ठ त्याचेजवळ येऊन म्हणाला, बऱ्याच दिवसानंतर इच्छित वस्तूची प्राप्ती ही जीवांना आनंददायकच असते.

भद्र ! सागरदत्तोऽहं भवत्येष ममालयः ।
विमला कमलोद्भूता सुता सूत्या च साभवत् ॥ ६९ ॥

अर्थ :– हे भद्र ! माझे नाव सागरदत्त आहे. हा माझाच वाडा आहे. पत्नी कमलेची ही विमला नामक माझी सुकन्या आहे व ती नवयौवना आहे.

रत्नजालमविक्रीतं विक्रीयेत यदागमे ।
भाविज्ञास्तं पतिं तस्याः समुत्पत्तावजीगणन् ॥ ७० ॥

---

श्लोकांक (६६) उद्वक्त्रः - उपरितनकृतवदनः; उन्नमितवदनः । सूत्यां - युवतीं । (६७) तत्सौधाग्रवितर्दिकां - प्रासादाग्रवेदिकां । वञ्चिता - निष्फला । (७०) यदागमे - यस्य आगमने । भाविज्ञाः - निमित्तज्ञाः । समुत्पत्तौ - जन्मकाले ।



अर्थ :– तिच्या जन्मसमयी भविष्यज्ञांनी असे भविष्य वर्तविले होते की "ज्यांचे आगमन झाले असता "बऱ्याच दिवसापासून पडून असलेले जडजवाहिर विकले जाईल तोच तिचा पती होईल"

भवत्यत्र प्रविष्टे च दृष्टमेतदलं परैः ।
भाग्याधिक भवानेव योग्यः परिणयेदिति ॥ ७१ ॥

अर्थ :– आपले येथे पदार्पण होताच भविष्य खरे ठरले. अधिक काय बोलावे ? हे भाग्यवंत ! आपणच तिच्या दृष्टीने योग्य वर आहात. तिला आपण पदरात घ्या. तिचा पत्नी म्हणून स्वीकार करा.

तन्निर्बन्धादयं चाभूदनुमन्ता तथाविधौ ।
वाञ्छितार्थेऽपि कातर्यं वशिनां न हि दृश्यते ॥ ७२ ॥

अर्थ :– सागरदत्त श्रेष्ठीच्या अत्याग्रहामुळे त्या विवाहास कुमाराने संमति दिली. जितेन्द्रिय इच्छित पदार्थ लाभ होतांना अधीरता अथवा उतावळेपणा करत नाहीत.

अथ सागरदत्तेन दत्तां सत्यंधरात्मजः ।
व्यवहद्विमलां कन्यां हव्यवाहसमक्षकम् ॥ ७३ ॥

अर्थ :– याप्रमाणे सागरदत्ताने दिलेल्या विमला कन्यकेचा अग्नीसाक्षीने जीवंधर कुमाराने स्वीकार केला, विवाहास संमती दिली.

इति श्रीमद्वादीभसिंहसूरिविरचिते क्षत्रचूडामणौ
विमलालम्भो नाम अष्टमो लम्बः ।
याप्रमाणे वादीभसिंहसूरिविरचित क्षत्रचूडामणिमध्ये विमला व कुमार विवाह
वर्णन करणारा आठवा लंब समाप्त झाला.

---

श्लोकांक (७२) निर्बंधात् - आग्रहात् । कातर्यं - अधीरता । (७३) हव्यवाहसमक्षकं - अग्निसाक्षकं ।

## नवम लंब

अथ व्यूढामतिस्निग्धां गाढस्नेहोऽन्वभूदिमाम् ।
वाञ्छिता यदि वाञ्छेयुः ससारैव हि संसृतिः ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे पाणिग्रहण केलेल्या अत्यंत प्रेमळ अशा विमलासह कुमार जीवंधर अतिशय स्नेहपाशात अडकला. ज्याची इच्छा करावी ते जर वांछा करीत असतील तर संसारही ससार वाटतो.

ततोऽनुनीय तां हित्वा स मित्रैः समगच्छत ।
अन्यरोधि न हि क्वापि वर्तते वशिनां मनः ॥ २ ॥

अर्थ :– तदनंतर तिची समजूत काढून कुमार विमलेला सोडून आपल्या मित्रासह गेला. स्ववश मन असेल तर ते अन्याकरवी रोकल्या जात नाही.

वरचिन्हं तमालोक्य बव्हमन्यन्त बान्धवाः ।
ऐहिकातिशयप्रीतिरतिमात्रा हि देहिनाम् ॥ ३ ॥

अर्थ :– त्याचा नवऱ्याचा वेश पाहून त्याचे बांधवांनी, मित्रांनी खूप प्रेमाने स्वागत केले. सर्वसामान्य जनांना ऐहिक गोष्टी बाबत उत्कंठा ही स्वभावतःच असते.

अब्रवीदस्य सोत्प्रासं बुद्धिषेणो विदूषकः ।
बहुद्वारा हि जीवानां पराराधनदीनता ॥ ४ ॥

अर्थ :– मित्रापैकी एक बुद्धिषेण नावाचा विनोदी मित्र थट्टेने म्हणाला - ''ठीकच आहे. दुसऱ्याला खूष करण्यासाठी त्याची नानाप्रकारे आराधना दीनतापूर्वक कोणीही करतच असतो.

सुलभाः खलु दौर्भाग्यादन्योपेक्षितकन्यकाः ।

श्लोकांक (१) ससारा - सारसहिता; सुखप्रदा । (२) अनुनीय प्रबोध्य । हित्वा - त्यक्त्वा (३) वरचिन्हं - वरस्य चिन्हानि यस्य तं । (४) सोत्प्रासं - सप्रहासं; विहस्य । (५) अन्योपोक्षित - अन्यैः कृता उपेक्षा यासां ताः । पौरोभाग्यं - पुरः अधिकः भागः भाग्यं, तम्य भावः; महाभाग्यमित्यर्थः ।



व्यूढायां सुरमञ्जर्यां पौरोभाग्यं भवेदिति ॥ ५ ॥

अर्थ :– ''दुर्भाग्याने दुसऱ्यांनी नाकारलेल्या कन्यका तर कोणासही केव्हाही मिळू शकतात. जर तुझा सुरमंजरीसह विवाह होईल तर आम्ही आपणास महान् भाग्यशाली मानू.''

तद्वाक्यादयमुद्वोढुमवाञ्छीत्तां च मानिनीम् ।
हेतुच्छलोपलम्भेन जृम्भते हि दुराग्रहः ॥ ६ ॥

अर्थ :– त्याचे बोलण्यावरून कुमाराने त्या मानिनी सुरमंजरीसह विवाह करण्याची इच्छा केली, मनात संकल्प केला. मनुष्याचा दुराग्रह हा निमित्ताचे मिषाने अधिकच वाढतो. (बुद्धिषेण विदुषक मित्राचे बोलणे हे त्यास निमित्त होते.)

तत्राप्यौपयिकं भूयो यक्षमन्त्रं व्यचीचरत् ।
अनपायादुपायाद्धि वाञ्छिताप्तिर्मनीषिणाम् ॥ ७ ॥

अर्थ :– तेथेही उपाय म्हणून त्यास यक्षाने दिलेल्या मंत्राचे-विद्येचे स्मरण कुमार करूं लागला. कोणत्याही हमखास निरपायी उपायाने वांछिताची प्राप्ती मनीषींना होतच असते.

वार्धकं तत्र चोपायमुपायज्ञोऽयमौहत ।
करुणामात्रपात्रं हि बाला वृद्धाश्च देहिनाम् ॥ ८ ॥

अर्थ :– उपाय शोधण्यांत निष्णात कुमाराने 'म्हाताऱ्याचे रूप घ्यावें' हाच उपाय मनात ठरविला. कारण जीवांना बाल आणि वृद्ध हे निश्चितच करुणापात्र मात्र असतात.

वार्धकं तत्क्षणे चास्य मनुमाहात्म्यतोऽभवत् ।
अनवद्या सती विद्या फलमूकापि किं भवेत् ॥ ९ ॥

अर्थ :– मंत्रविद्येच्या प्रभावाने कुमारास त्याच क्षणी म्हातारपण प्राप्त

श्लोकांक (६) हेतुच्छलोपलम्भेन - हेतुः इति छलं व्याजः तस्योपलम्भनं प्राप्त्या । जृम्भते - वर्धते; प्रसरति । (७) औपयिकं - उपायभूतं । यक्षमंत्रं - सुदर्शनयक्षोपदिष्टं । व्यचिचरत - अस्मरत्; व्यतर्कयत् । (८) वार्धकं - वृद्धरूपं; वृद्धावस्था । (९) मनुमाहात्म्यतः - मंत्रमाहात्म्येन । अनवद्या - निर्दोषा । सती - प्रशस्ता । फलमूका - फलरहिता ।

झाले. जर विद्या निर्दोष असेल तर ती निष्फळ तरी का व कशी होईल ?

विजहार पुनश्चायं वर्षीयान्परितः पुरीम् ।
अन्यैरशङ्कनीया हि वृत्तिर्नीतिज्ञगोचराः ॥ १० ॥

अर्थ :– **म्हाताऱ्याचे रूप धारण केलेला कुमार नगरात इकडेतिकडे फिरू लागला. नीतिनिपुण माणसाचे वर्तन हे कोणालाही संशय येणार नाही असे असते.**

प्रवयोविप्रवेषं तं वीक्ष्यमाणा विवेकिनः ।
विषयेषु व्यरज्यन्त वार्धकं हि विरक्तये ॥ ११ ॥

अर्थ :– **त्या कुमाराने घेतलेल्या वयोवृद्ध म्हाताऱ्याच्या रूपाकडे पाहून विवेकी लोक संसार विषयापासून विरक्त होऊ लागले. अनुकंपापात्र वृद्धावस्था ही विरक्तीला कारण असते.**

मक्षिकापक्षतोऽप्यच्छे मांसाच्छादनचर्मणि ।
लावण्यं भ्रांतिरित्येतन्मूढेभ्यो वक्ति वार्धकम् ॥ १२ ॥

अर्थ :– **''माशीच्या पंखाप्रमाणे अतिशय पातळ अशा आवरणाने मांसचरबीने झाकलेले असे हे शरीराचे केविलवाणे रूप. तरीही त्यामध्ये लावण्याचा आभास हा भ्रम आहे.'' असेच जणूं म्हातारपण सांगत असते.**

प्रतिक्षणविनाशीदमायुः कायमहो जडाः ।
नैव बुध्यामहे किन्तु कालमेव क्षयात्मकम् ॥ १३ ॥

अर्थ :– **सर्वसामान्य लोक कालास तर क्षय पावणारे मानतात. प्रतिक्षण झिजणारे शरीर क्षणाक्षणाने कमी होणाऱ्या आयुष्याला मात्र नाशवंत मानत नाहीत हे आश्चर्य आहे.**

हन्त लोको वयस्यन्ते किमन्यैरपि मातरम् ।
मन्यते न तृणायापि मृतिः श्लाघ्या हि वार्धकात् ॥ १४ ॥

अर्थ :– **अत्यंत खेदाची बाब आहे की, लोक आपल्या म्हातारपणामध्ये**

---

श्लोकांक (१०) वर्षीयान् - अतिवृद्धः । (११) प्रवयोविप्रवेषं - अतिवृद्धब्राह्मणवेषं । (१२) अच्छे - लघुनि । (१४) अन्ते वयसि - वृद्धावस्थायां । मृतिः - मरणं ।



**आपल्या मातेला गवताइतपतही महत्त्व न देता त्यापेक्षाही हीन लेखतात. म्हातारपणापेक्षा तर मरण बरे !**

इत्याद्यूहं च हास्यं च जनयन्प्राज्ञबालयोः ।
अगारं सुरमञ्जर्या वर्षीयान्पुनरासदत् ॥ १५ ॥

अर्थ :– **याप्रमाणे प्राज्ञांना विचारप्रवण करणारे आणि मुलांना हसविणारे रूप धारण करणारा म्हातारा सुरमंजिरीच्या घरासमोर आला.**

पृष्टो दौवारिकास्त्रिभिराचष्ट फलमागतेः ।
कुमारीतीर्थमात्मार्थं न ह्यसत्यं सतां वचः ॥ १६ ॥

अर्थ :– **दरबारात द्वारपालिकेने ''कोण पाहिजे ? काय काम आहे ?'' असे विचारले तेव्हा तिला म्हाताऱ्याने आपल्या येण्याचे कारण सांगितले. ''मी आत्मकल्याणार्थ कुमारी तीर्थास जात आहे.'' सज्जन असत्य बोलत नाहीत.**

अहसन्नथ तद्वाक्यादङ्गना अप्यसंगतात् ।
अविवेकिजनानां हि सतां वाक्यमसंगतम् ॥ १७ ॥

अर्थ :– **त्याच्या असंगत बोलण्याने ती दासी खूप हसू लागली. मुग्ध बायांना सज्जनाचे बोलणे कळत नसल्यामुळे असंगतच वाटते.**

अरुद्धः कृपया ताभिरगाहिष्ट च तद्गृहम् ।
सर्वथा दग्धबीजाभाः कुतो जीवन्ति निर्घृणाः ॥ १८ ॥

अर्थ :– **कृपाबुद्धीने त्या दासीने त्यास न रोकल्यामुळे म्हाताऱ्याने घरात प्रवेश केला व जळलेल्या बीजाप्रमाणे शक्तिहीन म्हाताऱ्याची जर दया उत्पन्न होत नाही तर ते म्हातारे बिचारे कसे जगतील ?**

अभ्यधुः सुरमञ्जर्याः सुन्दर्यः सभया इदम् ।

---

श्लोकांक (१५) ऊहं - वितर्कं, वैराग्यपरिणामं । (१६) दौवारिकास्त्रिभिः - द्वाररक्षिकाभिः । कुमारीतीर्थं - कस्यचित्पुण्यतीर्थस्य संज्ञा इति सुरमञ्जरीदौवारिकाभिः मनसि धृतं । (१७) असंगतात् - अप्रस्तुतात् । (१८) दग्धबाजीभाः - दग्धं च तत् बीजं च । दग्धबीजं (कर्म०) तस्य आभा इव आभा येषाम् ते । अरुद्धः अव्याघातः । अगाहिष्ट - प्राविशत् । (१९) सुरमञ्जर्याः इत्यत्र समक्षं इति शेषः ।

सभयस्नेहसामर्थ्याः स्वाम्यधीना हि किंकराः ॥ १९ ॥

अर्थ :– दासीने सुरमंजरीला भीतभीत सर्व वृत्तांत सांगितला. चाकर हा तर मालकाच्या हुकुमाचा ताबेदार असतो. त्यांचे बळ भययुक्त स्नेह एवढेच असते.

पुरुषद्वेषिणी सापि वर्षीयांसं न्यशामयत् ।
भवितव्यानुकूलं हि सकलं कर्म देहिनाम् ॥ २० ॥

अर्थ :– पुरुषाचा द्वेष करणाऱ्या त्या सुरमंजरीने त्या म्हाताऱ्यास बोलावून घरात बसविले. जीवमात्राची प्रवृत्ती ही भवितव्यानुसार होत असते.

बुभुक्षितं तमालक्ष्य भोजयामास सा सती ।
अन्तस्तत्वस्य याथात्म्ये न हि वेषो नियामकः ॥ २१ ॥

अर्थ :– भुकेला पाहून सुरमंजरीने त्यास दासीकरवी भोजन करविले. वेष हा अंतःकरणाचा - मनाचा नियामक नसतो.

भुक्त्वाथ वार्धकेनेव सुष्वाप तलिमे कृती ।
योग्यकालप्रतीक्षा हि प्रेक्षापूर्वविधायिनः ॥ २२ ॥

अर्थ :– जेवण केल्यानंतर म्हाताऱ्याने थकवा आल्याकारणाने कां म्हणाना तो सुरमंजरीने दिलेल्या मऊ गादीवर झोपला. विचारपूर्वक कार्य करणारे योग्य काळाची वाट पाहत असतात.

भुवनमोहनं गानमगासीदथ गानवित् ।
परस्परातिशायी हि मोहः पञ्चेन्द्रियोद्भवः ॥ २३ ॥

अर्थ :– नंतर गायनविद्या जाणणाऱ्या त्या म्हाताऱ्याने जगास मोहून टाकणारे एक सुंदर गाणे म्हटले. पाचही इंद्रियांची आपआपल्या विषयाकडे ओढ ही परस्पर मात करणारी असते.

गानकौशलतः सैनं शक्तिमन्तममन्यत ।

---

श्लोकांक (२१) अन्तस्तत्वस्य - अंतरंगस्य । याथात्म्ये - याथार्थ्ये । वेषः - कृत्रिमआकारः । नियामकः - निश्चयवाचकः । आलक्ष्य - दृष्ट्वा । (२२) तलिमे - तल्पे ।प्रेक्षापूर्वविधायिनः - विमृश्यकारिणः । (२३) 'भुवनं मोहनं' इत्यापि पाठान्तरम् । (२४) सदसन्तौ - विद्वदविद्वज्ञनौ ।



विशेषज्ञा हि बुध्यन्ते सदसन्तौ कुतश्चन ॥ २४ ॥

अर्थ :– त्याच्या सुंदर गीताने सुरमंजरीने गानविद्येत निपुण जाणून त्याची खूप स्तुती केली. विशेष ज्ञानीच, मर्मज्ञ लोकच सत् आणि असत गोष्ट बरोबर ओळखतात.

ततः स्वकार्यमप्यस्मात्सादराभूत्परीक्षितुम् ।
स्वकार्येषु हि तात्पर्यं स्वभावादेव देहिनाम् ॥ २५ ॥

अर्थ :– त्याच्यामुळे आपले कार्य कसे सिद्ध होईल याचा ती विचार करूं लागली. लोकांना आपले प्रयोजन सिद्ध करण्याकडे ओढा स्वभावतःच असतो.

गानवच्छाक्तिरन्यत्र किमस्तीत्यन्वयुङ्क्त सा ।
याञ्चायां फलमूकायां न हि जीवन्ति मानिनः ॥ २६ ॥

अर्थ :– ''गायनाशिवाय अन्य कोणती कला विद्या आहे कां ?'' असे तिने त्यास विचारले. कारण याचना करून ती निष्फळ झाली तर मानीला ते सहन होत नाही.

बाढमस्ति समस्तेपीत्यब्रवीत्प्रौढनैपुणः ।
उक्तिचातुर्यतो दार्ढ्यमुक्तार्थे हि विशेषतः ॥ २७ ॥

अर्थ :– ''हो ! आहे की'' असे सर्व कामात निपुण म्हाताऱ्याने उत्तर दिले ''मला तर पुष्कळ विद्या येतात'' सांगण्यातील वचनचातुर्याने विशेष दृढता येते व त्यावर दुसऱ्याचा विश्वास बसतो.

अभीप्सितवरप्राप्तावुपायं साप्ययाचत ।
रागान्धे हि न जागर्ति याञ्चादैन्यवितर्कणम् ॥ २८ ॥

अर्थ :– तिने आपला ईप्सित वर प्राप्त होण्याचा उपाय विचारला. आपल्या अशा याचनेने आपणास कमीपणा येतो हे रागांधाना कळत नाही.

---

श्लोकांक (२५) सादराभूत् - तत्परा बभूव । (२६) अन्वयुङ्क्त - पप्रच्छ । फलमूकायां - फलरहितायां सत्याम् । (२७) बाढम् - साधु (होकारार्थी) । समस्ते - सर्वविषयेषु । (२८) अभीप्सितवरप्राप्तौ - इच्छितपतिप्राप्तौ । वितर्कणं - विचारः ।

कामं कामप्रदं सोऽयं कामदेवमुपादिशत् ।
मनीषितानुकूलं हि प्रीणयेत्प्राणिनां मनः ॥ २९ ॥

अर्थ :– ''सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या कामदेवाची उपासना करावी'' असे त्या म्हाताऱ्याने सांगितले. इच्छेनुकुल प्रतिसाद मिळाल्यामुळे लोकांचे मन खूष होते.

मनीषितं च हस्तस्थं मेने सा सुरमञ्जरी ।
मनोरथेन तृप्तानां मूललब्धौ तु किं पुनः ॥ ३० ॥

अर्थ :– ते ऐकताक्षणीच जणू 'आपले मनोरथ पूर्ण झाले' असे त्या मानिनी सुरमंजरीस वाटले. केवळ मनोरथाने संतोष पावणाऱ्यांना जर इच्छित गोष्ट प्राप्त झाली तर त्यांच्या आनंदास काय पारावार राहील ?

अनैषीत्तामसौ पश्चात्कामकोष्ठं यथेप्सितम् ।
विचाररूढकृत्यानां व्यभिचारः कुतो भवेत् ॥ ३१ ॥

अर्थ :– नंतर इच्छिल्याप्रमाणे त्या सुरमंजरीला कामदेवाच्या मंदिरात नेले. विचारपूर्वक योजना आखणाऱ्याच्या कामात विसंगती अथवा अडथळा कसा येईल ?

कामं सा प्रार्थयामास जीवकस्वामिकाम्यया ।
जन्मान्तरानुबन्धौ हि रागद्वेषौ न नश्यतः ॥ ३२ ॥

अर्थ :– ''जीवंधर स्वामी माझे पति व्हावेत'' अशा इच्छेने ती कामदेवाची प्रार्थना करू लागली. पूर्वभवापासून चालत आलेले रागबंध नष्ट होत नाहीत.

लब्धो वर इति प्रोक्तं बुद्धिषेणेन सा सती ।
मनोभुवो वचो मेने स्त्रीणां मौढ्यं हि भूषणम् ॥ ३३ ॥

---

श्लोकांक (२९) कामप्रदं - वांछितार्थस्य दातारं । मनीषितानुकूलं - कामितार्थानुरूपं वचनं इति शेषः । (३०) हस्तस्थं - हस्तगतं; प्राप्तमेवेत्यर्थः । (३१) कामकोष्ठं - मन्मथगृहं । व्यभिचारः - कार्याभावः । विचाररूढकृत्यानां - विचारेण पर्यालोचनया रूढं निश्चितं कृत्यं येषां । (३२) जीवकस्वामिकाम्यया - जीवकप्राप्त्यपेक्षया । (३३) बुद्धिषेण इति विदूपकेण गृहीतं नाम । मनोभुवः - कामदेवस्य ।



अर्थ :– 'तुझा पति तुला प्राप्त झाला' असे बुद्धिषेणाने म्हणताच त्याचे शब्द हे कामदेवाचेच आहेत असे सुरमंजरीस वाटले. मूढता भोळसटपणा हे स्त्रियांचे भूषण होय.

कुमारं दर्शिताकारं दृष्ट्वा जिह्राय तत्क्षणे ।
मृतकल्पा हि कल्पन्ते निर्लज्ञा निष्कृपा इव ॥ ३४ ॥

अर्थ :– आपले खरे स्वरूप प्रगट करणाऱ्या कुमारास पाहून ती त्याच क्षणी लाजेने दूर झाली. लज्जा हेच स्त्रियांचे भूषण आहे. निर्लज्ञ व्यक्ति ही जीवंत असूनही निर्दयाप्रमाणे मृतवत् भासते.

पतिकृत्येन पत्नीं तां सुतरां सोऽप्यतोषयत् ।
संसारोऽपि हि सारः स्याद्दम्पत्योरेककण्ठयोः ॥ ३५ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराने पत्नी सुरमंजरीस प्रेमालापाने प्रसन्न केले. पति पत्नी जर एकविचार व एक हृदयाचे असतील तर असा संसारही सुखमय होतो.

ततः कुबेरदत्तेन दत्तां तां सुरमञ्जरीम् ।
सुमतेरात्मजां सोऽयमुपयेमे यथाविधि ॥ ३६ ॥

अर्थ :– नंतर कुबेरदत्ताने अर्पण केलेली सुमतीची पुत्री सुरमंजरीचे कुमाराने यथाविधी पाणिग्रहण केले.

इति श्रीमद्वादीभसिंहसूरिविरचिते क्षत्रचूडामणौ
सुरमञ्जरीलम्भो नाम
नवमो लम्बः ।

याप्रमाणे वादीभसिंहसूरिविरचित क्षत्रचूडामणि मध्ये सूरमंजरी विवाहाचे वर्णन करणारा नववा लंब समाप्त झाला.

---

श्लोकांक (३५) सुतरां सोऽप्यतोषयत् - प्रीतेः परां काष्ठां प्रापयामास ।

## दशम लंब

अथ पाणिगृहीतीं तां बहुमेने बहुप्रियः ।
बहुयत्नोपलब्धे हि प्रेमबन्धो विशिष्यते ॥ १ ॥

अर्थ :– **याप्रमाणे अनेक पत्नी असणारे कुमारास विवाहात नव्यानेच स्वीकारलेल्या सुरमंजरी विषयी अधिक प्रेम वाटूं लागले. बहु कष्टाने प्राप्त झालेल्या वस्तुबाबत रागभाव विशेष असतो.**

कृच्छ्रेणाराध्य तां भूयो मित्राणां पार्श्वमाश्रितः ।
स्वामीच्छाप्रतिकूलत्वं कुलजानां कुतो भवेत् ॥ २ ॥

अर्थ :– **महत्प्रयासाने तिची समजूत काढून कुमार मित्रासह निघाले. कुलीन स्त्रिया आपल्या पतिविरुद्ध वर्तन कसे ठेवतील ?**

सचित्रीयैस्तदा मित्रैः पित्रोरन्तिकमाययौ ।
आत्मदुर्लभमन्येन सुलभं हि विलोचनम् ॥ ३ ॥

अर्थ :– **सुरमंजरीच्या प्राप्तीने जीवंधर कुमार आश्चर्यचकित झालेल्या आपल्या मित्रासह आपल्या घरी पिता गंधोत्कट, माता सुनंदा, बंधू यांना भेटण्यास घरी गेला. सुरमंजरीच्या प्राप्तीमुळे मित्रांना आनंद झाला यात आश्चर्य काहीच नाही. कुमारास सुरमंजरीची प्राप्ती ही मित्रांना अपेक्षातीत होती; म्हणून आश्चर्यकारकही होती.**

पित्रोरप्यतिमात्रोऽभूत्पुत्रस्नेहोऽस्य वीक्षणात् ।
कस्यानंदकरो न स्यात् कृतान्तास्यादपागतः ॥ ४ ॥

अर्थ :– **कुमारास पाहून मातापित्यांना पुत्राच्या अतिशय स्नेहाचा अनुभव आला. यमाच्या मुखातून सुटलेल्या पुत्रास पाहून कोणास आनंद होणार नाही ?**

---

श्लोकांक (१) पाणिः गृहीतः अस्याः, तां पाणिगृहीतीं । (२) कृच्छ्रेण - महत्प्रयासेन । आराध्य - सम्बोध्य । पार्श्वं - समीपं । (३) सचित्रीयैः - साश्चर्यैः । विलोचनं - विस्मयावहं । पित्रोः - माता च पिता च पितरौ (एकशेष द्वंद्व) तयोः; मातापित्रोः । (४) अतिमात्रः - अतिशयितः । (५) उल्लाघतां - हृष्टतां । वल्लभे - जीवंधरस्य - दयिते इत्यर्थः ।



ततो गंधर्वदत्ता च गुणमाला च वल्लभे ।
उल्लाघतां क्रमान्नीते नीतिरेषा हि संसृतौ ॥ ५ ॥

अर्थ :– **यानंतर कुमाराने अत्यंत प्रिय गंधर्वदत्ता आणि गुणमालेला भेटून प्रसन्न केले. यथोचित आणि यथासमय गुणानुराग प्रगट करावा हेच लोक व्यवहारातील सर्वमान्य नीतितत्त्व आहे.**

अथ गंन्धोत्कटेनायं मन्त्रयित्वा ततो ययौ ।
विधित्सिते ह्यनुत्पन्ने विरमन्ति न पण्डिताः ॥ ६ ॥

अर्थ :– **तसेच गंधोत्कटासह गुप्त मंत्रणा करून तेथूनही जीवंधर निघाले. ठरविलेले इच्छित कार्य पूर्ण होईपर्यंत महापुरुष विश्राम घेत नाहीत.**

विदेहाख्ये ततो देशे धरण्यास्तिलकोपमाम् ।
तिलकान्तधरण्याख्यां राजधानीमशिश्रयत् ॥ ७ ॥

अर्थ :– **तेथून कुमार 'विदेह देशातील नाव सार्थ करणाऱ्या तिलकसदृश धरणीतिलक राजधानीस पोचले.**

महितो मातुलेनात्र विदेहाधिपभूभुजा ।
भागिनेयो महाभागो मह्यां केन न मह्यते ॥ ८ ॥

अर्थ :– **त्या विदेह देशाचा अधिपती गोविंदराजा होता व जीवंधराचा मामाच होता. मामाने खूप मोठा आदरसत्कार केला. भाग्यवान् भाचा हा भूतलावर कुणास मानसन्मानास पात्र वाटणार नाही ?**

आसीद्गोविन्दराजोऽपि तद्राज्यस्थापनोद्यतः ।
स्वयं परिणतो दन्ती प्रेरितोऽन्येन किं पुनः ॥ ९ ॥

अर्थ :– **मामा गोविंदराज देखील आपल्या भाच्याचे गेलेले राज्य परत मिळविण्याच्या प्रयत्नात होताच. आधी स्वतःच शत्रूवर हल्ला करण्यास तयार असणाऱ्या हत्तीला जर पुनः कोणी टोचून प्रेरीत केले तर तो उट्टे काढणारच. मात्र स्वतःच काष्ठांगारास राज्यपदावरून हटविण्याचा विचार असतांना त्यास**

---

श्लोकांक (६) विधित्सिते - विधातुं अभिमते कार्ये । अनुत्पन्ने - अनिष्पन्ने सति । (७) तिलकान्तधरण्याख्यां - धरणीतिलकनाम्नीम् । (८) भागिनेयः - भगिन्याः जातः । (९) परिणेतः दन्ती - मत्तगजः ।

जीवंधराने प्रेरणा दिल्यामुळे त्याचा विचार पक्काच झाला.

मन्त्रिभिर्मन्त्रशालायां मन्त्रयामास मन्त्रवित् ।
न ह्यमन्त्रं विनिश्चेयं निश्चिते च न मन्त्रणम् ॥ १० ॥

अर्थ :– तदनंतर मंत्रणाचतुर गोविंदराजाने आपले मंत्री आणि कारभाऱ्यासह मंत्रशालेत विचार करून धोरण व पुढील योजना ठरविली. विचारपूर्वक संबंधिताशी चर्चा केल्याशिवाय कोणतीही गोष्ट निश्चित करू नये; आणि पक्का निर्णय झाल्यानंतर मंत्रणा विचारविमर्श नसावा.

काष्ठाङ्गारस्य संदेशं सचिवैः शुश्रुवानयम् ।
ज्ञात्वा हि हृदयं शत्रोः प्रारब्धव्या प्रतिक्रिया ॥ ११ ॥

अर्थ :– नंतर खुद्द गोविंदराजाने काष्ठांगाराकडून आलेला संदेश मंत्रिजनास ऐकविला. शत्रूच्या हालचालीवरून पुढील कारवाई करावी हेच योग्य असते.

अघेनाहमपख्यातिं राजघे मदहस्तिनि ।
लब्धवानवबुध्येत मिथ्येयं तत्त्ववेदिना ॥ १२ ॥

अर्थ :– काष्ठांगाराचा संदेश असा - ''वास्तविक सत्यंधर राजास मारणारा एक मदोन्मत्त हत्ती होता. परंतु त्यास ''मीच मारले'' अशी माझी अपकीर्ति झाली. तत्त्वज्ञ आपण माझी ती अपकीर्ति खरी समजूं नये.

निःशल्योऽहं भवाम्येष भवत्यत्र समागते ।
दुर्जनेऽपि हि सौजन्यं सुजनैर्यदि संगमः ॥ १३ ॥

अर्थ :– ''आपण जर इकडे राजपुरीला आलात तर मी निःशल्य होईल'' सज्जनाच्या सल्लेने वागण्याने दुर्जनही सज्जन होऊ शकतो.

इत्युक्त्वा निश्चितोऽरातिरतिसंधित्सुरञ्जसा ।

---

श्लोकांक (१०) अमंत्रं - न मंत्रितं; अविचारितं । (१२) अघेन - पापकर्मोदयेन । अपख्यातिं - अपकीर्तिं । राजघे मदहस्तिनि - सत्यंधरं राजानं हन्तीति राजघः; सति इति शेषः (मदहस्तिना राजा मारितः इति सति अपि इत्यर्थः) । (१४) अतिसंधित्सुः - अतिशयेन संधिं विधातुं अभीप्सितः । वञ्चयितुमिच्छुः । अरातिः - शत्रुः ।



असतां हि विनम्रत्वं धनुषामिव भीषणम् ॥ १४ ॥

अर्थ :– याप्रमाणे काष्ठांगाराचा निरोप ऐकताच तो शत्रु असून आपणास फसवित आहे अशी गोविंदराजाची खात्री झाली. दुष्टाची नम्रता ही धनुष्याच्या नम्रतेप्रमाणे भयानक असते. तसाच दुष्ट काष्ठांगाराचा संधि करण्याच्या मिषाने हा कुटील डाव आहे, हे त्याने ताडले.

विप्रलम्भोत्सुके शत्रौ कार्यान्धोऽयमतप्यत ।
दुर्जनाग्रे हि सौजन्यं कर्दमे पतितं पयः ॥ १५ ॥

अर्थ :– ''आपणास फसविण्यास तयार शत्रूवर स्वकर्तव्यमग्न गोविंदराजा संतप्त झाला. दुर्जनासह सौजन्य राखणे हे चिखलात दूध फेकण्यासारखे आहे.

आहूतास्तेन साकूतं गच्छामस्तच्छलाद्वयम् ।
इत्युच्चैर्निश्चिकायासौ बकायन्ते हि जिष्णवः ॥ १६ ॥

अर्थ :– ''जर आपणास आपल्या शत्रूने हेतुपुरस्सर बोलविले आहे तर त्यावरून आपणही त्यावर ''आम्ही जाऊं'' कपटमिषाने उत्तर द्यावे असे गोविंदराजाने ठरविले. विजयाची अपेक्षा ठेवणाऱ्याने आपली वृत्ती बगळ्यासारखी ठेवावी. अर्थात मनात एक योजून दाखवावे मात्र वेगळेच. ही राजनीति आहे.

काष्ठाङ्गारेण संजातं सख्यं प्रख्यापयन्नसौ ।
डिण्डिमं ताडयामास गतेर्वार्ता हि पूर्वगा ॥ १७ ॥

अर्थ :– ''काष्ठांगाराशी आमचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत.'' असे जाहीर करून दवंडीही देवविली. कारण मनुष्य पोचण्यापूर्वीच तेथे वार्ता जाऊन थडकते.

चातुरङ्गबलं पश्चाच्चतुरोऽयं न्यशामयत् ।
आलोच्यात्मारिकृत्यानां प्राबल्यं हि मतो विधिः ॥ १८ ॥

अर्थ :– तदनंतर गोविंदराजाने चतुरंग दल सज्ज केले. आपल्या आणि शत्रूंच्या हालचाली व सामर्थ्याचा योग्य अंदाज घेवून योग्य उपाययोजना आखावी हेच उचित आहे. व हाच विधि आहे. कर्तव्य आहे.

---

श्लोकांक (१५) विप्रलम्भोत्सुके - वञ्चनातत्परे । कार्यान्धः - स्वकर्तव्यमग्नः गोविन्दराजा। (१६) साकूतं - केनचित् अभिप्रायेण सहितं; कपटेन । जिष्णवः - जेतुं इच्छन्तीति । (१८) विधिः - कर्तव्यं । (१९) प्रतस्थे - 'समवप्रतिविभ्यःस्थः' इत्यात्मनेपदं । सलग्ने - शुभे लग्ने ।

प्रतस्थे चाथ सल्लग्ने पात्रदानादिपूर्वकम् ।
दानपूजातपःशीलशालिनां किं न सिध्यति ॥ १९ ॥

अर्थ :– **नंतर गोविंदराज शुभ मुहूर्तावर पात्रदानपूर्वक प्रस्थान करता झाला. तत्पूर्वी त्याने दान, पूजा वगैरे धार्मिक सोपस्कार पूर्ण केले. धर्मनिष्ठ पुण्यवंताचे कोणते कार्य सिद्ध होत नाही ?**

अथ राजपुरीं प्राप्य राजा कैश्चित्प्रयाणकैः ।
निकषा तत्पुरीं क्वापि निषसाद महाबलः ॥ २० ॥

अर्थ :– **नंतर चतुरंग सेनेच्या अधिपती गोविंदराजाने कूच करत राजपुरीच्या जवळ पोहोचला. आणि नगरीच्या जवळच सैन्याने तळ ठोकला.**

प्राभृतं प्राहिणोत्तस्य काष्ठाङ्गारो मुधा मुहुः ।
हन्त कापटिका लोके बुधायन्ते हि मायया ॥ २१ ॥

अर्थ :– **काष्ठांगारानेही अनेकदा गोविंदराजाकडे नजराणा पाठविला. पण तिकडून अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. या जगात मायाचारी आपण सज्जन आहोत असे दाखवीत असतात.**

प्रतिप्राभृतमेतस्मै प्राहैषीत्स्वामिमातुलः ।
आ समीहितनिष्पत्तेराराध्याः खलु वैरिणः ॥ २२ ॥

अर्थ :– **जीवंधर कुमाराच्या मामाने पण काष्ठांगाराच्या प्रत्येक भेटीला प्रतिभेट पाठवून दिली. जोपावेतो इच्छित गोष्ट सिद्ध होत नाही, प्राप्त होत नाही तोपावेतो शत्रूचीही आराधना करावी लागते.**

कन्याशुल्कतया लोके यन्त्रभेदमघोषयत् ।

श्लोकांक (२०) प्रयाणकैः –– कतिभिः दिनैः । निकषा - समीपे । निषसाद - अवस्थानं चकार । (२१) प्राभृतं - प्रदेशनं; प्रीतिदानं । कापटिकाः - मायाविनः । बुधायन्ते - सूज्ञवत् आचरन्ति । (२२) आ समीहितनिष्पत्तेः - इष्टसिद्धिपर्यंतं । बुधायन्ते - सूज्ञवत् आचरन्ति । (२३) शुल्कं - कन्यार्थं दीयमान द्रव्यं । कन्याशुल्कतया - कन्यावरणार्थं यत् शुल्कं मूल्यं; तस्य भावः तया । यंत्रभेदं - वराहत्रयशोभितचंद्रकयंत्रभेदिनम् । उपायप्रष्ठरुढाः - उत्तमोपायैः प्रसिद्धाः । कार्यनिष्ठानिरङ्कुशाः कार्यनिर्वाहे अप्रतिहतशक्तयः ।



उपायप्रष्ठरूढा हि कार्यनिष्ठानिरङ्कुशाः ॥ २३ ॥

अर्थ :– **तदनंतर गोविंदराजाने अशी दवंडी देवविली की, ''जो कोणी चंद्रक यंत्रावरील वराहत्रयाचा भेद करील त्याला कन्या शुल्करूपाने देईल, त्यास माझी मुलगी देईन'' साधन-सामग्रीची योग्यप्रकारे जुळणी झाली तर कार्यसिद्धी निराबाध होते.**

धनुर्धराश्च संभूतास्त्रैवर्णिककुलोद्भवाः ।
आमोहो देहिनामास्थामस्थानेऽपि हि पातयेत् ॥ २४ ॥

अर्थ :– **घोषणेप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या त्रिवर्णामध्ये जन्मलेले अनेक तेथे जमलेत. मोह हा प्राण्यांना अप्राप्य वस्तूच्याही मागे लावतो. (कन्येच्या व्यामोहाने चंद्रकयंत्रातील वराहत्रयाचा भेद या अशक्य गोष्टीसाठी लोक जमलेत.**

ततश्चन्द्रकयन्त्रस्थवराहत्रयभेदने ।
न शेकुश्चापिनः सर्वे क्व विद्या पारगामिनी ॥ २५ ॥

अर्थ :– **त्यापैकी कोणताही धनुर्धर चंद्रकयंत्रावरील वराहत्रयांचा भेद करण्यास समर्थ झाला नाही. परिपूर्ण विद्या क्वचितच आढळते.**

अलातचक्रतः शीघ्रं चक्रमारुह्य हेलया ।
विव्याध विजयासूनुर्भानुः किं न तमोहरः ॥ २६ ॥

अर्थ :– **नंतर राणी विजयेच्या पुत्राने यंत्रावर चढून आलातचक्राने त्या तीन वराहाचा छेद केला. सूर्य हा अंधकाराचा नाश करणारा नसतो कां ? निष्णात समर्थ व्यक्तीच असे अवघड काम करू शकते.**

अथ गोविन्दराजाऽपि राज्ञामित्थमचीकथत् ।
सात्यंधरिरयं हीति स्थाने हि कृतिनां गिरः ॥ २७ ॥

अर्थ :– **नंतर गोविंदराजाने ''हाच सत्यंधर राजाचा पुत्र आहे'' असे उपस्थित सर्वच राजसमूहास सांगितले. पुण्यवंताची वाणी योग्य ठिकाणी व योग्यवेळी निघत असते.**

श्लोकांक (२४) संभूताः - समागताः । (२५) पारगामिनी - परिपूर्णा । (२६) अलातचक्रं - अलातं उल्मुकं, चक्रं यन्त्रं; सारितकाङ्गारयन्त्रं । हेलया - लीलया । (२७) स्थाने - योग्यावसरे ।

राजानोऽप्येवमस्माभिरस्मारीत्यभ्यनन्दिषुः ।
आचष्टे हि नरेन्द्रत्वमालीढादिषु पाटवम् ॥ २८ ॥

अर्थ :– राजेलोकही उद्गारले ''आम्हालाही असेच वाटते''. आलीडन आदि धनुर्विद्येतील पटुता नरेन्द्रपणा राजेपणा सिद्ध करते.

काष्ठांङ्गारः कुमारस्य वीक्षणात्क्षीणमानसः ।
तच्छ्रुतेर्मृतकल्पोऽयमनल्पाधिरचिन्तयत् ॥ २९ ॥

अर्थ :– काष्ठांगार जीवंधर कुमारास पाहून मनाने खिन्न झाला व ती जीवंधर कुमाराची वार्ता ऐकून मानसिक दुःखाने अर्धमेला व पीडित झाला. तो मनांत विचार करूं लागला -

सात्यंधरौ च सत्यस्मिन्सद्यो हन्त वयं हताः ।
वीरेण हि मही भोज्या योग्यतायां च किं पुनः ॥ ३० ॥

अर्थ :– ''हा जर सत्यंधराचा पुत्र असेल तर आपण आताच मेल्यासारखे झालो. वीर पुरुषांनीच राज्याचा उपभोग घेतला पाहिजे.

कथमेनं वणिक्पाशं मथनोऽप्यवधीत्तदा ।
आत्मनीने विनात्मानमञ्जसा न हि कश्चन ॥ ३१ ॥

अर्थ :– ''त्यावेळेस मथनाने (सेवकाने) या वैश्यास असे कसे मारले ? आपल्या कार्यामध्ये अन्य कोणाचाही काहीच उपयोग नसतो, हेच खरे.

दुराकूतः किमाहूतो मातुलोऽस्य मया मुधा ।
स्ववधाय हि मूढात्मा कृत्योत्थापनमिच्छति ॥ ३२ ॥

अर्थ :– ''मी या वाईट अभिप्राय धारण करणाऱ्या गोविंदराजास निष्कारण बोलाविले ? मूर्ख मनुष्य आपल्याच नाशासाठी एखादी गोष्ट उभी करतो. त्यातलाच हा प्रकार का ?

श्लोकांक (२८) आलीढादिषु - अवस्थानभेदेषु; प्रत्यालीढं, आलीढं, समपदं, वैशाखं, मंडलम् इति पञ्च अवस्थानानि; तत्र (१) ऊर्ध्वस्थस्य वामपादप्रसारे दक्षिणपादसंकोचे प्रत्यालीढं । (२) विपर्यये आलीढं । (३) त्रिवितस्त्यन्तरेण स्थिते पादद्वये वैशाखं । अन्यद्‌द्वयं अन्वर्थकं । (२९) अनल्पाधिः - तीव्रदुःखितमस्कः । (३१) वणिक्पाशं - कुत्सितं वणिजं । आत्मनीने - आत्मने हितकार्ये । (३२) दुराकूतः - दुरभिप्रायः । कृत्योत्थापनं - वेतालोत्थापनं ।



गोविन्दराजयुक्तोऽय दुर्दान्तः किं विधित्सति ।
मरुत्सखे मरुध्दूते मह्यां किं वा न दह्यते ॥ ३३ ॥

अर्थ :– ''हा अपराजित सत्यंधर पुत्र त्याच्या मामासह काय काय करून माझेवर कोणते संकट आणेल याचा काही भरंवसा नाही. अग्नीला जर वायूची साथ मिळाली तर पृथ्वीवर काय जळणार नाही ?

इति चिन्ताकुलं शत्रुं स्वामिमित्राणि चिक्षिपुः ।
विपदो वीतपुण्यानां तिष्ठन्त्येव हि पृष्ठतः ॥ ३४ ॥

अर्थ :– याप्रमाणे चिंतेने व्याकुळ झालेला काष्ठांगार विचार करू लागला. कुमाराच्या मित्रांनी त्याची निर्भत्सना केली. (त्यास भडकविले.) पुण्यरहित पापी पुरुषाच्या भोवती आपत्ती या अशाच भंडारतच राहतात.

मत्सरी कौरवेणायं भर्त्सनादयुयुत्सत ।
मत्सराणां हि नोदेति वस्तुयाथात्म्यचिन्तनम् ॥ ३५ ॥

अर्थ :– या निर्भत्सनामुळे मत्सरग्रस्त काष्ठांगार हा जीवंधर कुमाराशी युद्धास तयार झाला. मत्सरी पुरुषांना सारासार विचार कसा म्हणून सुचत नाही.

केचित्कौरवतः केचिद्वैरितोऽप्यभवन्नृपाः ।
सुजनेतरलोकोऽयमधुना न हि जायते ॥ ३६ ॥

अर्थ :– युद्धाचे वेळी कित्येक क्षत्रिय राजे जीवंधराच्या बाजूने उभे राहिले तर कित्येक काष्ठांगाराच्या बाजूने उभे राहिले. संसार हा अनादि काळापासून नेहमीच सज्जन व दुर्जन यांनी भरलेलाच असतो. आजच नाही !

कौरवोऽप्याहवेऽरातिं लोकान्तरमजीगमत् ।
दुर्बला हि बलिष्ठेन बाध्यन्ते हन्त संसृतौ ॥ ३७ ॥

अर्थ :– युद्धामध्ये कुमाराने शत्रूला यमसदनी पाठविले. अतिशय खेदाची गोष्ट आहे की या संसारात बलवान पुरूष दुर्बल पुरुषाचा घात करतात.

श्लोकांक (३३) दुर्दान्तः - दुःखेन कष्टेन दमनीयः । मरुत्सखे - अग्नौ । मरुद्‌धूते - वायुना संधुक्षिते सति । (३५) मत्सरी - अन्यशुभद्वेषी । कौरवेण - जीवंधरस्वामिनासह । (३६) कौरवतः - कौरवस्य पक्षे । वैरितः - वैरिणः; काष्ठाङ्गारस्य पक्षे ।

अथ संग्रामसंरम्भं कौरवोऽयमवारयत् ।
मुधावधादिभीत्या हि क्षत्रिया व्रतिनो मताः ॥ ३८ ॥

अर्थ :– **शत्रू यमसदनीं गेल्यानंतर कुमाराने युद्धामधील हिंसा तात्काळ थांबविली. निष्कारण हिंसेला घाबरून ती हिंसा करत नाहीत म्हणूनच तर क्षत्रिय व्रती म्हटले जातात. स्वामी श्रेष्ठ क्षत्रीय होते. त्यांनी ताबडतोब युद्ध थांबवून हिंसा टाळली.**

वीरसूर्विजया जाता वीरपत्नी च मे सुता ।
इत्युक्त्वा मातुलोऽप्येनमानन्दादभ्यनन्दयत् ॥ ३९ ॥

अर्थ :– **गोविंदराज आनंदातिशयाने उद्गारला - ''आज माझी भगिनी विजया ही वीरास जन्म देणारी माता झाली ! आणि माझी पुत्री ही आज वीरपत्नी झाली !'' असे म्हणून आनंदाने कुमाराचे अभिनंदन केले.**

समन्ततः समायाताः सामन्तास्तं सिषेविरे ।
समौ हि नाट्यसभ्यानां संपदां च लयोदयौ ॥ ४० ॥

अर्थ :– **तसेच चौबाजूने जमलेले मांडलिक राजे कुमाराचे सेवक बनले. नाटकातील सभ्य प्रेक्षकसमूहास नटांच्या संपत्तीची हानी आणि लाभ हा सारखाच असतो. तद्वत् मांडलिक राजांना एक राजा जाऊन दुसरा आला यांत काही हर्षविषाद नसतो.**

राजपुर्यामगाद्धायमभिषेक्तुं जिनालयम् ।
भगवद्दिव्यसान्निध्ये निष्प्रत्यूहा हि सिद्धयः ॥ ४१ ॥

अर्थ :– **तदनंतर गोविंदराज स्वामीचा राज्याभिषेक करण्यापूर्वी जिनमंदिरात गेला. भगवंताचे दिव्य पुण्यमय सान्निध्य असेल तर सर्व कार्ये निर्विघ्न सिद्ध होतात.**

तावता संन्यधात्तत्र यक्षो यक्षचरो मुदा ।
फलमेव हि यच्छन्ति पनसा इव सज्जनाः ॥ ४२ ॥

श्लोकांक (३९) वीरसूः - वीरं सूते इति । (४०) सामन्ताः - संलग्नः अंतः एकदेशः अस्याः समन्ता; समन्तायाः स्वदेशाव्यवहितभूमेः इमे राजानः सामन्ताः । नाट्यसभ्यानां - प्रेक्षकानां । (४२) संन्यधात् - समागतः ।



अर्थ :– **एवढ्यांत कुत्र्याचा जीव यक्षेन्द्र मोठ्या हर्षाने तेथे आला. सज्जन फणसवृक्षाप्रमाणे केवळ फळेच देतात.**

अथ गोविन्दराजेन यक्षराजो यथाविधि ।
अभ्यषिञ्चन्महाराजं कौरवं गुरुगौरवात् ॥ ४३ ॥

अर्थ :– **नंतर गोविंदराजासोबत यक्षेंद्रानेही कौरवराज जीवंधर स्वामीचा मोठ्या सन्मानाने यथोचित राज्याभिषेक केला.**

अयादापृच्छ्य राजेन्द्रं यक्षेन्द्रोऽपि स्वमन्दिरम् ।
न ह्यासक्त्या तु सापेक्षो भानुः पद्मविकासने ॥ ४४ ॥

अर्थ :– **यक्षेन्द्रही राजेन्द्र जीवंधरास विचारून स्वस्थानी परत गेला. कमळांना विकसित करण्यात सूर्य आसक्तिपूर्वक प्रवृत्त झालेला नसतो. तो तर सहज योग आहे. त्यात सूर्यास काहीच अपेक्षा नसते. तद्वत् स्वामींना यक्षेन्द्राकडून काहीही अपेक्षा नव्हती. त्यांनी त्यास जाण्यास अनुमती दिली.**

तर्पिताखिललोकोऽस्मात्सौधाभ्यन्तरमाश्रितः ।
सिंहासनमलंचक्रे राजसिंहः क्रमागतम् ॥ ४५ ॥

अर्थ :– **तदनंतर राजश्रेष्ठ जीवंधर स्वामींनी सर्व लोकांना यथायोग्य दान वगैरे देवून संतुष्ट केले व तेथून आपल्या राजवाड्यात जाऊन कुलपरंपरेने आलेले राजसिंहासन अलंकृत केले.**

तद्वृत्तान्तवितर्कोऽभूल्लोके विस्मयबृंहितः ।
अतर्क्यसंपदापद्भ्यां विस्मयो हि विशेषतः ॥ ४६ ॥

अर्थ :– **या सर्व घटनेविषयी सामान्यपणे आश्चर्यपूर्ण चर्चा होऊ लागली. ठीकच आहे, संपत्ति आणि विपत्ति अकल्पित येऊन पडल्यात म्हणजे लोकांना स्वाभाविकपणे आश्चर्य वाटते.**

क्व पूज्यं राजपुत्रत्वं प्रेतावासे क्व वा जनिः ।
क्व वा राजपुनःप्राप्तिरहो कर्मविचित्रता ॥ ४७ ॥

श्लोकांक (४३) गोविन्दराजेन इत्यत्र सह इति शेषः । (४५) अस्मात् इत्यत्र जिनमंदिरात्। सौधः - प्रासादः । क्रमागतं - कुलक्रमागतं । (४७) प्रेतावासे - श्मशाने । जनिः - उत्पत्तिः ।

अर्थ :– लोक विचार करू लागले की, ''लोकपूज्य राज्यपूत्रपणा कोठे ! आणि कोठे स्मशानामध्ये जन्म आणि राजसिंहासनाची प्राप्ती ! खरोखर कर्मगती विचित्र व आश्चर्यकारक फल देणारी असते हेच खरे !

पुण्यपापादृते नान्यत्सुखे दुःखे च कारणम् ।
तन्तवो न हि लूतायाः कूपपातानिरोधिनः ॥ ४८ ॥

अर्थ :– हे अगदी खरे आहे की, सुख आणि दुःखामध्ये पुण्य आणि पापाशिवाय दुसरे काहीच कारण नसते. कोळी नावाच्या कीडयाने विणलेले जाळे हे विहीरीत पडणाऱ्यास रोकूं शकते कां ? जे सुखदुःख दिसून येते तेथे पुण्यपाप एवढेच कारण आहे. पुरुषार्थ कारण नाही.

हत्त्वा जिघांसुमात्मानं लेभे राज्यं जिघांसितः ।
भाव्यवश्यं भवेदेव न हि केनापि रुध्यते ॥ ४९ ॥

अर्थ :– ज्यास मारण्याची इच्छा केली त्याने मात्र आपणास मारण्याची इच्छा करणाऱ्यालाच (काष्ठांगारास) मारून राज्य मिळविले ! जे भवितव्य घडावयाचे आहे ते निश्चितच घडते; ते कोणाकडूनही रोकले जाऊ शकत नाही.

जिजीविषाप्रपञ्चेन जातोऽयं राजवञ्चकः ।
काष्ठाङ्गारोऽपि नष्टोऽभूत्स्वं नाशी हि नाशकः ॥ ५० ॥

अर्थ :– प्रबल जीजीविषेने हा काष्ठांगार राजवंचक (राजाचा वध करणारा) झाला आणि तोच स्वयं नाश करणारा काष्ठांगार मात्र स्वतःच नष्ट झाला !

यक्षः क्षणोपकारेण प्राणदायी बभूव सः ।
काष्ठाङ्गारः कृतघ्नोऽभूत्स्वभावो न हि वार्यते ॥ ५१ ॥

अर्थ :– मरणक्षणीं एक क्षणमात्र णमोकार मंत्र देण्याच्या उपकाराने तो कुत्र्याचा जीव यक्ष होऊन त्याने जीवकस्वामीस वाचवून कृतज्ञ झाला ! या उलट लहानपणापासून ज्याचे पालनपोषण केले असा काष्ठांगार मात्र कृतघ्न झाला !

---

श्लोकांक (४८) तन्तवः - तन्तुजालं । लूतायाः - मकरीजालस्य । (४९) जिघांसुं - हन्तुं इच्छुं । जिघांसित्तः - हन्तुं इष्टः । (५०) जिजीविषाप्रपंचेन - जीवितुं इच्छाया विस्तारेण । (५१) स्वभावो न हि वार्यते - स्वभावो दुरतिकमः ।



कोणीही स्वभाव बदलूं शकत नाही.

अपकारोपकाराभ्यां सदसन्तौ न भेदिनौ ।
दग्धं च भाति कल्याणं केनाङ्गारविशुद्धता ॥ ५२ ॥

अर्थ :– अपकार वा उपकाराच्या कारणाने संत आणि असंत विपरीत स्वभावाचे (असंत व संत) होऊ शकत नाहीत. सोने तापवले तरी अधिक चकाकते. आणि कोळसा कितीही धुतला तरी काळा तो काळाच राहतो. तद्वत् सज्जनावर अपकार केला तरी दुर्जन न होता संतच राहतो व दुर्जनावर कितीही उपकार केले तरी तो दुर्जनच राहतो.

रिक्तारिक्तदशायां च सदसन्तौ न भेदिनौ ।
खातापि हि नदी दत्ते पानीयं न पयोनिधिः ॥ ५३ ॥

अर्थ :– सज्जन आणि दुर्जन निर्धन आणि धनवानही झालेत तरीही सज्जन आणि दुर्जन हे दुर्जन आणि सज्जन होत नाही. कोरडी नदी खोदली तरी पाणी देते. सज्जन निर्धन झाले तरी होईल त्या उपायाने परोपकारच करतात आणि सागर पाणी देतच नाही. तद्वत् दुर्जन श्रीमंत असेल तरीही तो परोपकार कधीच करत नाही.

इतीयं किंवदन्ती च तद्देशे शंवदाप्यभूत् ।
राजन्वती सती भूमिः कुतो वा न सुखायते ॥ ५४ ॥

अर्थ :– अशी ही लोकोक्ती - किवदंती जीवंधर कुमाराचे राज्यातही सार्थ झाली की, ''जर भूमी ही न्यायी राजामुळे राजवंती असेल तर कोठून सुख होणार नाही ?'' अर्थात् त्या भूमीवर सर्वत्र आबादी आबाद असते.

काष्ठाङ्गारकुटुम्बस्याप्यनुमेने सुखासिकाम् ।
स्वस्थानेऽपि महाराजो न ह्यस्थानेऽपि रुट् सताम् ॥ ५५ ॥

अर्थ :– जीवंधर कुमाराने काष्ठांगाराच्या कुटुंबी जनांना राजवाड्यातच सुखाने राहण्यास अनुमती दिली. अयोग्य स्थानी सुद्धा सज्जनाचा रोष असत नाही. काष्ठांगाराच्याही नातलगावर कुमार जीवंधराचा रोष नव्हता.

---

श्लोकांक (५२) कल्याणं - सुवर्णं । भेदिनौ - भिन्नस्वरूपौ । (५४) शंवदा - प्रियंवदा । राजवन्ती - शोभनराजवती । (५५) सुखासिकां - सुखेन अधिवसितुं ।

यौवराज्ये च नन्दाढ्यं वृद्धं क्षत्रोचिते पदे ।
गंधोत्कटं च चक्रेऽसौ लोकवन्द्ये च मातरौ ॥ ५६ ॥

अर्थ :– नंतर जीवक स्वामीने आपल्या लहान भावास नंदाढ्यास युवराजपदी आरूढ केले. स्थापन केले आणि वयोवृद्ध अशा पितृतुल्य गंधोत्कटास वयोवृद्ध व क्षत्रियास उचित अशा पदावर बसविले. आणि विजयादेवी आणि सुनंदा या दोन्ही मातांना लोकपूज्य पदावर स्थापन केले.

अकरामकरोद्धात्रीं वर्षाणि द्वादशाप्ययम् ।
महिषैः क्षुभितं तोयं न हि सद्यः प्रसीदति ॥ ५७ ॥

अर्थ :– तसेच स्वामींनी आपल्या सर्व प्रजाजनांना बारा वर्षेपर्यंत करमाफी देऊन राज्य बारा वर्षेपर्यंत करमुक्त केले. पृथ्वी करविरहित केली. कारण काष्ठांगाराचे राज्यात प्रजेवर बराच जुलुम करून प्रजेस कष्ट दिले होते. जसे रेड्यांनी गढूळ केलेले पाणी लौकर स्वच्छ होत नाही. तशीच गत राज्यातील प्रजाजनांची झाली होती.

पद्मवक्त्रादिमित्रेभ्यो यथायोग्यमदात्पदम् ।
अविशेषपरिज्ञाने न हि लोकोऽनुरज्यते ॥ ५८ ॥

अर्थ :– तसेच पद्मास्य आदि आपल्या सर्व मित्रांना यथायोग्य पद देवून संमानित केले. प्रत्येकामध्ये जे वैशिष्ट्य असते ते न ओळखता जर सर्वांचा सारखा सन्मान केला तर ते ठीक होत नाही. प्रजेस सुखदायक होत नाही.

पद्मादयोऽपि तद्देव्यः समागत्य तदाज्ञया ।
तं समीक्ष्य क्षणे चासन्क्षीणाखिलमनोव्यथाः ॥ ५९ ॥

अर्थ :– स्वामींच्या आज्ञेवरून त्यांच्या पद्मा आदि सर्व देवी (पत्नी, राण्या) राजपुरीत आल्या आणि कुमारास पाहताक्षणीच जणू त्यांच्या सर्व मनोव्यथा सर्वच समाप्त झाल्यात.

चिरस्थाय्यपि नष्टं स्याद्विरुद्धार्थे हि वीक्षिते ।
सन्निधावपि दीपस्य किं तमिस्त्रं गुहामुखम् ॥ ६० ॥

श्लोकांक (५७) अकरां - राजग्राह्यभागरहितां । (कर, टॅक्स)



अर्थ :– दीर्घकालीन दुःख सुद्धा जसे जर त्या विरुद्ध पदार्थाच्या दर्शनाने नाश पावतेच. तद्वत् दीर्घकाळ पतिविरहाच्या दुःखाने खेदखिन्न अशा त्या स्त्रिया पती जीवंधर कुमारास पाहताक्षणीच त्यांच्या सर्व मनोव्यथा दूर झाल्यात. दीपक जवळच असतांना गुहेचे मुख अंधारात राहूं शकते ? अर्थात् राहूं शकत नाही.

अथाऽयं नुवतेः पुत्रीं दत्तां गोविन्दभूभुजा ।
पर्यणैषीन्महाराजः पार्थिवैर्विहितोत्सवः ॥ ६१ ॥

अर्थ :– तर कुमार जीवंधराने गोविंद राजाने दिलेल्या आणि नुवतीची पुत्री लक्ष्मणाशी विवाह केला. तेव्हा सर्व सामंत राजांनी मोठा उत्सव केला.

इति श्रीमद्वादीभसिंहसूरिविरचिते क्षत्रचूडामणौ
लक्ष्मणालम्भो नाम
दशमो लम्बः ।

याप्रमाणे वादीभसिंहसूरिविरचित क्षत्रचूडामणि मध्ये राज्यलाभ आणि लक्ष्मणा लाभ यांचे वर्णन करणारा दहावा लंब समाप्त झाला.

श्लोकांक (६१) नवुतेः पुत्रीं - लक्ष्मणानाम्नीं ।

# अकरावा लंब

अथ राज्यश्रिया लब्ध्वा लक्ष्मणां मुमुदे कृती ।
चिरकांक्षितलाभे हि तृप्तिः स्यादतिशायिनी ॥ १ ॥

अर्थ :– याप्रमाणे राज्यलक्ष्मीसह लक्ष्मणा नामक युवतीला प्राप्त करून कर्तृत्ववान जीवंधरकुमार अत्यंत आनंदी झाले. बऱ्याच दिवसानंतर अपेक्षित वस्तूचा लाभ झाल्यानंतर अत्यंत तृप्ति होणे स्वाभाविकच आहे.

लब्ध्वा राज्यमयं राजा रेजे सर्वगुणैरपि ।
काचो हि याति वैगुण्यं गुण्यतां हारगो मणिः ॥ २ ॥

अर्थ :– राज्य मिळवून राजे जीवंधरकुमार आपल्या सर्व गुणांनीही सर्वप्रिय व शोभायमान झाले. मोती हारामध्ये गोवल्या गेलेला काचमणी असा शोभा पावत नाही. तद्वत् काष्ठांगार राजपुरीच्या सिंहासनामध्ये सर्व मांडलिकांच्या माळेत मुळीच शोभत नव्हता. आणि एखादा रत्नमणी त्या हारात खुलून दिसतो तद्वत् जीवंधरस्वामी त्या मांडलिकांच्या सभेत खुलून दिसत होता.

कृतिनामेकरुपा हि वृत्तिः संपदसंपदोः ।
न हि नादेयतोयेन तोयधेरस्ति विक्रिया ॥ ३ ॥

अर्थ :– संपदा-राज्य असो वा नसो कर्तृत्वशील महात्म्याची वृत्ती तर एकरूपच सारखी असते. अर्थात् संपत्तियोगात उत्फुल्ल होत नाही व विपत्काळी हतबल होत नाही. नदीच्या पाण्याने समुद्रामध्ये विकृती उत्पन्न होत नाही.

सुखदुःखे प्रजाधीने तदाभूतां प्रजापतेः ।
प्रजानां जन्मवर्जे हि सर्वत्र पितरौ नृपाः ॥ ४ ॥

अर्थ :– राज्याधिष्ठित कुमार झाले तेव्हा प्रजापति जीवंधराचे सुखदुःख

श्लोकांक (२) वैगुण्यं - विगुणः गुणहीनः निन्द्यः, तस्य भावः वैगुण्यं । गुण्यतां - प्रशस्तः गुणः गुण्यः; तस्य भावः गुण्यता; तां । हारगः - मालायां प्रविष्टः (३) नादेयतोयेन - नदीजलेन। तोयधेः - समुद्रस्य । (४) जन्मवर्जं - जन्म वर्जयित्वा; वर्जनं वर्जः जन्मनो वर्जः त्यागः यस्मिन् कर्मणि तत्तथा ।



प्रजेवर अवलंबून झाले. राजे हे जन्माशिवाय इतर सर्व बाबतीत प्रजेचे मातापिताच असतात.

आसीत्प्रीतिकरं तस्य करदानं च दानवत् ।
वृषलाः किं न तुष्यन्ति शालेये बीजवापिनः ॥ ५ ॥

अर्थ :– त्याचे राज्यात प्रजेला कर देणे हे दान देण्यासारखे सुखाचे वाटत असे. उपजावू जमीनीत धानाचे बीज पडले - म्हणजे शेतकरी सुखी होणार नाही कां ?

मित्रोदासीनशत्रूणां विषयेष्वपसर्पतः ।
तदज्ञानेऽपि तज्ज्ञानात्तदैवासीत्प्रतिक्रिया ॥ ६ ॥

अर्थ :– जी राज्ये शत्रु आहेत, मित्र आहेत, उदासीन आहेत त्या सर्वच राज्यामध्ये स्वामींचे गुप्तहेर फिरत असल्यामुळे तेथील कोणतीही गंधवार्ता त्या राजास ज्ञात असो वा नसो पण कुमारास तात्काळ कळत असे. त्यामुळे त्याचा बंदोबस्तही ताबडतोब होत असे.

रात्रिंदिवविभागेषु नियतो नियतिं व्यधात् ।
कालातिपातमात्रेण कर्तव्यं हि विनश्यति ॥ ७ ॥

अर्थ :– सर्वच राजकारभारांत नियमित असणारे जीवंधर कुमार त्यांनी रात्रौ आणि दिवसा सर्वच वेळी राजकारभारातील कर्तव्याची उचित विभागणी केली. जर वेळीच सर्व व्यवस्था झाली नाही तर कर्तव्य राज्यकारभार बिघडतो.

श्लोकांक (५) वृषलाः - कृषीवलाः । शालेये - शालिधान्यक्षेत्रे । (६) उदासीनः - जिगीषोः नृपतेः शत्रुमित्रभमितः व्यवहितः परतरः, 'विषयानन्तरो राजा शत्रुर्मित्रमतः, परं; उदासीनः परतरः' इत्यमरः । अपसर्पतः - चारात्, गुप्तचरात् । विषयेषु - मण्डलेषु । तदज्ञाने - तत्कर्तृकज्ञाने असति अपि । तज्ज्ञानात् - स्वस्य तद्विषयकज्ञानात् । (७) रात्रिंदिवविभागेषु - रात्रौ दिवा च रात्रिंदिवं, अत्र षष्ठवर्थः; अहोरात्रयोरित्यर्थः; तयोःविभागाःप्रहरादयः तेषु । नियतं - यत् आदिष्टं अस्मिन् काले कर्तव्यं इति तत् । कालातिपातमात्रेण - कालातिक्रमेण केवलं; 'क्षिप्रमक्रियमाणस्य कालः पिबति तद्रसं' इति समानार्थपदं; । (८) राज्यं - राज्ञः कर्म । योगः - अनुपात्तस्य उपादानं; क्षेमः - उपात्तस्य रक्षणं योगश्च क्षेमश्च इति समाहारद्वंद्वः । प्रपंचतः - विस्तारेण ।

तपसा हि समं राज्यं योगक्षेमप्रपञ्चतः ।
प्रमादे सत्यधःपातादन्यथा च महोदयात् ॥ ८ ॥

अर्थ :– **योगक्षेमाच्या दृष्टीने राज्य हे तपासारखे आहे. राज्यातही काही नवीन प्रांत जोडणे (योग) व जे आहेत त्यात क्षेम राखणे हे तपासारखेच महत्त्वाचे आहे. तपामध्ये आहे त्या आपल्या सामर्थ्यावर दृढ राहून पुढे आपला मोक्षमार्ग अधिक कसा वृद्धिंगत होईल हे दोन्ही पाहणे म्हणजे क्षेम व योग आवश्यकच असते. त्यात प्रमाद घडला असतां राज्य व तप दोहोंचाही अधःपात होतो; आणि प्रमाद घडला नाही तर दोहोंचाही महान् उदय होतो.**

प्रबुद्धेऽस्मिन्भुवं कृत्स्नां रक्षत्येकपुरीमिव ।
राजवन्ती च भूरासीदन्वर्थं रत्नसूरपि ॥ ९ ॥

अर्थ :– **सदैव जागरुक असे कुमार जीवंधर हे संपूर्ण राज्याचे शासन एखाद्या नगरीच्या शासनाप्रमाणे अत्यंत आटोपशीरपणाने व दक्षतेने सांभाळत होते. त्यामुळे ती राज्यभूमी खऱ्या अर्थाने राजन्वती होऊन शोभिवंत दिसत होती. ती जणूं रत्नसू होती. अर्थात् समृद्ध होती.**

एवं विराजमानेऽस्मिन्राजराजे महोदये ।
विजया जननी तस्य विरक्ता संसृतावभूत् ॥ १० ॥

अर्थ :– **अशाप्रकारे भाग्यशाली जीवंधर राजकारभार चालवीत असताना कुमाराची आई, विजया ही संसारापासून विरक्त झाली.**

पैतृकं पदमद्राक्षमत्राहं पुत्रपुङ्गवे ।
कृताः पुरोपकर्तारः कृतकृत्या यथोचितम् ॥ ११ ॥

अर्थ :– **ती विचार करू लागली - ''मी माझ्या पुत्रश्रेष्ठाला आपल्या पित्याचे राज्य पुनः प्राप्त करताना प्रत्यक्ष पाहून धन्य झाले ! आमच्यावर उपकार करणाऱ्या गंधोत्कटादिकांनाही यथोचित योग्य प्रत्युपकारद्वारा त्यांचाही त्याने मानमरातब राखलेलाही मी पाहिला आहे !''**

---

श्लोकांक (९) प्रबुद्धे - जागरूके । एकपुरीमिव रक्षति - अनायासेन शासति सति; एकपुरीमित्यनेन सकलमहीमंडल - पालनमनायासेन द्योत्यते । अन्वर्थं - अनुगतार्थनामकं यथा तथा । रत्नसू - रत्नानि सूते इति । कृत्स्नां - चतुःसागरपर्यन्तां । (११) पैतृकं - पितुरिंदं ।



फलं च पुण्यपापानां मया मय्येव वीक्षितम् ।
शास्त्राद्दते किमन्यत्र कर्मपाकोऽयमीक्षितः ॥ १२ ॥

अर्थ :– **''पुण्यपापाचे फल मीच स्वतः माझे जीवनातच अनुभवले आहे. आता शास्त्राशिवाय अन्यत्र पाहण्याची पुनः गरज ती काय ?''**

अतोऽपास्य सुतस्नेहं तपस्यामि यथोचितम् ।
ज्ञात्वापि कुण्डपातोऽयं कुत्सितानां हि चेष्टितम् ॥ १३ ॥

अर्थ :– **''आता मात्र पुत्रस्नेह बाजूला सारून यथोचित तपसंयम साधून तप करेन ! कारण संसाराचे स्वरूप जाणूनही पुनश्च त्याच संसारात बुद्धिपूर्वक रममाण होणे ही गोष्ट नीच पुरुषास शोभादायक वाटते. तत्त्वज्ञास शोभणारी नाही.**

इति वैराग्यतस्तस्याः सुनन्दापि व्यरज्यत ।
पाके हि पुण्यपापानां भवेद्बाह्यं च कारणम् ॥ १४ ॥

अर्थ :– **विजयामातेचे वैराग्य पाहून सुनंदा माताही विरक्त झाली. पुण्यपापाचे फल मिळतांनाही यथायोग्य बाह्यनिमित्त कारणांचा योग सहजासहजी प्राप्त होतच असतो.**

ततः कृच्छ्रायमाणं ते महीनाथं च कृच्छ्रतः ।
अनुज्ञाप्य ततो गत्वादीक्षिषातां यथाविधि ॥ १५ ॥

अर्थ :– **नंतर त्या दोन्ही मातांनी आपल्या विरक्ती व दीक्षा यामुळे खेदखिन्न जीवंधराची कशीबशी समजूत काढून परवानगी घेवून त्यानी यथाविधी दीक्षा घेतली.**

पद्माख्या श्रमणीमुख्या विश्राण्य श्रमणीपदम् ।
तन्मातृभ्यां ततस्तं च महीनाथमबोधयत् ॥ १६ ॥

अर्थ :– **पद्मा नावाच्या एका पसिद्ध आर्यिकेने कुमाराच्या दोन्ही मातांना दीक्षा देऊन दुःखी राजा कुमार जीवधरासही उपदेश देवून प्रबोधन केले.**

---

श्लोकांक (१३) कुण्डपातः - कुण्ड्यते रक्ष्यते जलं अग्निर्वा कुण्डः, अग्निकुण्डे जलाशये वा पतनम् । (१५) कृच्छ्रायमाणं - दुःखविशिष्टं । (१६) विश्राण्य - दत्त्वा । (१७) प्रव्रज्या - व्रतादानं ।

प्रव्रज्या जातुचित्प्राज्ञैः प्रतिषेद्धुं न युज्यते ।
न हि खादापतन्ती चेद्रत्नवृष्टिर्निवार्यते ॥ १७ ॥

अर्थ :– "जर कोणी दीक्षा घेत असेल तर कोणत्याही शहाण्या माणसाने त्यास रोकणे उचित नाही. आकाशातूनच जर रत्नवृष्टी होत असेल तर ती कशी रोकल्या जाईल ? अर्थात् रोकणे शक्य नाही.

वयस्यन्तेऽपि वा दीक्षा प्रेक्षावद्भिरपेक्ष्यताम् ।
भस्मने रत्नहारोऽयं पंडितैर्न हि दह्यते ॥ १८ ॥

अर्थ :– "वय संपत असलेले दिसतांना विचारवंतांनी दीक्षेची इच्छा अपेक्षा जरूर करावी. विद्वान् ज्ञानी पुरुषांनी मौल्यवान् रत्नहार जाळून राखेमध्ये भर घालणे योग्य नाही. तद्वत् हा मानवजन्म संसारातच खर्ची घालणें योग्य नाही."

इति प्रबोधितो नत्वा प्रसवित्रीं सकाशतः ।
प्रश्रयेण गतो राजा प्राविक्षन्नृपमन्दिरम् ॥ १९ ॥

अर्थ :– याप्रमाणे पद्मा आर्यिकेने दिलेला उपदेश श्रवण करून कुमाराने त्यांना नमस्कार करून तेथून ते परत फिरले व राजमंदिरात प्रवेश करते झाले.

न चिराद्धि पदं दत्ते कृतिनां हृदि विक्रिया ।
यदि रत्नेऽपि मालिन्यं न हि तत्कृच्छ्शोधनम् ॥ २० ॥

अर्थ :– कृतकृत्य पुण्यात्म्याचे हृदयात कोणताही विकार दीर्घकाळ टिकून राहात नाही. जर रत्नावर धूळ चढलेली असेल तर ती दूर करण्यास फारसे कष्ट पडत नाही. तद्वत् मातेच्या दीक्षेने झालेली व्यथा दीर्घकाळ टिकून राहिली नाही.

अथास्य क्षात्रविद्यस्य क्षणवद्भुञ्जतो महीम् ।
त्रिदशोपमसौख्येन त्रिंशद्वर्षाण्ययासिषुः ॥ २१ ॥

अर्थ :– याप्रमाणे क्षात्रविद्येमध्ये निपुण राजा जीवंधराने स्वर्गातील देवाप्रमाणे अत्यंत सुखाने तीस वर्षेपावेतो जणू क्षणाप्रमाणे काळ व्यतीत करून राज्यसुखाचा उपभोग घेतला.

---

श्लोकांक (१९) प्रश्रयेण - विनयेन । (२०) कृच्छ्रशोधनं - कृच्छ्रेण कष्टेन शोधनं ।



ततः कदाचिदस्यासीज्जलक्रीडामहोत्सवः ।
वसन्ते सह कांताभिरष्टाभिरतिकौतुकात् ॥ २२ ॥

अर्थ :– पुढे एकेकाळी वसंत ऋतूचे आगमन झाले असताना स्वामींनी आपल्या आठ राण्यासह मोठ्या कौतुकाने जलक्रीडेचा आनंदोत्सव साजरा करण्याचे ठरविले व ते जलक्रीडेसाठी उपवनात गेले.

जलक्रीडाश्रमात्सोऽयमाक्रीडे च सनीडके ।
क्रीडन्कापटिकैः श्लाघ्यं कापेयं निरवर्तयत् ॥ २३ ॥

अर्थ :– जलक्रीडेच्या श्रमाने दमल्यामुळे एका लता मंडपादिकांनी सुशोभित अशा बागेत गेले. तेव्हा तेथे त्यांनी वानरांच्या टोळ्या मनोहर चेष्टा करण्यात दंग होत्या.

अन्यसंपर्कतः क्रुद्धां मर्कटीं कोऽपि मर्कटः ।
प्रकृतिस्थां बहूपायैर्नाशकत्कर्तुमुद्यतः ॥ २४ ॥

अर्थ :– त्यात कोणी एक वानर अन्य वानरीच्या मागे लागलेला पाहून त्याची पूर्व प्रेयसी वानरीला अत्यंत क्रोध आला. तेव्हा तिला पूर्ववत् शांत व प्रसन्न करण्यासाठी त्या वानराने तिची नानाप्रकारे मनधरणी करून समजूत घालण्याचा यत्न केला. पण व्यर्थ !

ततः शाखामृगोऽप्यासीन्मायिको मृतवद्दशः ।
तदवस्थां भयग्रस्ता वानरीऽयमपाकरोत् ॥ २५ ॥

अर्थ :– शेवटी त्या वानराने कपट रचून तो मेल्यासारखा पडून राहिला. हे पाहताच ती वानरी फार घाबरली व त्याचे जवळ जाऊन तिने त्यास हलविले, जागविले.

हर्षलो हरिरप्यस्यै पनसस्य फलं ददौ ।
वनपालो जहारैतद्वानरीमपि भर्त्सयन् ॥ २६ ॥

---

श्लोकांक (२३) सनीडके - लतामंडपसहिते । आक्रीडे - उद्याने । कापटिकैः - मर्कटैः । कापेयं - कपिचेष्टां । निरवर्तयत् - ददर्श । (२४) संपर्कतः - संभोगतः । प्रकृतिस्थां - प्रसन्नां । (२५) मायिकः - मायावी । मृतवद्दशः - मृतस्य इव दशा यस्य सः । (२६) हर्षलः - संतोषविशिष्टः । हरिः - मर्कटः । भर्त्सयन् - करप्रचलयष्टिना भयप्रदर्शयन् ।

अर्थ :– त्यामुळे हर्षाने उत्फुल्ल होऊन त्या वानराने तिला एक फणसाचे फल दिले. परंतु तेथील वनपालाने हे पाहिले व त्या वानरीस दमदाटी देत त्याने ते फळ तिच्यापासून हिसकावून घेतले.

इत्यशेषं विशेषज्ञो वीक्षमाणः क्षितीश्वरः ।
तत्क्षणे जातवैराग्यादनुप्रेक्षामभावयत् ॥ २७ ॥

अर्थ :– हे संपूर्ण दृश्य पाहून विवेकसंपन्न कुमार जीवंधर यांना तत्क्षणी वैराग्य उत्पन्न झाले व ते येणेप्रमाणे बारा अनुप्रेक्षांचे चिंतवन करू लागले.

द्वादश अनुप्रेक्षा - १ अनित्यानुप्रेक्षा

मद्यते वनपालोऽयं काष्ठांगारायते हरिः ।
राज्यं फलायते तस्मान्मयैव त्याज्यमेव तत् ॥ २८ ॥

अर्थ :– आता पाहलेल्या दृश्याप्रमाणे हा वनपाल माझ्यासारखा आहे; काष्ठांगार वानराप्रमाणे आहे, हे राज्य फणसाप्रमाणे आहे. म्हणून वनपालाने वानराचे हातातून फळ हिसकावले. त्याप्रकारे मी सुद्धा काष्ठांगारापासून राज्य परत घेतले. अतएव हे राज्य मलाही सोडण्यायोग्यच आहे.

जाताः पुष्टाः पुनर्नष्टा इति प्राणभृतां प्रथाः ।
न स्थिता इति तत्कुर्याः स्थायिनी आत्मन् ! पदे मतिम् ॥ २९ ॥

अर्थ :– जन्मास आला, धष्टपुष्ट झाला (वाढला), आणि गेला (संपला) हीच तर सर्व संसारी प्राण्यांची गत आहे. चार गतीरूप संसारातील एकही भव कोणताच स्थायी शाश्वत नाही. म्हणून हे आत्मन् ! या अशा आत्म्यामध्ये आस्था ठेव ! हे आत्मन् ! अविनाशी अशा आत्म्यामध्ये बुद्धि स्थिर कर.

स्थायीति क्षणमात्रं वा ज्ञायते न हि जीवितम् ।
कोटेरप्यधिकं हन्त जन्तूनां हि मनीषितम् ॥ ३० ॥

---

श्लोकांक (२७) अशेषं - संपूर्णं । अनुप्रेक्षां - तत्वानुचिंतनम् । (२८) मद्यते - यथा अहं तथैव आचरति । काष्टाङ्गारायते - काष्टाङ्गारवत् आचरति । (२९) फलायते - ॅवत् आचरति । प्रथाः - परिपाटी । स्थायिनि पदे - स्थिरे स्थाने; मोक्षे । पतत्रेः - पक्षिणः ।



अर्थ :– हे जीवित किती टिकाऊ आहे की क्षणमात्र सोबत आहे समजून येत नाही. परंतु प्राणिमात्राच्या इच्छा मात्र कोटीपेक्षाही जास्त असतात.

अवश्यं यदि नश्यन्ति स्थित्वापि विषयाश्चिरम् ।
स्वयं त्याज्यास्तथा हि स्यान्मुक्तिः संसृतिरन्यथा ॥ ३१ ॥

अर्थ :– जर हे पाचही इंद्रियाचे विषय काही काळ राहून अवश्य नाश पावतातच. अशा परिस्थितीत जर त्यांना आपणहून सोडले तर त्यामुळे निश्चित मुक्ती मिळते. जर आपण न सोडले. तरी ते तर नष्ट होणारच आहेत. न सोडण्याचा भाव हीच त्यातील आत्मत्वाची बुद्धी आहे; मोह आहे. आणि त्यामुळे व तेवढ्याच कारणाने तर संसार आहे.

अनश्वरसुखावाप्तौ सत्यां नश्वरकायतः ।
किं वृथैव नयस्यात्मन्क्षणं वा सफलं नय ॥ ३२ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! हे नाशवंत शरीर आहे. अशा शरीराच्या धर्मसाधनेसाठी जर उपयोग केला तर धर्माने अविनाशी आत्मोत्थ सुख प्राप्त होते, हा अत्यंत स्वस्त सौदा आहे. म्हणून हे आत्मन्! कां बरे आयुष्य क्षणाक्षणाने वाया घालवतोस ! प्रत्येक क्षणास धर्मार्थ घालवून क्षणास सफल कर कसा !

२ अशरणानुप्रेक्षा

पयोधौ नष्टनौकस्य पतत्रेरिव जीव ते ।
सत्यपाये शरण्यं न तत्स्वास्थ्ये हि सहस्रधा ॥ ३३ ॥

अर्थ :– सर्वत्र समुद्र सभोवती असताना नौकेतील शिडावर बसलेल्या पाखराप्रमाणे हे जीवा ! या संसारामध्ये तुला जन्ममृत्यु पासून वाचविण्यास कोणीही समर्थ नाही. जसा त्या पाखरास शीडाशिवाय अन्य कोणताही आश्रयच नाही तद्वत् या संसारात या जीवास मरणापासून वाचविणारा कोणीही शरण नाही ! आणि सुखप्रसंगी मात्र हजारो जमतात.

आयुधीयैरतिस्निग्धैर्बन्धुभिश्चाभिसंवृतः ।

---

श्लोकांक (३४) आयुधीयैः - आयुवेन जीवन्ति ते आयुधीयाः; तैः । पश्यतां एव - पश्यतः तान् अनादृत्य (षष्ठी चानादरे)

जन्तुः संरक्ष्यमाणोऽपि पश्यतामेव नश्यति ॥ ३४ ॥

अर्थ :– आजुबाजूला शस्त्रे जय्यत तयार आहेत. अत्यंत प्रेमळ नातलग सभोवताल आहेत. या सर्वांनी रक्षण करतो म्हटले तरी या जीवास मरणापासून कोणीही वाचवूं शकत नाही. तो पाहता पाहतांच नाश पावतो. भव नष्ट होऊन मरण पावतो.

मन्त्रयन्त्रादयोऽप्यात्मन्स्वतंन्त्र शरणं न ते ।
किंतु सत्येव पुण्ये हि नो चेत्के नाम तैः स्थिताः ॥ ३५ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! कोणतेही मंत्र, यंत्र आदि बाह्य सामग्री कोणीच तुला स्वतंत्रपणे शरण नाही. परंतु जर पुण्य असेल तरच ते शरण असतात. जर पुण्य नसेल तर ते असून उपयोग तो कोणता ?

३ संसारानुप्रेक्षा

नटवन्नेकवेषेण भ्रमस्यात्मन्स्वकर्मतः ।
तिरश्चि निरये पापाद्दिविपुण्याद्द्वयान्नरे ॥ ३६ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! तूं नटाप्रमाणे संसारामध्ये अनेक भव गती धारण करून आपल्या कर्मानुसार भ्रमण करतो आहेस ! पापामुळे तिर्यंचगति व नरकगतीमध्ये आणि पुण्यामुळे देवगती आणि मनुष्य गती प्राप्त होते.

पञ्चानन इवामोक्षादसि पञ्जरआहितः ।
क्षणेऽपि दुःसहे देहे देहिन्हन्त कथं वसेः ॥ ३७ ॥

अर्थ :– हे जीवा ! तूं या संसारामध्ये मोक्ष प्राप्त होईपर्यंत लोखंडी पिंजऱ्यात अडकलेल्या सिंहाप्रमाणे या संसाराच्या व देहाच्या पिंजऱ्यामध्ये अडकून पडला आहेस ! दुःखाने असह्य अशा या शरीरामध्ये हे आत्मन् ! तूं कसा बरे राहतो आहेस ! साश्चर्य खेद आहे !

तन्नास्ति यन्न वै भुक्तं पुद्गलेषु मुहुस्त्वया ।

श्लोकांक (३६) नैकवेषेण - नानाविधवेषेण । द्वयात् - पापपुण्याभ्यां । दिवि - देवगतौ । नरे - मनुष्यगतौ (३७) आहितः - बद्धः । पंचाननः - शार्दूलः । अमोक्षात् - अमुक्तत्वात् ।



तल्लेशस्तव किं तृप्त्यै बिन्दुः पीताम्बुधेरिव ॥ ३८ ॥

अर्थ :– या संसारामध्ये असा एकही पदार्थ नाही की ज्या पुद्गलाचा तूं अनेकवार उपभोग घेतला नाहीस ! भोगून भोगून त्यातील लेशमात्राने तुझी तृप्ती झाली कां ? होईल कां ? ज्याप्रमाणे सागराचे जलप्रमाणे सर्व जल पिऊनही तहान नाहीशी झाली नाही तद्वत् तुझी शांति कशानेही होणार नाही.

भुक्तोज्झितं तदुच्छिष्टं भोक्तुमेवोत्सुकायसे ।
अभुक्तं मुक्तिसौख्यं त्वमतुच्छं हन्त नेच्छसि ॥ ३९ ॥

अर्थ :– भोगून भोगून जे उच्छिष्ट आहे त्यासच वारंवार भोगण्यामध्ये तूं अत्यंत उत्सुक आहेस ! परंतु खरे आहे की, अद्यापपावेतो न भोगलेले मुक्तीसौख्य मात्र भोगण्यास तूं उत्सुक नाहीस ?

संसृतौ कर्म रागाद्यैस्ततः[१] कायान्तरं ततः[२] ।
इन्द्रियानिन्द्रियद्वारा रागाद्याश्चक्रकं पुनः ॥ ४० ॥

अर्थ :– संसारात अनादिकालापासून रागद्वेषामुळे कर्मबंध होतो आहे. त्या कर्मबंधाने नवनवे शरीर धारण करतो आहेस ! तदनंतर त्या शरीरातील इंद्रिय आणि मनद्वारा भोग भोगल्याकारणाने पुनः रागादिक होताहेत ! असे हे संसाराचे रहाटगाडगे अखंड सुरू आहे.

सत्यनादौ प्रबन्धेस्मिन्कार्यकारणरूपके ।
येन दुःखायसे नित्यमद्य वात्मन्विमुञ्च तत् ॥ ४१ ॥

अर्थ :– याप्रमाणे कार्यकारणरूपाने अशी अविछिन्न परंपरा चालू असतांना ज्यामुळे हे आत्मन ! तूं एक सारखा दुःखी होत आहेस त्याचा तूं त्याग तर कर कसा !

४ एकत्वानुप्रेक्षा

त्यक्तोपात्तशरीरादिः स्वकर्मानुगुणं भ्रमन् ।

श्लोकांक (३९) उत्सुकायसे - उत्सुकः भवसि । अतुच्छं - अनल्पं, श्रेष्ठं । (४०) कायान्तरं - अन्यत् शरीरं । १ततः - कर्मणः । २ततः - कायान्तरात् । चक्रकं - संसारभ्रमणं । (४१) प्रबंधे - संसारबन्धे । दुःखायसे - दुःखं प्राप्नोषि; वेदयसे ।

त्वमात्मन्नेक एवासि जनने मरणेऽपि च ॥ ४२ ॥
बन्धवो हि श्मशानान्ता गृह एवार्जितं धनम् ।
भस्मने गात्रमेकं त्वां धर्म एव न मुञ्चति ॥ ४३ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! एक शरीर सोडून दुसरे शरीर धारण करत करत आपल्या कर्मानुसार भ्रमण करणारा तूं जन्म आणि मरण या दोन्ही वेळी एकटाच असतोस. बंधू, मित्र सर्वच जास्तीत जास्त स्मशानापर्यंतच येतात, धन कमावलेलेही घरातच आहे तेथे राहते, शरीर तर राखरूपाने मातीत मिसळते. फक्त धर्मच तेवढा तुझी सोबत करतो. धर्मच हा तुझ्या सोबत राहतो.

पुत्र-मित्र-कलत्राद्यमन्यदप्यन्तरालजम् ।
नानुयायीति नाश्चर्यं नन्वङ्गं सहजं तथा ॥ ४४ ॥

अर्थ :– पुत्र, मित्र, कलत्र-पत्नी आदि हे तर मध्यंतरी संयोगरूपाने तुझ्या सोबत असतात. तेही तर तुझ्या सोबत येत नाहीत. यात काहीच आश्चर्य नाही ! परंतु जन्मासोबत प्राप्त शरीरही तुझी साथ करत नाही हे केवढे आश्चर्य आहे !

त्वमेव कर्मणां कर्ता भोक्ता च फलसन्ततेः ।
मोक्ता च तात किं मुक्तौ स्वाधीनायां न चेष्टसे ॥ ४५ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! तूं तुझ्याच पापपुण्याचा कर्ता आहेस ! तूंच एकटा या कर्माच्या फलपरंपरेचा भोक्ता आहेस !! आणि कर्मबंधनातून मुक्त होतोस त्या वेळीही तूं एकटाच आहेस ! अशी वस्तुस्थिती असतांना मोक्षप्राप्ती ही सर्वस्वी तुझ्या स्वाधीन असतांनाही तूं मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करत नाहीस हे आश्चर्यच आहे ! तूं स्वाधीन मुक्तिसुख मिळविण्याचा यत्न का करत नाहीस ?

अज्ञातं कर्मणैवात्मन्स्वाधीनेऽपि सुखोदये ।
नेहसे तदुपायेषु यतसे दुःखसाधने ॥ ४६ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! कर्मोदयामुळे तूं अज्ञानी होऊन आपल्या स्वाधीन आत्मोत्कर्षाच्या-मोक्षमार्गा-पासून होणाऱ्या सुखाची व त्याच्या प्राप्तीमध्ये साधनाची इच्छाही करत नाहीस. उलट तूं यामुळेच संसारात भटकत आहेस.

---

श्लोकांक (४४) अन्तरालजं - अन्तराले मध्यगतकाले प्राप्तं । (४६) अज्ञातं - यथा स्यात् तथा । निचोलासिसंनिभः - कोशान्तर्वर्तिना खड्गेन समानः; (निचोलः कोशः) ।



५ अन्यत्वानुप्रेक्षा

देहात्मकोऽहमित्यात्मञ्जातु चेतसि मा कृथाः ।
कर्मतो ह्यपृथक्त्वं ते त्वं निचोलासिसंनिभः ॥ ४७ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! मी देहात्मक आहे असे तूं मनामध्ये कधी मानून बसू नकोस. तू तर कर्मापासूनही वेगळाच आहेस. ज्याप्रमाणे तलवार म्यानापासून वेगळीच असते तद्वत् आत्मा कर्मापासूनही भिन्नच आहे.

अध्रुवत्वादमेध्यत्वादचित्त्वाच्चान्यदङ्गकम् ।
चित्त्वनित्यत्वमेध्यत्वैरात्मन्नन्योऽसि कायतः ॥ ४८ ॥

अर्थ :– शरीर हे अध्रुव असल्यामुळे, अपवित्र असल्यामुळे, अचेतन असल्यामुळे आणि तूं तर मात्र सचेतन; नित्य व पवित्र असल्यामुळे हे आत्मन ! या शरीरापासूनही अत्यंत भिन्न आहेस !

हेये स्वयं सती बुद्धिर्यत्नेनाप्यसती शुभे ।
तद्धेतुकर्म तद्वन्तमात्मानमपि साधयेत् ॥ ४९ ॥

अर्थ :– हेयामध्ये स्वयं प्रवृत्त होणारी बुद्धी आणि प्रयत्नपूर्वक-पुरुषार्थपूर्वक शुभामध्ये मात्र न प्रवर्तणारी अशी बुद्धी ! यास कारणही जीवाचे कर्ममात्रच आहे. ते कर्मच त्याच्या अनुभागानुसार जीवासही शुभ किंवा अशुभ परिणमविते; हे लक्षांत न घेताही कर्मानुसार वागणे तूं कधीच सोडत नाहीस. हे आश्चर्यच आहे.

६ अशुचित्वानुप्रेक्षा

मेध्यानामपि वस्तूनां यत्संपर्कादमेध्यता ।
तद्गात्रमशुचीत्येतत्किं नाल्पमलसंभवम् ॥ ५० ॥

अर्थ :– ज्या अशुचि शरीराच्या संसर्गामुळे शुचि स्वच्छ पदार्थही अशुचि

---

श्लोकांक (४८) अमेध्यत्वात् - अशुचित्वात् । अचित्त्वात् - जडत्वात् । (४९) सती - प्रवर्तमाना । असती - अप्रवृत्ता । तद्धेतुकर्म - शुभाशुभप्रवृत्तेः हेतुः पूर्वजन्मकृतकर्म । तद्वन्तं - शुभाशुभप्रवृत्तिरूपं । (५०) मेध्यानां - पवित्रानां । अल्पमलसंभवं - शुक्लशोणितादिकारणं यस्यत् ।

होतात असा हा देह अशुचि आहे, यांत तर आश्चर्य नाही. परंतु तो देहही अपवित्र वस्तूचा पुंज आहे.

अस्पष्टं दृष्टमङ्गं हि सामर्थ्यात्कर्मशिल्पिनः ।
रम्यमूहे किमन्यत् स्यान्मलमांसास्थिमज्ञतः ॥ ५१ ॥

अर्थ :– कर्मरूप शिल्पकाराच्या सामर्थ्याने शरीर हे बाहेरून अपवित्र न दिसणारे हे शरीर मात्र बाहेरून रम्य दिसते. परंतु विचार केला तर मल, मांस, हाडे, मज्ञा याशिवाय शरीर हे आणखी काय आहे ? अर्थात् कांहीच नाही.

दैवादन्तः स्वरूपं चेद्बहिर्देहस्य किं परैः ।
आस्तामनुभवेच्छेयमात्मन्को नाम पश्यति ॥ ५२ ॥

अर्थ :– जर दैवयोगाने देहाचे हे आंतररूप देहाच्या बाहेर आले तर फार काय सांगावे, त्या शरीराचा भोग घेणे तर दूरच राहो परंतु त्याकडे कोण खरोखर पाहील ? अर्थात् कोणीच नाही.

एवं पिशितपिण्डस्य क्षयिणोऽक्षयशंकृतः ।
गात्रस्यात्मन्क्षयात्पूर्वं तत्फलं प्राप्य तत्यज ॥ ५३ ॥

अर्थ :– परंतु हे आत्मन् ! असे हे मल-मांस-रक्तादिकांचे पिंडरूप शरीर त्याचा उपयोग तप-व्रतादि धर्मसाधनेकडे करून घेतला तर त्याचा नाश होण्यापूर्वी त्याचेकडून इष्ट मोक्षफलाची प्राप्ती करून घेवून नंतर त्याच्या त्यागास भीऊ नकोस !

आत्तसारं वपुः कुर्यास्तथात्मंस्तत्क्षयेऽप्यभीः ।
आत्तसारेऽक्षुदाहेऽपि न हि शोचन्ति मानवाः ॥ ५४ ॥

अर्थ :– शरीरापासून सारभूत तेवढे प्राप्त करून घे. तदनंतर त्याचा नाश झाला तरी त्यास भिण्याचे कारण नाही. सार-रस काढून घेतल्यानंतर उसाची

श्लोकांक (५१) ऊहे - विचारे । (५२) अन्तःस्वरूपं - अन्तर्भागः । आस्तां - दूरे आस्तां । (५३) पिशितपिंडस्य - मांसपिंडस्य । क्षयिणः - नश्वरस्य । अक्षयशंकृतः - मोक्षसुखोपलब्धि-साधनभूतः । (५४) आत्तसारं - आत्तः सारः साफल्यं येन तत् । आत्तसारेक्षुदाहे - आत्तः निष्कासितः सारः रसः यस्मात् तस्य इक्षुदंडस्य ज्वालने ।



चिपाडे जळालीत तरी त्याची कोणी चिंता करत नाही, शोक करत नाही.

७ आस्रवानुप्रेक्षा

अजस्रमास्रवन्त्यात्मन्दुर्मोचाः कर्मपुद्गलाः ।
तैः पूर्णस्त्वमधोधः स्या जलपूर्णो यथा प्लवः ॥ ५५ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! ज्यांना दूर करणे अत्यंत कष्टाचे आहे अशा कर्मपुद्गलाचा आस्रव या संसारामध्ये अनादि काळापासून निरंतर सदैव होत आहे. ज्याप्रमाणे छिद्रातून आलेल्या पाण्याने भरलेली नाव खालीखाली रसातलास जाते तद्वत् हा आत्मा या अनादि संसारात या कर्मभाराने सारखा बुडत आहे.

तन्निदानं तवैवात्मन्योगभावौ सदातनौ ।
तौ विद्धि सपरिस्पन्दं परिणामं शुभाशुभम् ॥ ५६ ॥

अर्थ :– त्याचे कारण अनादि काळापासून चालत आलेले तुझेच योग आणि रागद्वेषादि परिणाम हे आहेत. ते म्हणजेच परिस्पंदाने सहित असे तुझेच परिणाम आहेत, असे तूं समज.

आस्रवोऽयममुष्येति ज्ञात्वात्मन्कर्मकारणे ।
तत्तन्निमित्तवैधुर्यादपवाह्योर्ध्वगो भव ॥ ५७ ॥

अर्थ :– हा या भावाने होणारा आस्रव आहे असे या कर्मांचे कारणास जाणून त्या त्या कारणापासून दूर होऊन उर्ध्वगमन करणारा शुद्ध आत्मा प्राप्त करून घे.

८ संवरानुप्रेक्षा

संरक्ष्य समितिं गुप्तिमनुप्रेक्षापरायणः ।
तपःसंयमधर्मात्मा त्वं स्या जितपरीषहः ॥ ५८ ॥

श्लोकांक (५५) प्लवः - नौः । (५६) तन्निदानं - आश्रवस्य कारणं । योगभावौ - योगः मनोवाक्कायव्यापारः भावश्च कषायपरिणामः; तौ । सपरिस्पपन्दं - प्रदेशचलनं योगः । (५७) वैधुर्यात् - त्यागात् । अपवाह्य - आस्रवं निध्यरु ।

अर्थ :– यत्नाचाराची म्हणजेच समितीची पालना करून गुप्ती, अनुप्रेक्षा यामध्ये तन्मय होऊन तप-संयम-धर्म यासह तद्रूप होऊन तूं परीषहास जिंकणारा व्हावेस !

एवं च त्वयि सत्यात्मन्कर्मास्रवनिरोधनात् ।
निरन्ध्रपोतवद्भूया निरपायो भवाम्बुधौ ॥ ५९ ॥

अर्थ :– याप्रमाणे या उपरोक्त कारणाने नूतन कर्माचा निरोध झाल्यामुळे ज्याप्रमाणे नौकेचे छिद्र बुजवलेले असतांना सागरामध्ये नौका बुडत नाही तद्वत् या सर्व संवरद्वाराने नूतन कर्माचा निरोध झाला असतांना या संसारासागरात संभाव्य संकटानी आपत्तींनी मुक्त होऊन निर्भय होशील. (ज्याप्रमाणे छिद्र रहित नाव जशी समुद्रांत निष्कंटक विहार करते तद्वत् तुझी ही जीवननौका संसारसागर निर्विघ्नपणे तरून जाईल.)

विकथादिवियुक्तस्त्वमात्मभावनयान्वितः ।
त्यक्तबाह्यस्पृहो भूया गुप्त्याद्यास्ते करस्थिताः ॥ ६० ॥

अर्थ :– हे आत्मन् ! तू विकथा वगैरे पंधरा प्रमादाचा त्याग करून आत्मस्वरूपांत एकाग्र होऊन बाह्य परिग्रहापासून निर्वांछक झालास तर गुप्ती समिती आदी साधने तुला हस्तगत झालीत म्हणून समज.

एवमक्लेशगम्येऽस्मिन्नात्माधीनतया सदा ।
श्रेयोमार्गे मतिं कुर्याः किं बाह्ये तापकारिणि ॥ ६१ ॥

अर्थ :– याप्रमाणे गुप्ती आदि साधना केल्यामुळे मोक्षमार्गाची प्राप्ती सहजासहजी होते. म्हणून हे आत्मन् तूं त्या सर्व संवरास कारणभूत आत्माश्रित स्वभावसाधनेत तन्मय हो. तेथे चित्त एकाग्र कर. परपदार्थामधील आसक्तीला दुःखदायक जाणून तिचा त्याग कर.

शुष्कनिर्बन्धतो बाह्ये मुह्यतस्तव हृद्व्यथा ।

---

श्लोकांक (५९) नरिन्ध्रपोतवत् - जलागमनछिद्ररहितपोतवत् । निरपायः - अपायरहितः। (६२) शुष्कनिर्बन्धतः - व्यर्थसम्बंधतः, निष्फलनिरोधात् । प्रत्यक्षनिरयोचिता - नरकगतौ यथा इत्यर्थः । बाह्ये - बाह्यवस्तुनि ।



प्रत्यक्षितैव नन्वात्मन्प्रत्यक्षनिरयोचिता ॥ ६२ ॥

अर्थ :– बाह्य परवस्तूमध्ये आसक्तीमुळे बाह्य वस्तूमध्ये झेप घेणाऱ्या तुला ज्या काही व्यथा भोगाव्या लागतात त्या तर हे आत्मन् ! प्रत्यक्ष नरकयातनेसारख्याच आहेत !

## ९ निर्जरानुप्रेक्षा

रत्नत्रयप्रकर्षेण बद्धकर्मक्षयोऽपि ते ।
आध्मातः कथमप्यग्निर्दाह्यं किं वावशेषयत् ॥ ६३ ॥

अर्थ :– तूं बांधलेल्या कर्माचा क्षय करशील व संवराच्या कारणाने नवीन कर्मबंध रोकल्यामुळे हे आत्मन् ! तूं सर्वच घातिकर्मे जाळून दग्ध करशील व तूं केवली होशील. ज्यातून पाणी बाहेर जातच आहे आणि बाहेरून पाणी प्रवेश करू शकत नाही अशा जलाशयामध्ये पाणी कसे बरे राहील ? तद्वत् पूर्वबद्ध कर्मांची निर्जरा आणि संवरद्वारा नूतन कर्मांचा निरोध झाला असतांना कर्मांचा क्षय कसा होणार नाही ?

क्षयादनास्त्रवाच्चात्मन्कर्मणामसि केवली ।
निर्गमे चाप्रवेशे च धाराबन्धे कुतो जलम् ॥ ६४ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! कर्मांचा संवर व निर्जरेमुळे तूं केवली होशील. जुने पाणी जात असेल व नवीन येत नसेल तर तलावामध्ये पाणी कसे राहील ?

रत्नत्रयस्य पूर्तिश्च त्वयात्मन्सुलभैव सा ।
मोहक्षोभविहीनस्य परिणामो हि निर्मलः ॥ ६५ ॥

अर्थ :– हे आत्मन् ! रत्नत्रयाची पूर्णता प्राप्त करणे हे तुला सहजसाध्य आहे. मोह आणि क्षोभ (चंचलतेने) रहित असा आत्म्याचा परिणाम हा अत्यंत निर्मल शुद्ध होतोच.

परिणामविशुद्ध्यर्थं तपो बाह्यं विधीयते ।

---

श्लोकांक (६३) आध्मातः - सम्यक् संधुक्षितः । (६४) केवली - मुक्तबंधः भवेः इति शेषः। धाराबन्धे - सरसि । (६५) मोहक्षोभविहीनस्य - मोहनीयकर्मव्यापारविहीनस्य ।

न हि तण्डुलपाकः स्यात्पावकादिपरिक्षये ॥ ६६ ॥

अर्थ :– या परिणामांच्या विशुद्धतेकरिता बाह्य अनशनादि तपाची साधना सांगितलेली आहे. अग्नी, पाणी इत्यादि बाह्य साधनसामग्रीचा यथोचित संयोग नसेल तर तांदूळ कसे काय शिजणार ? अर्थात् शिजणार नाहीत.

परिणामविशुद्धिश्च बाह्ये स्यान्निःस्पृहस्य ते ।
निःस्पृहत्वं तु सौख्यं तद्बाह्ये मुह्यसि किं मुधा ॥ ६७ ॥

अर्थ :– परिणामांची विशुद्धता बाह्य पदार्थामध्ये आसक्तीचा जर त्याग केलास, निस्पृह झालास तरच संभवनीय आहे. निस्पृहत्व हेच तर खरे सुख आहे! म्हणून हे आत्मन् ! तू बाह्य पदार्थामध्ये का बरे निष्कारण मोहित होतोस ?

गुप्तेन्द्रियः क्षणं वात्मन्नात्मन्यात्मानमात्मना ।
भावयन्पश्य तत्सौख्यमास्तां निःश्रेयसादिकम् ॥ ६८ ॥

अर्थ :– इंद्रिये आपल्या वश करून एक क्षणमात्र अत्यल्प काळ मात्र आपल्या आत्म्याला आपल्या आत्म्यामध्येच आपल्या आत्मसामर्थ्याचे साधनाने जर तूं आत्म्याची भावना करशील तर त्याद्वारांच तुला आत्मोत्थ सुखाचा अनुभव येईल. मोक्षसुखाचा अनुभव तर दूरच असू देत आणि एकदा ते सुख कसे असते याचा अनुभव एकदा तरी घे.

अनन्तं सौख्यमात्मोत्थमस्तीत्यत्र हि सा प्रमा ।
शान्तस्वान्तस्य या प्रीतिः स्वसंवेदनगोचरा ॥ ६९ ॥

अर्थ :– आत्मोत्थ सुख अविनाशी आहे. यात कसलाही यत्किंचितही संशय नाही कारण शांत व निर्मल हृदयांत प्रत्यक्ष अनुभवात येणारा जो कल्पनातीत व स्वसंवेदनास गोचर आत्मानंद तोच त्याचा सबळ पुरावा आहे.

---

श्लोकांक (६६) पावकादिपरिक्षये - वन्ह्याद्यभावे । (६८) गुप्तेन्द्रियः - निगृहीतेंद्रियः । निःश्रेयसादिकं - मोक्षादिकं । (६९) प्रमा - ज्ञानं । स्वसंवेदनगोचरा - आत्मज्ञानैकविषया ।



## १० लोकानुप्रेक्षा

प्रसारितांघ्रिणा लोकः कटिनिक्षिप्तपाणिना ।
तुल्यः पुंसोर्ध्वमध्याधोविभगास्त्रिमरुद्धृतः ॥ ७० ॥

अर्थ :– पाय पसरलेल्या पुरुषाप्रमाणे तसेच आपल्या कमरेवर हात ठेवलेल्या पुरुषाप्रमाणे हा लोक आहे. त्याचे १ ऊर्ध्वलोक २ मध्यलोक आणि ३ अधोलोक असे तीन भेद असून तो तीन वातवलयांनी वेढलेला आहे.

